म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र २६५२
IRBK-0102652
IRBK-0102652
IRBK-0102652

# समाज-चित्रें भाग २

लेखिकाः- सौ. गिरिजाबाई केळकर.

गृहिणीभूषण, राजकुंवर, हीच मुलीची आई

वगैरे पुस्तकांची लेखिका— यांनीं लिहिलें.

हें पुस्तक धुळें येथें ' खानदेशवैभव ' छापखान्यांत छापिलें.

आवृत्ति १ ली. प्रती १०००.

IRBK-0102652

[ सर्व हक्क राखून ठेविले आहेत. ]

सन १९३४

2652
किंमत १ रु. ४ आ.

# अनुक्रमणिका.


| गोष्टीचें नांव | पान नंबर |
|---|---|
| ( १ ) भ्रमनिरास | १ |
| ( २ ) पतिता | २९ |
| ( ३ ) संधिकाल | ४७ |
| ( ४ ) दैवयोग | ५५ |
| ( ५ ) विठोबाची वारी | ६२ |
| ( ६ ) एकच घोट | ६८ |
| ( ७ ) खरें सुख | ८१ |
| ( ८ ) जुगारी संपाद | ८७ |
| ( ९ ) समता | ९७ |
| ( १० ) कृतज्ञता | १०३ |
| ( ११ ) आंगठीचा प्रभाव | ११५ |

# प्रस्तावना.

लघुकथांचा काळ आतां पालटला आहे. ज्या काळीं मी लघुकथा लिहायला सुरवात केली, त्या काळापेक्षां हल्लीं लघुकथा लिहिणारे लेखक—लेखिका पुष्कळ वाढल्या आहेत आणि त्यांमध्यें पुष्कळ प्रकारही झाले आहेत. काळाच्या बदललेल्या पारिस्थितीची प्रतिबिंबें त्या लघुकथांतून दृष्टीस पडतात. पण तरुणाच्या उडीबरोबर प्रौढ माणसाची उडी पडणें शक्य नसतें, तरीपण करमणुकीची आवड दोघांनाही असते, ह्मणून मी करमणुकीसाठीं या लघुकथा लिहिल्या. आतां त्यांमध्यें नवीन अगर पुढारलेल्या विचाराचा वा आचाराचा फारसा संबंध आला नाही तरी लघुकथा ज्याकरितां आपण वाचितों तें काम साधेल असें वाटतें. ज्यावेळीं आपण थकले भागलेले असतों, वर्तमान पत्रांची कटकट किंवा फिलॉसफीची वटवट यांपासून लांब रहावेंसें जेव्हां वाटतें तेव्हां सुद्धां पडल्या पडल्या कांहीं तरी वाचावेंसें वाटतें. अशा वेळीं मनाला आनंद देणारें साधन ह्मणून आपण गोष्टी अगर कादंबरी यांचा उपयोग करतों. मन रिझविण्यकरितां पहावयाच्या चित्रांत तें आधुनिक शेपटा सोडलेल्या मुलीचें आहे, कीं परकर व गांठीच्या चोळीच्या मुलीचें आहे, हें आपण फारसें पहात नाहीं. आपण एवढेंच बघतों कीं,एक लहानशी सुंदर निष्पाप बालिका आहे या दृष्टीनेंच आपण त्या चित्राचें कौतुक करतों. तशीच हीं माझी चित्रें आधुनिक पेहेरावानीं नटलेलीं नसलीं, तरी समाजांत वावरणाराला व बघणाराला दिसणारीं चित्रें आहेत. त्या चित्रांची कल्पना सर्वांनाच पटणारी नसली तरी चित्रकारानें चित्रास घेतलेला विषय चित्रांत बरोबर ग्रथित झाला आहे कीं नाहीं, एवढेंच रसिक वाचक

पहात असतो. या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे मला दिसलेली समाजांतील चित्रें यथाशक्ति मी यांत रंगविलीं आहेत करमणुकीच्या अथवा विश्रांतीच्या वेळेला कांहीं तरी ह्मणून जें वाचायला लागतें त्याला याचा उपयोग होईल आणि त्यांत दाखविलेले तत्त्व पटलें तर कांहीं वेळ डोक्यांत ठेवावें, नाहींतर विश्रांती नंतरच्या वामकुक्षींत तें विरू द्यावें. अशा बुद्धीनेंच हीं चित्रें मी माझ्या शक्तीप्रमाणें रंगविलीं आहेत. पण मी आधुनिक चित्रकार तर नाहींच पण कुशल चित्रकार ही नसल्यामुळें तीं सर्वांचेंच कितपत मनरंजन करूं शकतील याबाबत मला सुद्धां शंकाच आहे. तरी देखील इतस्ततः विखुरलेलीं पुष्पें एकत्र करून त्यांची माला सरस्वती देवीला अर्पण करावी ह्मणून तीं एकत्रित केलीं आहेत, तेव्हां ही सदिच्छेनें गुंफलेली माला वाचक वर्ग सहृदयतेनें पाहील अशी अपेक्षा करितें.

ज्या जगन्नियंत्याच्या कृपेनें ही माला गुंफण्याचा प्रसंग आला त्याचे आभार आपण यत्किंचित् मानवांनीं काय मानायचे ! पण त्या प्रभूचें स्मरण करितें.

" चि. भय्यासाहेब उपासनी " यांनीं आमच्या जुन्या ऋणानुबंधाप्रमाणेंच हें पुस्तक आपुलकीच्या भावनेनेंच तयार केलें याबद्दल " मुद्रक " या नात्यानें त्यांचे आभार मानायचे, पण वडिलांनीं लहानांचे आभार कसे मानावे ? ह्मणून त्यांचे नुसतें कौतुकच करते.

गुरुवार—२२।२।३४ 
न्यू प्रताप मिल धुळें, प. खानदेश. } **सौ. गिरिजाबाई केळकर.**

# समाज-चित्रें.

## गोष्ट १ ली.

### भ्रमनिरास.

वसंत मनोहराची जोडी ही लहानपणापासूनची जोडी, ती अद्याप जोडीच होती. बालवर्गापासूनचे हे मित्र अद्याप खऱ्या मित्राप्रमाणेंच राहिले होते. सख्खे भाऊसुद्धां एकत्र रहावयाला नाखुष असतात. पण हे दोघे मित्र निरनिराळ्या व्यवसायांत पडूनसुद्धां एकत्र राहिले होते. वसंतराव एल् एल्. बी. वकील होते, तर मनोहरपंत एल्. एम्. अँड एस. डॉक्टर होते. दोघांनीं धंद्यांत पडल्यावर एकत्र बिऱ्हाड करून एकाच गांवांत धंद्याला सुरुवात केली होती. सुदैवानें दोघांच्या बायकाहि सारख्याच व चांगल्या होत्या. वसंतरावाची मालती व मनोहरपंतांची मनोरमा ह्या समवयस्क मुली असून दोघी चांगल्या घरच्या होत्या. दिसण्यांतहि त्या दहाजणीसारख्या दिसत. दोघींचें पटेहि चांगलें, दोघी एकमेकींशीं खेळमेळीनें वागून संसार कामें करीत. एकीनें केर काढला तर दुसरी चूल पेटवी एकीनें चहाचे आधण ठेविलें तर दुसरी पेलेबशा मांडी, एकीनें भांडीं घासायला घेतलीं तर दुसरी विसळायला हजर असे. अशा तऱ्हेनें आरंभाचे दिवस मोठे गमतींत जाऊं लागले पण जसजसा परिचय वाढत चालला तसतसें दोघींच्या स्वभावांतलें अंतर समजूं लागलें. मनो-

रमेला नेहमीं नवा विषय आवडावयाचा, कांहीं तरी नवी धडपड करावी असें वाटायचें, तर मालती गप्प. मनोरमा थडाथडा बोलेल तर मालती अबोल; मनोरमेचा राग लोभ तोंडावर दिसेल तर मालती गंभीर. असा स्वभावभेद हळूहळू लक्षांत येऊं लागला. उलट पुरुषांच्याहि स्वभावांत भेद होताच. डॉक्टर शांत, गंभीर सरळ मनाचे होते तर वकील थट्टेखोर व बोलके होते मनोहरपंतांचा बहुतेक वेळ त्यांच्या व्यवसायांत जाई. नाहीं ह्मणायला दुपारचे ते जरा घरांत असतच त्यावेळीं जरा वामकुक्षी, वर्तमानपत्राचें वाचन वगैरे चाले. तर उलट मनोरमाबाईंना या वेळेस वकील घरीं नसतात, तर पतींनीं आपल्याशीं गप्पागोष्टी कराव्या, कांहीं वाचावें, कांहीं विनोद वगैरेंत वेळ जावा वाटे त्यांना जरा टापटिपीची नीटनेटकपणाची आवड असे ह्मणून त्या आपल्या खोलीला रोज नवीन तऱ्हेनें सजवायची खटपट करीत. त्यांना वाटे एखादे वेळेस तरी पतिराज हें कोणीं केलें ? नाहीं, तर हें सुरेख दिसतें, वगैरे एखादा शब्द तरी प्रोत्साहनाचा बोलतील, पण व्यर्थ. मनोहरपंताचा कार्यक्रम, स्वभाव सर्व ठराविक उलट वसंतराव जरा एवढें कुठें कांहीं नीटनेटके चांगलें पाहिलें असेल तें सांगायचे. पण मालतीबाईंना तें आवडतच नसे. चार मण्डळी चहाला आली तरी कांहीं तरी नवा पदार्थ करून तो नीटनेटका सजवून बाहेर धायची मनोरमाबाईंची धडपड असायची. मालतीबाई दुसरेंच कांहींतरी उद्योग करीत पण मण्डळी गेल्यावर वसंतराव घरांत आले ह्मणजे पानावर बसल्यावर दुपारच्या गोष्टी निघाल्या ह्मणजे मनोरमाबाईंची खूप स्तुती करीत. तर मनोहरपंत ह्मणत " त्यांत काय मोठसं ? दोघींपैकीं कोणीतरी करायचं, तिनं केलं. ती नसती तर मालती वहिनींनीं केलं नसतं कीं काय ?" अशा तऱ्हेनें चाले. तेव्हां

मनोरमेला असं वाटे कीं, आपल्या यजमानांना स्वतः बायकोचं कौतुक करायाला नको, बोलायला नको. पण दुसऱ्यानें फुकाचें चांगलें ह्मटलेलें सुद्धां खपत नाहीं. असे विचार आले ह्मणजे त्यांनां वाटे, आपला भ्रतार-योगच चांगला नाहीं. माहेरी आई सावत्र, ती कधीं बरं ह्मणत नव्हती. उलट जर बाबा मला कुठें हुशार, चांगलं ह्मणाले कीं, माईनीं दुप्पट तिरस्कार करावा. वाटलं होतं लग्न झाल्यावर तरी सुख मिळेल, पण तें दैवांतच नाहीं. ह्यांचा स्वभाव अगदीं विक्षिप्त, यांनां कांहींच नको. मग आपलं काय अडलं असं ह्मणून तिनें नवऱ्याचें कांहींच बघूं नये. नेहमीं नाखुष फुरगटलेलें असें असावें. पण मनोहरपंत पडले शांतीचे परब्रह्म ! तेसुद्धां कधीं रागवत नसत. सकाळीं उठावें, दवाखान्यांत जावें, दुपारीं उशीरा येऊन जेवावें. पुन्हां पांचाला चहा घेऊन बाहेर. ते रात्रीं आठसाडेआठला घरीं.

[ २ ]

अशा तऱ्हेनें दिवस जात असतां लढाईची गर्दी उसळली. सरकारला हिन्दी प्रजेच्या मदतीचा प्रेमपान्हा फुटला तर लोकांनां साम्राज्य-सरकारला मदत करायची प्रेमस्फूर्ति झाली. निरनिराळ्या रूपानें महा-युद्धांत मदत होऊं लागली. तेव्हां आपल्यांतलं गेलेलें शौर्य आणून पहावें, ह्मणून पुष्कळ लोकांना इच्छा झाली त्यांत मनोहरपंतांनीं डॉक्टरी कमिशनची मागणी केली तेव्हां सरकारला तें पसंत पडून त्यांची निवडणूक होऊन त्यांना केव्हां कुठें रुजूं व्हावयाचें तें पत्र मिळालें. अर्थात् घरांतल्या व्यवस्थेचे विचार सुरूं झाले. व्यवस्था व्यवस्था ती काय ? यांनां आप्तांपैकीं कोणी नव्हतेच. बायकोच्या माहेरची मण्डळी फक्त होती त्यांनीं यांना भेटायला बोलवलें व मनोरमाबाईनां आपल्या-

कडे ठेवा ह्मणून सांगितलें. वसंतरावांची एक बहीण ताई ह्मणून होती, ती या दोघांवर सारखेच प्रेम करी. ती भेटायला आलीच होती. आतां प्रश्न फक्त मनोरमाबाईच्या रहाण्याचाच उरला. आपण जाणार, आपल्यामागें बायकोची व्यवस्था काय करावी अशी हुरहुर मनोहरपंतांना लागलीच होती व मनोरमाबाईंनाहि सारखें तसेंच वाटे. त्या पतिपत्नीचें याबद्दल पुष्कळ बोलणें होई, पण निकालच लागेना. जाण्याची तयारी झाली, दिवस जवळ आले; सर्वांच्या गाठीभेटी झाल्या, आप्तस्वकीयांच्या मेजवान्या झाल्या. पण अद्याप मनोरमाबाईंनीं कुठें रहावें हें ठरलें नाहीं. आतां निघायचें. पतिविरह कोणा स्त्रीला सुखावह होतो? मनोरमाबाईचे डोळे रडून रडून लाल झाले. अनेक देवांना त्यांनीं पतिदेवाला सुखी ठेवण्याकरितां नवस केले. मनोहरपंतांचा गंभीर स्वभाव विरघळला व ते विनवणीच्या व करुणस्वरांत ह्मणाले, " तूं खर्चाची काळजी करूं नकोस. जेथें तुला सुख वाटेल तेथें रहा. माई जरी कडक असल्या तरी त्या आतां तशा वागावयाच्या नाहींत. शिवाय बाबा आहेतच. " इतक्यांतच वसंतराव कांहीं कामानिमित्त आले आणि ह्मणाले, तुह्मीं नसती काळजी कां करतां! तुह्मीं गेलांत ह्मणजे हें त्यांचें घर गेलें असें नाहींना होत? त्या येथें अगर कोठेंहि रहातील. आतां तुह्मीं तुमची व्यवस्था पहा झालं. निघायची वेळ झाली. मनोरमा, मालती, ताई दाराशीं आल्या. " ताई येतो हं, अण्णाची आठवण विसरशील बरं, वहिनी येऊं? संभाळा हां. मीं बाबांनां पत्र पाठवलं आहे. कोणीतरी आज उद्यां येइलच. हां, मी जाऊं? " असें त्यांनीं पत्नीकडे पहात ह्मटलें व जवळ जवळ जबरीनें आपलें पाऊल घराबाहेर टाकिलें. झालं, इतका

वेळ दबून राहिलेले अश्रू जास्त जोरानें बाहेर येऊं लागले व ते मोकळेपणीं यावे ह्मणून मनोरमाबाईंनीं आपल्या खोलींत जाऊन पलंगाची वाट धरली व एकदां मन मोकळं झाल्याशिवाय बरं वाटायचं नाहीं, ह्मणून या दोघीहि त्यांच्यामागें गेल्या नाहींत. दोन दिवसांनीं माहेरचा मनुष्य आला, पण आजच कशाला जायला हवं असें ह्मणून वसंतराव व मालतीबाई यांनीं त्याला परत लावला. ताई सासरीं गेल्या. यांचा दिनक्रम सुरू झाला. तिला बरं वाटावं, वेळ जावा, ह्मणून वसंतरावहि फार काळजी घेत. ते निरनिराळीं पुस्तकें पत्रें, वाचायला आणून देत. जेवतांना इकडच्या तिकडच्या गोष्टी काढून बोलत, कांहीं माहिती सांगत, त्यामुळें तिचा वेळ चांगला जाई मालतीबाई सुद्धां तिच्या मनाला दुःख होऊं नये ह्मणून जपत. पण या सर्वांचा परिणाम निराळा होत चालला. पहिल्यासारखे मनोरमाबाईंचें लक्ष कामावरून नाहींसें झालें. नवऱ्याचें ह्मणून जें काम लागे, तेंहि आतां उरलें नाहीं आला गेला तरी वकीलांचाच, घर वकीलांचेंच आणि संसार मालतीचा असें झालें. सकाळीं थोडेसें इकडे तिकडे करावं व मन रमवावयाच्या नांवाखालीं वाचीत बसावें. संध्याकाळीं हे घरीं केव्हां येतील, चहाच्या वेळेस कांहीं नवा विषय केव्हां मिळेल, असें त्यांना वाटे. तसा कांहीं निघाला कीं मग त्याच्यावर बोलण्यांत या बोलघेवड्याबाई गुंग होत. त्यांना मग मागचं पुढचं धोरण मुळींच रहात नसे. अशा वेळीं अर्थात् मालतीबाई रिकाम्या पडत. पण ही गोष्ट दोघांच्याहि लक्षांत येत नसे व मानी मालतीबाई आपण होऊन मध्यें लुडबुड करायला जात नसत. या गप्पांचा परिणाम असा होई कीं, रोज रोज नवीं पुस्तकें वसंतराव वाचायला

आणून देत. ती त्या वाचीत, पुन्हां विचारीत, अशा तऱ्हेनें वसंतराव घरीं आले म्हणजे त्यांचा बराच वेळ मनोरमाबाईशीं गप्पांत जाई. अर्थात् ते बोलणें,बसणें, हास्य, विनोद यांपैकीं कोणत्याच तऱ्हनें मालतीबाईच्या वाट्याला येईनासें झालें. आतां मनोरमाबाईंनां आपल्यांत शिक्षणाची बरीच उणीव आहे, ती आपण भरून काढली पाहिजे असें वाटूं लागलें व तो विचार त्यांनीं यजमानांनाहि पत्रद्वारें कळविला व वसंतरावांजवळहि गोष्ट काढिली. त्यांचेंहि पत्र रिकामपणाचा वेळ अशा उद्योगांत घालणें चांगलें असें आलें व यांनींहि रुकार भरला. त्यांनीं शिक्षणाला आरंभ केला. अर्थात् दुपारचा वेळ शिक्षणाची पूर्वतयारी करण्यांत व रात्रीं चुकेल तें वसंतरावांनां विचारण्यांत जाई. अर्थात् अभ्यास व त्याबरोबर त्यांनां अनुसरून गप्पा यांत बरीच रात्र जाई. या सर्वांचा परिणाम इकडे मालतीच्या मनावर अनिष्ट होत चालला. सहवासानें मनोरमाबाईंचे कोटीक्रम, ती वादविवादशैली, ती शिक्षणाची उत्सुकता, या गोष्टी वसंतरावांचें मन आपल्याकडे ओढूं लागल्या. त्याबरोबर मालतीबाईंच्या संबंधाचें त्यांचें लक्ष्य कमी होत चाललें; कुठें कांहीं सभा वगैरे असली तर वहिनींनां चलण्याचा आग्रह होई, पण पत्नीला नांवालाच विचारीत. अर्थात् त्या नाहीं म्हणाल्या कीं, हीं दोघं चाललीं. मग, ते मुळींच विचारीनासे झाले. एकदां दोनदां या बाबतींत मालतीबाईंनीं तक्रार करतांच गोड शब्दानें सांगायचें एकीकडे राहून, तूं दुष्ट आहेस, तुला कोणाचें बरें पहावत नाहीं वगैरे शब्दांनीं पूजा केली. अर्थात् मालतीनें बोलायचें सोडलें. पण या वागणुकीची चर्चा आसपास होऊं लागली. केव्हांहि कोणी वकिलांकडे आले तर मनोरमाबाई खुर्चीवर बसलेल्या दिसत, पण

मालतीबाई कधीं कोणाच्या पहाण्यांत सुद्धां येत नसत. अर्थात् छिद्रान्वेषी जग त्यांच्यावर तेव्हांच टीका करी. पण ही बातमी मालतीबाई उठवितात असें मनोरमाबाईचेंही ठाम मत झालें होतें व त्याचाच प्रतिध्वनी वसंतरावांच्या मनावर उठूं लागला. याचा परिणाम पतिपत्नीच्या विरोधांत होऊं लागला याच सुमारास ताई माघारपणाकरितां आल्या होत्या. तिनें हें सर्व घरांतील धोरण पाहिलें. तें पाहून तिला फार खेद झाला. तिनें एकदां मालतीबाईच्या प्रकृतीबद्दल वसंतरावाजवळ गोष्ट काढून पाहिली, पण त्यांत पहिला अनुराग न दिसतां रागच दिसूं लागला. मनोरमा सुद्धां पहिल्याप्रमाणें यांच्यांत बोलाचालायला, गप्पा मारायला किंवा कुठे बसाउठायला जायला येत येत नसे. एकदां दोनदां ताई ह्मणाल्या " वहिनी, मी आहे तोंपर्यंत जरा चार दिवस कुठें तरी बसायला चला कीं हो; सारखं घरांत वसून कंटाळा येतो हो. " ह्मणजे त्या ह्मणायच्या, " मला बायकांत जाऊन लोकांच्या उठाठेवीच्या कुचक्या, नासक्या गप्पा नाहीं आवडत. मी आपली घरांतच बरी. तुह्मींच जा. " ह्मणजे अर्थात् ताईचें तोंड बंद होई. या परिस्थितीला कंटाळून मालतीबाई माहेरीं गेल्या, पण तेथें तरी किती दिवस रहाणार बरं ! पतिराजांची तर त्यांच्यावरची मर्जी इतकी बहार होत चालली कीं एकदां परत बोलवावयाच्या पत्राखेरीज त्यांनीं मुळींच पत्र लिहिलं नव्हतं. त्या गेल्यावर थोड्याच दिवसांत मनोरमाबाईहि आपल्या माहेरीं गेल्या. पण तेथें हातपाय न हालवतां बसून रहायचें, पुरुषी थाटाचें वर्तन त्यांच्या सावत्र आईला मुळींच रुचत नसे जावई परदेशांत गेलेले, कधीं नव्हे ती मुलगी आलेली ह्मणून त्या बोलत नसत. त्यामुळें प्रेम, आपलेपणा मन-

मोकळेपणा त्यांना मुळींच वाटत नसे अर्थात् मालतीबाई आल्यावर, वसंतरावांचें पत्र मालतीबाईंना सोबत हवी ह्मणून आलें व तेवढ्या निमित्तवर त्या परत आल्या. पण यांच्या कार्यक्रमांत कांहीं सुधारणा होईना. पतीचें लक्ष्य आपणाकडे जावें, आपल्या हक्काचें प्रेम आपणाला मिळावें ह्मणून मालतीबाईंनीं बरीच खटपट करून पाहिली, पण त्यांत यश देण्याऐवजीं उलटाच परिणाम होऊं लागला. मनोरमाबाईंच्या दाट परिचयामुळें वसंतरावांच्या डोळ्यांवर एक प्रकारचें दाट आवरण चढलें. उलट मनोरमाबाई सुद्धां आपला पति परदेशीं आहे, त्याच्या करितां आपलें कांहीं कर्तव्य आहे, ही गोष्ट अजिबात विसरत चालल्या तोंच आज बरेच दिवसांत डॉक्टरचें पत्र आलें नव्हतें, त्याचें कारण ह्मणून त्यांच्या तेथील एका स्नेह्याचें यांना पत्र आलें कीं, डॉक्टर एकाएकीं नोकरी सोडून कोठे गेले त्याचा पत्ता नाहीं व आपला शोध कोणी करूं नये असें त्यांनीं मागें लिहून ठेविलें आहे. या पत्रानें ही मंडळी काळजींत आहे, तोंच मनोरमाबाई व वसंतराव यांच्या नांवांचीं पत्रें आलीं. त्याचा सारांश असा होता कीं, मला संसाराचा कंटाळा आला आहे. हिंदुस्थान आणि परदेश दोन्हीं तऱ्हा अवलोकन करून माझें मन अगदीं विटलें आहे. निव्वळ स्वार्थासाठीं, ऐहिक सुखासाठीं आपण माणसें ज्या धडपडी करितों, तें पाहून मन भांबावून जातें. ह्याच वेळेस मला योग्य मार्गदर्शक मिळाल्यामुळें मी परमेश्वरविषयक विचार करूं लागलों आहे. मला अध्यात्मज्ञानाची लालसा उत्पन्न झाली आहे, ह्मणून मी तिकडे जात आहे. माझा शोध करण्याचा प्रयत्न करूं नये. आतां यामुळें मनोरमेला दुःख होईल. पण तिची व्यवस्था मी नीट करून ठेविली आहे ह्यांत तिला श्रीमंतीनें जी

नाहीं तरी कोणाच्या तोंडाकडे न पहातां रहातां येईल. तिनेंहि शक्य असेल तर पारमार्थिक गोष्टींची गोडी लावून घ्यावी. नाहीं तर जगाप्रमाणें आहे तें खाऊन कुठेंहि स्वस्थ रहावें व सुखी व्हावें. मला मात्र क्षमा करावी, हीं पत्रें वाचून काय वाटलें असेल तें त्या दोघांनांच माहीत. मालतीबाईनां मात्र हा अपशकून वाटला. त्यांच्या वडिलांचेंहि त्यांनां पत्र आलें. त्याचें कांहीं उत्तर गेलें व मनोरमाबाई तेथेंच राहिल्या. सध्यां वसंतरावांची प्रॅक्टीसहि चांगली चालली होती. लक्ष्मी त्यांच्यावर प्रसन्न असून, बाहेरहि चांगली मानमान्यता वाढत चालली होती. गांवांत आला गेला त्यांनां भेटायला येई. कोणत्याहि सार्वजनिक कार्यांत हे सढळ हातानें मदत करीत. त्यांचा परिवारहि मोठा झाला असून चांगल्यापैकीं होता. मात्र त्यांत एकच कमीपणा होता कीं, बाह्यलक्ष्मी जरी प्रसन्न होती, तसेंच भाग्यरवी जरी चढतीवर होता, तरी गृहलक्ष्मी मात्र नाखुष, इतकेंच नव्हे तर खंगत चालली होती. कारण मालतीबाई हल्लीं आजारी होत्या. अन्न जात नसे, अंग दुखे, कसेंसें वाटे, केव्हां केव्हां बारीक तापहि येई. पण त्याची जाणीव कोणालाच नव्हती. कोणाला असणार ? घरांत माणसें इन मिन तीन. त्यांत वसंतरावांचा त्यांचा जवळ जवळ अबोलाच. कांहीं प्रासंगिक गरजेनें बोलावें तर कारकून सर्व बाजारहाट पहात असे. आल्यागेल्याच्या निमित्तानें बोलावें तर ती जागा मनोरमाबाईनीं घेतली होती. कोणाला जेवायला बोलवायचें, कोणाला नाहीं, कोणाला चहाला बोलवायच, हें सर्व त्यांच्या विचारें ठरे. आतां या दोघी उरल्या, त्यांचीहि तीच स्थिति. त्यांच्यांत जाहीर अबोला नव्हता. गरजच लागली, अडलंच तर पाणी द्या, जेवायला चला असें दोघीं एकमेकींनां ह्मणत. पण

इतकेंच. त्यांत मनोरमाबाईचें अडत नसे. त्या कांहीं वाचीत. वसंतरावांशीं गप्पा मारीत, फार झालें तर संध्याकाळीं कधीं फिरायला, कधीं व्याख्यानाला ह्मणून बाहेर जात. उलट मालतीबाईचें हल्लीं बाहेर बसायला जाणें सुद्धां कमी झालें होतें. त्याचें एक कारण ह्मणजे, ही गेली कीं हिच्याकडे कोणी तरी येणार. पण अशा तऱ्हेनें कोणी आल्या गेल्या ह्मणजे मनोरमाबाई त्यांच्यांत मिसळत नसत व बायकांचा द्वेष करीत. दुसरें, ही लोकांकडे गेली ह्मणजे, बायका, त्या बायकाच. एकीनें मुद्दाम ह्मणावें, ' कांहो, जाऊबाई नाहीं आल्या ? ' कीं दुसरीनें ह्मणावें ' पुरें जाऊबाई,' कीं तिसरीनें जरा करुण स्वरानें ह्मणावें 'काय बाई तरी, अशी सुरेख बायको असून एवढा शहाणा सुरता मनुष्य, ' कीं लगेच पहिलीनें ह्मणावें, 'अहो पण त्या मनोरमाबाईना नको का कांहीं वाटायला ? जनाची नाहीं पण मनाची तरी? गरीब बिचारा नवरा, गेला तिकडेच गेला.' अशा एक नी दोन बोलण्यानें मालतीबाईना आपण कुठून आलों असें होई. अशी चर्चा आपल्याबद्दल होते, असें क्वचित् त्यांच्या कानावर आलें कीं, वसंतरावांनां बायकोला खाउं का गिळूं असें होई. यामुळें त्यांचें जें पत्नीकडे दुर्लक्ष होतें तेथें द्वेषानें ठाण दिलें. त्यांनां तिच्याबद्दल तिरस्कार वाटूं लागला. केव्हां केव्हां मनोरमाबाईनीं ' त्यांनां माझ्यामुळं सुख होत नाहीं, मी जाते ' असें नाटक करावें, कीं, वसंतरावांनीं पत्नीला एकांतांत गांठून " तूं तिला कां छळतेस ? गरीब बिचारी दुःखी जीव, तिचा हेवा कां करतेस ? लोकांत विनाकारण आमची बेअब्रू करून तुला काय मिळतं ? तुला काय संशय येतो तो सांग ? असा लांबून हेवा कां करतेस ? आमच्या वर्तणुकीचा संशय असला

तर पुरावा धरून दे." एकना दोन, तोंडास येईल तें रागाच्या तडाख्यांत वडबडत जावें.

मनोरमाबाईंनां खरी इच्छा माहेरी जाण्याची नव्हतीच. अर्थात् इतकें नाटक झालें ह्मणजे थोडे दिवस ही कुरकर थंडावत असे. अशा परिस्थितींत मालतीबाईंच्या दुखण्याची काय दाद लागणार? त्या केव्हां केव्हां हांतरूण घालून निजूं लागल्या. एकदां डॉक्टरला बोलावून प्रकृतीहि दाखवली. डॉक्टरनीं औषध दिलें, पण गुण कशाला येतो! त्याच संधीस ताईचे यजमान कांहीं कामानिमित्त येथें आले होते. अर्थात् ते मेहुण्याकडे चार दिवस पाहुणे होते. पण त्यांनां सुद्धां यांच्या घरांतील वागणूक चमत्कारिक वाटे. वसंतराव त्यांच्याशीं सुद्धां नीट बोलत चालत नसत. एवढा मेहुणा पाहुणा आलेला ह्मणून यांनीं कधीं पत्नीला हांक मारून अमकें वाढा किंवा अमकें करा ह्मटलें किंवा एरवी तरी हे केव्हां एकीकडे बोलतांना, एकमेकाकडे बघतांना किंवा हंसतांना आढळले आहेत असें नाहीं. व्यवहार गुपचूप चालायचा ते गोंधळांत पडले. त्यांना मग जास्तच लक्ष द्यावेसें वाटायला लागलें. मनोरमाबाईची वसंतरावांची सलगी त्यांनां जरा खेदजनक वाटली. पण नात्याचा मनुष्य कशाला बोलतो? जातांना त्यांनां वाटलें कीं मालतीबाईंनां विचारून जावें, ह्मणून ते स्वयंपाकघराच्या दाराशीं गेले. वसंतराव बरोबर होतेच. ते दारांतून ह्मणाले, मीं येतों, कांहीं निरोप आहे का? तेव्हां मालतीबाई पुढें आल्या व ह्मणाल्या, "निरोप कशाला त्यांनांच पाठवा. येऊन फार दिवस झाले. कधींपासूनच बोलवायच्या आहेत पण अडचणीमुळें राहिलें, आतां ठीक आहे, तरी जरूर जरूर पाठवावे. आतां निराळें

पत्र नकोना ! तेव्हां वसंतरावांनांहि ह्मणणें भाग पडलें कीं, "ताईला थोडे दिवस पाठवा. या खेपेला तिचें येणें बरेंच लांबलें आहे. आपण जाण्याबरोबरच पोंचती करा, नाहींतर मनुष्य पाठवितों." अर्थात् त्यांना पाठवायचें वचन देऊन जाणे भाग पडलें. आजपर्यंत ताई ७ महिन्यांनीं येत असे, पण अलीकडे वसंतरावांची वृत्ती चमत्कारिक झाली होती; त्यांमुळें त्यांनां आप्त माणसांचें कांहींच वाटत नव्हतें. उलट ताई जरा बोलली होती ह्मणून तिचा रागच होता. पण कांहीं आंतड्याची ओढ व कांहीं जनलज्जा ह्मणून ताईला आणावी लागली.

ताई आल्यानें मालतीबाईंना जरा बरें वाटलें. बोलाचालायला मनुष्य झालें. जरा वेळ बरा जाऊं लागला, पण ताप सोडींना. डॉक्टर ह्मणत हें असेंच चालल्यास क्षयावर जाईल. वसंतराव ह्मणत, सांगाल तें औषध देतों किंवा एखाद्या सॅनिटेरियममध्यें पाठवतों. पण मालतीबाई कोठेंच हालण्यास तयार नव्हत्या. आतां त्या आपला रिकामपणाचा वेळ ईश्वराकडे लावूं लागल्या. मनुष्यस्वभावच असा आहे कीं जो नास्तिक असेल तोसुद्धां संसारांतील स्वतःच्या कार्यक्षेत्रांत निरुत्साही झाला ह्मणजे मग त्याला देव आठवूं लागतात. अगदीं सुखांत असतांना, सर्व अनुकूल असतांना, ईश्वराची आठवण करणारीं माणसें फारच थोडीं. पण निराशेच्या वेळेस त्याच्याशिवाय शांतीचें स्थानच सांपडत नाहीं व तोहि बिचारा असा क्षमावान् व दयाळू आहे, कीं मागलेंपुढलें न बघतां त्याला आठवावा तेवढ्यापुरतें शांतिसौख्य देतो. त्याच शांतीचा लाभ आपल्याला मिळावा ह्मणून मालतीबाईंनीं हल्लीं त्याला जवळ केला होता ताई आल्यानें थोड्या इकडे तिकडे बोलत चालत,

पण निराशेनें त्यांना पूर्ण ग्रासलें असल्यामुळें त्या आतां आपलें दुखणें शेवटचें व्हावें असें इच्छित होत्या व ' मी आहे तोंवर चार दिवस माघारपणाला रहा हो ' असें त्या ताईला ह्मणत. या उद्गारांनीं त्यांना वाईट वाटे; पण तोंड सुचेना. यांनीं पाहिलें कीं आपण आलों आहों, तरी यांच्या वागणुकींत कांहींच फरक पडत नाहीं. दिवसा गप्पा, कोर्टाचें काम, रात्रीं १०–११ पर्यंत अभ्यास व त्याच्या नांवावर गप्पा, यांनां दोघांनां एकमेकांच्या सहवासाशिवाय कांहींच सुचत नाहीं. हीं दोघं जरी अद्याप घसरलीं नाहींत, मनाशीं सद्सद्विवेक बुद्धिचा झगडा करून टिकून आहेत, तरी तीं कांठावर आहेत. केव्हां कडेलोट होईल याचा नेम नाहीं. पण काय करावें ? पुष्कळ विचार केला. कांहीं सुचेना, वसंतराव आले ह्मणजे हिच्याशीं चार शब्द गोड बोलत. हीसुद्धां मालतीचें नांव न काढतां त्यांच्याशीं गोड बोले. पण डोक्यांत सारखें भ्रमण कीं, या दोघींचें कसें व्हावें. मालतीचा सौख्यनाश तर होताच, पण मनोरमेचाहि सर्वस्वी घात होतो. कारण ताईचें प्रेम वसंतदादावर होतें तितकेंच किंबहुना कांकणभर जास्त मनोहर उर्फ अण्णावर होतें. अण्णासुद्धां तिच्यावर सख्या बहिणीप्रमाणें प्रेम करीत तेव्हां त्याच्या नांवाला डाग लागावा, जगांत मनोरमेची नालस्ती व्हावी, हें तिला आवडेना. तिनें पुष्कळ विचार केला. मालतीबाईशीं गोष्ट काढली पण कांहीं सुचेना. उलट मालतीबाई ह्मणत ' तुह्मीं चार दिवस राहून आपल्या गोडींत जा. त्या माणसांना आतां कांहीं दुसऱ्याची जरूर उरली नाहीं. एखादे वेळेस अपमान व्हावयाचा.' पण ताईना तें पटेना. मग एक दिवस विचार करून तिनें ठरविलें कीं, आपण या बाबतींत दादाशीं न बोलतां

मनोरमाबाईशीं बोलायचें. पटलें तर ठीक. नाहीं तर वळकटी बांधून हजरच आहे. यापेक्षां ते आपलें जास्त वाईट काय करणार ? असें ठरवून एक दिवस तिसरे प्रहरीं वसंतराव गांवास गेले होते अशी संधी पाहून ती मनोरमेच्या खोलींत गेली. मनोरमा माडीवर आपल्या खोलींत ड्रॉइंगचें सामान घेऊन बसली होती. समोर वसंतरावांचा फोटो पडला होता अर्थात् तो काढून पहायचा कदाचित् तिचा विचार असावा. पण ताईला असें अवचित आलेलें पाहून ती एकदम घाबरली व गडबडीनें तें सामानच आवरायचा आव आणून फोटो लपवायला लागली. तशी ताई ह्मणाल्या " वा वहिनी तुह्मीं फोटो काढण्यापर्यंत ड्रॉइंग वाढवलं वाटतं ? मला तरी पाहूंदे; आपल्याला स्वत:ला जरी आलें नाहीं तरी लोकांचें पहायला मला आवडतें "

" वा वन्स, तुह्मीं कां असें ह्मणायचें ? तुमच्यासारखें रांगोळी काढणारें आहे कोण ? "

" पण वहिनी, फोटो नी रांगोळी निराळी "

" नाहीं वन्स, ही त्याची दुसरी तऱ्हा माझ्यासारखीला आतां कोणाला रांगोळ्या काढायच्या आहेत? ह्मणून हें काढून बघतें, कांहीं तरी मनाला विरंगुळा हवा नां ? "

" कां वहिनी तुह्मांला कोणाला काढायच्या नाहींत ? "

" आतां तें बोलणें काय करावयाचें. वन्स आतां कां मला संसार मांडायचा आहे, का कोणी माझ्या घरीं यायचें जायचें आहे. असंच कुठें तरी राहून कुठें तरी दिवस काढायचे. "

" छे, छे वहिनी, चुकतां आहां. मी पाहुणी आलें ह्मणजे

मला नको कां एक दिवस तरी रांगोळी काढायला ?"

"बाबूला नको का? ओवी आहेना, " मामा मांडी पाट मामी काढते रांगोळी."

" अहो त्याचे मामा पाट मांडायला लागले कीं त्याची मामी काढील."

" मग तुह्मी कोण, तुह्मी मामी नाहीं का? ह्मणजे अण्णानें जन्मापासून लावलेलं नातं अण्णा परदेशांत गेल्यावर वहिनी तुह्मी विसरणार कां? पण मला तें विसरतां येणें शक्य नाहीं. माझ्या अण्णाचें माझ्यावरचें प्रेम जर मी विसरेन तर कृतघ्न ठरेन. वहिनी तुह्मी तुमच्या लग्नापासून पहातां, पण त्याच्या आधींपासूनच्या गोष्टींचा एवढा चित्रपट आहे कीं, अण्णा ह्मटला कीं तो डोळ्यापुढें उभा रहातो. अण्णाच्या मांडीवर बसलेलं, खांद्यावर बसून पेरू तोडलेलं, पेल्यांतला निमा चहा गट्ट केलेलं, कसं विसरतां येईल ? अण्णा मुंबई-हून आला ह्मणजे आपल्या घराकडे जायच्या आधीं आमच्या घरीं येऊन माझा खाऊ, खेळ काय असेल तो माझ्या हातांत टाकून मग आपल्या घरीं जाई. माझ्या पहिल्या गरभारपणीं मी आजारी होते, तर हे भावी डॉक्टर माझी नाडी हातांत धरून सारखे बसले होते. आई, बाबांनीं किती आर्जव केले तरी प्राणी निजला नाहीं. ही गोष्ट तुह्मी इतक्यांत विसरला कां ! आमच्या खेडेगांवांत नर्स नव्हती, तर आपली एक क्लासमैत्रीण हा प्रदेश दाखवायच्या मिषानें माझ्या बाळंतपणा-करितां ह्मणून मुंबईहून बरोबर घेऊन स्वारी माझ्या वेळेला आमच्या येथें हजर. हीं दोघं आल्यावर तिसरेच दिवशीं मी बाळंतीण झालें. मग तीं दोघं परत गेलीं. सांगा बरं वहिनी, हें काम पैशानें

झालें असतं कां? आमच्या येथें तर सगळीं ह्मणालीं कीं, वसंतराव तर भाऊच आहेत, पण मनोहरपंताच्या प्रेमाला मोल नाहीं; मग वहिनी तुह्मीं नातं तोडून तुटेल काय? "

" पण वन्स, मी नातं तोडायचें कधीं ह्मटलें? पण मला आतां या जन्मांत कांहीं घर नाहीं! "

" वहिनी तूं घर ह्मण ह्मणजे होईल. तुझी तरतूद अण्णानें बरोबर केली आहे. "

" पण वन्स, एकट्या जिवाचें कसलें घर? कुठें तरी चार घांस खायचे "

" पण वहिनी, जेवायला हवं तोंपर्यंत सगळं हवं ना? मग तूं कां अशी निराश्रितासारखी वागतेस नी बोलतेस? निराळें घर करायची ऐपत आहे. कुठेंहि तुला तुझेपणानीं रहातां येईल.

" कुठें तरी रहायचें ह्मणून तर येथें आहे. ,,

" वहिनी, हें घर जरी तुमचेंच आहे, तरी रहाणें तुह्मांला खरोखरच भूषणावह नाहीं. मी तुह्मांला याबद्दल चार शब्द सांगेन ह्मणत. तुह्माला तें आवडो अगर न आवडो, पण कर्तव्य ह्मणून बोलून सोडणार आहे. ह्मणजे मला निदान कर्तव्य केल्याचें तरी समाधान होईल. "

या प्रस्तावनेनेंच मनोरमेला ही काय बोलणार हा अंदाज झाला होता. पण एकदम झिडकारतां येईना ह्मणून ती ह्मणाली " एवढं कसलं कर्तव्य राहिलं आहे कळूं दे तरी. "

" वहिनी, कळायला खरोखरच पाहिजे आहे. आपल्यामागें जग, आपल्याला काय ह्मणतं हें कळत नाहीं ह्मणून आंधळ्यासारखें चालतें

पण तें कळलं तर पुष्कळ सुधारतां येईल. तेव्हां आमच्या येथें रहाण्याबद्दल जग काय ह्मणतें तें तुह्मीं नको कां बघायला ?"

"जगाला काय बघायचें ? त्याला कोणाचेंच बरें बघवत नाहीं. त्यांत घरचींच माणसें ओरड करायला असल्यावर काय तोटा ?"

"वहिनी, घरचीं ओरडतात हेंच मुळीं खोटं असतं. घरच्यांनां खरी गोष्ट सांगायला नको असते. पण जग आपल्या डोळ्यांनीं बघतें व त्याला महत्त्व दिलेंच पाहिजे. जोंपर्यंत आपण जगांत रहातो, समाजांत रहातो तोंपर्यंत समाजाला महत्त्व दिल्याशिवाय चालत नाहीं."

"असें समाजाला सर्व भिते तर पुढाऱ्यांच्या हातून ज्या सुधारणा झाल्या, त्या झाल्याच नसत्या."

"कबूल, पण तें केव्हां? जर एकादें उच्चतम तत्त्व समाजाच्या गळीं उतरायचें असेल, त्यांत कांहीं समाजाचें ऐहिक अगर पारमार्थिक हित साधायचं असेल तर समाजाशीं विरोध करून त्यांच्या टीकांचे शस्त्रप्रहार सोसायचे, पण व्यक्तीच्या स्वतःच्या सुखासाठीं अगर स्वेच्छाचारी वर्तनासाठीं पुढाऱ्याचें नांव घेऊन जर व्यक्ती समाजापासून फटकून वागूं लागेल तर ती कांहीं स्वार्थत्यागाची गोष्ट होत नाहीं. त्यापासून समाजाला खालीं ओढल्याचें पाप मात्र लागेल."

"पण प्रत्येक पुढाऱ्याला हा असा समाजाचा बागुलबोवा टाकून द्यावा लागला आहे. जी गोष्ट आपण आपल्या सदसद्विवेक बुद्धीला विचारून प्रामाणिकपणानें करतों त्या गोष्टीकरितां या उठाठेवखोर माणसांनां कां ह्मणून भ्यायचें."

" पण तें केव्हां ह्मणायचें ? जर एखादें परोपकाराचें काम तुह्मीं दोघं मिळून करतां आहां आणि समाज टीका करायला लागला तर भ्यायचं नाहीं. पण हल्लींच्या तुमच्या वागणुकींत कांहीं विशेष साध्य साधायचा प्रयत्न आहे असें नाहीं. निव्वळ तुह्मीं तुमच्या लहरी मनाची हौस पुरवावयाचाच प्रयत्न करीत आहां. तुमचें शिक्षण धरलें तरी तें तुह्मांला एकट्यानें मिळवितां येण्याजोगे आहे; किंवा त्यासाठीं तुह्मांला एकमेकाचा इतका वेळ घालवायला नको. वाचनाची हौस पण ती व्यक्तीला स्वतंत्रतेनें पुरवतां येते. त्याहूनहि वाटलें तर तुह्मांला एखाद्या शिक्षणसंस्थेची मदत घेतां येईल. पण हे साधे आणि सरळ रस्ते सोडून लोकांनीं तुमच्याकडे बोटें दाखवावीं अशा तऱ्हेनें तुह्मीं वागतां व लोकांनां घरचींच माणसें सांगतात ह्मणून ओरडतां हा केवढा अन्याय वरं ! मांजर जरी डोळे मिटून दूध प्यायलें तरी घर मालकाचे डोळे उघडे असतात. तुमच्याकडे दोन दिवस आलेला मनुष्य सुद्धां ओळखूं शकतो कीं, दादाचें लक्ष बायकोकडे मुळींच नाहीं.

"पण त्यांनीं असं वागावं असं त्यांनां मीं सांगितलं आहे कां ?"

' वहिनी, मुद्दाम वेड घेऊन पेड गांवाला जाण्यांत काय अर्थ आहे ? पुष्कळ गोष्टी न सांगतांच होत असतात; आणि हें तुमच्या-सारख्या चाणाक्ष बुद्धीच्या माणसाला समजत नसेल असें कसं म्हणावें ? दादाचें मन मालतीवहिनीपेक्षां तुमच्याकडे जास्ती ओढतें हें तुह्मांला कळत कां नाहीं? सबंध दिवसांत तुमचे तासचे तास गप्पागोष्टींत जातात आणि तिच्या वाट्याला तितकीं मिनिटेंसुद्धां येत नाहींत, हें तुह्मांला

दिसत कां नाहीं? पतिपत्नीच्या आयुष्याचा अनुभव तुह्मीं कां घेतला नाहीं ? बरं, हाच दादा पूर्वी वहिनीशीं असाच कां वागत असेल ? मग आतां असं व्हायचं कारण काय बरं असावं? "

" त्यांना त्यांच्याजवळ बसायला मी थोडीच बंदी केली आहे ? ते कां बोलत नाहींत ? मी तर चार वेळां माहेरी जायला निघाले. त्यांनींच आग्रह करून ठेवून घेतलें. ते जर माझ्यावर शुद्ध मनानें भगिनीप्रेम करतात तर मी त्याचा अव्हेर कसा करूं ? "

" वहिनी, तुला त्याच्या भगिनीप्रेमाचा अव्हेर करायला आह्मीं केव्हांच सांगत नाहीं. पण तूंच पहा, तूं तुझ्या वडिलांच्या पितृ-प्रेमाचा अव्हेर नाहीं का केलास ? नुसत्या सावत्र आईच्या थोड्याशा स्वभावाकरितां तूं नाहीं कां झिडकारिलेंस. मग तें कां ? सांग बरं. मनुष्यस्वभाव मुळीं स्वार्थी, तेथें तुमच्या वडिलांच्या घरीं काय कमी आहे ? पैसा आहे, नोकर चाकर, सर्व आहे. जरासें आईच्या मर्जीनें रहायचें एवढेंच. पण तें तुह्मांला पटेना. येथें तुमच्या मर्जीनें सगळीं वागतात, काम धाम करायला नको, दुसऱ्याच्या तंत्रानें वागायला नको. उलट आपलीच मर्जी संभाळायला चार माणसें. हें मनुष्य-स्वभावाला केव्हांहि आवडतें. पण त्याचबरोबर दुसऱ्याच्या मनाचा तुह्मीं कोठें विचार करतां ? तुह्मी जर एक दिवस जेवला नाहींत, तर दादा चार वेळां "वहिनी उठा, जेवायला चला," ह्मणून आर्जव करितो. नाहीं तर तुह्मांला चहा कॉफी कांहीं तरी घ्यायला लावतो. पण तेंच उलट पहा, मालतीवहिनीच्या जेवण्याची तुह्मी कधीं चौकशी करतां कां ?"

'मी आपली रीतीप्रमाणें एकदोन वेळां ह्मणतें पण मला नाहीं बाई जास्त आग्रह करतां येत."

"तुह्माला नसेल येत, पण दादाला येतो हें तुह्मांला ठाऊक आहे. मग त्याला सांगावें, त्याला भाग पाडावें, आपल्या भावाचें, भावजयांचें कल्याण इच्छावें हा भगिनीधर्म नाहीं का? जर तुह्मी दादाची बहीण ह्मणवतां तर दादाच्या भरकटलेल्या मनाला विवेकाचा लगाम घालून जागेवर आणण्याचें काम तुमचें आहे. बरं भावजय झटली तर अण्णा वडील आहे. तुह्मी त्याची बायको, अर्थात् वडील भावजईला आईच्या जागीं मान असतो. तेव्हां या नात्यानेंही अधिकार-वाणीनें दादाला रागवावयाचें व वहिनीचें सुख दुःख बघायचें काम तुमचें नाहीं कां? सांगा. मग ही सर्व गोष्ट डोळ्याआड करून, तुह्मी जो वर्तनक्रम ठेविला आहे तो योग्य आहे का? आणि त्याच्या समर्थनाकरितां, जर तुह्मीं पुढाऱ्यांचीं उदाहरणें देऊन दुसऱ्याला दोष दिलांत तर तुमच्यावरचा समाजाचा आक्षेप जाईल का? पहा बाई विचार करून, मला जें वाटलें तें सांगितलें आहे." असें ह्मणून ताई उठून गेली. पण ताईला नक्की माहीत होतें कीं, आतां आपल्यावर गहजब होणार. ह्मणून तिनें खालीं येतांच आपली आवराआवर करायला आरंभ केला. मालतीबाईनीं पुष्कळ सांगितलें, पण ऐकलें नाहीं इकडे मनोरमाबाईच्याही मनावर कांहींतरी परिणाम झालाच. त्या रात्रभर विचार करीत होत्या. त्यांना कांहीं रात्रीं झोप आली नाहीं. वसंतराव त्या दिवशीं आलेच नाहींत. दुसरें दिवशीं जेवण झाल्यावर आपली निघण्याची सर्व तयारी करून ताई मनो-

रमेच्या खोलींत आल्या. मनोरमा नांवाला पुस्तक हातांत घेऊन बसली होती. तिला पाहून ताई ह्मणाल्या, " वहिनी, मी आज जातें ह्मणून तुह्मांला सांगायला आलें आहे. "

" आणि एकाएकीं कां ह्मणून ? " " कारण कांहीं विशेष नाहीं, पण काल मी तुह्मांला बोललें तें दादाला कळलें, ह्मणजे अर्थात् त्याचा मजवर राग होईल; मग तो मला कांहींतरी बोलेल. मी गप्प बसायची नाहीं. मग त्याची माझी तोंडातोंडी होईल. त्यांत काय अर्थ ? त्यापेक्षां गेलेलेंच बरें. जगली वाचली मालती वहिनी तर पुन्हः केव्हां तरी माझ्यावर आहे असंच प्रेम ठेवा. बोलल्याचा राग आणूं नका अण्णासाठीं, अण्णाच्या प्रेमासाठीं, अण्णाच्या नांव लौकिकासाठीं चार शब्द सांगावेसें वाटलें ह्मणून सांगितल. तें वेडी नणंद ह्मणून विसरून जा "

" पण जाण्याची घाई करून काय करावयाचें आहे ? मी कां सगळंच भाऊजीजवळ बोलतें वन्सं ?"

" तसें नव्हे वहिनी, कोणी मुदाम बोलत नाहीं. पण जेथें आपलें खरें खरें प्रेम असतेंना,तेथें बोलायचें नाहीं ह्मटलें तरी बोलवलं जातं व तें मनुष्यहि, तें आपल्याकडून काढून घेतल्याशिवाय रहात नाहीं. अर्थात् हल्लीं तुमचें परस्परांवरचे जे मनोधर्म आहेत त्यांत त्यांच्यापासून तूं कांहींच लपवूं शकावयाची नाहींस तुह्मांला वाटतें आहे कीं, आह्मी एकमेकांवर नुसतें साधें सात्त्विक प्रेम करतों आहों, पण त्या प्रवाहांत तुम्हीं इतकीं वहात आहां कीं, मनुष्याचे स्वभावधर्म व देहधर्म तुह्मी अजिबात विसरलां आहां. विस्तवाचें लोण्याशीं जें साहचर्य आहे, तेंच तरुण स्त्री पुरुषाचें अतिसंघटनाचे आहे. पुरुष-

प्रकृतींत जो राजस गुण आहे, जो अग्नी आहे तो. तो स्त्रीप्रकृतीच्या भोळ्या, मूर्ख व मृदु अंतःकरणाचा कसा फायदा घेईल याचा नेम नसतो. बरं जरी यदाकदाचित् एखाद्या कणखर मनाच्या माणसांनीं हें शारीरिक पाप केलें नाहीं तरी मानसिक पाप होणार नाहीं असें छातीला हात लावून सांगणें जड जाईल. आपल्या धर्मानें नुसत्या शारीरिक पापालाच शासन ठेवलें नसून, कायिक, वाचिक व मानसिक सर्व तऱ्हेच्या पापाला शासन ठेवलें आहे. तेव्हां त्याचासुद्धां विचार तुह्मीं केला पाहिजेच. आज तुह्मीं पापी आहां, असं मी ह्मणत नाहीं, पण तुमची जी दिनचर्या चालली आहे, तुमचें जें परस्परांचें वर्तन आहे आणि त्यामुळें दादाचीं वहिनीशीं जी वागणूक आहे, त्या सर्वांकडे पाहिलें तर तुह्मीं एका डोंगराच्या कड्यावर उभी आहां. केव्हां धक्का लागून खालीं पडाल याचा नेमच नाहीं."

"वन्स तुह्मीं कांहीं तरी आपला ग्रह करून घेऊन बोलतां आहां. तुह्मीं सांगा, मीं कोठें चुकते ती? मी, त्यांनां त्यांच्याशीं नीट वागूं नका असें सांगितलें नाहीं. पण त्यांनीं माझ्याशीं चांगलें वागावें अशी तजवीजहि करून ठेवली नाहीं. तेच माझ्या खोलींत येऊन गप्पा मारीत बसतात."

"पण सुरुवातीपासूनच तूंहि त्याला तुह्मीं येथें येऊन बसूं नका. मीच जरूर तेव्हां खालीं येऊन विचारीन असं सांगितलें नाहीं. तुह्मींच त्याच्याबरोबर एकट्या, सभा वगैरेंनां जाऊं लागतां. त्यापासून त्याच्या बायकोला राग येतो. या गोष्टीकडे तुह्मींच कानाडोळा केलांत. आतां तुह्मींच सांगा, अण्णा असतांना जर मालतीवहिनी अशा

वागल्या असत्या, तर तुह्मांला तें आवडलं असतं कां? एखादे वेळेस मंडळी येऊन रात्रीं जास्त वेळ गप्पा मारीत बसली किंवा तुह्मांला विचारल्याशिवाय अण्णा बाहेर गेला, तर तुह्मीं किती रागवत असा त्याची आठवण करा. अण्णाचें तें प्रेम स्मरा. अण्णा वहिनीचें, मालती, मालती ह्मणून किती कौतुक करीत असे, त्याची आठवण करा. तुह्मीं त्या अण्णाची धर्मपत्नी आहां. मग आपणाला आर्य पतिव्रतांचा धर्म कोणता याचा विचार करा. पतीच्या हयातींत समक्ष अगर मागें पतीला जें प्रिय, त्याच्या कीर्तीला जें साजेल तेंच करणें आपलें कर्तव्य नाहीं कां? अण्णा योगाभ्यासासाठीं संसारत्याग करून गेला आहे त्याच्या त्या सामर्थ्यांत त्याला जर हें तुमचें वर्तन दिसलें, तर तें त्याला कसें वाटेल हें पहा. आपल्या हिंदु स्त्रियांच्या आर्यपरंपरेला स्मरा व तुह्मांला जो विचार करणें योग्य वाटेल तो करा.

आज मालतीवहिनीचें जीवन तुमच्या हातांत आहे. तिचें संसारसुख तुमच्या मर्जीवर अवलंबून आहे. कारण तिच्या दुखण्याला दादाचें प्रेम हेंच औषध होय. तें मिळवून देणें, सर्वस्वीं तुमच्या हातांत आहे. आज कालें दादा तुमच्या हातचें बाहुलें झाला आहे. त्याला तुमची मोहिनी आहे, ती तुमची तुह्मीं काढून घेऊन त्याला जागा करून पुन्हां संसारमार्गांत पाडायचें तुमचें काम आहे. नव्हे कर्तव्य आहे. तुह्मांला वाटेल तें करा. नुसतं तुह्मीं येथें बसून त्यांनीं नीट वागावं ह्मणून तो खास वागत नाहीं, हें तुह्मांला सुद्धां ठाऊक आहे. तुह्मांला आपल्या ओंढाळ मनाला आवरून, त्यांतील मळ काढून टाकून पवित्रतेच्या वाणीनें ह्मणा अगर कठोर वाणीनें ह्मणा, त्याचा संबंध खाडदिशीं तोडून टाकून लांब गेलें पाहिजे व संसारां-

तील या ऐहिक गोष्टींची गोडी कमी करून आपलें लक्ष ईश्वरचरणीं लावून अणगाला परत येण्याची बुद्धि देण्यासाठीं परमात्म्याची प्रार्थना करणें व अडीअडचणीला आप्तांच्या उपयोगीं पडणें हाच धर्म आहे. त्यांतच व्यक्तीचें व समाजाचें कल्याण आहे बघा काय तें, येतें हां. नमस्कार करते " असें ह्मणून ताई तेथून उठून खालीं आल्या. व टांगा आणायला सांगून, मालतीबाई काय ह्मणतात तेंसुद्धां न ऐकतां स्टेशनावर गेल्या.

इकडे मालती अगदीं घाबरली. आतां पतिराज आल्यावर दुहेरी खरडपट्टी निघणार ह्मणून त्यांनां कांहींच सुचेना. इकडे मनोरमाबाइ सारख्या विचार करीत होत्या, त्यांनांहि कांहीं सुचेना ताईचा टांगा त्यांनीं गेलेला पाहिला. त्यांच्या मनावर नाना तऱ्हेचे विचार सारखे हेलखावे खाऊं लागले. वेळ जाईना ह्मणून करमणुकीचें साधन ह्मणून चहा करून घेतला पण मन उत्तेजित होऊन जास्तच विचार करूं लागलें. आयुष्याचा काळ कळूं लागल्यापासूनचा चित्रपट डोळ्यांपुढें येऊन नाचूं लागला. हातांनां चाळा ह्मणून त्या आपल्या पेटींतील कागदपत्र वरखालीं करीत होत्या; त्यांत त्यांनां पतीचीं पत्रें दिसलीं. तीं वाचतांना त्यांनां आज नवा अर्थ कळूं लागला. बेपत्ता होण्या-पूर्वीच्या पत्रांत हळुहळु कसा विचार बदलत चालला आहे, अप्रत्यक्ष-रीत्या असार संसाराचें विवेचन वेळोवेळा त्यांनीं कसें केलें आहे, त्या त्यांच्या वागणुकीला आपली वागणूक शोभते का? असे विचार, नुकताच ताईनीं केलेला उपदेश, हीं दोन्ही त्यांच्या मनांत धिंगाणा घालूं लागलीं. तशी त्या उठून गच्चीवर आल्या. तेव्हां पश्चिमेकडे सूर्य अस्तास जाण्याच्या तयारींत होता. तरी पण अस्तास जाणारे

त्याचे किरण सुद्धां लालबुंद अशा तेजानें प्रकाशून जगाला, उद्यां असाच तेजःपुंज रूपानें येईन असें जणूं सूचवित होते, व आगमनाच्या वेळेप्रमाणेंच गमनाच्या वेळेसहि पृथ्वीवरील मनुष्यांच्या मनांत सायंकाळचा उत्साह व आनंद घालीत होते. कर्मनिष्ठ मानव ज्याप्रमाणें आपापल्या धर्माप्रमाणें त्याचे प्रयाणसंमारंभ करण्याच्या मार्गांत होते, त्याचप्रमाणें आचारप्रिय गृहिणीसुद्धां शुभ गोष्टींनीं गृहाला शुभ चिंतून, त्याला वंदन करून घरांत येणाऱ्या लक्ष्मीचें या लक्ष्मी-वेळेला स्वागत करण्याच्या विचारांत होत्या. त्याच्या त्या सौम्यतेचा परिणाम इतरांप्रमाणेंच मनोरमाबाईंच्या मनावरहि झाला. त्यांचें मन स्वच्छ झालें. किल्मिष निघालें व आपली चूक विचाराला पटूं लागली. त्याबरोबर परिस्थितीचें ज्ञान झालें. ज्ञानचक्षू उघडले व मनांत कांहीं विचार येऊन त्या कांहीं विशिष्ट निश्चय करून निश्चयी मुद्रेनें आपल्या माडींत आल्या. त्यांनीं इकडे तिकडे पाहिलें, एक ट्रंक रिकामी करून त्यांत घाईघाईनें भरतां येतील तितक्या वस्तू भरल्या. एक लहान वळकटी केली व खालीं आल्या. मालतीबाई देवाला दिवा-वात करण्याच्या तयारींत होत्या. चूल पेटलीच होती. "एक पेला चहा करतां का? मी आतांच्या गाडीनें बाबांकडे जाणार आहे."

"कां पत्रबित्र आलं का? सर्व खुशाल आहेतना?"

"हो पण त्यांनीं मला तावडतोब चार दिवस बोलावलं आहे."

मालतीबाईंनीं चहा केला. त्यांनीं घेतला व गड्याला टांगा आणायला पाठवून, कारकुनाला बोलावून, तिकीट काढण्यासाठीं त्याला बरोबर घेऊन गेल्या.

मालतीबाई एकट्याच विचारांत पडल्या. जातांना त्यांनीं रोजच्यासारखें न बोलतां मोठ्या गोडपणानें त्यांचा निरोप घेतला होता. वसंतराव घरीं आले. या दोघी एकदम गेल्याचें पाहून त्यांनां आश्चर्य वाटलें. तरीपण ताईबद्दल त्यांनां विशेष वाटलें नाहीं. पण मनोरमाबाईबद्दल त्यांनीं बरीचशी चौकशी केली. पत्र केव्हां आलें, कोणाचें आलें जातांना काय ह्मणाल्या वगैरे वगैरे विचारलें. पण मालतीबाई काय सांगणार. त्यांच्या माडींत जाऊन त्यांनीं इकडे तिकडे पाहिलें. पण कांहीं सांपडलें नाहीं. चार दिवस गेले, सहा गेले, नंतर वसंतरावांनीं कोण आजारी आहे, किती आहे वगैरे चौकशीचें पत्र लिहिलें. त्यांत अर्थात् लवकर येण्याबद्दलची सूचनाहि होती. पण त्याचें लवकर उत्तर आलें नाहीं. इकडे घरांत मालतीबाईला अगदीं वेड लागण्याची वेळ आली होती. या दोघी एकदम गेल्या व वसतराव अगदींच डोकें फिरल्यासारखे करूं लागले. घरांत लक्ष नाहीं व पाय नाहीं. सदा विचार. मालतीबाईना देव आपल्याला कधीं सोडवतो असें वाटूं लागलें आतां वसंतरावांनीं मनोरमाबाईच्या माहेरीं जाण्याचा विचार केला, तोंच त्यांच्या नांवाचें एक जड पाकीट व मालतीबाईच्या नांवाचें पाकीट, अशीं आलीं. मालतीबाईच्या पत्रांत आपण गैरसमजुतीनें जो त्रास दिला, त्याबद्दल क्षमा मागितली असून त्यांनीं आपल्या प्रकृतीला जपून बरें व्हावें व वसंतरावांच्या तब्यतीला चांगलें जपावें असें लिहिलेलें असून सध्यां आपल्याला तेथें येण्याला सवड नाहीं, तरी पण घरात मुलंबाळं झालीं ह्मणजे अडीअडचणीला मदत करणें वडील जावांचें कामच आहे. जेव्हां अशा प्रकारची वेळ येईल, तेव्हां आपण आपल्या वडील जावेचें

कर्तव्य बजवावयाला केव्हांहि हलगर्जीपणा करणार नाहीं असें लिहिलें होतें. वसंतरावांचें पत्र बरेंच लांब होतें त्यांत आपण स्वखुषीनें पुष्कळसा विचार करूनच तेथून निघून आलों आहों. त्याला मालती-बाई निमित्ताला सुद्धां कारण झाल्या नाहींत. तरी त्यांच्यावर कोण-त्याही प्रकारचा राग करूं नये. उलट त्यांच्याशीं जितके जितके आपण चांगले वागल, तितके तितके झालेले अन्याय धुतले गेले असें मला वाटेल असें लिहून, मला उपरती होऊन, आर्यगृहिणीचीं कर्तव्यें कोणचीं, हीं पहायची इच्छा झाली व त्यांत मला असेंच आढळून आल कीं, आजपर्यंतच्या आर्यांच्या पवित्र परंपरेंत स्त्रियांना फक्त आपघर अगर बापघर हीं दोनच घरें सांगितलेलीं आहेत. आतां मला स्वतःचें घर नाहीं. अर्थात् सासरचें घर या नात्यानें तुमच्या तेथें किंवा येथें राहिलें पाहिजे पण माझ्यासारख्या स्त्रीनें नुसतें आयुष्य कंठणें, ईश्वराच्या घरीं अन्याय होईल. प्रत्येकाचें सामर्थ्य आहे तोंपर्यंत त्यानें काम केलें पाहिजे. या न्यायानें पहातां माझ्या कामाची आपल्या तेथें जरूर नाहीं. माझ्या आईचीं मुलें लहान लहान आहेत अर्थात् शक्य असेल तर माझ्यासारख्या माणसाची जरुरी येथें आहे. तेव्हां सेवाधर्म हें स्त्रियांच्या आयुष्याचें सार असल्यामुळें, आज मी माझ्या लहान भावंडांची काळजी घ्यायला ह्मणजे पर्यायानें माझ्या मातापित्यांची सेवा करायला येथें आलें आहे. ज्यावेळेस आपल्या घरांत लहान मुलें होऊन अडचण पडेल, त्यावेळेस तुमची वडील भावजय ह्मणून तुमची अडचण काढावयाला मी तिथेंसुद्धां न बोलावतां खास येईन. कारण स्त्रीजन्माचें ध्येय एक आहे कीं, गाजावाजा न करतां निरनिराळ्या परिस्थितीप्रमाणे जनतेस जनार्दन समजून त्याची सेवा करायची

गाजावाजाच्या संवयीप्रमाणें यांत जरी नांव झळकणार नाहीं, तरी पण आपल्या सहवासानें मला जें शिक्षण मिळालें व त्यामुळें मीं जें वाचन वाचलें आणि त्यापासून तिकडच्या आशिर्वादानें मला जे विचार सुचले व त्यांत जें दिसलें तें हेंच कीं आर्य स्त्रियांचें कर्तव्य एकच कीं, जिला स्वतःचा संसार नाहीं तिनें आप्तांची सेवा जनार्दनस्वरूपी समजून करायची. आमचें ध्येय एकच की कन्या, पत्नी व माता या कुठल्याहि रुपांत सेवाधर्म करावयाचा व ईश्वरी आशिर्वाद मिळवायचा. त्याच मार्गाला आज मी लागलें आहे. तरी आतां मला पुन्हां पत्राचा त्रास न देतां, आपण मालतीच्या प्रकृतीची मनापासून काळजी ध्यावी. हे आशिर्वाद.

पत्र वाचून वसंतराव विचार करीत बसले. मालतीबाई, सारख्या रडत होत्या काळ झपाट्यानें जातो. हेहि दिवस गेले. ताईला सावकाश रीतीनें कळलं कीं मनोरमाबाईनीं त्यांना गुरुदेव ह्मणून पदवीहि दिली

वाचकहो पुढचें मला कांहीं कळलें नाहीं. पण परवां मनोरमाबाई भेटल्या होत्या. त्यांच्या सांगण्यावरून समजलें कीं, वसंतरावाकडे पुत्रजन्माचें बारसें लवकरच होणार असून त्याकरितां ताई व मनोरमाकाकू जाणार आहेत.

मनोरमाबाई हल्लीं एक तपस्विनी झाल्या आहेत रानांत न जातां, गुरु न शोधतां मनोरमाबाईसारख्या बायका संसारांत येऊन, कशा विदेही होऊं शकतात याचें मनोरमाबाई हें एक उदाहरण आहे. अशा साध्वीकडे पाहिलें ह्मणजे मनांत येतें कीं, या पुण्यभूमींत, या आर्यांच्या आर्यावर्तांत काय बरें अशक्य आहे. जेथें अशा सुकन्या जन्माला येतात त्या आर्यभू तुझी धन्य असो.

# गोष्ट २ री.

## पतिता.

**गंगू** रहात होती तो वाडा आपल्या जुन्या तऱ्हेचा एक जुनाच वाडा होता. पुढल्या अंगाला एक लहानशी माडी असलेली जागा, मागल्या अंगाला एक लहानशी माडी, बाजूनें कौलारी घर आणि मागच्या अंगाला थोडें मोकळें परसू. त्याच्या एका कोपऱ्याला शौचकूप आणि मधल्या मोकळ्या जागेंत अळूकेळीं लावून तिथें बिऱ्हाडकरांच्या वापरण्याचें पाणी सोडलें होतें. पुढल्या माडीच्या घरांत एक सुशिक्षित दंपत्य रहात होतें तर मागल्या घरांत एक फटिंग तरुण होता. खालच्या खोल्यांत लोकांच्या इथें स्वयंपाक करणाऱ्या दोन तीन म्हाताऱ्या बाया रहात होत्या उरलेली जागा गंगूच्या आईच्या ताब्यांत होती गंगूची आई, दोन भाऊ व भावजया एवढीं माणसें होतीं. भावांना लहान लहान नोकऱ्या असून त्यांत त्या भाड्याचीं भर पडत होती व वास्तविकरीत्या सुखासमाधानानें भाजीभाकरी खाण्याजोगी त्यांची स्थिति होती एकच बहीण म्हणून त्यांनीं चार पैसे खर्चून गंगूचें लग्न चांगल्या तऱ्हेनें करून दिलें होतें—पण, देवाचा घाला लगेच गंगूच्या डोक्यावर पडला आणि एका वर्षांतच कुमारिका, नववधू व विधवा या तिन्ही स्थिती गंगूला प्राप्त झाल्या. गंगूला तर वाईट वाटलेंच—पण, अनुभविक म्हातारीचें अंतःकरण ह्या स्थितींनें जास्त होरपळलें. जवळ जवळ तिला वेड लागायची पाळी आली—आणि त्यामुळें, गंगू हेंच तिच्या जीवनाचें सार झालें.

त्या गंगूला कोणीं हं ह्मटलें कीं, ह्मातारीचें डोकें फिरे ! ह्याचा परिणाम घरांतल्या घरांत भांडणें होण्याकडे होऊं लागला, भाव-जयांनीं कोणी कांहीं ह्मटलें कीं, ह्मातारी वाघासारखी ओरडे व गंगूचा कड घेऊन बोले—मग तें न्यायाचें असो कीं अन्यायाचें असो ! याचा परिणाम मात्र असा झाला कीं, गंगूला कोणीही आपल्याला हं ह्मण-णारें नाहीं असें वाटूं लागलें व ती थोडी शेफारत चालली. भाऊं-भावजयांच्या बोलण्याकडे आपण लक्ष देणें हें आपलें कर्तव्य आहे ही जाणीव तिला नाहींशी झाली. व आपल्यांत कांहीं दोष आहेत, आपली परिस्थिति इतरांपेक्षां कांहीं वेगळी आहे याचीही जाणीव नाहींशी झाली. खावें प्यावें आणि मन मानेल तसें वागावें—हेंच तिचें ध्येय ठरलें. आतांशा दुपारची ती एका शाळेमध्यें कांहीं शिकण्याकरतां ह्मणून जात असे—पण, तिकडे जाऊन शिक्षणाचा लाभ तिला किती झाला हें कांहीं सांगवत नाहीं. परतु, केशरचनेच्या निरनिराळ्या तऱ्हा, चोळ्यापोलक्यांच्या नाना जाती,लुगडीं नेसण्याच्या अनेक फॅशन्स् यांचें अनुकरण मात्र झपाट्यानें होऊं लागलें ! जात्या मनुष्यस्वभाव अनुकरणप्रिय आहे—त्यांत कोणी हं ह्मणायला नाहीं ही खात्री—मग काय? स्वेच्छाचाराकड मनुष्याची प्रवृत्ति स्वाभाविकच होते. आज असाच एक प्रसंग घडून आला. तिनें ज्या प्रकारचें पोलकें व पातळ घेतलें होत तसें पोलकें व पातळ घेऊन नेसूं नये असें तिच्या भवाचें ह्मणणें होतें—तिला तें पटलें नाहीं. तिनें डोळ्यांत पाणी आणून आपली फिर्याद आईकडे नेली व आईच्या प्रेमाला भरती येण्याकरितां, पदरचे चार शब्द तिखटमीठ लावून त्यांत घातले. म्हातारी उसळली व 'चार दिवस पोरीची जात आहे

तोंपर्यंत तुह्मी तिला कां छळतां ?' ह्मणून भांडूं लागली. मागल्या माडींत रहाणारे विसूभाऊ सुद्धां खालीं येऊन सहजगत्या आल्यासारखें दाखवून लोकांच्या भांडणांत शिरून आजीबाईंना समजावीत, गंगूताईची बाजू घेत व भावांशी मानभावीपणा दाखवीत-असें होऊं लागलें. होतां होतां, या कुटुंबांत विसूभाऊंचें संघटन वाढत चाललें. विसूभाऊ विसूभाऊ ह्मणून गंगू त्यांच्याशीं मोकळेपणाने बोलूं लागली, मुलगे त्यांच्याशीं मोकळेपणानें बोलूं लागले, ह्मातारी त्यांना आपला खरा हितचिंतक समजूं लागली—पण, हा सर्व फार्स दूर बसून रमाविष्णूचें जोडपें पहातच होतें. रमाबाईला विसूभाऊबद्दल तिटकारा वाटे त कां तें कांहीं सांगतां येत नसे पण ती असें ह्मणे कीं, जर स्त्रिया शुद्ध असतील तर त्यांना तें सहज दिसण्याजोगें आहे. विष्णुपंतसुद्धां त्यांची या बाबतींत टवाळकीच करीत-विसूभाऊबद्दल त्यांचें मोठें चांगलें मत होतें असें मात्र नाहीं ! होतां होतां विसूभाऊचा व गंगूचा सहवास वाढत चालला. शाळेमध्यें गाणीं हावभावासह ह्मणण्याचें काम चालू होतें. त्यांत गंगू होती. ती सकाळसंध्याकाळ रिकाम्यावेळीं हें गाणें गुणगुणूं लागली व मागल्या माडींतील एक श्रोता वरचेवर लक्ष देऊन ऐकूं लागला हळूच एक दिवस त्यानें एकदोन गाण्यांचीं पुस्तकें आणून गंगूला भेट दिली. विसूभाऊंची माडी ह्मणजे हळूहळू एक जादूची पेटीच होत गेली. आज काय, स्नेहीफोटोग्राफरचे पांच सहा फोटोच आणून वहिनींना दाखव—अर्थात्, तेथें गंगू असावयाचीच. त्यांत हळूच गंधर्वाचा व रघुवीर सावकाराचा फोटो घुसड, मग त्यांच्या पोपाखाची चर्चा कर, मग एखाद्या फिल्म कंपनीचे फोटो आणून दाखव, मग कधीं पार्श्वत्य

चित्रकलेचे नमुने ह्मणून प्रणयी युग्मांचे फोटो आणून दाखव-अशा तऱ्हेनें, तो आपली घसरट त्या मुलींत पाडीत होता. कधीं सिनेमाचे आमंत्रण लावी. या सर्व वागणुकीचा अर्थ कोणाच्याच लक्षांत येत नव्हता संध्याकाळचा, पुरुष कोणी घरांत नाहींतसे पाहून हा घरांत येऊन बसे-अर्थात्, त्या वेळीं एकटी गंगूच घरांत रिकामी असे. पुरुष बाहेर, आजीबाई पोथीला, सुना स्वयंपाकांत. अर्थात, गंगूताईशी इकडची तिकडची चर्चा कर, वादविवाद कर, कोणीतरी पाश्चात्याच्या चरित्रांत कांहींतरी दोष दाखव हे उद्योग चालायचे आणि बोलतां बोलतां हळूंच जगांत खरें शुद्धत्व कोठेंच नाहीं, प्रत्येकाचें खाजगी चरित्र निराळेंच असतें असें दाखवावयाचें ! भोळी गंगू त्याच्या बडबडानें खुश होऊन त्याला जगांतली कितीतरी माहिती आहे असें वाटून खूश होई. जसजसें संघटन वाढत चाललें तसतसें बहुतेक पुढारलेल्या माणसांना यानें कांहींना कांहीं मदत केली आहे असें तो भासवूं लागला व आपल्याला आपल्या नांवाचा गाजावाजा केलेला आवडत नाहीं ह्मणून आपण इकडे एका बाजूला रहातों असें तो भासवूं लागला. या बोलण्याबसण्याचा परिणाम असा होऊं लागला कीं, भावजया आपल्या नवऱ्यांजवळ कुरकुर करूं लागल्या व हिची त्याच्याबद्दलची आसक्ति वाढूं लागली. आतां ती हळूंहळूं विसूभाऊच्या जिन्यापर्यंत जाऊं लागली; कधीं खालीं उभे राहून विसूभाऊला हांक मारावी, कांहीं पुस्तकं द्यावीं घ्यावीं, आसपास कोणी नाहींसें पाहिलें कीं चार दोन मिनिटं उभें राहून बोलावें, कोणाला आलेसें पाहिलें कीं लगेच निघून जावें. शाळेमध्यें पुनर्विवाह वगैरे विषयांची चर्चा सुरू झाली कीं, हिला आपणही या विषयाची

माहिती विचारावीशी वाटे व तोही कांहींतरी उडवाउडवीचीं उत्तरें देऊन वेळ मारून नेई. एक दिवस संध्याकाळीं ही यांच्या पुढल्या पडवींत एकटीच कांहीं वाचीत बसली होती. विसूभाऊ आला—तेव्हां त्यानें एक चापटी तिच्या पाठीवर हळुचशी मारली—त्याबरोबर ती चमकली. तिनें पाहिलें तों, विसूभाऊ! ती घाबरली. तिचा चेहेरा उतरला, भ्यालेल्या हरणासारखे तिचे डोळे इकडेतिकडे गरगर फिरूं लागलें. तिची ती स्थिति पाहून विसूभाऊ ह्मणाला—'अं! एवढ्याशा थट्टेनं एवढ्या घाबरायला काय झाल? एवढ्याशा थट्टेनं इतक्या घाबराल हें ठाऊक नव्हतं. आतां पुनः नाहीं करणार'. पण गंगू कांहींच उत्तरली नाहीं. ती तेथून उठून मुकाट्यानें घरांत गेली. तिला चैन पडेना. आपलें कांहींतरी चुकलें आहे असें तिला वाटे. विसूभाऊबद्दल एकदम तिच्या मनांत तिरस्कार उत्पन्न झाला. हा मनुष्य वाईट असावा, पाजी असावा असें तिला वाटलें. या परक्या पुरुषाशीं जास्तकमी बोलण्याचा प्रघात आपण ठेवला ही चूक केली असें तिला वाटूं लागलें. आजपासून आपण पुन्हां त्या माणसाशीं बोलायचें सुद्धां नाहीं असा तिनें आपल्या मनाशीं निश्चय केला. तिची सारी रात्र तळमळण्यांत गेली. कुलीन स्त्रीला परपुरुषाचा स्पर्श हा एक विषारी रोग वाटतो. तो रोग निघायला परमेश्वरी चिंतनाचें इंजेक्शन घ्यावें—तेव्हां कोठें जरा समाधान वाटतें. गरीब बिचारी गंगूसुद्धां ईश्वराला शरण जाऊन या पापी जगापासून आपलें संरक्षण कर ह्मणून विनवूं लागली व तसें करतांना तिचा डोळा लागला.

दुसरे दिवशीं विसूभाऊकडे मुळींच पहायचें नाहीं असें झालेलें निश्चयी मन—त्याचा चेहेरा काय ह्मणतो तें पहाण्यासाठीं निश्चयाविरुद्ध

डोळ्यांना हुकूम करूं लागले व त्या डोळ्यांना विसूभाऊच्या चेहऱ्यां-तलें कारुण्य दिसूं लागलें ! हळूहळू एकदोन दिवसांत मन विरघळलें व निश्चयाचा मेघ त्या प्रवाहांतून वाहून गेला ! मन आतां उलट बाजू खाऊं लागलें. आपला दादा नाहीं का आपल्या अंगावरून हात फिरवीत ? आपला भाऊ नाहीं का आपल्याला थपडा देत ? तसाच विसूभाऊ ! हिच्या मनाचा बदललेला कल विसूभाऊनें ओळखला. दोनचार दिवसांनीं एक दिवस त्यानें हळूंच 'तुह्मांला पुनर्विवाहाची माहिती सांगनों हं' असें ह्मणून सुचविलें. चैत्राचा महिना होता. बायका हळदीकुंकवाला गेल्या होत्या. ह्मातान्या बायका पुराणाला गेल्या होत्या फक्त रमाबाई, अस्पर्श असल्यामुळे, आपल्या माडींत होत्या. ही शाळेंतून येऊन नुकतीच उभी होती-इतक्यांत विसूभाऊची स्वारी आली व येण्याबरोबरच "ही पहा मी माझ्या पुनर्विवाहित मित्रांकडून आणली माहिती" असें ह्मणून गप्पा मारूं लागला. "अहो ! पुनर्विवाह ह्मणजे प्रीतीविवाह. याला तुमच्या सारखी मुलगी मुळींच उपयोगी नाहीं—कारण, तुह्मीं नुसती थट्टेनं थप्पड मारली तर घाबरलांत. पण प्रीतीविवाहांत तर आपली खरी प्रीती कोणावर आहे हें अगोदर पहायचं असतं. तिथं एकाद्यानं असं मनगट धरल्यास माझं प्रेम तुझ्यावर नाहीं असं खणखणीत सांगावं लागतं." असें ह्मणून त्यानें हळूंच तिचे मनगट धरले. 'हां ! हें काय, सोडा मनगट, मला स्वतःला पुनर्विवाह करायचाच नाहीं. मी आपली सहज तुह्मांला माहिती विचारली" असें ह्मणून तिनें आपला हात झट्-दिशीं हिसकून घेतला. "हो का ? मला काय ठाऊक ? मीं ह्मटलं, माहिती विचारतां त्या अर्थीं तुमचा विचार आहे वाटतं ? बाकी सध्यां

लग्नापेक्षां पुनर्विवाहांत खरोखरच सुख असतं. आपल्या आवडीचा, आपल्या पसंतीचा, ज्याच्या सहवासांत चार दोन महिने काढून आपण ज्याची खरी परीक्षा केली आहे असा मनुष्य मिळतो—आणि लग्नांत आईबाप घालवतील तिथं जावं लागतं ! या सुधारणेनें मोठी सोय केळी बोवा ! वाटेल त्या बाइला नवरा मेल्यानंतर रडत न बसतां पुनः संसार थाटतां येतो. अर्थात्, पुनर्विवाह करणारेसुद्धां पोक्त बाया व तरुण मुली या मानानें त्याची किंमत लावतातच. समजा, उद्यां तुमच्यासारखं रत्न पुनर्विवाह करायला उभं राहिलं, तर कोण नको ह्मणेल ? ज्याला सहवास झाला आहे तो मनुष्य तुमच्या रुपगुणांचीं स्तोत्रं गाईल यांत नवल नाहीं ! पण, अगदीं प्रथम पहाणारा मनुष्य सुद्धां तुमच्या रुपगुणांवर भाळेल. चला बोला, आहे का विचार ? देऊं जाहिरात ? " असें ह्मणून तो चमत्कारिक नजरेनें तिच्याकडे पाहूं लागला. त्या नजरेंत एकदां तिला वीप वाटे तर एकदां अमृत वाटे. ती कंटाळून केविलवाण्या आवाजांत ह्मणाली, " कसला घाणेरडा विषय काढलांत ? मी कधीं तुम्हांला माझ्या पुनर्विवाहाबद्दल ह्मटलं ? सहज माहिती विचारली. आतां मला ती मुळींसुद्धां नको." " बरं आहे ! जसा हुकूम ! " असें ह्मणून विसूभाऊ बाहेर पडलेला पाहून, रमाबाई खालीं आल्या व गंगूच्या घराकडे जाऊन मुद्दाम ' आजी, आजी ' ह्मणून त्यानीं हांका मारल्या. गंगू बाहेर आली. " मला प्यायला पाणी घाला बरं " असें ह्मणून तिला घेऊन आपल्या घरीं आल्या व इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत अप्रत्यक्ष रीत्या स्त्रियांवर पावित्र्यानें रहायची केवढी जबाबदारी आहे हें त्यांनीं तिला जाणवलें. ती आपल्या घरीं आली-पण ह्या बोल-

ण्याचा परिणाम तिच्या मेंदूवर मुळींच झालेला दिसला नाहीं. तिचें मन सारखें विसूभाऊंच्या चेहऱ्याकडे व त्या विचारांकडे होतें.

× × × × × ×

आज संध्याकाळीं विसूभाऊ घरींच होता. चाराचा सुमार होता घरांतल्या सगळ्या बायका कथेला गेलेल्या होत्या. हिची शाळा लौकर सुटल्यामुळें, ही घरीं लौकर आली व घरीं कोणी नाहींसें पाहून आपणही तिकडेच जावें या विचाराला लागली. नळावर जाऊन हातपाय धुवून तिनें चूळ भरली व डोळ्याला पाणी लावून परत फिरणार तों, वरून विसूभाऊ ह्मणाला-"गंगूताई, मला ताप येऊन जीव घाबरतो आहे. थोडं गार पाणी प्यायला पाठवतां कां ?" असें ह्मणून तो लगेच खिडकीच्या आड झाला. हिला प्रश्न पडला. पाणी कोणाच्या हातीं पाठवावें ? घरीं कोणीच नाहीं. हिनें गार पाण्याची तपेली भरली व जिन्यापर्यंत गेली " विसूभाऊ, विसूभाऊ ! " दोन हांका मारल्या. वरून कण्हण्याचा आवाज ऐकूं आला. तिला वाटलें, ' याला बराच ताप आला बरं कां; आपण जर याला भावासारखा मानतों तर, दुखण्याबाण्याला वर जायला काय हरकत आहे ? ' असा विचार करून ती वर गेली. तिनें पाणी आणून त्याच्या पुढें ठेवलें. तो पाणी पिऊं लागला व ही त्याला ' असं कशानं झालं, काय झालं ' ह्मणून विचारूं लागली. पण विसूभाऊ हा मनुष्य नसून काळ-सर्प आहे हें तिला आजच समजलें त्यानें उठून बोलतां बोलतां जिन्याच्या दाराला कडी घातली व " तूं गप्प राहिल्यास बोभाटा होणार नाहीं पण आरडाओरडा केल्यास, तूं माझ्याशीं वाटेल तेव्हां

बोलत बसतेस हें सर्वांस ठाऊक आहे त्याचा फायदा घेऊन मीं सर्वांना वाटेल तें सांगेन. मग तुझे भाऊभावजया तुला जवळसुद्धां उभे करणार नाहींत. तेव्हां, शाहाणपणाचा मार्ग ह्मणजे ओरडा-आरड्याशिवाय मी सांगेन तसं ऐकत जावं—ह्मणजे जगांत मान्यता राहून पुनः आपल्याला सुखी रहातां येते. तुझ्या इच्छेसाठीं पाहिजे तर, आपण पुनर्विवाह करूं! ”

किती झालें तरी, गंगू ही कुलीं घराण्यांतली पवित्र कन्या होती. ती त्याच्या बोलण्याला थोडीच कबूल होणार! “ विसूभाऊ, मी तुह्माला भाऊ ह्मणत आलें ना? माझा असा केसानं गळा नका हो कापूं? इतके दिवसाचा शजारधर्म तरी स्मरा. ह्मातार्‍या आईकडे बघा? ” पण तो नीच मांग हें बोलणें मुळींच हेटाळणीवर न्यायला लागला. इकडे गंगू घाबरी झाली. एक वेळ वाटे, मोठ्यानें ओरडून चार माणसें गोळा करावी. पुनः वाटे, हा मांग ह्मटल्याप्रमाणें खरो-खरच आपल्यावर नसतें कुभांड घेईल. क्षण—एकच क्षण विचारांत गेला. मांग पुढें झाला व त्यानें तिचें मनगट धरून व खीः खीः खिदळत हंसून तिला आपलेकडे ओढलें. त्याबरोबर जोरानें हिसडा देऊन तिनें आपला हात सोडवलान् आणि “ जा मेल्या! कर बदनामी परमेश्वर तर पाहिलना? ” असें ह्मणून तिनें मोठ्यांदा आरोळी ठोकली. “ मार! मोठ्यांदा बोंबा मार. या उभ्या वाड्यांत आज तुला कोणीही सोडवायला येणार नाहीं अशी तजवीज मीं आगाऊच केली आहे. ही बघ मीं तुला अशी धरतो. ” “ नाहींच मी तुला माझा हात धरूं देणार कोणी नाहींच सोडवायला आलें तर, अबलांचा वाली परमेश्वर तरी सोडवायला येईल? ” “ फक्त नाटकांत! ” असें ह्मणून

विसूभाऊ हंसला-पण खरोखरच त्याच वेळेस "हा बघ जगांत परमेश्वर आहेच. दार उघड" असें ह्मणून एका व्यक्तीनें दारावर धक्के मारले व दरडावणीच्या स्वरांत "दार उघडतोस कां फोडूं?" ह्मणून विचारलें. त्याबरोबर विसूभाऊ लटपटला व त्यानें दाराची कडी काढली. तो गृहस्थ आंत गेला व त्यानें गंगूला हात धरून बाहेर काढलें. विसूभाऊकडे दांतओंठ खात तो ह्मणाला, "राजश्री, सभ्य लोकांच्या वाड्यांत राहून चांगले धंदे करतां!" "तसा मी नाहीं, तसा मी नाहीं.-तीच पोरटी आपण होऊन माझ्या माडींत आली." तेव्हां ते ह्मणाले, "राजश्री, तोंड सांभाळून बोला. सुरवातीपासून मीं इथेंच आहे." असें ह्मणून तो गृहस्थ निघून गेला.

गंगू वर गेली तेव्हां कोणी नव्हतें असें जरी तिला वाटलें होतें तरी पण बिऱ्हाडकरांत असणाऱ्या एक आजीबाईनें परसाकडून येतांना तिला जिन्यावर चढतांना पाहिलें होतें ही एवढीच बातमी बायकी स्वभावाप्रमाणें कल्पना लढवायला पुष्कळ होती-शिवाय, खालीं येतांना वहिनीसाहेबांनीं पाहिलें!-मग काय विचारतां? गंगू घरांत जाऊन रडत बसली-पण तिला नीट रडतां सुद्धां येईना. तिच्या अंतःकरणांत इतकी आग पेटली, दुःखानें ती इतकी वेडी झाली कीं, तिच्या डोळ्याला पाणीसुद्धां येईना अगर खरी हकीकत आई अगर भाऊ यांच्याजवळ जाऊन सांगायचेंही सुचेना. पण, वहिनीसाहेबांच्यामार्फत ती तार पोंचलीच होती. अर्थात्, घरामध्यें आरडाओरडा, दंगल सुरू झाली; पण वर आलेले गृहस्थ दुसरे तिसरे कोणी नसून, रमाबाईचे यजमान विष्णुपंतच होते. गंगूला माडीवर जातांना त्यांनीं पाहिलें होतें-तेव्हां अर्थात्, या दोघांना योग्य वेळीं पकडावें आणि थोडी कानउघाडणी

करून तिची इच्छा असल्यास तिला पुनर्विवाह करावयास सुचवावें असा विष्णुपंतांचा बेत होता-ह्मणून, ते आपल्या माडींतून उठले व या जिन्याशीं आले; पण, आंतील जो संवाद त्यांच्या कानावर आला त्यावरून गंगू निष्पाप असून फसून वर आली आहे एवढें त्यांच्या लक्षांत आलें-त्यामुळेंच, ते जिना चढून वर जाऊन उभे राहिले व पुढें काय होतें तें पाहूं लागले. योग्य संधी येतांच ते पुढें कसे झाले तें मागें सांगितलेंच आहे. अर्थात्, ही माहिती असणाऱ्या विष्णुपंतांनीं रात्रीं गंगूच्या घरीं जाऊन तिच्या शुद्धतेची खातरजमा तिच्या माणसांना करून दिली व त्यांत तिच्या वागणुकीकडे दुर्लक्ष केल्याबद्दल तिच्या आईची व भावाचीही कान-उघाडणी केली व आणखी ह्मणाले कीं, " आजचा हा प्रसंग तिच्या अज्ञानानं व तुमच्या दुर्लक्षानं उद्भवलेला आहे-अर्थात् तुह्मीं तिला क्षमा करून मदतच केली पाहिजे. तीसुद्धां या प्रसंगानं शहाणी होईल व जगांत पुढं जास्त धोरणानं वागेल. " या क्षणापुरती हीं सगळीं गप्प बसलीं. रात्रीं १०॥ च्या सुमारास रमाबाई परसाकडे गेल्या- पहातात तों, केळीच्या तिथें केळीच्या सावलींत कोणीतरी मनुष्य आहे. जवळ जाऊन पहातांच, ती गंगू असल्याचें त्यांनीं ओळखलें, त्या पुढें झाल्या आणि ह्मणाल्या, " कोण गंगूताई ! मी परसाकडून येईपर्यंत मला जरा सोबत करा अं ! " मग त्या परसा-कडून आल्यावर गंगूशीं बोलत तिथं बसल्या. त्यांनीं दुपारचा प्रसंग न काढतां चार सान्त्वनपर शब्दांनीं तिची समजूत केली. एकदोन दिवसांत विष्णुपंतांचें बिऱ्हाड त्या वाड्यांतून दुसरीकडे गेलें. त्या आजीबाईच्या मार्फत गंगूची बातमी तिखटमीट लाऊन बऱ्याच ठिकाणीं

पसरली. आतां तर घरांत सगळ्यांनीं पिसाळून सोडलें. शेवटीं, त्या दु:खाला व त्रासाला आई कंटाळली व आपण उठून एक दिवस रागारागानें कुठें यात्रेला निघून गेली– पण तिनें हिला मुद्दामच बरोबर नेलें नाहीं–कां ? तर उगीच कांहींतरी लोकापवाद यायचा ! पण, तिच्यामागें एक दिवस भाऊभावजय व नणंद यांची बरीच जुंपली व बोलण्याच्या भरांत ' नसेल घरांत पटत तर, लावा जा दुसरीकडे दिवे' असें बंधुराज ह्मणाले. हिच्याही सोशीकपणाची मर्यादा आतां बरीच चढली होती तीही आज बरीच त्रासली व ' जगांत पुष्कळ बायका पोट भरतात, आपणही भरूं ' असें ह्मणून निघाली. तिला वाटलें होतें कीं, ' कुठेंही भाड्याची खोली घेऊन शिवण काम करून राहिलें, कोणाच्याही घरीं हलकेसें काम केलें ह्मणजे पोटापुरतें मिळेल!' ती दुसरे दिवसापासून खोल्यांचा शोध करायला निघाली. दोन तानी ठिकाणीं गेली तर, जागा मिळालीच नाहीं. एकदोन ठिकाणीं तर, नसत्या चांभार चौकशा झाल्या व कांहीं जणांनीं तर, तोंडावर स्वच्छ ' आह्मी अशा बायकांना जागा देत नाहीं ' ह्मणून सांगितलें ! तेव्हां तिचे डोळे उघडले. लोकांनीं ठिकठिकाणीं केलेला अपमान, दाखविलेला तिरस्कार व बोललेले शब्द–सगळें तिच्या डोळ्यांपुढें उभें राहिलें, भाऊभावजयांचे शद्बही तिच्या कानांत घुमूं लागले. आतां तिला पुन: त्या घरांत जाण्याची इच्छासुद्धां होईना–पण करते काय ? सत ना गत–ती पुन: घराकडे निघाली. रस्त्यांत तिची व रमाबाईंची गांठ पडली. " कां गंगुताई, कुठं चाललांत ? " असें सहज त्यांनीं तिला विचारलें. पण या प्रेमळ शद्बाबरोबर, गंगूताईच्या डोळ्यांतून अश्रू सुरू झाले. ' रस्त्यांतन हें बरं नव्हे ' असें समजून रमाबाईंनीं

' उद्यां सकाळीं या कीं आमच्या घरीं जरा ' असें ह्मटलें व त्या पुढें गेल्या, व हीही घरीं गेली. दारांत पाय ठेवतांच " झालं का भटकून ? नाहीं कां कुठें थारा मिळाला ? " असे भावजईचे शब्द, तापलेल्या तेलाप्रमाणें, सळदिशीं तिच्या कानांत गेले. ती तशीच आंत जाऊन बिछान्यावर पडली–पण, भावजयांपैकीं कोणीही तिच्या जेवणाखाण्याची चौकशी केली नाहीं. या अपमानानें तर, आगींत तेल ओतल्यासारखें झालें. भुकेनें पोटांत काहूर उसळलें, विचारानें डोकें फिरलें व शेवटीं ग्लानी येऊन पहांटे पहांटे तिचा डोळा लागला. सकाळीं उठली, तोंड धुणें, परसाकडणें केलें व देवाला नमस्कार करून तिनें रमाबाईच्या घराची वाट धरली. तिला घरांत चहासुद्धां विचारला नाहीं. ती रमाबाईकडे गेली. तिनें आपण होऊनच सगळी हकीकत तिला सांगितली व तिथें बसून मोकळ्या मनानें पोटभर रडली. तिची एकंदर हकीगत ऐकून, तिची कांहींएक चूक नसतांना थोड्याशा दोषाबद्दल समाज तिला केवढें घोर प्रायश्चित्त देत आहे असें रमाबाईना वाटलें. अशा वेळीं ही अबला पोटाकरितां बाहेर पडून जर एखाद्या कुंटणीच्या ताब्यांत गेली तर, **तिच्या जन्माच्या नासाडीला जबाबदार कोण ?** असा प्रश्न रमाबाईच्या डोळ्यापुढें येऊन उभा राहिला. त्यांनीं तिला सौम्य शद्बांत तिच्या चुका दाखवल्या व जगांतील स्त्रियांचीं कर्तव्यें, त्यांची वागणूक कशी असायला पाहिजे तेंही सुचवलें. पण गंगूताई आतां दुःखानें लीन झाली होती. ती ह्मणाली–" अहो रमाबाई ! हें सगळं चांगल्या बायकांकरितां आहे; पण माझ्यासारख्या जगाच्या दृष्टीनें पतित ठरलेल्या स्त्रीनं आतां काय करावं ? मी माझ्या भावांकडे–ते जर मला बोलणार नाहींत तर–मोलकरीण ह्मणून सुद्धां

रहायला तयार आहें, पण कुचकं नासकं बोलल्याशिवाय आमच्या वहिनींच पोट भरावं कसं?" तेव्हां रमाबाई तिला ह्मणाल्या, "नाहीं, गंगूताई, तूं पतित नाहींस तूं पवित्र स्त्री आहेस तुला ह्या जगांत पुष्कळ कामें करतां येतील. तुला कोणाचीही मोलकरीण होण्याची जरूर नाहीं. तुझ्या भाऊभावजयांच्या डोळ्यावर रूढी व स्वभाव या दोहोंचं पटल आहे-त्यामुळंच, तीं तुझी उपेक्षा करताहेत. चल, ऊठ, कार्याला लाग; इच्छा असल्यास, पुनर्विवाह करून उत्तम गृहसौख्य जोड अगर समाजसेविका हो." "नाहीं, बाई, नाहीं-आतां मला लग्नाचा विचारसुद्धां नको. आतां मला फक्त ईश्वराचं नांव घेत पवित्रतेनं राहून घासभर अन्नाचा गोळा कसा मिळवितां येईल तेवढंच सांगा. वास्तविक पाहिलं तर, ज्याची जरूर नाहीं अशा माझ्यासारख्या प्राण्यांनीं जगण्याचीच आवश्यकता नाहीं-पण जीव देण्याजोगं धारिष्ट माझ्यांत नाहीं हो!" "छे! छे! गंगूताई! असं ह्मणूं सुद्धां नये. प्रत्येक जन्मास आलेल्या प्राण्यानं पुनः ईश्वर बोलावीपर्यंत जगलंच पाहिजे असा ईश्वरीसंकेत आहे मग हा ईश्वरी हुकूम आपण कोण तोडणार?" "मग त्या ईश्वरानं आह्मांला असं दुःख कां बरं द्यावं?" "हा आपल्या चुकीचा दंड आहे." "मी काय बरं चूक केली?" "असं काय बरं ह्मणतां? मी कांहीं तुह्मांला दुखवायला ह्मणत नाहीं-पण, जगाची परीक्षा केल्याशिवाय, इतरांचं ऐकल्याशिवाय तुह्मीं थोड्या जास्त स्वतंत्रतेनं नाहीं कां वागलांत? त्या चुकीचं हें फळ आहे." "रमावहिनी, तुह्मी खरोखरच माझ्या खऱ्या खऱ्या वहिनी आहां-कारण, परवां मास्तरांनींच नाहीं कां माझी अब्रू बचावली-त्या नीच मांगाच्या हातून माझं संरक्षण केलं? द्रौपदीच्या

हांकेला जसा कृष्ण धांवून गेला तसा हा माझा बंधुराया माझ्या हांकेला धांऊन आला." "त्यांत काय मोठंसं? दुसऱ्याला मदत करणें हें प्रत्येकाचं कर्तव्यच आहे." "मग सांगा वहिनी, चुकीला प्रायश्चित्त नाहीं कां? कोणचा नेम आचरूं? काय धर्म करूं? सांगा. सांगा. कशा तऱ्हेचं प्रायश्चित्त या चुकीला मीं घेऊं?" 'परमेश्वराचं नांव. त्या परमात्म्याचं गोड नांव. तोच परममंगल परमात्मा सगळ्यांच्या चुका पदरांत घेऊन पुनः साहाय्यला धांवत असतो. त्याचं स्मरण करणं ह्मणजेच खरी शांती. ती शांती तुह्मीं मिळवा ह्मणजे तुह्मांला खरं सुख होईल." "तें मला कसं शक्य आहे? मी कुठं राहूं? कुठल्या देवाजवळ राहूं? मला पतितेला कोण देवळांत येऊं देतो? कोण घरांत थारा देतो? मग उभं रहायलाच जर जागा नाहीं तर, मी परमेश्वर कसा आळवावयाचा?" "छे छे! वेडे मुली, असं ह्मणूं नकोस. तूं खरोखर पतित नाहींस—हा तुझ्यावर आळ आहे हें त्या परमात्म्याला नक्की ठाऊक आहे. तूं त्याला शरण जा. जो पाप्यांचा उद्धार करतो, जो दीनांचा नाथ आहे, त्याला तुझ्यासारख्याचा उद्धार करणं मुळींच कठीण नाहीं. तो तुझी उपेक्षा करणार नाहीं" "हें खरं कां? तो पवित्र प्रभु माझ्यासारख्या अपवित्र अबलेला आपल्याजवळ घेईल कां? मीं कुठं जाऊन त्याची आराधना करूं? मला सभ्यतेनं रहायला या पृथ्वीच्या पाठीवर कुठं जागा नाहीं!" "नाहीं, बाळ, परमात्मा कोणाचीही उपेक्षा करीत नाहीं. जर तुला कुठं रहायला थारा नसेल तर इथं ये, इथं रहा. हें घर तुझ्या धर्मबंधूंचं आहे. मला नणंद नाहीं, ती उणीव तूं भरून काढ—पण होतां होईतों, आपलीं माणसं आपण होऊन सोडूं नयेत हें चांगलं."

गंगू घरीं गेली. पण त्या माणसांनीं तिला मुळींच थारा दिला नाहीं. तेथून ती रडत रडत एका वस्त्रानिशीं रमाबाईकडे आली. त्यांनीं तिला आश्वासन देऊन ठेऊन घेतलें व वाचण्यासाठीं पोथ्यापुस्तकें घेऊन दिलीं. आरंभाला ती बहुतेक वेळ रडून काढी—पण रमाबाईनीं गोष्टी सांग, वाचायचें काढ, असें करून तिला उद्योगाला लावलें. तिचें धार्मिक वाचन बरेंच झालें, नंतर तिला इतरही ग्रंथ वाचायला दिले. अशा तऱ्हेनें तिच्या मनाच्या घडणीचा तिचा अभ्यास त्या वाढवीत होत्या. ही त्यांच्याकडे आल्यानंतर त्यांची बदली ८।१० दिवसांतच एका खेडेवजा शहरांत झाली. गंगूच्या मनावर याचा बराच परिणाम झाला.

आज बरेच वर्षांनीं माझी आणि रमाबाईची गांठ पडली. तेव्हां घरांत गंगामाई पाहिली. मी ह्मटलें, "ही कोण?" त्या ह्मणाल्या, "ही एक गृहदेवता आहे. प्रत्येकाच्या घरांत आनंद पसरवायचं काम ही करीत असते. आमच्या घरांतली ही टापटीप, हा देवधर्म, ही आमच्या गंगामाईच्या कर्तृत्वाचे उत्तम नमुने आहेत." मीं ह्मटलें, "ह्मणजे? आज इथं आल्यापासून दोन चार जणींच्या तोंडून गंगामाई गंगामाई असं जें नांव ऐकलं तें ह्यांचंच कां?" "होय होय हीच ती पवित्र गंगा—हिच्या ओघांत सांपडणाऱ्या प्रत्येक प्राण्याला ही आपल्या जळानें पवित्र करते व मातेप्रमाणें काळजीपूर्वक त्याला कांठाला नेते—ह्मणूनच, हिला सर्वजण गंगामाई ह्मणतात. आमच्या गांवाचं ती जीवन आहे. गोरगरीबांचं तें एक दैवत आहे. भुकेल्याची भूक, तहानेल्याची तहान गंगामाईला समजते." मीं ह्मटलें, "ह्मणजे?

परोपकारार्थ खर्चण्याजोगी मोठी इस्टेट त्यांच्याजवळ आहे वाटतं ? ” तशी रमाबाई ह्मणाल्या, “ छे ! छे ! ताई, तूं चुकतेस. सांठवलेलं द्रव्य केव्हांच संपतं पण ईश्वरसेवेच्या खडतर तपश्चर्येनं आमच्या गंगामाईनं जें बळ मिळविलं आहे त्या बळाच्या जोरावर त्या प्रत्येकाला योग्य वेळीं मदत करतात आणि त्यामुळंच, त्यांचा प्रत्येक शब्द कोणीही खालीं पडूं देत नाहीं. या माझ्या माईचे गुण मीं तुला किती ह्मणून सांगू ? ” हें बोलणें ऐकून गंगामाई माझ्याजवळ आल्या व डोळ्यांत अश्रू आणून ह्मणाल्या, “ ताई, माझ्या वहिनीच्या ताई त्या माझ्या ताईच. वहिनीचं सांगणं मुळींचं ऐकूं नका. मीं एक पतित अबला आहे. जर कांहीं माझ्यांत सुधारणा झाली असेल तर, ती ह्या परिसामुळं. ताई, मी भिकारीण ह्मणून आज दारोदारची भिकारीण व्हायची. ती ह्या वहिनीच्या पुण्याईनं एक संसारांत राहिलेली हतभाग्य स्त्री ह्मणून ती तुह्मांला दिसत आहे. आतां एवढं मात्र खरं कीं, ह्या संसारांत कांहीं अर्थ नाहीं असं जें वाटत होतं तें ह्या वहिनीच्या संगतीनं—इच्छा असल्यास जगांत प्रत्येकाला पुष्कळ काम आहे, फक्त करणारीं माणसेंच पाहिजेत—असं मला पटूं लागलं आहे-आणि ह्मणून ह्या माझ्या गुरुमाऊलीच्या देखरेखीखालीं होईल तेवढं दुसऱ्याच्या उपयोगीं पडण्याचा प्रयत्न मी करीत असतें व उरलेला वेळ ईश्वरस्मरणांत घालवते. नाहीं तर मी कोण ? ” असें ह्मणून तिनें आपली सर्व हकीगत मला सांगितली. तेव्हां पूर्वचरित्रांतली गंगू व आजच्या तपस्विनी गंगामाई ह्या दोहोंतील अंतर पाहून माझ्या तोंडांतून शब्द

निघाले, " अहाहा ! अशा किती तरी नामधारी पतित अबला आमच्या समाजांतील राक्षसी वृत्तीच्या पुरुषांच्या संसर्गानं खालीं पडून धुळींत मिळून जात असतील ! अज्ञानानं पाप-पंकांत रुतणाऱ्या ह्या अबला जर पतित झाल्या तर त्याचा दोष, बा समाजा, तूं कोणाच्या माथीं लादणार ? ज्या स्त्री-देवतेच्या चरणीं तुह्मीं कांहीं वेळां लोटांगण घालतां तेच चरण खालीं ओढायला जेव्हां तुह्मी तयार होतां तेव्हां कोणावर रागवायचं ?" असा विचार करीत करीत मीं घरीं आले आणि पवित्र व पुण्यशील गंगामाईची हकीकत लिहून काढली ती वाचकभगिनींच्या पुढें ठेविली आहे.

---

# गोष्ट ३ री.

## संधिकाल.

**गांवा**लगत पण वस्ती सोडून पवना नदी मोठ्या थाटानें वहात होती. तिच्या एका तीराला लहान लहान टेंकड्या असून त्या सगळ्या हिरव्यागार वनश्रीनें खुलल्या होत्या. त्यांत मधूनमधून पांढरा चाफा व इतर रानफुलें खुलून दिसत होतीं, तर दुसऱ्या कांठावर एका मोठ्या राजप्रासादाचा पार्श्वभाग आलेला होता. तेथें एक मोठी गच्ची असून त्या गच्चींतून आंतील दिवाणखान्याच्या खिडक्या व दरवाजे दिसत होते. गच्ची सुंदर तर होतीच पण तेथें मांडलेलें व्यासपीठवजा सिंहासन तर नितांत सुंदर होतें. तें उत्तम अशा संगमरवरी दगडाचें केलें असून त्यावर भरगच्ची आच्छादन घातलेली एक गादी व लोड होतें, त्या गादीवर लोडाला टेंकून एक गृहस्थ बसला होता. त्याची आंगलट पिळदार व बांधेसूद असून आंगांत एक साधा मध्यम जाडीचा सुंदर परीटघडीचा करकरीत सदरा होता. नेसलेलें धोतरही त्याप्रमाणेंच शुभ्र होतें. जवळच एक जरीकाठी उपरणें पडलें होतें. त्या गृहस्थाचें वय चाळीशीजवळ पण पस्तीशीच्या पलीकडे असावें असें वाटत होतें, तरी पण त्याच्या तोंडावर तारुण्याचें सुंदर तेज खेळत होतें व त्याच्या जोडीला शौर्य व सच्छिलताही दिसत होती. कोणीही त्या गृहस्थाकडे पाहिल्यास त्याच्याबद्दल त्याला आदर आणि प्रेमच वाटेल अशी त्याची ढब होती व ह्यावेळीं तो ज्या तऱ्हेनें बसला होता ती ढब पाहिली असतां तो कोणीतरी थोर गृहस्थ असावा असें चटादिशीं वाटे. तो

खरोखरच थोर गृहस्थ होता. महाराष्ट्रांत दुर्दैवाच्या तडाख्यांतून जीं थोडींशीं ब्राह्मण संस्थानें उरलीं आहेत, त्यापैकीं एका संस्थानचे ते चीफ होते. रयतेला त्यांच्याबद्दल फार अभिमान होता. ते सुशिक्षित असून थोड्याच वर्षांपूर्वीं त्यांच्या हातांत राज्याधिकार आला होता. आपल्या राज्यांत प्रगमनशील सुधारणा करण्याची त्यांची मोठी महत्वाकांक्षा होती.

ह्यावेळेस तिसरा प्रहर टळून गेला होता तरी संध्याकाळ झाली नव्हती. भास्कराचे प्रखर तेज कमी होऊन त्यानें आतां सौम्यरूप धारण केलें होतें, त्यामुळें वनश्रीवर पडलेलीं कोवळीं उन्हें तिच्या शोभेंत भर घालीत होतीं. नदीच्या संथ प्रवाहावर पडणारीं सूर्याचीं कोवळीं उन्हें कांहीं अपूर्व आनंद देत होतीं. ह्यावेळेस जणों सर्व सृष्टी आनंदानें डुलत होती. हें सौख्य, हा आनंद आकंठ पान करण्याच्या नादानेंच जणो चीफसाहेब तिकडे एकाग्रतेनें पहात होते. त्यांचे नेत्र समोरच्या टेंकड्यांकडे खिळले होते व त्यांची इतकी तंद्री लागली होती कीं त्यांना बाह्य जगाचें भानही नव्हतें असें एखाद्यास वाटावें. पण कल्पना कशाला ? ती पहा त्या दिवाणखान्याच्या गच्चीकडील दरवाजांत कोण बरं उभी आहे ? पंचवीस वर्षांची एक तरुणी दरवाजावर हात ठेवून उभी आहे तिच्या रुबाबदार चेहऱ्यावरून व वैभवशाली वस्त्रप्रावरणांवरून ह्या राणीसाहेबच असाव्यात असें वाटतें. ह्या रूपानें तर सुंदरच आहेत पण त्यांच्या सौंदर्यांत साध्या रहाणीनें विशेष भर पडली आहे. ह्या वेळेस त्या एक चंदेरी पातळ नेसल्या असून तशाच नाजूक खणाची चोळी अंगांत आहे. हातांत दोनदोन बांगड्या असून बोटांत हिऱ्या पाचूची आंगठी आहे व गळ्यांत नुसतें

सौभाग्यसूचक मंगळसूत्र आहे. भाग्यशाली दिसणाऱ्या कपोलावर चंद्रकोर भिवयांच्यामध्यें थोडा वर, सुंदर सरळ बारिक नाकाच्या अनुरोधानें लावलेला मंगल कुंकुमतिलक ह्या सर्व सौंदर्याला शोभा देत होता. थोडा वेळ तेथें उभे राहून मग त्या हळूंच हंसगतीनें चालत चालत आपल्या पतिराजांच्या पाठीशीं येऊन उभ्या राहिल्या पण त्यांना कांहीं त्यांची चाहूल लागेना. मग त्यांनीं अगदीं हळूंच पतिराजांच्या खांद्यास स्पर्श केला; त्याबरोबर एकदम दचकून स्वारीनें मागें पाहिलें, तेव्हां हंसत राणीसाहेब ह्मणाल्या, " एवढा कसला विचार चालला आहे ? "

" छे ! उगीचच कांहीं तरी. "

" वा ! ह्मणजे माणसं आलेलींसुद्धां समजत नाहींत. "

" तसं तुह्माला उगीचच वाटतं ' थोड थांबून पुन्हां ते ह्मणाले, ' एकटं बसलं ह्मणजे डोकं कांहीं तरी काम करतं. '

' हो, पण इतकी तंद्री ? '

' चालला होता कांहीं तरी विचार. '

' मग तो मला ऐकण्याजोगा नाहीं कां ? '

' बायकांना त्यांत काय समजणार ? तुह्मी आपली मजा करावी झालें,

' अस्सं अस्सं ! बरं मजा ह्मणजे काय ? '

' तें मानण्यावर आहे. '

' बरं आपल्याला काय वाटतं तें तरी सांगायचं. '

' जशी वेळ येईल तसं वाटतं. '

' ह्मणजे ? '

‘ म्हणजे काय ? एखाद्या वेळेस तुमच्याशीं बोलण्यांत मजा वाटते, एखादे वेळीं नुसता विचार करण्यांत वाटते. आतां ह्या टेकडीचें सौंदर्य पाहण्यांत मजा वाटते. खरेंच ह्या वेळेस त्या टेकडीवर वनराजीचें सौंदर्य कोंवळ्या उन्हामुळें किती खुलून दिसत आहे बरं.”
“ आपण दोघं तेथें पर्णकुटी बांधून रहायला जाऊं, ” राणीसाहेब म्हणाल्या, “ हेच हेच विचार मघाशीं माझ्या मनांत आले होते; पण ते दोघांबद्दल नाहींत, एकट्याबद्दलच. ”

‘ तें बरोबर आहे. कारण पुरुष नेहमीच आप्पलपोटे असतात. बायकांना एकटं रहायला नको असतं म्हणून. ’

‘ हो हो तर, पूर्वींच्या काळांत बायकासुद्धां एकट्या रहात. मग सध्यांच्या शांततेच्या काळांत कसली भीति ? पण आमची मनोरचनाच आप्पलपोटी; नाहीं बरं ? ’

‘ मग ते आप्पलपोटे विचार तरी सांगावे,’ राणीसाहेब हंसत हंसत म्हणाल्या.

‘ नाहीं, आम्हीं सांगणार नाहीं. आम्ही आपले आप्पलपोटे; पण आपण तरी आज सकाळीं आपले विचार कुठें सांगितले ? ’

‘ होय, सांगितले नाहींत खरें; पण तेव्हां स्वारीच्या एकदम येण्यानें मी इतकी गोंधळून गेलें कीं, मला माझ्या विचारांची नीट जुळवाजुळव करून सांगतांच येईना. शिवाय भोंवती सेवकजनांची गर्दी.’

‘ म्हणून आतां त्यांची हाकालपट्टी करून आला वाटतं. ’

' होय तर; पण अशा बोलण्यांत मूळ गोष्ट मी उडवून देणार नाहीं. मला तंद्री लावणारे विचार ऐकण्याची फार इच्छा झाली आहे. '

' पण मग आपले विचार सांगायचें वचन हवें. '

' कबूल; पण आधीं इकडचे,' असें मानेला हिसडा देऊन गोड हास्य करीत लडिवाळपणानें राणीसाहेब ह्मणाल्या. ' बरं बुवा, स्त्रीहट्टापुढें पुरुष हटायचेच. असो. आह्मी येथें बसून ही शोभा पहात असतां आमच्या डोक्यांत असा विचार आला कीं,' ही शोभा किती आनंददायक आहे. ह्मणूनच रानांवनांत ह्मणजे शुष्क जंगलांत नाहीं, तर जेथें जगन्नियंत्याचें क्रीडांगण पहायला मिळेल अशा ठिकाणीं जाऊन साधुसंत ईश्वराधना करीत असतात. त्यांत स्वारस्य आहे. आपण पुष्कळ वेळां असें ह्मणतों कीं, देवाची उपासना संसारांत होत नाहीं कां ? होते. होत असेल; पण संसारांत रहाणाऱ्या मनुष्याला घरचा संसार सोडला तरी समाजाचा संसार त्याला त्रास देणारच. पण ती निसर्गसुंदर जागा पहा. तें सर्वांच्या मालकीचें पाणी पहा. तो विधात्यानें लाविलेला दिवा पहा. काय सौंदर्य ! काय आनंद ! काय समाधान ! तेथें जावें, बसावें व ईश्वराचे गुणानुवाद गात त्याच्याशीं एकरूप होण्याची पूर्वतयारी करावी. खरेंच, त्यांत आनंद आहे, समाधान आहे, पूर्ति आहे. हें राज्य, हा पैसा, हा मोह, हीं समाजबंधनें कांहीं नकोत. कटकट नको. कोणीही ह्यांचा उपभोग घेईल. जर मिळेल तर तें स्वानंदसुख मिळवावें असे मला वाटत होतें आणि जणो तेथें जायच्या मी तयारींत आहे अशा तऱ्हेनें मला

आनंद झाला होता. इतक्यांत आपली स्वारी आली व आमची समाधि भंगली. ह्याबद्दल कोणची शिक्षा करूं ?'

'इतक्या गोड आनंदांतून जागें केल्याबद्दल कोणचीही शिक्षा क्षम्य आहे, पण खरंच योगायोग कांहीं विचित्र असतो हेंच खरें; कारण आज आपल्या विचारांसारखेच कांहीं विचार माझ्या डोक्यांत आले होते पण मी त्यांचा शेवट स्वार्थी तऱ्हेनें लावला. सकाळीं मी स्नान करून माझ्या शृंगारमंदिरांत आलें. तेथें वेणीफणी व वस्त्रपरिधान करून आरशापुढें आलें तों तेथें टेबलावर एका तबकांत कांहीं अलंकार मला घालण्याकरितां दासींनीं आणून ठेविले होते. ते पहातांच माझ्या डोक्यांत असा विचार आला कीं, मी एका गरीब कुटुंबांतील मुलगी. असें वैभव पहायला मिळेल अशी कधीं कल्पनाही नव्हती. माझ्या आईबापांनीं चार पांच हजार रुपये खर्च करून मला एखाद्या साधारण सुखवस्तु कुटुंबांत दिली असती. पण माझ्या पूर्वजन्मींच्या सुकृतानें व आपल्या कृपाकटाक्षानें हें वैभव मला लाभलें; तर ह्याचा उपयोग नुसते हिऱ्यामोत्यांचे दागिने अंगावर घालून मिरविण्यांतच करूं का ? विलासाला व चैनीला कधीं शेवट नाहीं, पण ईश्वरानें अनायासें दिलेलें हें वैभव व अनेक वर्षें तपश्चर्या करूनसुद्धां न मिळणारा आपल्या सारख्या सुशिक्षित, विचारी व वैभवसंपन्न माणसांचा सहवास ह्यांचा उपभोग व्यक्तिविषयक सौख्यापेक्षां दुसऱ्या तऱ्हेनें नाहीं कां करतां येणार ? मी बाहेर पडलें ह्मणजे अमक्यांची पत्नी ह्मणून लोकांनीं माझा जयजयकार करावा अशी मनीषा बाळगण्यापक्षां आपल्या सहवासांत ह्या रयतेकरितां कांहीं करून मग जर हक्काचा जयजयकार मिळाला, तर तो ऐकायचा थोडा तरी हक्क आहे. हिऱ्या-

मोत्यांच्या अलंकारानें मी आपल्या नेत्रांना रिझवूं शकेन; बाह्य जग वैभवशाली ह्मणून ह्मणेल, स्त्रिया सौंदर्याचें वर्णन करतील; पण त्याच्या-पेक्षां दुसरा एखादा सुंदरसा दागिना जर ह्या राजवाड्यांत घडवितां आला, आपल्या सहवासाच्या पुण्याईनें तो सर्वत्र वाटतां आला तरच हे हिऱ्यामोत्यांचे अलंकार मी घालीन. पूर्वजांनीं मिळविलेल्या ह्या वैभवाचा मी आनंदानें स्वीकार करीन, पण ज्यांना ते पहायला सुद्धां मिळायचे नाहींत अशांच्या पुढें ते घालून नुसतें मिरविण्यांत काय विशेष आहे? आतां आपल्या डोक्यांतही असेच विचार आले, पण राज्य सोडायचा विचार मात्र मला पसंत नाहीं. आपण हंसा, खुशाल हंसा. मला स्वार्थी ह्मणा. पण सध्यां आपली स्थिति अशी आहे कीं, आधीं आपलीं राज्यें नाहींत. जीं आहेत त्यांत खऱ्या सुशिक्षितांचा अभाव. ज्याला जबाबदारीची जाणीव आहे, आपण राजा हें उपपद सार्थ करून दाखवावें असें ज्यांना वाटतें, राजाचीं कर्तव्यें ज्यांना कळतात अशीं माणसें तर विरळा. 'खाना पिना और मजा मारना' हीच पुष्कळांची स्थिति. आयत्या पिठावरील हे नागोबा. अशा वेळीं ज्यांना कळतं आहे, तळमळ आहे, त्यांनीं आपल्यावरील जबाबदारीचीं कर्तव्यें सोडून आत्मसुखाकरितां—वैय्यक्तिक इच्छापूर्तिकरितां—अनेकांचें सुख बुडवावें हें खात्रीनें पाप ठरेल. आज आपण बाजूला झालां नी एखादी व्यसनी व्यक्ति ह्या पदावर अधिष्ठित झाली तर तिला आपल्या अनेक व्यसनांच्या व चैनीच्या तृप्तीसाठीं हा खजिना अपुरा पडून रयतेला धाईधाई रडविण्याची बुद्धि होणार नाहीं कशावरून? त्यापेक्षां आपण मनानें विरक्त होऊन संसार करूं या आणि आपल्यासाठीं होणारा खर्च व राज्यांतील इतर खर्च यांकरितां लागणारा पैसा

ज्यांच्याकडून घेतों त्यांच्याच सुखाकरितां तो व्यवस्थितपणें खर्च करून दाखवूं या. कां ? कांहींच बोलायचें होत नाहीं ? तो पाहिला का, दिनमणी अस्तास जात आहे आणि तो लालबुंद गोल एका क्षणांत नदीच्या पात्रांत बुडून जाईल.'

' खरं आहे. कारण आतां संधिकाल झाला आहे व राणीसाहेब, आपल्याही विचारांचा संधि झाला हें ऐकून आपल्या चेहऱ्यावर जी लाली आली आहे त्यामुळें मला आज दोन गोल पाह्यला मिळाले. कां? लाजायला काय झालें ? आपण अगदीं खरं तेंच सांगितलेंत. मी तुमचें भाषण लक्षपूर्वक ऐकत होतों व दर क्षणाला मला वाटत होतें कीं, इतर राजकन्यांना नाकारून मी जी निवड केली ती अगदीं योग्य होती. सरल, खरोखर तूं नांवाप्रमाणें सरल आहेस; तुझी योग्यता फार मोठी आहे, मला आजपर्यंत ही कल्पना नव्हती. बाह्यरूपाला खुल-विणारें तुझें हें अंतरंग पाहून मी धन्य झालों. या, लाजतां का? आपण आतां आंत जाऊं, पण त्यापूर्वीं ह्या संधिकालीं मी आपल्या विचारांशींही संधि केला आहे असें सांगतों.

ह्या वळेस राणीसाहेब त्या संध्याप्रकाशाच्या शोभेकडे बघून हळूच पुटपुटल्या, ' ह्या संधिकाला, आजचा हा योग किती भाग्याचा आहे. असें प्रसंग आयुष्यांत वरचेवर येतील का ? "

॥ श्रीशं वन्दे ॥

---

# गोष्ट ४ थी.

## दैव-योग.

—१—

देशमुखांचें घराणें फार जुनें आणि नांवाजलेलें असें होतें. सध्यां घरीं शेतीचा मोठा फड असून त्यामुळें ठेवावीं लागणारीं गडी-माणसं, गाडी-घोडीं यामुळें तेथें जहागिरीथाट दिसावा यांत नवल नव्हतें. परमेश्वर कृपेनें त्यांच्या वैभवास साजेसा त्यांना एक मुलगा असून तोही आपल्या आई-बापांना आपल्या बाल-लीलांनीं आनंदवीत होता.

एके दिवशीं सायंकाळीं गड्याबरोबर फिरून आल्यानंतर बाळाचा चेहरा सुकल्यासारखा दिसत होता. त्याचें तें रोजचें दुडदुड धांवणें, बाहेरच्या मौजा, बोबड्या पण स्पष्ट शब्दांत सांगणें, पित्या-मातेच्या कंठास मिठ्या मारणें आज मंदावलेलें दिसत होतें रात्रीं आई-शेजारीं बसून जेवणही गेलं नाहीं. त्याला अंथरुणांत चिऊकाऊ करून निजविलें पण झोंप येईना. अंगांत ताप सडकून भरला, डोकें कढत झालें, जिभेस कोरड पडली, ओंठ सुकले, पाणी वारंवार मागूं लागला. राधाबाई घाबरल्या, दादासाहेबांना बोलाविलें. फॅमिली डॉ. रा. जोशी यांनां बोलावणें गेलें, त्यांनीं येऊन बाळास तपासलें. त्यांच्या चर्येवर चिंतेच्या व थोड्याशा अस्पष्टशा निराशेच्या रेषा उमटल्या, पण

राधाबाईच्या समजुतीखातर त्यांनीं निदान न कळवितां औषधाकरितां गडी बरोबर नेला आणि औषधाच्या पुड्या व कपाळावरील पट्टीचें औषध पाठवून देतों ह्मणून सांगितलें. दादासाहेब व राधाबाई उभयतां बाळाच्या पलंगाजवळ बसलीं ! बाळ अंथरुणांत सारखा तळमळत होता. राधाबाई कपाळ चेंपीत होत्या. अशा स्थितींत बाळाच्या दुखण्याचे २।३ दिवस गेले दुखण्याचा पाय मागें हटेना. दादासाहेबांचा डॉ. जोश्यांवर पूर्ण विश्वास होता, तरी राधाबाईच्या समजुतीखातर त्यांनीं सिव्हिलसर्जन आणिला, पण गुण येईना. आज तर मुलगा भारीच घालमेल करीत होता. तो बोलेना, हाका मारल्या तर समजल्याचें चिन्ह दिसेना. मात्र हात पाय झाडून किंचाळ्या फोडणें सारखें चालू होतें. सारींजणं काळजीनें तटस्थ होऊन, त्याच्या भोंवतीं बसलीं होतीं.

--२--

सकाळची वेळ, गांवांतील भरवस्तींतील गल्लींत दुसऱ्या मजल्यावरच्या भाड्याच्या लहानशा घरांत चुलीजवळच्या कोपऱ्यांत स्थापन केलेल्या देवापुढें, यमूताई भक्तिभावानें पूजा करून हात जोडून नमस्कार करीत बसली होती. जवळच चहाच्या उपकरणाची सिद्धता केली होती. समोरच्या खिडकींतून सकाळच्या सूर्याचे येणारे तांबूस किरण तिच्या शरिरावर पडून तिचा गारवर्ण अधीकच खुलवीत होते. उंचशा भालप्रदेशावर लाविलेला कुंकुम-तिलक ज्याप्रमाणें तिच्या सौंदर्याची शोभा वाढवींत होता, त्याचप्रमाणें तें भव्य कपाळ ती भाग्यशाली आहे असें सुचवीत होता. तिच्या गालांवर व चेहऱ्यावर पडलेलीं तांबूस किरणे जशीं तिच्या सौंदर्यांत भर घालीत होतीं, तसाच तिचा

तो सुंदर भक्ति-युक्त चेहरा पहाणाराचे अंतःकरणांत तिच्याबद्दलच्या चांगुलपणांत भरच घालीत होता. तिनें आपले जोडलेले हात खालीं केले. अनन्यभावानें मनाशीं पुटपुटली, " परमात्मा ! यांच्या परिस्थितींत मला कांहींच कां मदत करतां येणार नाहीं ? " इतक्यांत पाठीमागें पावलांचा ध्वनी झाला. ती चटदिशीं चपापून उठली. पदर सांवरला व हंसतमुखानें तिनें पतीराजांचें स्वागत केलें. पण भय्यासाहेब आज विमनस्क स्थितींत होते. त्यांनीं तिकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. ते आपले पाटावर बसले. चहा गाळून तयार झाला. भरलेला पेला मोठ्या आदरानें पती-देवापुढें केला गेला. पण ते आज अगदींच भानावर नव्हते; तेव्हां मोठ्या प्रेमळपणानें यमूताई म्हणाल्या, " काय बरं ? आज कांहीं बरं वाटत नाहीं कीं काय ? "

**भय्यासाहेबः**—बरं नसायला काय झालं ? पण बरं असायला जें कांहीं लागतं त्याचा अजून कांहींच पत्ता नसल्यानें, त्याच्या अभावीं मात्र आजारी पडावं लागणार आहे. कारण तूं बघते आहेस, आपल्याला इथं येऊन चार महिने झाले, अजून एक पै देखील मिळाली नाहीं. बाबांनीं आजपर्यंत मोठ्या सुखासमाधानानं आमचं शिक्षण केलं, पण त्यांच्यामागं अद्याप ४ मुलांच्या शिक्षणाचा बोजा आहे; अशा वेळीं अद्याप मला पाठवावयाच्या पैशांची त्यांची काळजी संपू नये का? दर महिन्यास त्यांच्याकडून पैसे मागावयाला मला आतां शरम वाटते. हेंच पहा आतां पैसे संपले, पुढें काय ?

**यमूताईः**—खरंच, विचार करण्याजोगा प्रश्न आहे खरा ! पण गडे ! आधीं चहा निवतो आहे, तो घ्यावा हें पहा, वडिलांच्या

आशीर्वादानें आपले हेही दिवस जातील. तो कृपाघन परमात्मा श्रीराम आपल्याला खास विसरणार नाहीं.

**भय्यासाहेब हंसून म्हणाले:**—" तुझा त्या रामावर फार विश्वास आहे खरा, पण माझ्यांतला राम मात्र नाहींसा होत चालला आहे. तो राम उद्यांची काय तजवीज सुचवितो आहे ? सांग बरें ? "

**यमू:**—हे माझे बिलवर मोडावे.

**भय्या:**—मोठीच शहाणी किनई ! बाबांनीं केलेले दागिने मोडायला मला काय अधिकार आहे ?

**यमू:**—बरं, आपण या गोष्टीची चर्चा दुपारीं करूं. मला आज बाहेर जायचं आहे. येथल्या देशमुखांचा मुलगा फार आजारी असून त्याचं तंत्र आज अधीकच बिघडलं आहे, असं मला बायजानं सांगितलं; तेव्हां मी त्यांच्याकडं जरा जाऊन बाळाला बघून येतें.

**भय्या:**—तूं डॉक्टरीण म्हणून कां जाणार आहेस ? एवढ्या मोठ्या श्रीमंताकडे आपण अशा वेळीं कसं जायचं ?

**यमू:**—श्रीमंतांकडे ह्मणून नाहीं जात मी. माईसाहेब माझ्या लहानपणच्या शाळा-मैत्रिणि आहेत. त्या कांहीं श्रीमंतीच्या थाटांत माझ्याशीं वागत नाहींत. उलट बहिणीच्या नात्यानं वागतात. तेव्हां त्यांचं बाळ आजारी असलेलं मला कळून मी त्यांच्याजवळ गेलें नाहीं तर त्या मला काय म्हणतील ?

**भय्या:**—तें तुमचं तुम्ही पहा. माझी कांहीं हरकत नाहीं.

—३—

बाळाच्या पलंगावर दुःखी अंतःकरणांत राधाबाई बसल्या होत्या, इतक्यांत यमूताई आल्या. भरलेल्या डोळ्यांनीं व जड अंतः-

करणानें त्यांनीं तिचें मूक स्वागत केलें व बाजूला सरून पलंगावर तिला जागा दिली. यमूताई बसली. तिनें बाळाकडे पाहिलें. त्याची सारी हालचाल ती लक्षपूर्वक पहात होती. मधून कांहीं माहिती ती माई-साहेबांना विचारीत होतीच. त्यावरून तिच्या डोक्यांत एकदम एक कल्पना आली. ती एकदम उठली व म्हणाली, " माईसाहेब, आपण तर बाळाकरितां पुष्कळच इलाज केले, पण आमचे येथील मंडळीही डॉक्टरच आहेत. बोलावूं कां ? एकाद वेळेस मोठमोठया माणसांना न सुचणारी गोष्ट लहानांनाही सुचते ! "

माईसाहेब--तूं काय वाटेल तें कर; मी वेडी झालें आहे. कोणी-कडनं माझं बाळ मला लाभो म्हणजे झालं ! "

—४—

पडल्या फळाची आज्ञा म्हणून यमूताई घरीं गेली आणि आपल्या मनांत वाटलेल्या कल्पना व त्यावरील व्यवहारिक कल्पना तिनं पतीला सुचविल्या व लवकर चालण्याबद्दल आग्रह धरिला. प्रथम भय्या-साहेबांनीं तिची टर उडविली. तिनें काकुळतीनें विनंती केली, " आपण यावेळीं चला. मानापमानाकडे फारसें बघूं नका. कदाचित् हाच प्रसंग तुमची कीर्ति वाढवावयाला कारणीभूत होईल. " असें म्हणून जवळ जवळ जबरीनेंच तिनें त्यांना घराबाहेर काढिलें.

देशमुखांकडे दोघेंही आलीं. माईसाहेबांच्या परवानगीनें भय्या-साहेबांनीं रोगी तपासला; यमूताईची कल्पना त्यांना पटली. बरोबर आणि-लेला बर्फ त्यांनीं बाळाच्या मुतीच्या वाटेवर सारखा फिरावयाला आरंभ केला. यमूताई बाळाला मांडीवर घेऊन नर्सचें काम करीत बसली.

डॉक्टर जवळ बसून दोन दोन ऊन पाण्याचे थेंब बाळाच्या तोंडांत सोडीत होते.

१५।२० मिनिटांत बाळाला सडकून लघवी झाली आणि बाळाचें ओरडणें बंद होऊन तो शांत पडला. झोंपी गेलेल्या बाळाला पलंगावर निजवून मच्छरदाणी सोडली गेली.

डॉक्टरचे उपचार चालू असतांच दादासाहेब आंत आले होते व त्यांनीं त्यांच्याबद्दलची माहिती राधाबाईकडून मिळविली होती. त्यामुळें ते काम संपवून जाऊं लागले तेव्हां त्यांच्याशीं ते चार शब्द बोलले. मुलाला आराम पडला हें पाहून उभयतां पतिपत्नि खूष झालीं. " तुमचंच औषध चालू ठेवा " असं त्यांनीं डॉक्टरना सांगितलं. अंतःकरणांतल्या प्रेमळतेनें व मैत्रिणीच्या नात्यानें यमूताई बाळाची अगदीं बारकाईनें नजर ठेवून सुश्रूषा करीत होती व डॉक्टर निष्ठेनें औषध देत होते ईश्वरी इच्छेमुळें बाळ बरें झालें. पतिपत्नी आनंदलीं. ज्याच्या त्याच्या तोंडीं नव्या डाक्टरचें नांव झालें.

---

**यमूताई:**-आज काय चहाला दिखील घरांत यायला वेळ नाहीं?

**भय्यासाहेब:**-दोन तीन जरूरीचे पेशंट असल्यामुळें कामांत होतों. हा आलोंच.

**यमू०:**—काय बाई तरी, केव्हांचा चहा करून वाट पहाते आहे मी !

**भय्या०:**— पण ही गर्दी व्हावी ह्मणूनच ना सारखी जिवाची तळमळ चालली होती. आजचा माझा नांवलौकिक व पैसा हें तुझ्या श्रमाचं फळ आहे.

**यमू०:-** छे मी काय केलं ? योगायोग आला. माईचं बाळ बरं झालं व त्यामुळं त्या उभय पतिपत्नींच्या तोंडून जिकडेतिकडे आपलं नांव झालं.

**भय्या०:-** पण त्या दिवशींचा खरा डॉक्टर तूंच ! तूंच मला आग्रहानं नेलंस !

**यमू०:-** छे ! मी कांहींच नाहीं केलं. ईश्वरानं मला निमित्तमात्र पुढं करून, हें यश आपल्या पदरीं बांधलं. खरोखर प्रभु दयाळु आहे. मात्र अनन्यभावानं आपण त्याला शरण गेलं पाहिजे. माझ्या रामांत खरोखरच " राम " आहे.

असें ह्मणत असतां यमूताईच्या तोंडावर भक्तिभावाचें तेज चमकत होतें. त्याच वेळेस भय्यासाहेब मनांत पुटपुटले.

" कांहीं वेळेला असे कांहीं आयुष्याला उन्नति देणारे प्रसंग घडून येतात कीं, त्यामुळें भाविक मनाची ईश्वरावर अढळ श्रद्धा बसते आणि तें प्रभुचरणीं लीन होतें. "

———:*:———

# गोष्ट ५ वी.

## विठोबाची वारी.

जाधवराव पाटील ह्मणजे जुनें मराठ मोळी घराण्यातले; पण काळाच्या तडाक्यांत सांपडून सांपत्तिक दृष्टया खालावलेलें घर, पण मनुष्य मोठा सज्जन होता. विठोबाची भक्ति तर त्यांच्या घराण्यांत चार पिढ्यांची होती. त्यांचे आई वडील तर पंढरीचे वारकरी होते. पण यंदा दिवस वाईटच आले, धान्य नीट पिकलं नाहीं, पाऊस वेळेवर पडला नाहीं व जें पिकलें त्याचें उत्पन्न यावें तसें आलें नाहीं. ह्यामुळें एखादं अधिक उणं मनुष्य ठेऊन घरचा गाडा रेटावा, तर ती ताकद नव्हती. त्यामुळें पाटलिणीला व गंगा ह्मातारीला बरेंच काम पडलें, पण गंगाबाईची गोष्ट वेगळी होती. पाटलीण बाईना गरोदरपणामुळें ते श्रम जाणवले, कार्तिकी आली, वारकरी निघाले, माळकरी निघाले, गंगाबाईचा शोध घेतला पण सून प्रसूत व्हायला झाली, जावं तरी खराब, राहावें तरी पंचाईत. लक्ष विठोबाकडे, जीव सुनेकडे, आज प्रसूत होईल जाईन, उद्यां होईल जाईन, पण तें कांहीं होईना. ह्मातारी रोज देवापुढें बसे आणि ह्मणे विठोबा नाहींका नजरे पडायचे ! माझा नेम चुकविणार ! उद्यां एकादशी, आज संध्याकाळीं पाटलीण बाळंत होऊन मुलगा झाला. जिकडे तिकडे झाल्यावर ह्मातारी मुलाला ह्मणाली, 'बाबा मी जाऊ आतां पंढरीला? तिकडे पोरहीं जिवाची सुटली आतां तूं निजसूर झालास.' पाटील जरा आज

मिजाशींत होते. ते ह्मणाले, 'आई तुला येड तर नाहीं लागलें? आतां निघून तूं उद्यां पंढरपूरला कशी जाशील ? आणि घरांत बाळंतीण.' ह्मातारी ह्मणाली, आतां काय बाळंतिणीचं आहे ४ दिवस. शेजाऱ्याकडून पथ पाणी घाल, नाहींतर एखादी मोटार बघना ?'

' मोटार ? ती काय चार आठ आण्याची बाब आहे ? मुद्दाम मोटार मागितली कीं दस रुपये घेईल ईस.

' घेवो बिचारा. '

' ठीक, ठीक, पैसा कोठला ? माझ्याजवळ तर दिडकी बी नाय.

' मी देईन, माझ्या पुतळ्या विठोबासाठीं. त्यांत काय त्यानेंच दिल्या, त्याच्याकरतांच खर्चीन्या.' 'मग तुझा विठोबाच मोटार पाठविल नी तूं जा. आतां पेज पाणी बघ,' असें ह्मणून पाटील झटक्यांत उठून गेले. मुलाच्या अशा वागणुकीनें ह्मातारीला फार दुःख झालें तिनें रात्रीं नवापर्यंत घरांतला धंदा केला आणि मग देवाजवळ पडली; पण एकसारखा विठोबाचा ध्यास दहा वाजले ११-१२ वाजले, रात्र जात चालली. चार वाजतां ह्मातारी उठली. काय मनाचा विचार केला देव जाणे; पण हळूच उठून दिंडी दरवाजा उघडून बाहेर पडली, ती थेट रस्त्याला लागली. इकडे पहिल्या रात्रीं पोर रडलं बाळंतिणीलाही झोप मिळाली नव्हती ह्मणून तीही निजली; सगळं घर निजलं. ह्मातारीचा पहाटचा हाकारा झाला नाहीं तर कोणीच उठलं नाहीं. सहा साडेसहाला सगळीं उठलीं; मग चौकशी करतात तर ह्मातारी नाहीं. जाधवरावांना कळल, ते जास्तच रागावले, चिडले, पण मग डोकं शांत झाल्यावर घोडें घेऊन गडी शोधाला पाठवला.

× * × * ×

पंच पंच उषःकाल झालेला आहे, बारीक वाऱ्यामध्यें गोड गारठ्याची झुळुक आहे, पशुपक्षी भक्ष्य शोधासाठीं बाहेर पडायच्या विचारांत आहेत, प्रत्येक झाडावर किलबिल किलबिल शब्द ऐकूं येत आहेत, जाणों पांखरें बाहेर पडतांना घरीं कसें संभाळून रहावें ह्याचें शिक्षण पिलांना देत आहेत, सूर्योदयाला अद्याप अवकाश आहे तरी पण सर्व दिशा उजळून जणो अधिकाऱ्याचें स्वागत करायला हंसत मुखानें उभ्या आहेत. नुकताच वर्षा काल संपला असल्यामुळें वनदेवता अजून नवतारुण्यांनीं फोफावलेलीच आहे. पण त्यांतही मोठमोठ्या वृक्षांच्या लवलेल्या फांद्या वगैरे पाहिल्या म्हणजे स्त्री सुलभशाली लीनता ती विसरली नाहीं असेंच वाटतें. अशा ह्या रमणीय वेळीं एक रसीक जोडीनें मोटारींतून पंढरपूर मार्गानें जात होते. दोघंही तरूण असून आनंदी दिसत होतीं. मोटारींतील जोडपें म्हणजे डॉ. अत्रे हे होते मिसेस यजमानांना म्हणाल्या, खरंच, रात्रींचा कांहीं विचार नसतां आज एकाएकीं हा देवाचा विचार ह्या नास्तिक माणसांनां कसा सुचला ? तेव्हां ते म्हणाले, मला नास्तिक म्हणण्यांत खरोखर तूं चुकते आहेस, पण आजचें मात्र तसें झालें खरें! काल संध्याकाळीं आपले ते प्रांत दीक्षित नाहीं कां ? ते आले होते व मला म्हणाले कीं, आम्ही आतां पंढरपूरला जातों आहों, तुम्ही येतां कां ? तेव्हां मी म्हटलें यात्रा ह्या नात्यानें जाण्याचा मला शोक नाहीं. मंडळींत म्हणून यायचें पण आज दुपारीं माझें येथें काम आहे, मग ते गेले. मी रात्रीं निजलों तों मला पहाटे स्वप्न पडलें कीं, 'जशी कांहीं आई येऊन मला उठवते आहे; व म्हणते, अरे, निजलास काय लवकर उठून पंढरीला चतुर्दिशीं जाऊन ये. मोटार आहेना ? मी

जागा झालों तर मला आश्चर्य वाटलें व मला आठवलें कीं, आई म्हणायची तूं मोटार ठेवलीस म्हणजे मी 'आखाडी' 'कार्तिकीला' पंढरीस जात जाईन. तर आज आपण पंढरपुराजवळ आहों. मोटारीनें सहज साध्य आहे आणि स्वप्नांत आईनें मुद्दाम सांगितलें आहे. जावें झालें. असा विचार घेऊन उठलों नी राणीसरकारला हांक मारली, ड्रायव्हर नव्हता, बोलाविसतों उशीर होईल, म्हणून निघालों."

"म्हणजे स्वप्नावर विश्वास आहे म्हणायचा"?

"नेहमीं नसतो. ओ! ओ! पण हें काय? सडकेवर बाई आहे; हार्न दिला तरी बाजूला कां बरं होत नाहीं?"

"थांबवावी गडे, मोटार. आपण बघूं या."

मोटार बंद करून दोघें उतरलीं व त्या बाईकडे जाऊन बघतात तों ती बेशुध्ध होती, पण हळु हळु सावध होत होती डॉक्टरनीं तिला धरून नीट बसवली, बाईनीं तिचा पदर वगैरे नीट केला, मग दोघांनीं तिला हळु हळु धरून आणून मोटारींत घातली थर्मास काढून थोडा चहा तिला पाजला, मग ती सावध झाली. 'बाबा तू कोण?' "आजीबाई, मी मुलासारखा आहे, तुह्मांला काय झालें? रस्त्यांत कां पडलात?"

"कांहीं नाहीं, विठोबाकडे जात होते, वाईच भोंवळ आली, वाटेल बरं आणि गेलें तरी आतां काय वाईट?"

'कुठें आहे तुमचा विठोबा, आह्मी तुह्मांला पोंचवतो. थोडा उशीर होईल, पण चालेल?' मिसेस अत्रे ह्मणाल्या.

'माझा विठोबाना, लई दूर आहे, अशी मोटार असति तर जवळ होता. पण गरिबाला कुटली ?'

'पण गावाचं नांव तर सांगा पाहू ?' डॉक्टर ह्मणाले.

'तो होय, तो राहातो पंढरीला. आज एकादश घरनं निघालें, असेल मर्जी तर पोचेन, घेईन दर्शन कीं फिरन माघारी. नसेल मर्जी तर रस्त्यांतच त्याचें नांव घेत घेत मातींत माती जाईल, देह राहील चित्त बिठोबाच्या पाशीं. बाबा तूं लई उपकार केला. आतां मला बेश लागतं मी माझ्या रस्त्याला लागते तूं तुझ्या रस्त्यानी जा' हें बोलतानां ह्मातारीच्या तोंडावर जें भक्तिचं तेज जें विठोबाचें प्रेम दिसत होतें तें पाहून दोघंही कंप पावलीं. डॉक्टरिणबाई ह्मणाल्या, 'चला तुह्मी आमच्या बरोबर, आह्मी पंढरीसच जातो आहों.'

"काय हो, मोटार पंढरीला जाते, मग माझ्या विठोबानें ती पाठवली ! अहाहा ! विठ्ठला, तूं किती कितीरे प्रेमळ ! आगि चांगला ! देवा, देवा,' असं ह्मणत पुन्हः ह्मातारी आनंदाच्या मूर्च्छेंत मग्न झाली. ती गाडींत होती. डॉक्टरीणबाई तेथें बसल्या व डॉक्टर पुढें बसून मोटार सुरू झाली, थोड्या वेळांत गार वाऱ्यानें व मनाच्या समाधानानें, ह्मातारी सावध झाली. तिला कांहीं सुचेना. मोटार पंढरपुरास आली, ह्मातारीला चंद्रभागेंत स्नान करवलं व तिच्यासह सर्व देवळांत गेलीं डॉक्टर मोठे सरकारी अधिकारी होते तेथें बंदोबस्ताला असणारे अधिकारी त्यांच्या परिचयाचे होते, अर्थात् त्यामुळें ह्या तिघांना आंत जाऊन स्वस्थ दर्शन झालें. ह्मातारी आनंदानें बेहोष झाली. तिनें देवापुढें दहादां नाक घासलें व ह्मणाली, 'तरी मी

जाधवाला ह्मटलें माझा विठोबा मला नेईल! त्या ह्मातारीच्या समाधानाला पाहून स्वतः पंढरपुरास आल्याच्यापेक्षां त्यांना जास्त आनंद झाला. मग त्या उभयतांनीं भक्तियुक्त अंतःकरणानें विठोबाला नमस्कार केला, तेव्हां विठोबा हंसल्याचा भास डॉक्टरांना झाला, खरं खोटं देव जाणें !

दर्शन घेऊन, हीं माणसं तावडतोब निघालीं. ह्मातारीही निघाली. तिला जास्त राह्यचंच नव्हतं. घरीं सून बाळंत होती, दर्शनाचा हेतू तो सिद्ध झालाच होता, मोटारीची वाट पाटलाच्या गांवावरून होती. तेथें ती उभी करून तिला घेऊन तिच्या आग्रहावरून दोघं तिच्या घराकडे आलीं; तों घरांत एकच गर्दी ! बाळंतीण घाबरी झाली होती, डॉक्टरीणबाई एकदम पुढें झाल्या. त्यांनीं सर्वांना बाहेर काढलें, खोलीची खिडकी उघडली, शेगडी बाहेर टाकविली. मग डॉक्टरांना हाक मारली. पाटलाची परवानगी विचारून डॉक्टर आंत आले, त्यांनीं तिला तपासलें, जवळच्या बॅगेंतलें औषध दिलें व हें सर्व अशक्तपणाचें आहे, शेक आणूं नका, खिडकी उघडी राहूं द्या, स्वस्त पडूं द्या, अंगाला लावणें, आंघोळ वगैरे करूं नका वगैरे वगैरे सूचना देऊन जायला निघाले; ह्मातारीनें आग्रहानें दूध केळीं दिलीं व पुन्हः येण्याचं वचन देऊन गेले. मग सगळीं लोकं विचारायला लागलीं 'हा मोठा डॉक्टर आणि डॉक्टरीणबाई एकदम कोठून आणलीं गंगाबाई?' तेव्हां गंगाबाई ह्मणाली, 'माझ्या विठोबानें दिलीं,' असं ह्मणून तिनें भक्तियुक्त अंतःकरणानें आपल्याला विठोबानें मोटार कशी पाठविली तें सर्वांनां सांगितलें. तेव्हां आईच्या भक्तीबद्दल पाटील व इतर सर्वांनाच आदर वाटला.

—— :X: ——

# गोष्ट ६ वी.

## एकच घोट.

माझ्या अगदीं लहानपणचा काळ परमसुखाचा काळ ह्याची मला अद्याप आठवण होते. खरोखर सांगितलें तर तुम्हाला खोटें वाटेल पण त्या वयांतल्या कांहीं कांहीं गोष्टी मला इतक्या आठवतात, इतक्या डोळ्यांपुढें दिसतात कीं, तुम्ही खोटें म्हटल्या-बद्दल वाटणारा राग त्या आनंदमय स्मरणांत नाहींसा होतो. मी माझ्या आईबापांचा एकुलता एक मुलगा. ह्यामुळें मीं नेहमीं आईच्या जवळ आईच्या मागें असावयाचा. तरी पण ह्या लहान वयांतसुद्धां मला आमच्या बाबांजवळ गेलेलें, बोललेलें, खेळलेलें मुळींच आठवत नाहीं. बाबा मला कधींच हाक मारीत नसत असें नाहीं. पण तें केव्हां ? शिव्या द्यायला, मार द्यायला, ते बोलावीत. अर्थात् ' बाबा ' म्हणजे ' मार ' , ' बाबा ' म्हणजे ' शिव्या ' , ' बाबा ' म्हणजे ' भीतीचा बागुलबोवा ' ही माझी समजूत दिवसदिवस दृढ होत चालली तरी पण वयाच्या सात वर्षांपर्यंत ह्याबद्दल मला विशेष कांहीं वाटलें नाहीं. कारण बाबा जो कांहीं थोडा वेळ घरांत असतील तेवढा वेळ सोडल्यास उरलेल्या वेळांत आईच्या संगतींत, आईच्या सावलींत माझा काळ परम सुखाचा जाई. हवें तें खावें, हवें तें मागावें व आईच्या भोंवतीं भोंवतीं खेळावें; पण पुढें मोठ्या हौसेनें आईनें माझी मुंज केली. आईनें म्हणायचें कारण आईच्या पाठीस लागण्यामुळेंच बाबांनीं ती मुंज केली. बाकी ह्या

बाबतींत तरी आमची आई पाठीस कशी लागली ह्याचें मला आश्चर्य वाटतें. कारण माझी आई म्हणजे गरिबीचा एक नमुनेदार मासला आहे. त्याचें वर्णन करूं म्हटल्यास येणार नाहीं. तिचा देव, तिचा गुरु, तिचें सर्वस्व म्हणजे बाबा. बाबांची वाणी तें तिचें वेदवाक्य. त्याच्या उलट बाबा म्हणजे तिला मोठ्या सन्मानानें वागवीत होते असें मुळींच नाहीं. ते आपला नवरेपणाचा हक्क व्यवस्थित रीतीनें बजावीत असत. आमच्या घरीं एकच कायदा असे. बाबांनीं हुकूम करायचा आणि सर्वांनीं तो पाळावयाचा. त्या बाबतींत कोणीही आपलें दुमत दाखवावयाचें नाहीं. मग तो हुकूम कसाही असो. म्हणूनच माझ्या मुंजीचा आग्रह बाबांनीं कसा ऐकला असें वाटतें ! पण असो. माझी मुंज झाली व माझ्या विद्यार्थीदशेला व त्याबरोबरच माझ्या ग्रहदशेला सुरुवात झाली. माझ्या शिक्षणाला बाबांनीं स्वतःच आरंभ केला आणि तो जसा झाला तसतसा मी त्यांच्या मर्जींतून उतरत चाललों. त्यांच्या मर्जींतून ज्यास्त ज्यास्तच उतरत चाललों. त्यांच्या त्या शिक्षणाला कुठल्याच प्रकारची पद्धत शिस्त अगर नियमितपणा मुळींच नसे. रोज इतकेंच शिकवायचें हाही निर्बंध नाहीं. त्यांच्या मर्जीस येईल तेव्हां रात्रीं, पाहाटे व दुपारीं ते शिकवीत; आणि रिकामा दिसलों कीं, ' पाटी घे ' म्हणून रागावत

संध्याकाळीं अगर सुट्टीचे दिवशीं बरोबरीचे सवंगडी येऊन खेळतांना दिसले कीं त्यांच्याबरोबर जाण्याकरितां मी धडपडे. पण मला सुट्टी कोण देतो ? क्वचित् प्रसंगीं बाबा घरीं नाहींतसें पाहून आईला विचारून गेलों आणि त्यांनीं जर का मला पाहिला तर पुन्हः अभ्यासाच्या वेळेला असतील नसतील त्या चुका काढून ' खेळायला

पाहिजे, नाहीं ' असें म्हणून माझी पाठ मऊ करायला ते चुकत नसत. सुरवातीं सुरवातीला आई माझा कैवार घेत असे, पण पुढें जेव्हां ते तिला सांगत कीं, अमक्याचा मुलगा बघ कितवी शिकतो, तमक्याचा मुलगा बघ आणि तुझा लाडका गुणी बाळ बघ. शाळेंत मास्तर कुठल्याही यत्तेंत घेत नाहीं. तेव्हांपासून आईलाही तसेंच वाटूं लागलें. तिला काय ठाऊक कीं, मला कुठल्याही एका यत्तेचें व्यवस्थित शिक्षण दिलें नसल्यामुळें व कुठल्याही मास्तरकडे गेल्यास ' माझ्या मुलाला मी इतक शिक्षण दिलें आहे; अमक्याच यत्तेंत बसविलें पाहिजे असें म्हणत, ' त्या दुराग्रहामुळें मास्तरांचें व बाबांचें जमेना व मला शाळा कधीं मिळेना.

पण गरीब बिचारी आई ! तिला हें सर्व कळेना व माझ्या डोक्यावरचा गाढवपणाचा आरोप जाईना. आतां एकाच्या जोडीला मला दोन माणसें झालीं. आजपर्यंत बाबा रागावले, त्यांनीं मारलें, झोडलें तरी आईची कुशी मला विसांव्याला सांपडे पण आतां तेंही गेलें. जरी मी आईजवळ निजे व आईची चवघडी पांघरे तरी पण आईचा तो प्रेमळ आवाज मला हल्लीं मिळत नसे. ' कार्ट्या, असा कसा निघालास ? तुझ्या बरोबरीचीं मुलें पहा ! त्यांना कां छळतोस ? ते तुझ्या कल्याणाकरतां सांगतात ! अशा गुणांनीं आमचे नांव कसें राखशील ' वगैरे वगैरे बोले ह्मणा अगर उपदेश करी ह्मणा, पण पूर्वीसारखी आंजारीत गोंजारीत नसे; इतकेंच नव्हे तर ती आपल्या मतें आपलें हद्दत ह्मणून शेजारीं पाजारीं तिच्या मैत्रिणींकडे माझ्या नांवानें कुरकुरे. त्याचा परिणाम असा झाला कीं शेजारच्या बाया आपल्या मुलांजवळ माझें उदाहरण ' ढ मुलगा ' ह्मणून देऊं लागल्या त्यामुळें

असें झालें कीं, शेजारपाजारच्या मुलांना मी एक बिनवारशी मुलगा आहे अशी जाणीव पक्की होत चालली. खेळायला गेलें आणि कुठें कांहीं कमीजास्ती झालें कीं, खुशाल बाकीच्या मुलांनीं आमच्या बाबांकडे येऊन माझी चहाडी करावी. ह्मणजे बाबांनीं मला मरेमरेतों मारावें. अशा माराचे वण कित्येक दिवस माझ्या पाठीवर राहात असत व अशा वेळीं माझी आई जवळ बसून शुश्रषा करी व त्या वेळेस तिच्या डोळ्यांतून जें पाणी झिरपे तें माझ्या वेदनांच्या कळवळ्यांनीं न येतां मी असा गाढव मुलगा तिच्या पोटीं कसा निपजलों ह्याबद्दल येई तरी पण किती केलें तरी ती आईच होती. तिला माझ्या करतां वाईट वाटे, ती मला आपल्या मतानें पुष्कळ शिकवी व वडिलांजवळही माझ्याकरतां ती अशी रदबदली करी कीं, 'इतकें मारूं नये. वेळेस भलताच प्रसंग व्हायचा. असेल नशिबांत तसें होईल' पण तिचें तें दीनवाणीनें व नम्रतेनें सुचविणें आमच्या बाबांच्या मेंदूवर यत्किंचितही परिणाम करीत नसे अशा तऱ्हेच्या कमी जास्त परिस्थितींत आयुष्याचीं १४ वर्षें गेलीं.

रोजच्या ह्या परिस्थितीला मी आणि आईबाप सगळींच कंटाळलीं. एक दिवस असाच एक चमत्कारिक खटका उडाला. आमचा एक भाऊबंद झाडावरून खालीं पडला. आसपासची मंडळी थांबली. मी तेव्हां तेथेंच होतों. एकानें मला सांगितलें, "बाबू पळ लवकर. डॉ अत्र्यांना आण." मी पळत जाऊन डॉ अत्र्यांना घेऊन आलों व उशीर झाला ह्मणून तेथें क्षणही न थांबतां घरीं आलों, तरी पण काळोख पडलाच घरांत भीतभीतच शिरलों, तरी पण घरांत सर्व शांतच. मला आश्चर्य वाटलें. मी इकडे तिकडे बघितलें व

हळूंच एका कोपऱ्यांत बसलों. जेवायची वेळ झाली. बाबा जेवले तरी पण मला कांहीं आईनें बोलावलें नाहीं. मी ओळखलें कीं, ही बाबांची ताकीद असेल. पण मला भूक फार लागली होती. बाबा आंचवायला गेल्याबरोबर मी हळूंच जाऊन आईला म्हटलें, " आई मला वाढतीस कां? मला फार भूक लागली आहे. "

इतकें म्हणतों तोंच बाबा बाहेरून आले व हातांतील पळीपंचपात्री माझ्या डोसक्यावर फेंकून त्यांनीं जें तोंड सोडलें तें समग्र लिहितां येणें शक्य नाहीं. माझ्या पडलेल्या खोकेंतून रक्त वाहात होतें. आई तें पुसायला व फडकें बांधायला पुढें आली तों त्यांनीं तिलाही एका धक्यानें पलीकडे ढकली व मला हाताला धरून दाराबाहेर हांकललें. मी किती वेळ किंकर्तव्यमूढ होऊन दाराबाहेरच उभा होतों. तास गेला कां दोन तास गेले मला कांहीं स्मरण नाहीं. थोड्या वेळानें दार उघडून पुन्हः बाबा आले व त्यांनीं मला तेथून चालते होण्याबद्दल पुन्हः बजावलें. मी चालायला लागलों. कुठें जायचें, काय करायचें, कांहींच ठरलें नाहीं. रस्त्यानें जात होतों. थोड्या वेळानें पहातों तों मी रेल्वे स्टेशनांत येऊन उभा.

स्टेशन पाहिल्यावर माझ्या डोक्यांत एक विचार आला. आगगाडींत बसावें आणि खूप लांब—इतकें लांब कीं आईबाबांना कांहीं समजणार नाहीं इतकें लांब—जाऊन राहावें. म्हणजे आपल्यामुळें आईला व बाबांना त्रास होणार नाहीं. अशा विचारानें मी स्टेशनांत शिरलों व नुकत्याच आलेल्या एका गाडींत जाऊन बसलों. मला आतां आश्चर्य वाटतें कीं, त्या वेळेस मला कसें कोणी अडवलें नाहीं? सकाळीं उजाडलें. ९ वाजले आणि एका स्टेशनवर गाडी थांबून

सगळीं माणसें उतरलीं. तेव्हां मला जाणीव झाली कीं, आपण तिकिटाशिवाय आहों. आतां काय ? आपल्याला पकडतील, मारतील वगैरे सर्व गोष्टी माझ्या डोळ्यांपुढें दिसूं लागल्या. इतक्यांत मला एक युक्ति सुचली. एका आजिबाईचें एक लहानसें बोचकें मी हातांत घेतलें व त्यांच्या बरोबर रेल्वे फाटकांतून बाहेर तर पडलों. पण पुढें काय ? त्या बाईचें सामान टांग्यांत ठेवलें. त्या गेल्या मी काय करणार ?

रस्ता फुटेल तसा चाललों. आदल्या दिवशींची सबंध भूक, कुठें जायचें कांहीं माहित नाहीं, डोकें फिरायला लागलें, पाय वळायला लागले, रडू यायला लागलें, पण कोणाजवळ रडायचें, कोणाजवळ बोलायचें, अशा विचारांत एकादें पाऊल टाकीत होतों, इतक्यांत एक बंगला दिसला. सहज मनाला वाटलें तिथें जावें, खायला मिळतें कां पहावें, कांहीं तरी कामधंदा मिळवावा, अशा विचारानें मी तेथें गेलों. घर ब्राह्मणाचेंच होतें. एक बाई खुर्चीवर बसून पुढें असणाऱ्या टेबलावरील बशींत पोपया चिरीत होत्या, लहान मुलं भोवतीं उभीं होतीं. त्यांनीं तो चिरला, मुलांना दिला, जवळ उभ्या असणाऱ्या नोकरांच्या हातावर एकेक फोड दिली व माझ्याही हातावर एक फोड दिली. मी तसाच उभा राहिलों. त्या बाई मला ह्मणाल्या, “ बाळ खा. कांय कामाला आला आहेस ? फोड खाऊन काम कर. ”

त्यांच्या ह्या प्रेमळ आवाजानें माझ्या डोळ्यांतून अश्रू येऊं लागले त्या ह्मणाल्या, “ बाळ काय झालें ? बैस, खालीं बैस. ” मी फक्त “ पाणी द्या ” असें ह्मणालों व खालीं बसलों. पाणी पिऊन

फोड खाल्ली पण डोळ्याचें पाणी थांबेना. मोठ्या जबरीनें मनोनिग्रह केला व ह्मटलें " मला नोकरी द्या. "

" तूं नोकरी मागायला आलास कां ? मग रडतोस कां ? घरीं आल्यावर कुठें नोकरी मिळण्याजोगी आहे कां विचारीन हां ! तूं कुठला ? काय शिकला आहेस? "

" मी फार लांबचा आहे. कांहींच शिकलों नाहीं; थोडें मराठी इंग्रजी मला येतं; तुह्मी सांगाल तें काम मी करीन, पण मला भूक लागली आहे. "

" अरेरे, भुकेसाठीं कां तूं रडतोस " असें ह्मणतांच त्या माउलीच्या डोळ्याला पाणी आलें. अहाहा !! काय ती प्रेमळ माऊली ! प्रत्यक्ष देवीच. ह्या बाईचा जों जों मला सहवास होऊं लागला, तों तों तिच्या त्या दयाळू आणि थोर अंतःकरणाची मला जास्त जास्तच ओळख होऊं लागली व जगांत अशीं थोर व प्रेमळ माणसें आहेत म्हणूनच जग चाललें आहे असें मला वाटूं लागलें. असो. तिनें मला घरांत चलावयास सांगितलें. नळाखालीं थंड पाण्याचें स्नान करून मी जेवावयास बसलों. जरी मला वाढायला एका नोकराला सांगितलें होतें तरी आपण जवळ येऊन माझ्याजवळ बसून ' बाळ, भात निवाला असेल; ताक भात खा म्हणजे तुला बरें वाटेल ' अशी माझी आस्थापूर्वक चौकशी मला कित्येक दिवसांनीं ऐकायला मिळाली. पोटांत भात जातांच मला बरें वाटलें. मी घरांत हिंडूं फिरूं लागलों. घराचे मालक आले. त्यांनीं माझीं चौकशी केली, पण माझें उत्तर ठराविक. ' मी ब्राह्मणाचा मुलगा आहे, लिहिणें वाचणें फार झालें नाहीं; घरांतून चोरी चहाडी करून निघालों नाहीं, पण मला माझी आणखी

कांहीं एक माहिती द्यावयाची नाहीं. आपण मला संभाळलेंत, जर उद्योगधंदा लावून दिला तर येथें रहातों; नाहीं तर दुसरीकडे पुन्हः भिक्षा मागण्यास जाणें प्राप्त आहे." असें म्हणतांना माझ्या डोळ्यांतून अश्रू येऊं लागले. शेवटीं मला माझी माहिती सांगणें जिवावर येते असें पाहून त्यांनींही तो नाद सोडला. मात्र माझ्यावर एकदम विश्वास टाकणें त्यांना बरें वाटलें नाहीं. ज्या माउलीनें मला आश्रय दिला ती माउली इतकी प्रेमळ आणि सच्छिल होती कीं, तिच्या नुसत्या सहवासानेंसुद्धां मनुष्य पवित्र होईल. मग अशा बाईचा मला प्रत्यक्ष आधार असल्यावर काय कमी ? खरोखर ह्या घरांत कांहींच कमी नव्हतें. नोकर चाकर, मुलेंबाळें, पैसा कशालाच येथें कमी नव्हतें. म्हणजे याचा अर्थ येथें द्रव्याच्या राशी पडल्या होत्या असा नव्हे. पण ह्या गृहलक्ष्मीच्या अधिष्ठानानें सगळें घर व वातावरण आनंदी व समाधानी दिसे नोकरचाकर, मुलेंमाणसें, आला गेला स्नेहीसंबंधी कोणीही मनुष्य तेथें येवो, माईच्या पुढें तो आला कीं, त्याचें तोंड खुललेंच पाहिजे. कारण आमच्या माईची वागणूक होतीच तशी. माई ह्मणजे मूर्तिमंत प्रेमळ, प्रेमळता ह्मणजे माई. त्यांच्या येथें मी महिना दोन महिने काढले. पंक्तीला जेवावें, किरकोळ काम दिसल्यास मी माझ्या बुद्धीनें करावें आणि ते करण्यांत मला मोठा आनंद वाटे व उरलेला वेळ वाचावें. ह्या थोड्या अवधींत मला पुष्कळ चांगलीं पुस्तकें वाचावयास मिळालीं. इंग्रजी वर्तमानपत्रेंही थोडीं थोडीं वाचण्याचा मला नाद लागला. संध्याकाळीं आह्मी सर्व बसलों ह्मणजे मराठींत माहिती पुष्कळशी माईच सांगे, त्यांच्या त्या गोष्टी ऐकण्यांत आह्मी सर्व तल्लीन होत असूं. इंग्रजी थोडें थोडें दादासाहेब स्वतः माझेकडून वाचून घेत

पण असें हें दुसऱ्यावर सर्वस्वी आपला भार टाकून आळसांत राहाणें मला बरें वाटलें नाहीं. मला कांहींतरी उद्योग लावून द्या असा मी आग्रह केला. पण माझें शिक्षण कोणत्याही तऱ्हेनें पूर्ण झालें नसल्यामुळें मला कुठेंही जागा मिळणें अशक्य होतें. पण आपल्या शिक्षणाच्या लोकांचें मायपोट ह्मणजे रेल्वे. तिच्यांत मला अडकावयाचा ठरवून स्टेशन मास्तरकडे नेलें. तो त्यांच्या बऱ्या परिचयाचा असल्यामुळें माझ्या ओळखीचा हा मुलगा आहे याला कोठेंतरी लावा असें सांगितल्यावरून त्यांनीं मला स्टेशनवर येत जाण्यास सांगितलें. मीही जाऊं लागलों. ४।५ दिवस झाले. एके दिवशीं स्टेशनावर गाडी उभी होती. मी आपल्या परिस्थितीचा विचार करीत प्लॅटफार्मच्या टोंकास गेलों होतों. त्या गाडीला रेल्वेच्या ट्रॅफिक मॅनेजरचें सलून. जोडलें होतें. त्यांतून आया एक लहान गोड खेळकर मूल घेऊन खालीं उतरली व ती एका सोड्याच्या दुकानाशीं गेली; इतक्यांत तें मूल पळत पळत इंजिनचा आवाज बघण्यास लाईनवर गेलें. सलून काढण्याकरितां इंजिन शर्टिंग नुकतेंच सुरू करण्यांत आलें होतें. गाडी मोठी होती त्यामुळें इंजिन प्लॅटफार्मच्या टोंकाला आलें होतें आणि सर्व उतारू प्लॅटफार्मच्या मध्यावर होते. आतां इंजिनच्या खालीं तें मूल येणार कारण तें मूल अगदीं आनंदानें टाळ्या पिटीत इंजिनकडे पहात उभें होतें. दोन क्षण दोन सेकंड गेलें कीं तें मूल गेलेंच; कारण इंजिनची गति सुरू होती. हें दृश्य दोन माणसांनीं पाहिलें एक मी व एक मुलाचा बाप. पण त्या बापाला धांवून तो ओरडून सांगेपर्यंत इंजिन थांबणें शक्य नव्हतें तरी पण त्यानें एक मोठी दुःखपूर्ण आरोळी ठोकली व एक

लालबावटा दाखविण्यांत आला पण काय ? तोंपर्यंत इंजिन त्या मुलीच्या पुढें ४ हात जाऊन थांबलें पण मी जेव्हां तें पाहिलें तेव्हां माझ्या डोक्यांत एकदम ती मुलगी चेंगरेल ती वाचविली पाहिजे अशी कल्पना आली व ज्या क्षणाला ती चेंगरणार असें मला वाटलें त्या क्षणीं मी उडी टाकून रुळाच्या बाजूला उभें राहून त्या मुलीला हात धरून ओढली आणि शक्य तितका मागें पडलों. पण भीतीनें घाबरून गेलों होतों. इंजिन थांबलें व स्टेशनावरील सर्व जनसमूह आमचेकडे आला. त्या साहेबानें मुलीला माझ्या हातांतून घेऊन क्षण-मात्र पोटाशीं धरली व लगेच तिला दुसऱ्या माणसाजवळ देऊन त्यानें माझी विचारपूस केली. मी फक्त घाबरलों होतों. त्यानें मलाही जवळ घेऊन अंगावरून हात फिरवून एक ग्लास कोल्ड्रिंक पिण्यास दिलें व म्हणाला, ' मुला, तूं आपला जीव धोक्यांत घालून आज मला किती ऋणी केलेंस ? आम्हां उभयतांचा जीव कीं प्राण अशी जी मेरी ती आज तूं मला काळाच्या दाढेंतून परत आणून दिलीस. मी तुझें काय बरं कल्याण करूं ? ' मग त्यानें मी कोण कोठला ही चौकशी केली व माझे पालक दादासाहेब यांना बोलावून मला आपल्याबरोबर पाठ-विण्याबद्दल विचारलें. आलेल्या संधीचा नशीब उदयाला उपयोग होईल असें जाणून त्यांनीं होकार दिला. मीसुद्धां कांहींतरी धाडस करण्यास मनानें तयारच होतों. पण तें कसें करावें एवढेंच सुचत नव्हतें. माझ्या प्रेमळ माईनीं मात्र सदाचरणानें वागण्याचा व ईश्वराला न विसरण्याचा उपदेश करून निरोप दिला. मी साहेबांच्याबरोबर गेलों. त्यांचें हिंदुस्थानांतील वास्तव्य संपतच आलें होतें. अर्थात् त्यांनीं मला विलायतेस नेले व तेथील शिक्षणक्रम संपेपर्यंत मदत

करून I. C. S. च्या परीक्षेस बसविलें. त्यांत उत्तीर्ण होऊन मी सिव्हिलिअन होऊन कांहीं वर्षांनीं स्वदेशीं परत आलों. पुष्कळ वर्तमानपत्रांतून माझ्या नांवाचा अलौकिक नशीबवान म्हणून गवगवा झाला होता. अशा स्थितींत आमचा गांव ज्या जिल्ह्यांत होता तिथेंच असिस्टंट कलेक्टर म्हणून माझी नेमणूक झाली. मी हिंदुस्थानांत आल्याबरोबर माझें आद्य दैवत माई आणि दादा यांना भेटण्यासाठीं ताबडतोब गेलों. मला पाहून त्यांना काय वाटलें तें वर्णन करून सांगतां येणें शक्य नाहीं. तिसरे प्रहरीं आम्ही बोलत बसलों होतों. ४ दिवसांनीं मी नोकरीवर लागणार होतों, तेव्हां माई म्हणाल्या, ' बाबू, तूं पुन्हः एकटा रहावयाचा, तुझें आतां लग्न झालें पाहिजे. पण तुझी खरी खरी हकीकत आतां तरी तूं सांगशील कां ? ' मग मी माझी इत्थंभूत हकीकत त्यांना सांगितली. ती ऐकून त्यांच्या डोळ्यांना पाणी आलें. त्या म्हणाल्या, ' बाबू. तूं पाहिजे तर माझ्यावर रागाव पण माझें ऐक. बाबारे, मातृदैवताची उपेक्षा करूं नको. बघ, कदाचित् वडिलांचा रागही जाईल. पण नाहीं गेला तरी तुला कांहीं मागावयाचें नाहींना ? मग आईला नुसता भेटून तरी जा. ऐकशील कां माझें एवढें ? ' माईना खूष करण्याकरितां त्यांची आज्ञा पाळण्याकरितां व आईचीही मला वरचेवर आठवण येई म्हणून मी जायचें कबूल केलें तशी त्या म्हणाल्या, ' वा, शुभस्य शीघ्रम् ! कदाचित् तुझें मन पालटेल, आतांच जा कसा ! ' असें म्हणून खरोखरच त्यांनीं माझा बिछाना बांधून मला चहा पाजून टांग्यांत बसवला. दादासाहेब सुद्धां म्हणाले, ' गरीब बिचारा भेटायला आला, त्याला

हकलायची ही कोण घाई!' पण माई इतकेंच ह्मणाल्या, 'ती माउली किती वाट पहात असेल?'

मी घरांतून निघाल्यानंतरची हकीकत विशेष नाहीं. बाबांना त्याबद्दल कांहींच वाटलें नाहीं. निदान त्यांनीं तसें दाखविलें. आईला मात्र मी गेलों हें बरें वाटलें नाहीं. तिला वाटत होतें कीं, कुठें तरी रहावें व बाबा शांत झाले म्हणजे त्यांची विनवणी करून घरांत यावे. गांवकरी कोणी आईसारखें बोलत, कोणी बाबांकडून बोलत. आतां मला शिकवण्याचा उद्योग त्यांचेमागें नसल्यामुळें घराच्या मागील मोकळ्या जागेंत एक गडी ठेवून बागाइतीचा उद्योग त्यांनीं आरंभिला; आणि आई तिच्या ध्येयाप्रमाणें त्यांच्या प्रत्येक कामांत वेळ घालवीत असे. रिकामपणच्या वेळीं त्यांना वाचनाचा नाद असल्यामुळें ते बरीच वर्तमानपत्रें वाचत. त्यांत त्यांनीं माझें नांव वाचलें. पण मी म्हणजे बाबूच अशी त्यांची कल्पना नव्हती. कारण मी माझें नांव घालतांना माझे प्रचलित नांव न घालतां माझें पाळण्यांतील नांव लिहीत असे. असो. मीं दुपारीं ३ वाजतां आमचे गांवांत आलों. स्टेशनमास्तर-कडेच माझें थोडेंसें सामान टाकून थेट घरीं आलों. घर दिसूं लाग-ल्याबरोबर I. C. S. चा धीटपणा जाऊन मला बाबा व त्यांचा राग दिसूं लागला. मी दारांत गेलों व नांवाचें कार्ड गड्यास दिलं. पण इतक्यांत माझे डोक्यांत एक विचार आला कीं, बाहेर येऊन चकमक होण्याचा प्रकार नको. काय तें आंतच होऊंदे. मी एकदम आंत गेलों तों, चहाचा पेला प्यायचा तसाच हातांत धरून हा एवढा मोठा गृहस्थ माझ्या भेटीला कसा आला बुवा असें ते आईला ह्मणत होते. मी दारांतच बूट हॅट काढून

आंत गेलों व एकदम आईला नमस्कार करून 'मला क्षमा करा' असें ह्मणत बाबांच्या पायावर डोकें ठेविलें तोंच, 'कोण बाबू! आं, तूं त्या साहेबाबरोबर कां आलास?" असें बाबा ह्मणाले. 'नाहीं बाबा, मीच तो साहेब.' 'काय? आमच्या आडनांवाचा एक मनुष्य इतक्या योग्यतेला चढला अशी मी ज्याच्या त्याच्याजवळ फुशारकी मारीत असतां तो प्रत्यक्ष तूंच निघालास?' 'होय बाबा, आपल्याच आशिर्वादानें हें सर्व झालें.' 'अरे! हें झालें तरी कसें?' 'सांगतों'; इतक्यांत त्यांचे लक्ष चहाकड जाऊन ते ह्मणाले, 'अरे खरेंच; गोष्टी मग तुला चहा घ्यायचा असेलना? बाबूला चहा दे. आई ह्मणाली, 'ही करते.' 'तर मग तोंपर्यंत हा माझ्या पेल्यांतला उरलेला तूं घे. घोटभर चहा पी ह्मणजे तुला हुशारी येईल. आपण पुन्हां आणखी पिऊं?' असें ह्मणून चहाचा पेला त्यांनीं माझ्या पुढें केला. अहाहा! माझ्या आयुष्यांतील हा पहिला क्षण, हा पहिलाच घोट, बाबांनीं चहाच्या रुपानें दिलेला हा प्रेमाचा घोट माझ्या निराशामय अंतःकरणाला पुन्हः चैतन्य देणारा हा एकच घोट मला किती अमृतमय लागला असेल व तो घेतांना प्रेरक प्रेममूर्ति माईची मला कितीदां आठवण आली असेल त्याची कल्पना करण्याचें वाचकांवर सोंपवून ह्या एकाच घोटानें माझ्यांत नवजीवन आलें एवढेंच सांगतों.

---

# गोष्ट ७ वी.

## खरें सुख.

कमलाकराच्या संतोषासाठीं पद्मेनें नोकरी सोडली व ती सोडल्यामुळें, नवऱ्याला समाधान झालेलें पाहून तिलाहि आनंद झाला खरा ! पण तो चिरस्थायी स्वरूपाचा नव्हता. ती एकटी बसली ह्मणजे नव्या संस्कारांतलि तिच्या मनाची खळबळ उडे; हिंदुसमाज कितीही समतेबद्दल ओरडला, तरी अखेर बायकोला नवऱ्याच्या पुढेंच मान तुकवावी लागते. असें मनांत येई तेव्हां आपणही इतकें बी. ए. होऊन तेंच केलें ना ! असें वाटे. अशा मनाच्या व्यग्र स्थितींत तिचें मन गटंगळ्या खात असतां तिची मैत्रिण सुशिला तिला भेटायला आली . खऱ्या अंतःकरणाच्या प्रेमळ मैत्रिणीनें तिच्या भाषणांतील वरपांगीपणा ओळखला व आत्यंतिक प्रेमळतेनें ह्मटलें, "पद्मा, तूं कांहीं तरी माझ्यापासून लपवते आहेस ! खरंना ? पण मला वाटतं, तूं जर मोकळ्या मनानं माझ्याशीं बोलशील तर तुला सुख होईल" असें ह्मणतांच पद्मेला रडूं आलें. तिनें घडलेली सारी हकीकत मोकळेपणानें मैत्रिणीला सांगितली. ती ऐकून सुशीला ह्मणाली, "हात्तेच्या, एवढंच ना ? अग, जसं तुह्मां कॉलेजिएट मुलींना जुन्या वळणांत रुळायला थोडं जड जातं, तसंच जुन्या विचारांत आजन्म गेलेल्या पुरुषांनाहि नवे विचार पचनीं पडायला जड

जायचंच ! पण जुन्या आनुवंशिक आर्यसंस्कृतीचा पगडाच तुझ्यावर पडून, तूं कमलाकरपंताना खूष करायसाठीं नोकरी सोडलीस ना ! आतां नव्या विचारांत तूं वाढल्यामुळें, तुझ्या मानी मनाला जरा वाईट वाटणं साहजिक आहे. पण तूं जरा शांतपणानें विचार कर कीं, पुरुष लग्न कशाकरितां करतो? सारा दिवस बाहेरच्या श्रमानें थकून भागून आल्यानंतर वेळीं अवेळीं घरीं आले तरी, उत्सुकतेचें स्वागत मिळावें, प्रेमाची, उत्कटतेची मूर्ति दिसावी, आनंदाचं वातावरण पसरावं. हें केव्हां घडतं ? भाग पडलेला असा दुसरा कोणताही व्यवसाय तिच्या गळ्यांत नसेल तर ! तूं मास्तरीण झालीस, कीं तुझ्यापुढें दुसरें ध्येय आलें; अर्थात् पत्करलेल्या ध्येयांत आपण सर्वोत्कृष्ट ठरावं असं कोणालाहि वाटणारच; त्याच्याकरितां करावी लागणारी प्रत्यक गोष्ट तूं करणारच व केलीहि पाहिजेच. तेव्हां अशा स्थितींत तूं जरी नवऱ्याशीं हंसलीस, खेळलीस; बोललीस त्याची काळजी वाहिलीस, तरी ती पुरुषी जोडीदार मित्रासारखी होईल. ”

“ पतीची इच्छा तशी नसते, त्यांना असा बाहेरचा बरोबरीचा मित्र नको असून कांहीं वेळां, आज्ञाधारक वाटणारी, कांहीं वेळां प्रेमानें राज्ञीपद मिळवून हुकमत गाजविणारी, कांहीं वेळां मातृस्वरूपानें कळकळ करणारी अशी प्रेमळ पत्नी हवी असते. तसं असेल तरच संसार-सुख मिळतं. तें जरी कविकल्पनेंतील नंदनवनासारखं नसलं तरी ज्याच्या त्याच्या लायकीनुसार खास असतं. आतांच पहा तूं घरांत राहिलीस कीं, तुला उठल्यापासून त्यांच्या चहाची काळजी, त्यांच्या आंघोळीची काळजी, काल पडस झालं होतं, आज आंघोळ

करावयाची कीं, नाहीं! हा विचार तुझ्या डोक्यांत घोळेल, स्वयंपाकाची तयारी करतांना भाजाची आवड नावड डोळ्यापुढें येईल, वाढायला लागलीस ह्मणजे आज जेवण कमी कां गेलं? काल कोणचे पदार्थ अधिक आवडले होते? ह्या गोष्टींत मन घालावेंसें वाटेल."

पद्मा ह्मणाली—"अहो, विदुषी, हा सकाळचे वेळचा उद्योग सांगितलात, पण मी दुपारीं काय करावं! वेळ कसा घालवावा? शिवाय यांच्या तुटपुंज्या मिळकतींत आह्मांला किती काटकसर करावी लागेल, द्या कीं, व्याख्यान!"

सुशिला ह्मणाली—"हें पहा पद्मताई, मी तुझ्या सारखी पदवीधर नाहीं, तेव्हां मला विदुषी ह्मणून टोमणा दिल्याबद्दल मुळीच राग येणार नाहीं, कारण मी विदुषी नसलें तरी, एका विदुषीची मैत्रिण खास आहे. पण तुझ्या वेळाचं कोष्टक मी आतांच सोडवतें. हें पहा, दुपारचें जेवणं खाणं आटपेपर्यंत बारा सहज वाजतील. पुढें दोन तास विश्रांति व वाचन यांना लागतातच ना? नंतर एक तास घरांतील नेहमींचं काम पहायला लागतोच. मग उरलेल्या वेळाचा प्रश्न! त्यांत तुला करतां येण्याजोगे पुष्कळ उद्योग आहेत. घरांतलें शिक्षण, उत्तम प्रकारचें कटिंग शिकून जर सगळें शिवण घरांतच शिवलं, तर करमणूक, कला व पैशांची बचत हें सारं कांहीं होतं. सुरवातीला, शिवण बेताचं असतं, तेव्हां एकदम मशीन नवीन विकत घेण्याचा अट्टाहास मध्यम स्थितींतल्या गृहिणीनें करूं नये, अगदींच थोडे असे जाड कपडेच फक्त शिंप्याकडे द्यावे; परटाचं धुणं, हाही एक घरांतल्या घरांत बसून करतां येण्याजोगा व पैसा व कपडा वाच-

विणारा उद्योग आहे. वरचेवर स्वच्छ कपडे घालायला मिळून, शिवाय कपडे अधिक दिवस टिकतात आणि तुझ्या दारापुढें मोकळी जागा आहे, त्यांत तुला थोडक्यांत शोभेची आणि उपयुक्त बाग तयार करतां येईल. काव्य आणि लेखनाची आवड असल्यास तीहीं वाढवतां येतील. अशा तऱ्हेनें मधला वेळ गेल्यानंतर पतिराजांच्या आवडीचा एखादा सोपासा पदार्थ चहाबरोबर करून पतिराजांची मार्गप्रतीक्षा करून तुला एक प्रकारचा अननुभुत आनंद वाटेल व आतुरतेनें घरीं येणाऱ्या पतीचें आनंदानं स्वागत करण्यांत व स्वागतानें खुष झाल्यानंतर, मिळालेली शाबासकी घेण्यांत तुला धन्य धन्य वाटेल. अशा सुखदायक प्रसंगांत वेळाचं मोजमाप फारसं रहावयाचंच नाहीं, पण त्यांतूनही, केव्हां तरी फिरावयाला जाणं, सिनेमाला जाणं, असल्या प्रकारचे प्रोग्राम दोघांच्या सहकारितेचे असले ह्मणजे वेळ कुठें आहे ? तूं लिहिलेला लेख वाचणं, तूं लिहिलेल्या कवितां ऐकून, तूं वाचिलेल्या वेगळाल्या गोष्टी, लेख वगैरे तुझ्या तोंडून ऐकणें, तुझ्या बागेची, तुझ्या स्वयंपाकाची, टापटिपीची तिसऱ्याजवळ स्तुति करणं, यांत कमलाकर पंतांना जो आनंद आणि जें समाधान वाटेल, तें समाधान, तुझ्या पगाराच्या थैलीनें खास होणार नाहीं; उलट तूं ज्याअर्थीं लग्न केलं आहेस, ज्याअर्थीं तुला पति संतोषांत असावा असं वाटतं आहे, त्याअर्थीं तूं हीं "गृहिणीचीं" कामं करून बघ. पतिसेवेचा धडा गिरवून बघ, मग तुला खरें सौख्य कशांत आहे, तें कळेल." पद्मा ह्मणाली, "सुशीला तुझं सांगणं, माझ्या मनावर कांहीं विशेष परिणाम करतें आहे खरं, पण मला काय वाटेल, तें आजच सांगतां येत नाहीं." उशीर झाल्यामुळें सुशीला गेली. पण ती या गांवच्या आसपासच

रहात असल्यामुळें, बाजूबाजूनें पद्मेची माहिती काढीत होती. सुशील गेल्यावर त्या क्षणापासून पद्मेचा आयुष्यक्रम बदलला.

* * * * *

साडेपांचाचा सुमार असेल, एका लहानशा घरांतील पुढल्या खोलींत एक सुंदर दृश्य दिसत होतें. केरवारा काढून स्वच्छ केलेली व्यवस्थित बैठक, मध्यें एक लहानसें टेबल, त्याच्यावर सुंदरसा विणलेला सुताचा रुमाल, खोलींच्या भिंतींना दोन फोटो, एक कॅलेंडर, कोपऱ्यांतील स्टुलावर एक घड्याळ, खिडकीला पांढरा शुभ्र पडदा, दाराला मण्यांचें तोरण, एका फळीवर कांचपात्रांत ठेविलेला पुष्पगुच्छ, तर दर्शनीच भागाला फुलांची माळ घातलेली; सरस्वतीची तसबीर हा सगळा थाट पाहिल्यानंतर वाचकहो, आपल्याला आंत जाण्याचा मोह खास होणारच. चला तर ते कोण गृहस्थ पायऱ्या चढताहेत त्यांच्या मागून अगदीं गुपचुप अदृश्य स्वरूपांत आपण जाऊं या. ते पहा आत गेले, त्यांची नजर आंतील दरवाज्याकडे लागली आहे, इच्छित मनुष्य पुढें न आल्यामुळें त्रासूनच कीं काय, कोण जाणें, त्यांनीं जोडे कोपऱ्यांत भिरकावले, टोपी काढून खुर्चीवर टाकली व हातांशीं भांडून कोट काढतात तोंच आंतील दरवाज्यानें एक हंसतमुख चेहरा उपहाराचें साहित्य घेऊन आला. त्या चेहऱ्याकडे पाहतांच या पहिल्या बोवांचा त्रासिकपणा पार कुठल्या कुठेंच मावळला. पत्नीनें पाण्यानें भरलेलें फुलपात्र हंसत हंसत हातांत घेऊन चूळतील भरून स्वारी खुर्चीवर बसली आणि आत्यंतिक प्रेमानें पुढें आलेला चहाचा पेला तोंडाला लावायला सुरवात झाली, तोंच फराळाची बशी पुढें

आली. बशी हातांत घेऊन, चमचानें आंतील जिन्नस तोंडांत टाकतां टाकतां कमलाकरपंत ह्मणाले, "कायग! तूं किती सुंदर जिन्नस करायला शिकली आहेस तरी। आजचे हे बटाटेपोहे, किती सुंदर झाले आहेत! मला वाटतं सारेच खावेत! पण मग तुझा काय?" इतक्यांत दरवाजांतून सुशीला ह्मणाली, "आजचा दिवस पद्मेचें खाऊन घ्या, उद्यांपासून ब्राह्मणाच्या हातचं." दोघांनीं एकदम मागें पाहिलें, आणि कमलाकरपंत ह्मणाले, "कां बरं?'– सुशीला ह्मणाली, "मी पद्मताईकारितां आज दोनशें रुपये दरमहाची एक नोकरी पाहून ठेविली आहे, उद्यां तेथें रुजू!" कमलाकरपंत ह्मणाले, "ताई, ती वेळ गेली, आतां तुमची मैत्रिण जाते ह्मणाली तर मी सत्याग्रह करीन."

पद्मा ह्मणाली "ताई, खरोखरच तूं "विदुषी." तूं माझे डोळे खरोखर उघडलेस. मला हें स्वर्गसुख सोडून, त्या सोन्याचांदीच्या तुकड्यांची आतां अपेक्षां वाटत नाहीं."

# गोष्ट ८ वी.

## जुगारी-संपादक.

आमच्या दादाला लहानपणापासून गोष्टी सांगण्याची, काव्य करण्याची, मोठी हौस; आमच्या खेळांत जर त्याचं माझं कांहीं बिनसलं, तर तो आपल्या शीघ्र काव्यानं माझ्या बाहुलीची-तिची आई जी मी-त्या माझी वेडी वांकडी वर्णनं घातलेलीं काव्यं करावयाचा आणि मला चिडवायचा व चिडलें ह्मणजे चिडका बिब्बा ह्मणून रडवायचा. अशा तऱ्हेनें लहानपणापासून असणारी त्याची काव्याची गोडी व वाचनाची गोडी वाढतच गेली. मोठेंपणीं तो आपला व्यवसाय सांभाळून एक साहित्य भक्त झाला. पण कुंठली गोष्ट अधिक झाली ह्मणजे ठिकच्या ठिकाणीं रहात नाहीं. उदाहरणार्थ पैसा वाढला कीं बंगला बांधावासा वाटतो, रसीकता वाढली कीं, सुंदर सुंदर वस्तूंनीं घर शृंगारावस वाटतं, धार्मिक बुद्धी वाढली ह्मणजे तीर्थाचं दर्शन व संतसमागम बाहेर येतो, कर्तृत्व शक्ती वाढली ह्मणजे घराबाहेर, गांवांत, गांवाबाहेर आसपासच्या प्रदेशांत ती पसरूं लागतें; त्याचप्रमाणें साहित्याचं.

साहित्याची आवड मनुष्याची वाढतच गेली, ह्मणजे त्याला विहार करायला स्वतांचं स्वतंत्र क्षेत्र असावंसं वाटतं. याच न्यायानं आमच्या दादालासुद्धां एका मासिकाची आवश्यकता वाटूं लागली. त्याचा स्वभाव गोड असल्यामुळें नी साहित्यक्षेत्रांत त्याच्या चांगल्या

ओळखी असल्यामुळें त्यानें मासिक काढावयाचं ठरवितांच उत्तम लेखिका, प्रतिभाशाली लेखक, सुंदर कवयित्री व कवि, विनोदी नाटककार, मार्मिक टीकाकार वगैरे वगैरे मंडळी चटदिशीं त्याच्या भोंवती गोळा झाली आणि इच्छित वेळीं सर्वांगसुंदर असा मासिकाचा अंक बाहेर पडला. त्या बरोबर त्याची एक प्रत माझ्याकडेही आली. माझ्या दादाचं ते उद्दिष्ट ध्येय पाहून मला किती आनंद झाला असेल! ते सांगून किंवा लिहून कां कळणार आहे ? असो. त्याचा दुसराही अंक निघाला. तो अंक व त्या सोबत दादाचं पत्र मी लेख लिहावा म्हणून विनंती वजा प्रेमाची सूचना केलेलं असं आलं नी तें मी लेख पाठविला नाहीं म्हणून बराचसा खऱ्या खोट्या रागानं लिहिलेलं होतं. तेव्हां त्याला उत्तर देऊन चालण्यासारखं नसल्यामुळें, मी त्याला खालील प्रमाणें पत्र लिहिलं.

श्री

**रा. रा. दादा यांस:**—सा. न. वि. वि. तुझें पत्र व मासिक पोहोंचलें. तुझें हे सुंदर मासिक पाहून मला कांहींच का कौतुक वाटलें नाहीं असें तुला वाटतें? पण लेखाबद्दल म्हणशील तर... तो मी मुद्दामच लिहिला नाहीं. कारण एक तर शारीरिक अस्वस्थते-मुळें माझ्या हातून बुद्धीप्रधान कामें होत नाहींत. व दुसरें मी कांहीं सुशिक्षित अशी विदुषी नव्हे! आणि नव्या विचारांचीही नव्हे. तेव्हां आतांच्या या नव्या विचाराच्या, नव्या आचाराच्या, नव्या उत्क्रांतिच्या काळांत माझ्यासारखीचे मागासलेल्या आचार विचारांचे लेख! नाहीं म्हणायला, एवढा वार्तिक फायदा होईल कीं, टीका प्रतिटीका म्हणून

कांहीं दिवस एक दोन पत्रांना विषय पुरवल्यासारखं होईल; पण खरें ह्मणशील तर, हल्लींच्या या मासिकांत कांहीं लिहावेसें मला वाटत नाहीं.

पूर्वीं एक काळ असा होता कीं, महाराष्ट्रांत ललित वाङ्मय वाचायला मिळायचीं साधनें अति दुर्मिळ; त्या वेळीं बाहेर पडलेल्या मासिकांना वाचक आणि लेखक मिळविण्यासाठीं कांहीं कांहीं योजना कराव्या लागत आणि ह्मणूनच निबंध, गोष्टी वगैरेसाठीं बक्षिसें लाविलेलीं असत. पण तेव्हां देखील अशी मौज असे कीं, बहुतेक बक्षिसाचे वेळीं, लेख थोडे ह्मणून निवड करतां आली नाहीं, कांहीं वेळां दोन तीनच आले पण ते बक्षिसालायकच नव्हते वगैरे वगैरे सबबीखालीं बक्षिसें रद्द केलीं जात असत. वास्तविक पाहिलें तर जेवढे लेख येतील तेवढ्यांतूनच लायक लेखांना बक्षिस मिळालेंच पाहिजे. जरी एक दोनच असले तरी त्यांत देखील जो पहिला येईल त्याला मिळालेंच पाहिजे. कारण ज्या अर्थी लेख थोडे आले त्या अर्थी लेखक तरी थोडे असले पाहिजेत किंवा अशा ठिकाणीं पाठवायची आवश्यकता वाटते, अशीं माणसं तरी थोडीं असलीं पाहिजेत. तेव्हां ज्या थोड्या माणसांनीं श्रम घेऊन लेख पाठविले, त्यांना त्यांच्या श्रमांचा मोबदला नको का मिळायला? का लेख लिहिणारानें आधीं तुमच्याकडे किती लेख आले, याची चौकशी करून मग लेख लिहायचा? त्यावरही उत्तर आहेच कीं, मुदत टळली. ही झाली जुन्या मासिकांची गोष्ट. आतां तुह्मी नव्या मासिकवाल्यांनीं एक नवा प्रतिष्ठित जुगारी धंदा आरंभिला आहे. रेसिस्‌ला प्रतिष्ठित जुगार ह्मणणाऱ्या संतांनीं ( साहित्यभक्त ह्मणजे संत. कारण साहित्यभक्त हा

बुद्धिप्रधान असतो व बुद्धीची वाढ सत्वगुणापासून होते असें ह्मणतात.) रेसवाल्यांना नांवें ठेवायचीं व आपण जुगारी-संपादक व्हायचें. कारण व्यापारी-दृष्टी जरी प्रत्येक धंद्यांत ठेवायची ह्मटलें तरी सुद्धां मनुष्याला आपला पेशा विसरून चालत नाहीं. हल्लीं प्रत्येक मासिकांत एक बक्षिसाची पद्धत निघाली आहे. कोणी गोष्टी, कोणी कोडीं, कोणी निबंध वगैरे....बक्षिसाकरितां लावितात त्यांत एक मुद्दाम "अट" अशी ठेविलेली असते कीं, प्रत्येक उत्तराबरोबर अमुक पैसे यावे. हें सारें पाहिलें ह्मणजे असा विचार डोक्यांत येतो कीं, तुह्मीं हीं बक्षिसें ठेवितां तीं निवळ तुमच्या मासिकाचा खप व्हावा ह्मणून? का लोकांना कांहीं बुद्धिविकासाविषयींची अभिरुचि उत्पन्न व्हावी ह्मणून? पण आज तर स्थिति अशी आहे कीं एकाद्या मास्तराच्या बायकोनें जर गोष्ट अगर कोडें सोडवायचें ह्मटलें तर आधीं रुपयाभर खर्च नवऱ्याजवळ मागितला पाहिजे. ह्मणजे बिचाऱ्या नवऱ्याला बायकोच्या लेखनव्यवसायाचा हा भूर्दंड! आतां वास्तविक पाहिलें तर पाश्चात्य देशांत, या लेखन व्यवसायावर लोक पोट भरतात. आमचे इकडेही कांहीं लेखकांना नांवाचा मोबदला मिळतो. लोकांचे लेख व बुद्धि यांच्या जोरावर कीर्ति, पैसा व मान हीं सारीं तुह्मां संपादकांचीं. वास्तविक पाहिलें तर प्रत्येक लेखकाला आपलें लिहिण्याचें कांहींतरी चीज व्हावेंसें वाटतें. ज्याला देवानें थोडी बुद्धी दिली आहे, असा गरीब माणूस असला तर तो अगर ती ह्मणतात कीं, फावल्या वेळांत थोडासा लेखन व्यवसाय करून दोन पैसे मिळवू! संसाराला हातभार लागेल, पण हल्लींची परिस्थितीच अशी-लेख पाठवायचा त्याबरोबर फी पाठवायची, टपाल खर्च करायचा व परत

मागवायचें हंशील पाठवायचें, मोबदला तर लांबच राहिला! बरें मोबदला घेऊन एकादा लेख पाठवायचा ह्मटला तर तो मोबदला इतका अल्प असतो कीं, गरिबाला सुद्धां तो घेऊन लेखावरील आपला हक्क सोडावासा वाटणार नाहीं. गरीब काय! व श्रीमान् काय! आपल्या कर्तृत्वाचे पारितोषक मिळावें असें वाटावयाचेंच. हें मी माझ्या बुद्धिवैभवावर मिळविलें आहे, असें अभिमानानें दुसऱ्याला दाखवायला सांपडावें अशी इच्छा अगर हौस प्रत्येक व्यक्तीची असते. पण त्याऐवजीं सध्यांचे तुह्मी संपादक लेखकांचाच पैसा गोळा करून त्याच्यावरच आपल्या मासिकाचे ढोलकें वाजवितां. या तुमच्या पद्धतीचा मला कंटाळा आला असल्यामुळें असल्या संपादकीय महाशयांकडे लेखच पाठवू नयेत असें मी ठरविलें आहे.

आतां तुला लिहिलेलें हें माझें खाजगी पत्र जर तूं कोणाला दाखविलेंस तर माझ्यावर चोहोंकडून टीकेचा भडिमार होईल, हें मला ठाऊक आहे. पण टीका, टीका आणि टीका! या टीकेचा मला इतका सराव झाला आहे कीं, त्यांत आतां नाविन्यच वाटत नाहीं. तेव्हां ज्या समजुतीनें मी लेख पाठविला नाही ती लक्षांत घे.

बरं, दादासाहेब, आतां आपण लवकरच इकडे याल, नाहीं कां! कारण आपण येण्याचा दिवस जवळ जवळ येत चालला आहे, मुलें मामा येईल, मामा येईल, ह्मणून नाचत आहेत. विशेष काय लिहूं. अंक समग्र वाचला, पुढल्याची वाट पहात आहे. कळावें लोभ असावा हे विनंती.

तुझी—ताई.

माझें पत्र, गेलें आठ दिवस झाले, दहा दिवस झाले, पंधरा दिवस झाले दादाचें उत्तर नाहीं. माझा जीव वर खालीं व्हायला लागला. मला वाटलं होतं कीं, माझं पत्र वाचून त्यावर दादाचं कांहीं तरी विनोदात्मक, चर्चात्मक असं उत्तर येईल, पण मुळींच उत्तर नाहीं. प्रथम शंका आली कीं, आजारी असेल? पण, तेथून आलेल्या एका माणसाकडून तो सुखरूप असल्याचें कळलें तेव्हां दुसरें पत्र पाठविलें, तरी उत्तर नाहीं. तेव्हां स्वतां मला ह्मणाले, 'तुझ्या त्या पत्रानें दादा रागावला' तें ऐकून मग मात्र मला कसेंसेंच वाटूं लागलें. माझी कल्पना नव्हती कीं, दादा रागावेल. पण हें उलट झालें. मग माझ्या जिवाला सारखी हुरहुर लागली. दिवाळी जवळ आली पण दादाचें पत्र नाहीं. कारण दादाचें गांव रेल्वनें फारसें लांब नसल्यानें तो दर वर्षीं दिवाळीला यायचाच. पण यंदा पत्र सुद्धां नाहीं. दिवाळी आली, आज नर्कचतुर्दशी, सकाळपासून सगळी व्यवस्था रीतसर झाली, पण माझें तोंड उदास! तो दिवस गेला, अवसेचा उजाडला, माझं मन उदास! यंदाच्या दिवाळींत कांहीं रम्यताच वाटेना. आनंद जसा कांहीं सोडूनच गेला.

मुलंही ह्मणायला लागलीं, आई! यंदा मामा नाहीं का ग यायचा? हे शद्ब कानीं पडतांच अंतःकरण भडभडून आलं, डोळ्यांच्या पापणीपर्यंत अश्रु आले, ते मग मुलांवर लटका राग काढून दाबावे लागले. बाहेर जा रे, बावांनो किती त्रास देतां? मला स्वयंपाक करूं द्या. मुलें बिचारीं माझा खाकरवसा ऐकतांच गेलीं. पण इतक्यांत आंत यायचं नी माझ्याकडे पाहून ह्मटलं, हें काय? झालं काय इतक्यांत? मी ह्मटलं 'कुठ काय? हीं लाकडें आतिशय वाईट आहेत! असा धूर

होतो आहे! नाहीं तरी आतांशी कारकून मन लावून बाजारच करीत नाहीं.' स्वतां कांहींच उत्तर दिउं नाहीं. फक्त हंसून निघून जायचं.

आज पाडवा, आमचे गांवांत टपाल सकाळींच येतं. आजच्या टपालांतही दादासाहेबांचं पत्र नाहीं. तेव्हां स्वारी यंदा खास येत नाहींसें वाटलें. नाहीं तर नाटक कंपनी जशी येणार! येणार!! ह्मणून जाहिराती लावते; तशीं दादासाहेबांचीं दोन तीन पत्रें व खुद्द स्वारी आजला यायला पाहिजे होती. हें ऐकल्याबरोबर आजपर्यंत दाबून धरलेले मनोविकार एकदम उचंबळून गंगा—यमुनांच्या प्रवाहरूपानें बाहेर पडले. तशी स्वतां ह्मणाले, अरे बापरे! इतकं का वाईट वाटतं! मग ज्याला एवढा सुद्धां बंधूचा राग सहन करायची शक्ति नाहीं, त्यानें इतकें टीकात्मक खरमरीत पत्र लिहावें कशाला? किती केलं तरी मनुष्यस्वभाव तिथून मनुष्यस्वभावच! पण तुह्मां लेखकांना हातांत लेखणी धरली कीं, खरडायचं ठाऊक. मग मागचा पुढचा विचार मुळींच रहात नाहीं

हे त्यांचे शब्द तर मला फारच झोंबले, अतःकरण पश्चातापानं इतकं पोळलं कीं, सांगतां येत नाहीं.

मी क्षमा मागायचं पत्र लिहायचं ठरविलं. दुपारीं बसून पत्र लिहायला आरंभही केला, पण लेखणी हातांत घेतली कीं, सारखा डोळ्यांतून अश्रूंचा पूर!

माझ्या आयुष्यांत मला कळायला लागल्यापासून मी एकदांही दादाला नाखुष केलेलं आठवत नाहीं. वादविवादाच्या भरांत आह्मीं परस्परांच्या मतावर कडक टीका करीत असूं, तो माझं सोवळं-ओवळं काढी; मला अर्थाडॉक्स ह्मणे तर मी त्याचें सोडा, ब्रेड, केक, हॉटे-

ळांतला चहा वगैरे काढून त्याच्या सगळ्या स्वच्छतेची टर उडवी, पण यांत आम्हीं कधींच रुसलों, रागावलों नाहीं. जर कधीं मी रुसलेसें दिसलें, तर तो किती प्रेमानें माझी आर्जव करी. तो दादा आज माझ्यावर रुसावा का! आज त्याला रागायला मी कारण व्हावें कां? खरोखरीच तें पत्र इतकं कडक झालं असेल कां? बरं, तसं जर होतं तर मला ह्यांनीं तेव्हांच कां नाहीं सुचविलें? हा तरी मेला कसला स्वभाव! कीं, आधीं आमी काय काय गुण उधळतें, तें मुकाट्यानें बघायचं! नी मग वेळेवर टोंचून बोलायचं. झालें, दिवस गेला. भाऊ-बीज उजाडली! आज इंदू-सिंधूची कोण गडबड! पण मला आजच्या दिवसाचें मुळींच महत्व वाटत नव्हतें. मी स्वयंपाकाची साधी तयारी काढून द्यायचा मोलकरणीला हुकूम केला. आणि मुलींना ह्मटलें कीं, आज तुमच्या खेळांत मुलांना जेवायला बोलवा. तें ऐकून मुली नाखूष झाल्या. फिर्याद तिकडे गेली तेव्हां सांगितलें कीं, 'आतां तुमच्या खेळांतली भाऊबीज होऊं दे. संध्याकाळीं घरातली मोठी करूं!' मला वाटलं, केली असेल मुलींची समजूत! मुलींनीं घरांतले जिन्नस घेऊन त्याला दुसरं स्वरूप देऊन भातुकलीच्या जेवणाचा थाट केला. भावांच्या ओंवाळण्या बिंवाळण्या झाल्या संध्याकाळ झाली बाहेर थेंड दिसतच होतं. पण मी पाय धुवून तुळशीला दिवा दाखविला व देवाजवळ बसलें. आमच्या देवघरांत देवाकडे तोंड करून बसलें ह्मणजे देवाच्या वरच्या खिडकींतून नेमकी चंद्राची कोर दिसत असे. मी नीरांजन घेतलं, चंद्राला नी देवाला ओंवाळलं, पण माझ्या दृष्टीला देवाची मूर्ति कांहीं दिसेना! डोळ्यांतनं पाण्याची धार लागली. ओंवाळायच्या या शुभ वेळेला अशुभ पाणी डोळ्यांतून येऊं नये

ह्मणून मी प्रयत्नांची शिकस्त केली. पण निष्फळ ठरली व ओवाळ-तांना मनांत ह्मणायचे उद्गार माझ्या तोंडून मोठ्यांदा बाहेर पडले. देवा! नारायणा! कृष्णसख्या, जसा तूं द्रोपदीचा भाऊ, तसाच माझा प्रेमळ दादा. तो असेल तेथें सुखी राहो. आयुष्यमान् होवो. कृष्णा हा माझा निरोप माझ्या दादाला पोंचविशील नारे? त्याबरोबर माझ्या पाठीमागून आवाज आला, 'निरोप पोंचला कलियुगांत देखील देव भक्तीला जागतात' त्या आवाजानें मी दचकले! हातांतलें ताम्हन पडलें कीं काय वाटलें ताम्हनासगटच उठून उभी राहून दरवाजाकडे पाहिलें तों काय! दादासुद्धां स्वतांची स्वारी दरवाज्यांतच उभी.

मला वाटलं-जणूं "हरिहरांचच" दर्शन आहे. मीं तीं निरांजनें दुरून अक्षता टाकून ओवाळिलीं. मला काय वाटलं सांगूं? .. सांगतांच येत नाही. जाऊं द्या झालं. स्वतां मात्र सारखे माझ्याकडे पाहून हंसत होते. दादाचा चेहरा थोडासा हळूवार झालासा दिसत होता. मग स्वतां ह्मणाले, 'पाटावर बसवून पद्धतशीर ओवाळ-शील कीं, नाहीं? ह्मणजे थोडं फार कांहीं मिळाल्यास, तारेचा खर्च तरी फाडतां येईल. अग इंदु, सिंधू .. मी ह्मटलं होतं ना! रात्रीं मोठी भाऊबीज होईल ह्मणून! कारण आज दुधाचा आह्मांला खाक्या."

........' मी ह्मटलं, हो खरंच, पुन्हां ओवाळायला जरी नको असलं तरी ओंवाळणीनंतर द्यायचं पागोटं राहिलंच. आणतें ह ' असं ह्मणून मी तारुण्याच्या अभिनयानं पळत खोलींत जाऊन एक वस्तू घेऊन परत आले नी दादाच्या हातांत देऊन ह्मटलं, दादासाहेब हें घ्या "नारळी पदरी पागोटें" ह्मणून हेडिंग घातलेले हस्तलिखित कागद होते. ते पाहून दादा बहुत खुष झाला व मघाच्या बोलण्यांवरून तो

कसा आला हें मीं ताडलंच होतं. मग स्वतः ह्मणाले, " चला आतां स्वयंपाक होईपर्यंत बाहेर गप्पा मारीत बसूं." असं ह्मणून दोन्ही मुलीं हातीं धरून बाहेर नेलं. तेव्हां मी अगदीं हळूंच विचारलं, "दादा, तूं रागावलास कारे? मी तें अगदीं स्वाभाविक लिहिलें. आतां क्षमा मागतें." तेव्हां दादाचे डोळे पाण्यानें भरून आले व तो अगदीं रुद्ध कंठानें ह्मणाला, ......."ताई चुकलों, तुझ्या प्रेमाची कल्पना असूनही चुकलों. क्षमा कर, माझ्या ताईवर, माझ्या लाडक्या ताईवर मीं पूर्वीं कधींही रागावलों नव्हतों आणि पुढेंही कधीं रागावणार नाहीं," असें ह्मणतांना खिशांतला हातरुमाल त्यानें डोळ्यांना लावला. माझेही डोळे पुन्हां पाण्यानें भरले. पण त्याला हंसवायसाठीं मी खोटें हसूं आणून ह्मटलें, "दादा, इश्श् तूं कायरे बायकांसारखं रडतोस? तेव्हां तो ह्मणाला, "तूं पुरुषांसारखं कठोर लिहिलंस ह्मणून." त्याच्या त्या कोटीनं मलाही हंसायला आलं आणि आह्मीं दोघं एकमेकांकडे आनंदाच्या साश्रूनयनांनीं पहातच राहिलों. अहाहा! त्या डोळ्यांची वाचा! त्या डोळ्यांतील प्रेम! काय मी वर्णन करूं! आमचे राग कुठल्या कुठं गेले नी आज आम्हांला किती सौख्याची "भाऊबीज" वाटली.

आमच्या मनोभावनांची भाषा डोळेच बोलले. इतक्यांत स्वतां आंत आले व हंसत हंसत आह्मां दोघांकडं पाहूं लागले. यावेळीं एथें, "शुद्ध प्रेमाचं" साम्राज्य जणों पसरलं होतं.... ...आणि हवें-तून जणों निनाद कानांवर पडत होते कीं........जगांत श्रेष्ठ काय? तर ... ...सात्त्विक प्रेम! प्रेम! नी प्रेम............

# गोष्ट ९ वी.

## समता.

आज गिरणीला बाजारची सुटी होती. गिरणीच्या आसपास एका चाळींत एका लांकडी कॉटवर दोनतीन इसम बसले होते. एक म्हातारा दाराजवळ बसला होता. मधून मधून विड्यांचा धूर सोडीत मोरे रंगांत त्यांच्या गप्पा चालल्या होत्या कॉटवर बसलेल्यांपैकीं काळासांवळा पण दणदाकट व तरतरीत चेहऱ्याचा तरुण होता तो म्हणाला, " हं, काय ऐकलंत ! मी वाचलेलं समजलं का ? "

" होय समजलं; पन तुम्ही एकदां समदं नीट सांगा. "

" अरे, विलायतमध्यें गिरणीकामगारांना कसा मान आहे. "

" पण आपल्यामध्यें कसं ? "

" आपले गिरणीवाले आपण कोणी मोठे लोक आहों असं समजतात. "

"ते मोठं तर हायतीच." पोत्यावर बसलेला एक जण म्हणाला.

" हें असं आपल्या लोकांना वाटतं म्हणून तर आपण असं दळींद्र भोगतों. "

" ज्याचं त्याचं नशीब. " दारांत बसलेला म्हातारा म्हणाला.

तो कोटवरचा तरुण जवळच्याचे खांद्याला हालवून म्हणाला, " काय नाना, बोला ना ? नशीब कसं ? आमच्या कष्टावर पैसा उभा रहातो कीं नाहीं ? "

नाना म्हणाला, " रामभाऊ, अगदीं खरी गोष्ट आहे. पहा आपल्या खोल्या, जरा दुरुस्ती मागितली तर जसं त्यांच्या बापाचं गाठोडं बुडेल असं कारकून ओरडतो आणि त्यांचे बंगले पहा. आमच्या मालकाची चैन पहा ! त्यांना उन्हाळा बाधतो. आम्हीं बारा तास घामाच्या धारा काढतों पण पोटभर खायलाही नाहीं. "

" अगदीं खरं बोललांत. " रामभाऊ म्हणाला.

म्हातारा म्हणाला, " भाऊ, तुम्हांला कितीबी मिळालं तरी पुरं पडायचं नाहीं. मला सरकारी कचेरींत चवदा रुपये मिळत होते तर दोन पोरी, दोन पोरं, चवघांचं लगीन केलं पोरीची पै घेतली नाहीं; शिवाय दोन डाग कारभारणीच्या अंगावर होते; पण तुमची ही च्या नव्हती, हाटेलं नव्हते ह्या चैनीमदी मालक काय रडेल ? महिन्याचे पांच सहा रुपये बिल हाटेलचं असतं. आम्हीं साहेबासंगं हिंडत होतो, एक एक दीन भाकर करायला फुरसद मिळत नस, पण फुटाणे मुरमुरे, कुठं चार शेंगाच्या फक्या, वाइच गुळाचा खडा मिळाला तर केवढा आनंद वाटे. नाटक तर नेलं कधीं साहेबांनीं तर दिसलं. एक वखुत पाह्यलं तेंच. पण तुमचं त्ये नाहीं. पगार झाली का पोराला जिलबी, बायकोला चिवडा आणि समद्यांना सिनेमा. तिथं गेले कीं हे जसे कोणी मोठे लोक ! समद्यांना, सोडा, च्याई. आपुन कशाला दुसऱ्याची बराबरी करावी ? पण आतां म्हाताऱ्याचं गोड नाहीं लागत. राम हरी. "

" खरंच ह्यातारेबाबा, तुह्मी राम हरीच ह्मणा. ह्यांत तुह्मांला कांहीं समजायचं नाहीं. जन्माला आलेल्या माणसानं मुळीं चैन करूं नये हें कसें चालेल? आयता नफा घेणारे मालक जर इतकी चैन करतात तर मग बारा घंटे राबणाऱ्या मजुरांना थोडीसुद्धां चैन नको का? तिकडे पहा मजूर कसा चैन करतो; पण तिकडे मजुराचीच मिजास मालकास सांभाळावी लागते, नाहीं तर संपाची भीति, कीं बसा—"

" पण भाऊ, संपाच्या लोकांना खायला काय?"

" वा:! तिकडे लोक फंड करून पोसतात, त्यामुळें तिकडे कामगार कामावरून निघाला नी कपडे बदलले कीं, मालकाच्या तोडीचा. तिकडे प्रत्येक गोष्ट कामगाराच्या तंत्रानेंच करावी लागते. हल्लीं तिकडे केवढा तंटा चालला आहे कीं पैशाची वांटणी सारखी झाली पाहिजे. एकाला हजार, दुसऱ्याला पांचशें, तिसऱ्याला शंभर, चवथ्याला पन्नास सारखा असा पगार ठेवायचा नाहीं. सगळ्यांना रोज. कोणी श्रीमंत गरीब नाहीं असं तिकडे ठरलं आहे. तशी सुधारणा आपण कामगार लोकांनीं मनावर घेऊन घडवून आणली पाहिजे."

" वा, वा, असं होईल तर मजा होईल."

" हो हो, झालंच पाहिजे. आपण सगळे जण एकजुटीनं जर वागलों तर होईल."

नाना ह्मणाला, ' खरोखर, हें विलायतचं आपल्याला पसंत पडलं. पण आपल्या इकेड तर जरा दोन पैसे एकाला मिळाले कीं तो दुसऱ्याला विसरतो, मग कसं?"

" विसरेल कसा? सगळ्यांनीं जुटीनें भांडलं पाहिजे. वरिष्ठ वरिष्ठ ह्मणून त्याचा बाऊ नाहीं उपयोगी. जरा गुर्मीत राहिलं पाहिजे. आपल्या गिरणींतल्या सगळ्या लोकांना तुह्मी लोकांनीं चढवून ठेविलं आहे. ते जरा सरळ केले पाहिजेत कीं हेच लोक उद्यां मान ठवायला लागतील. "

" बरं रामभाऊ, आतां आज उशिर झाला आपण थोडं हिंडून येऊं; पण आतां ठरलं कीं तुह्मीं आह्मांला रोज रात्रीं त्या विलायतेच्या गोष्टी वाचून दाखवायच्या व तुह्मी आह्मी गिरणवाले झालों तर तसं वागायचं. "

रामभाऊ आवेशानें ह्मणाला, " नाना, थट्टा नव्हे. "

" अगदीं कबूल, कबूल. " असें ह्मणून सगळे उठले.

त्या दिवसापासून त्या चाळींत रोज रात्रीं वर्तमानपत्रें वाचणें आणि त्यांची चर्चा हा कार्यक्रम सुरू झाला. मजूरवर्गांत उर्मटपणाचे बीज वाढूं लागलें. तें पाहून एक दिवस वरिष्ठानें रामभाऊला कामावरून काढलें. रामभाऊ बेकार झाला. त्याचें डोकें चांगलें होतें; तो थोडें इंग्लिश शिकलेला होता. तो कामासाठीं हिंडूं लागला, तोंच दैवयोगानें त्याला एक जागा मिळाली. गांवांत एका दत्तक शेठियानें नांवाच्या हौसेखातर व पुष्कळ पैसे मिळवायच्या लोभानें आपल्या जवळचें सगळें भांडवल घालून तेलाची गिरणी घातली होती. त्यानें इंजिन अगदींच नव्या टाईपाचें आणलें होतें. तें एकदां बिघडलें तें दुरुस्त होईना. आसपासच्या इंजिनियरला त्यांतली कांहीं खुबी समजेना, कोणी स्पेशालिस्ट बोलवावा तर जवळ पैसा नाहीं. गिरणी कोणी मूळ किंमतीलाही घेईना; कारण अनुभवाशिवाय काम केल्यानें

२६५८ ... ... २५१

भलताच पैसा लागला होता. अशा स्थितींत तो अगदीं टेकीला आला होता. इतक्यांत रामभाऊ उभा राहिला. त्यानें सांगितलें कीं, " मी हें इंजिन चालू करून देईन. पण तें जर तसें चालू झालें तर मला चार आण्याचा हिस्सा द्यावा व नुकसान झाल्यास मी जबाबदार." मनुष्य निराश झाला ह्मणजे काडीचा आधार पुरतो. त्या शेटानें ह्याच्या लायकीचा विचार न करतां हो ह्मटलें. रामभाऊ उत्तम फिटरच होता पण चांगलें डोकें होतें. त्यानें खुबी ओळखली. तें इंजिन दुरुस्त केलें व तें आतां पहिल्यापेक्षां किती तरी चांगलें काम देऊं लागलें. मालकाचे दिवस बदलले. माल उठूं लागला. छान फायदा पडूं लागला. रामभाऊचें दैव उघडलें. झोपडीचा बंगला मिळाला. त्याला हळूच शोभा आणायची इच्छा झाली. बायको बाईसाहेब झाली, मुलांचें कपडे बदलले. पैसा हातांत खेळूं लागला कीं वैभवाच्या वस्तू दिसूं लागतात. आज दिवे आले, उद्यां सतरंज्या आल्या. चहाचीं भांडीं चमकूं लागलीं, खुर्च्या टेबलें दिसूं लागलीं. अशीं दोन तीन वर्षे गेलीं. त्याचे मूळचे मिलचे सोबती एक दिवस एकजुटीनें आले. हा ऐटींत खुर्चीवर बसून त्यांना बैठकीवर चहा दिला. तो घेऊन त्यांनीं हळूच गोष्ट काढली कीं, " तुमचा आमचा एकच करार होता कीं जर कोणाला कारखाना काढायची ऐपत आली तर सर्वांनीं सारखा तनखा घ्यायचा. आह्मी इथं येतों, आपण शब्द खरा करा."

रामभाऊ ह्मणाला, " कारखाना शेटचा."

" अहो, पण तुमचा हिस्सा आहे ना त्यांत ! आपण सारख्या वांटणीनं राहूं. बोला, तुमच्या इथं काल चार जागा रिकाम्या झाल्या आहेत, आह्मी चौघे आज येऊं. तुह्मी तुमचा पगार तरी तुमच्या जव-

ळच्या लोकांना सारखा वांटायला लागा, मग पुढचं पाहूं. गप्प बसूं नका. आतां आह्मी जातो. उद्यां भोंग्याला येऊं. तोंपर्यंत तजवीज करून ठेवा ह्मणजे तिकडचं सांगूं. आमची काळजी देवाला ह्मणून त्यानं लवकरच तुह्मांला मोठं केलं." असें ह्मणून उद्यां येण्याचें पुनःपुन्हां बजावून ते गेले.

उद्योगांत गुंतल्यानंतर, कारखान्याची भरभराट कशी होईल, ह्या विचारांत हे जुने उद्योग रामभाऊ विसरला होता त्याला आज ती आठवण झाली. त्यानें पुष्कळ विचार केला, पण स्वतःच्या डोक्या-वर, बुद्धिमत्तेवर मिळविलेलें हें वैभव सोडून पुनः चाळींतील खोली किंवा जरा बरी जागा घेऊन त्या सर्वांबरोबरीच्या नात्यानें वागायचें ह्मणजे पुनः गरीब व्हायचें, कां मी बोललों तें चूक आहे असें ह्मणा-यचें ह्याचा विचार करीत तो वऱ्हांड्यांत बसला होता.

# गोष्ट १० वी.

## कृतज्ञता !

**काय** विनूभाऊ? अजून तूं उठला नाहींस ?

" अं, आतां उठतोंच कीं, तसा कांहीं उशीर झाला नाहीं. "

"उशीर ह्मणजे काय? उन्हं पडलीं, असं कसरे तुला निजवतं तरी!"

" अहो मग करायचं तरी काय ? सगळा एवढा मोठा दिवस गेला तर पाहिजे ! उशीरा उठलं ह्मणजे तितकेच तास कमी. "

" वा ! ह्मणजे या वयापासूनच का तूं दिवस घालवायच्या मार्गे आहेस ? मग तुला दिवस पुरायचा कधीं ! "

" ईश्वराला ठाऊक ! कारण पुढील कॉलेज खर्च झेपायसारखीं आमची स्थिति नाहीं व दुसरं कांहीं करावं तर वेकारी आ ह्मणून उभी ! आज ग्रॅज्युएटांनाच नौकऱ्या नाहींत तर आह्मासारख्या मॅट्रिकवाल्यांना कोण विचारतो ? "

" अरे नोकरी ह्मणजेच का दैव ! आणि झोपा काढून कां पुढील मार्ग सापडणार आहे ! तूं कालच्या व्याख्यानाला नव्हतास वाटतं. "

" होतो. अथपासून इतिपर्यंत होतो कोरड्या व्याख्यानाला काय लागतं. पाश्चात्यतज्ञ एकॉनमीचा अभ्यास केलेले तज्ञ जेथं बेकारी अशी चालायचीच ह्मणताहेत तेथें एकाद्या बाईच्या व्याख्यानानें का परिस्थिति पालटते ! बोलायला काय लागतं ! मी सुद्धां बोलेन "

"मग आजपर्यंत कां नाहीं बोललास? अरे, त्या सगळ्या बोलण्यांत कांहींच तथ्य नाहीं असें तूं ह्मणतोस. ही बघ पहिली गोष्ट तुझ्या झोंपेची, तूं किती वेळ निजलास?"

"मग काय? लवकर उठण्यानें बेकारी सुटणार आहे ह्मणतेस?"

"अरे, असें जरी नाहीं तरी मोठीं माणसं काय ह्मणतात तें ऐकून थोडं त्या प्रमाणें वागून पाहण्याला आपलं कांहीं गेलं कां? ही तुझी झोंप, ही जागेवर आणायचा निश्चय करून पाहूं बरं.—"

"अग, पण लवकर उठून करायचं काय?"

"चल, आधीं आंत चल. काकूंनीं मला मघाशींच चहाचं आमंत्रण दिलं आहे. त्या म्हणाल्या कीं, तूं उठल्यावर चहा करायचा आहे, तर तुझ्यासकट आंत गेलं ह्मणजे तूं उठलेला समजेल नी मला चहा मिळेल. "( असं ह्मणत दोघ सोप्यावरनं आंत आलीं. ) तों रमा काकू धांपा टाकीत उमऱ्यावर घागर ठेवित होत्या, त्यांना पहातांच वेणूताई पुढें झाली आणि ह्मणाली, "काकू तुह्माला फार दम लागलेला दिसतो. घागर मी उचलूं कां? आंग धुतलेली आहे," रमा काकू ह्मणाल्या, "नको माझं आपलं नेहमींचंच, मी नेहमींचीच एकटी, हातपाय आहेत तोंवर करीन. पुढचपुढें कुणां पाह्यलं?" वेणुताईनें चटदिशीं घागर उचलून आंतल्या आंगला चुलीपुढं ठेविली व ह्मणाली, "असं कां ह्मणतां काकू? विनूभाऊचं लग्न झालं कीं, येईल सून मदतीला."

"हं, विनोबाचं लग्न ना? काय पाहून लोकांनीं मुलगी द्यायची? घरचीं शेतीवाडी नाहीं, कांहीं नोकरी कर ह्मणावं तर ह्मणतो जगांतच नोकऱ्या नाहींत. खुटलंच बोलणं. ती झोंप सुटेल तेव्हां

बाबा नोकरीला जायचा ! ती घरीं कां येईल वेणूताई. सतरा ठिकाणीं गेलं पाहिजे, अठरा उमरे झिजविले पाहिजेत, ती तर आमची 'बोली नाहीं ! बरं जाऊं दे, हा बघ चहा झाला, विनू, तोंड धुतलंस कां?"

"हो, तुझं व्याख्यान सुरू होतं, तोंवर मी तोंडधुणं आटपलं."

"माझं कसलं वेडीचं व्याख्यान ! पण काल त्या बाई ह्मणाल्या तें थोडसं पटतं खरं. हं घे वेणूताई चहा घे, आज सकाळचीच तुला आपली आईनें पाठविली. नव्हतं दुसरं कोणी मनुष्य ? "

"होतं तर काय झालं ? पण माझं काम आटपलं होतं, आज आमच्या दारांत मी जें लहानपणीं झाड लावलं होतं ना ? त्याला यंदा आंबे आले, तेव्हां त्या झाडाला मी आणि विनूभाऊ मिळून पाणी घालीत होतों, ह्मणून त्या झाडाचे आंबे तुह्मांला व विनूभाऊला द्यायला मी स्वतः आले. "

"वा. मग हे आंबे महत्त्वाचेच आहेत ! विनू, पाहिलं का वेणूताईचं तुझ्यावरचं प्रेम ! "

"आई केलंन् तर नवल नाहीं, नाहीं केलंन् तर नवल ! कारण आह्मीं लहानपणीं २४ तास एके ठिकाणीं धुडगुस घालित होतों. काय ताई, तें सुखाचं आयुष्य ! आठवण झाली कीं, लहान व्हावसं वाटतं. "

'अरे, पण तेव्हां आपण मोठेपणाच्या गोष्टी करीत होतों, खरंना?'

हो, त्यावेळीं आपल्याला मोठेपणांत कांहीं तरी आहेसं वाटत होतें, पण तो भ्रमाचा भोंपळा अनुभवानं फुटला.'

'छट्, असं ह्मणूं सुद्धां नकोस व निराशही होऊं नकोस. कालचं व्याख्यान अजून माझे कानांत गुणगुणतं आहे. आशावादी प्रयत्नांनीं मनुष्य जगतो व नशीब काढतो. चल, आपल्याला कांहीं तरी करायचं असं आपण ठरवूं या. ह्मणजे त्यांतूनच तुला मार्ग सुचेल. पण बघ उद्यापासून माझ्यासाठीं एक गोष्ट तूं करशील कां? हें बघ, काकू आतां म्हाताऱ्या झाल्या, त्यांतून आजारानं त्यांची शक्ति गेली, तेव्हां पुढील दारानं आंत पाणी आणायचं त्यांच्या हातून होत नाहीं. तरी तेवढं ४ घागरी पाणी तूं आणून द्यायचं.'

'अग, पण ती कां आणते, मी उठल्यावर नाहीं का आणणार?'

'अरे पण आठाला नळ जातात, अन् आपली स्वारी तर आतां उठायची! तेव्हां उद्यांपासून पहाटे उठायचं, हल्लीं पांचाला चांगलं फटफटतं. तेव्हां उठून, प्रातर्विधी आटोपून काकूंचं चार घागरी पाणी आंत आणून टाकून, पावणेसहाला तूं आमचे येथें ये. मी सकाळीं आमच्या मळ्यांत फुलांना जात असते, तेव्हां आपण बरोबर जाऊं, ह्मणजे अनायासें फिरणें, गप्पा व कामंही होतील.'

'इतकीं कसलीं फुलं आणतेस?'

'मळ्यांतल्या मोगरींना यंदा खूप फुलं आलीं आहेत. तेव्हां, आई लक्ष घालते आहे, तिला तीं फुलं मीच वेंचून आणून देते.'

रमाकाकू ह्मणाल्या 'नशीब त्या आईचं.'

'होय, आह्मीं आळशी मुलांनीं तुमचीं कामं करून देणें ह्मणजे खरोखरीच नशीब बरं!'

'विनूभाऊ ठरलं अं, मी वाट पाहीन.'

× + = * = + ×

पंच पंच उषःकालची सकाळची वेळ. खेडेगांवांतल्या बाहेर एक तरुण तरुणी व एक गडी अशीं सडकेनें चाललीं आहेत, चालतां चालतां गांवापासून मैलावर असणाऱ्या देशमुखांच्या मळ्याकडे ही मंडळी आली. मळ्याच्या फाटकांत कांहीं वेळ उभं राहून नुकत्या उगवू पहाणाऱ्या सूर्याच्या लाल प्रतिबिंबाकडे पहात होतीं, त्यावेळीं अग्नीचा लाल गोल नुकताच क्षितिजांतून वर डोकावत होता, त्याच्या तेजाचे सूचक किरण आपली सोनेरी किरण चौफेर पसरून आनंदवीत होतीं. आदले दिवशीं येऊन गेलेल्या वळिवाच्या पावसाची भुरभुर डबक्यांतन् सांठली होती व त्यावर पडलेलीं कोंवळीं किरणं एक मोहक दृश्य दाखवीत होतीं. पानांपानावर सांठलेले दंवबिंदूचे थेंब गौरवर्णावर गोंदलेल्या ठिपक्याप्रमाणें पानांवर जणों सृष्टिदेवीनें हें सौंदर्य वाढविण्याकरितां गोंदलेंच आहे असें वाटून तीं डौलानें ताठरलीं होतीं मोगऱ्यांच्या फुलांचा सुटलेला घमघमाट रसीक व अरसीक, इच्छा असणारा व नसणारा सर्वांच्या नाकांतून परिमल फेकून आपलं अस्तित्व जाहीर करीत होता. जवळच दिसणाऱ्या टेकड्या ताठरपणानं उभ्या राहून जणों असं सुचवीत होत्या कीं, आम्हीं साधू आहोंत, ऊन, पाऊस व थंडी तिन्हीं स्थितींत मी स्थितप्रज्ञासारखी अशीच रहाते, हा सारा आकर्षक, मोहक व देखावा पाहून कोणाचं मन आकर्षणार नाहीं? मग हीं तर काय तरुण व सुशिक्षित होतीं, काव्यें वाचलीं व ऐकलीं होतीं. त्यामुळें स्वाभाविकरीत्याच त्यांना आनंद झाला.

इतक्यांत बरोबरचा गडी म्हणाला “ ताई, इथं काय थांबला, चला, बिगीबिगी फुलं तोडूं या, माझं लयी काम पडलं या.” त्याबरोबर

वेणू ओचा पदर बांधून फुलं तोडायला लागली. कारण वळिवाच्या पावसानं थोडीशी ओल झाली होती. विनोबाही स्वखुषीनें तिला त्या कामीं साहाय्य करीत होते,फुलं संपल्यावर वेणू ह्मणाली,"विनूभाऊ चल, आतां आपण मळ्याच्या दुसऱ्या वाटेनं बाहेर पडूं. बाकी तुलाही पहाटे उठून यायची शिक्षाच होत असेल नाहीं?" विनू तिच्या तोंडाकडे पहातच उभा राहिला. तें पाहून ती ह्मणाली, "का? गप्पा का. चल, जाऊं या, तूं दमलास होय?"

"अंह! दमलोबिमलो नाहीं, पण विचार करीत होतों कीं, एकादी लेणखडी ठोकावी कीं, खरं सांगावं!"

वेणू हसून ह्मणाली, "मग ठरलं काय?"

"ठरलं होय? ठरायच तेंच, तुझ्या पवित्र चेहऱ्याकडे पाहिल्यानंतर खोटं बोलायचं कसं ठरणार? तेव्हां खरं बोलायचं ह्मणजे पहाटे उठल्यानंतर होणारा आनंद व सृष्टीचं हें नैसर्गिक सौंदर्य मी कॉलेजांत असतांना बायरन, शेले यांचं शाब्दिक काव्य वाचलं होतं, पण परमेश्वरानं दाखवलेलं, हें खरं काव्य प्रथम तूं दाखवलं, अन् त्यामुळें मनाला वाटणारा उत्साह कसा असतो, याचा अनुभव तूं घ्यायला लावलास. तुला खरं सांगू कां, दोन दिवस अईला पाणी आणून द्यायला लागल्या मुळें, तिला माझ्याबद्दल जें प्रेम वाटतं आहे, तें मला एरव्ही कधींच पाहृला मिळालं नसतं. मी माझ्या सगळ्या आयुष्यांत दिवाळीशिवाय कधीं पहाटे उठलों नाहीं, मग पहाटेची खरी किंमत मला कळावी कशी?" असं बोलत बोलत तीं शेताच्या एका पडिक भागाकडे आलीं, आणि तेथून जवळ असणाऱ्या एका लहान फाटकानें बाहेर पडलीं. तेव्हां विनू ह्मणाला "हा तुकडा पडीक कां?"

तशी गडी म्हणाला, "अहो, समदी जमीन दोन गड्यास्नी होत नाहीं, तवा यंदा धनी म्हणाले समदं पेरून फजीत करूं नका, थोडी पडीक पडली तरी चालेल, पण करायची तेवढी चांगली करा. या फुलासनी पाणी मिळतूया म्हणजे काय? या आमच्या ताईबाईचे लाड आहेत! नाहींतर, समद बघायला होतं कुठें?"

'म्हणजे काय? पाणी पुरत नाहीं होय?'

'नाहीं, पाणी तर हाय म्हणा, थोडं थोडं मिळेल! पण येळ गवसना, नवे गडी मिळतू नाय, चांगलं काम करणारे जुने गडी हाय, ते आपल्या जीवाप्रमाणें करत्यात, त्याच्यापूर्ती ते करतात. हा तुकडा बाजुला पडतो, यासनी कसलं, तर एका गड्याचा वखुत जातो."

त्या परमानं पीक नाहीं होत, या गिरणनं समदा कुणबी-मराठा शेती टाकून शेनी गेला, पोरासोरास्नी खेडें गांव नाय आवडत. इथं ती पडद्याची चित्र बी नाय, नी ती नाचायची जलशे बी नाय, तुम्हा वाणी पोरास्नी खेडे गांव कुठं आवडतं. गिरणमध्यें जायच, हाटेलांत चाय प्यायची ती मिसळ का उसळ ती पैशा दोन पैशाची खायची व ताई दोन पैशासनी एवढी पुडी देतात, तेंच आपली आई घरांत मटकी करते, तर पातेलं भर उसळ होते कीं, आम्हीं समदी इतकुली खातों, लयी तर पावशेर मटकी उठत आसल. हाय काय दोन पैशाची मटकी, घरदार खाऊन रेलचेल होतं. पण पोरास्नी हें दिसत नाय. गिरणचा पैसा येतो, नाय असं नाय." विनू म्हणाला "वेणूताई, हा म्हणतो तें खरं आहे, पण हा जमिनीचा तुकडा कांहीं अगदींच लहान नाहीं; कारण गेल्या सुटींत मी माझे आतेभावाकडे गेलों होतों, तो

एका शेती फॉर्मवर आहे, तिथं पाहिलं तर एवढाल्या तुकड्यांतून नवीन तऱ्हेचीं खतं बितं घालून केवढालं पीक काढतात." असें बोलत बोलत तीं घरीं आलीं.

याच्या मनाचा कल पाहून दुसरे दिवशीं वेणूनं त्या तुकड्याबाबत वडिलांना विचारलं होतं. लहानपणापासून या दोन कुटुंबांचा घरोबा होता, परिस्थितीनं विनूच्या बापाला गरिबी आली, त्यांतही तो अकालीं मेला व विनूची विद्या पुरती झाली नाहीं. कारण मॅट्रिक, प्रिव्हियस या प्रत्येकांत त्यानं दोनदोन वर्षे काढलीं व इंटरमध्यें नापास होतांच बस्स कर म्हणून सांगितलं. कारण तीं तरी बिचारी काय करणार? घराचं अवघ वीस रुपये भाडं येई, त्यांत तीं तरी काय देणार! सरळ पास होत गेला असता तर बी. ए. झाला असतां पण कॉलेजांतील खुशालचेंडूपणा, विचार, वाचन, डिबेट, बोटिंग वगैरे अनुषंगिक गोष्टींत घुसळला व मुख्य गोष्ट विसरला, पण बोलून काय फायदा! असो. तरी पण वेणूचा बालमित्र म्हणून तिच्या वडिलांची दादासाहेबांची त्याच्यावर मेहेरनजर होती. आई काय, आईच त्या. वेणूच्या मित्रावर, ओळखीच्या माणसावर प्रेम करायचं हाच तिचा स्वभावधर्म होता, त्यामुळें वेणूनें विचारलेल्या गोष्टीला चटदिशीं सम्मती मिळाली. दुसरें दिवशीं हीं शेतावर जात असतां विनू अगदीं गप्प होता.

कारण आदले दिवशींचा शेतकीचा विषय त्याच्या डोक्यांत सारखा घोळत होता फुलं वगैरे तोडून झाल्यावर वेणू म्हणाली," विनूभाऊ, आज तूं गप्पसा" ! तेव्हां तो म्हणाला, " माझ्या डोक्यांत एकसारखा एक विचार घोळतो आहे कीं, जर माझेजवळ एवढासा जमिनीचा

तुकडा असता तर रिकामें बसण्यापेक्षां मी कांहीतरी उद्योग केला असता." ती ह्मणाली"वा, सुंदर कल्पना आहे.मग हा कालचाच तुकडा घे ना. तुला जितके दिवस कांहींतरी करावसं वाटेल, तितके दिवस कर. हं कधीं करतोस सुरवात? चांगली कल्पना सुचतांच कार्याला लागावं. चल, आतांच्या या गर्गाचार्यांच्या शुभमुहुर्तावर थोडसं खण. उद्यांपासून तेथें नवीन तऱ्हेची शेतकी प्रयोगशाळा सुरू करू या."

'छेः ताई अशी माझी थट्टा करूं नको.'

'छेः थट्टा नाहीं, खरंच सांगते, तूं तयारीला लाग. साधनं येतील. उद्योगाला लागल्यानंतर साधन तयार होतात. थोडेसें कष्ट पडतात एवढेंच. पण कष्ट, श्रम, उद्योग, अडचणी यांतच आयुष्याचं सुख सर्वस्व सांठविलेलं आहे. श्रमानं मिळालेलं, अडचणींतन वाट काढलेलं सौख्य मधुर तर आहे. हं मग काय, करणार ना सुरवात? चल विठोबा, आपण त्या जमिनीकडे जाऊं या. मग तूं यांना कुदळ आणून दे व घरीं जा, आम्हीं तासाभरानं तुझ्या पाठोपाठ येतों.'

ते दिवशीं वेणूताई तासभर थांबली आणि हलके हलके श्रम होईपर्यंत जेवढं खणतां आलं तेवढं विनोबानं खणलं. ते दिवसापासून दोन्ही सांज यायचं व खणायचं हा विनोबाला नाद लागला. दुपारच्या वेळचा शेतकी विषयक पुस्तक वाचायचाही नाद लागला. अशा तऱ्हेचीं पुस्तकें वेणूचे वडिलांजवळ बरींच होतीं. आपले आतेभावाकडनं, त्यानं भाजीपाल्याचं बीं बियाणं व खतापोताची माहितीही आणविली. त्या तुकड्यांत निरनिराळीं भाजीपाल्याचीं बियें पेरलीं गेलीं, एका बाजूला, वेणूची मिरची, कोथिंबीर आली, तर दुसरे

बाजूला नवीन तऱ्हेचीं नवीन खतं घातलेलीं पूर्ण वाढलेलीं अशी कोबी, फ्लॉवर, सालेट टोमॅटो, पापडी, डबलबी वगैरे वगैरे भाज्या दिसूं लागल्या. शेतकी शास्त्राप्रमाणें सुशिक्षित मालकानं बरोबर निगा राखलेलं हें लहानसं शेत नमुनेदार शेत दिसूं लागलं. शेती फॉर्मवरील त्याचा भाऊ एकदां येऊन पाहून त्यांतल्या चुका दुरुस्त करून नवीन माहिती सांगून गेला. दादासाहेबांची उदार मदत, वेणूचं प्रेमळ प्रोत्साहन, गड्यांची गोड सहकारिता याचा सततोद्योग, यामुळें यंदाच्या सालीं खरोखरच सुंदर भाज्या निघाल्या. बारा महिन्यांत बाहेरची भाजी घ्यावी लागली नाहीं. भाजीपाल्यांचा यशदायी प्रयोग पाहून दादासाहेब व गडी या सर्वांनाच आपल्या शेतांतला आणखी थोडा तुकडा या कामीं खर्च करावासा वाटला. विनोबानीं सतत श्रम व मेहनत घेतली व त्या नव्या शेतालाही अती उत्तम व सुंदर पीक पुढल्या वर्षीं काढलें. तेव्हां दादासाहेब म्हणाले कीं, " विनोबा, आतां वेतन काय द्यायचं ?" "आपण मला आळसाचा उद्योगी बनायला वाव दिला हेंच वेतन! " पण दादासाहेबांनीं तें कबूल केलें नाहीं; त्यांनीं आपल्या नेहमींच्या उत्पन्नाहून आलेला वरचा नफा सगळा विनोबाला दिला व त्यांच्या शेताजवळच चांगलीशी जमीन मिळेल तर ती घेऊन देण्याच्या ते प्रयत्नांत आहेत त्यांच्या पैशाची फेड ते त्याच्या उत्पन्नांतून सोयीसोयीनें करून घेणार आहेत. आळशी व झोंपाळू विनू इतका उद्योगी बनलेला पाहून रमाकाकूंना धन्यता वाटावी यांत काय नवल? विनोबा आतां पूर्ण शेतकरी बनला. तो कैक वेळां रात्रींचा तिथेंच निजतो, कारण त्याला आतां शेत, झाडं याशिवाय दुसरा विषयच नाहीं. आजही नेहमीं प्रमाणें उठल्याबरोबर विनोबा

एका फुलझाडाच्या वाफ्याशीं आला होता व त्यांतील एका सुंदर गुलाबाची सुंदर फूल फुललेली फांदी हातांत धरून उभा होता. इतक्यांत वेणू जवळ येऊन ह्मणाली, "काय विनूभाऊ, तूं आतां मोठा मनुष्य झालास? तुला आतां आह्मीं गरीब माणसं दिसतही नाहींत. त्या फांदीला धरून कसला प्रयोग करायच्या विचारांत आहेस?" "कोण? ताई? अहाहा! किती सुंदर वेळीं आलीस? अशा सुंदर वेळीं तूं आपल्या बरोबर मला आणून हा सुंदर आयुष्यक्रम शिकविलास, नाहीं कां? देवते! हें सुंदर फूल तुझ्या चरणकमलीं वहावं असा मी विचार करीत होतों, पण हें काम तेथें गांवांत येऊन कसं करायचं हाच काय तो प्रश्न होता. कारण आज जागें झाल्याबरोबर मला हें फूल दिसलं आणि माझ्ञ डोक्यांत विचार आला कीं, जें माझें आयुष्य आळशी नी बेकार होतं, ज्याला या फुलाची किंमत कळत नव्हती, त्या मला तूं उद्योगी बनवलस, सुंदर बनवलंस. हा हल्लींचा तुझा भाऊ पहा. माझी सगळी काडी पहिलवानी यष्टी जाऊन मी कसा बनलों आहे! माझ मन किती आनंदी बनलं आहे ह्मणून सांगूं! या सगळ्याला कारण कोण बरं.? ताई, तूंच माझी मार्गदर्शी देवता त्या देवतेच्या चरणी नम्रतेनें, प्रेमानं, भक्तीनं, आदरानं मस्तक ठेवतांना, त्यावर घालण्यासाठीं हें फूल मी तोडीत आहे." असं ह्मणत खरोखरच तो फुलासुद्धां तिच्या पायांवर डोकं ठेवायला वाकला, पण वेणू लगेच त्याचा हात धरून ओरडली, "नाहीं, भाऊ नाहीं. तुला स्फूर्ती-

दाता तो सूर्यनारायण; तें पहा, ते दिवशीं दिसणारं तेंच तें लाल प्रतिबिंब, त्यालाच आपण दोघं नमन करूं या," असं ह्मणतांना सात्त्विकतेचं सुंदर तेज वेणूच्या गौर चेहऱ्यावर खुलत होतं.

"नाहीं, नाहीं. माझा देव तूंच" असं ह्मणून चरणावर न ठेवूं दिलेलं मस्तक दोन हात जोडून त्यावर ठेवून नमलं. कोण नमलं ? **कृतज्ञता.**"

———:*:———

॥ श्रीशं वन्दे ॥

# गोष्ट ११ वी.

# आंगठीचा प्रभाव.

## प्रकरण पहिलें.

रायपूर गांव लहानसेंच असून तें एका ब्राह्मण संस्थानिकांचें राजधानीचें ठिकाण होत गांव जरी लहान होता तरी त्याची रचना पाहिल्यास त्याच्या संस्थापकानें उत्तरेकडील वैभवशाली व विलासप्रिय मुसलमानी बादशहांच्या राजधान्या अवलोकन केलेल्या असल्या पाहिजेत असें वाटे व तेथील देखावा कांहींवेळ तरी पहाणाऱ्याच्या मनाचें खास आकर्षण करी गांवांतूनच साक्षी नदी गेलेली असून तिच्या कांठावरच राजवाडा बांधलेला होता. अर्थात् खाशांच्या खासगी बसाउठावयाच्या जागांतून नदीचें पात्र दिसे ह्मणण्यापेक्षां त्या त्या बाजूलाच त्या त्या जागा होत्या ह्मणणें जास्त सयुक्तिक होईल तेथूनच पाणी मोठमोठ्या नळांनीं वाड्यांत नेऊन कारंज्यांतून वगैरे सोडलेलें होतें. जनानखान्यांतूनच एक वाट थेट नदीच्या प्रवाहापर्यंत गेलेली होती; ती राजघराण्यांतील स्त्रियांना स्नान वगैरे करण्याकरितां जाण्यासठीं बांधलेली होती. तिच्यावरच एक मोठा चबुतरा बांधून

संध्याकाळची हवा खाण्याची सोय केलेली होती. आंतील चौकांत मोठमोठ्या लांकडी मातीच्या कुंड्यांनीं व तारेच्या टांगायच्या कुंड्यांनीं बागेची उणीव भरून काढलेली होती. मुख्य दरवाजानें आंत गेलें ह्मणजे एक लहानसा चौक लागे त्याला तीन दरवाजे होते. उजवीकडच्या दरवाज्यानें आंत गेलें ह्मणजे जो चौक लागे त्यांत युवराज राजेसाहेब राहात व डावीकडे त्यांचे वडील खुद्द चीफसाहेब राहात असत व समोरच्या दरवाज्यानें गेल्यास पाकशाळा, कोठी, नोकरचाकर सर्व दिसे. हा पाठीमागील भाग आंतून दोन्ही चौकांना जोडलेलाच होता असो. ह्या वाड्यानें एक प्रकारची गांवाला चांगलांच शोभा आली होती. नदीचा राजवाड्याजवळचा भाग सोडला ह्मणजे खालीं वाळवंटांत गांवांतील लोक धुणें-पाणी वगैरे कामें उरकीत असत आणि त्यांच्या खालीं गुरेंढोरें वगैरे पाणी पीत. हा राजवाड्याजवळचा भाग सोडून आंत गेलें ह्मणजे ओळीनें कांहीं मोठमोठे वाडे लागून पुढें बाजारपेठ लागे; पण त्या मोठ्या रस्त्याला जोडून ज्या निरनिराळ्या गल्ल्या होत्या त्यांतून निरनिराळ्या लोकांची वस्ती होती. अशाच एका गल्लींत गेलें आणि तेथील घरें माणसें वगैरे पाहिलीं ह्मणजे ही अगदीं गरीब लोकांची गल्ली असावी असें वाटे. तें पहा घर. त्यांतलेत्यांत झाडून सारवून स्वच्छ केलेलें दिसतें आहे व त्याच्या आंगणांत एक लहानशी रांगोळीही घातलेली असावी असें वाटतें. घराच्या बाह्य देखाव्यावरूनच त्या घरांत डोकावून पाहाण्याची इच्छा साहाजिकच आपल्याला व्हायची व त्याप्रमाणें आंत डोकावतां तीन बायका दिसत आहेत. घर तर मराठ्यांचें दिसतें आहे. आंतील दोघी ह्मातार्‍या बायका मराठिणीच आहेत. पण ही मुलगी कोण ? ही कांहीं मराठीण दिसत

नाहीं. कारण तिचा पेहराव व तो सुंदर तेज:पुंज चेहरा ती त्या दोघींच्या पैकीं नाहीं असेंच सांगतो आहे. मग ही कोण ? पण असं कशाला ? आपण पुढें होऊन त्यांचें बोलणेंच ऐकूं या.

"मुक्ता, आतां आधीं माझी व्यवस्था लावना."

"ताराबाई, तुह्मीं ह्मणतां तें सर्व खरें आहे; पण व्यवस्था काय लावायची ? खरं सांगूं तुम्हांला मी म्हणतें लग्न करावें."

"वेडीच आहे झालें, अशा गरीब मुलीशीं कोण लग्न करायला उभे रहाणार ?" तारा ह्मणाली.

"अग तो मास्तर आहे, तोही एकटा आहे. पगार ३० रु. मिळतो. त्यालाही नवरी हवीच आहे झालं. आमच्या कारभारी-साहेबांचा हुजऱ्या शंकरराव तोही ह्मणत होता, नवरी मिळेल तर लग्न करीन. तोही चांगला आहे. पगार सोळा रुपये मिळतो, सणावारीं वाड्यांत जेवणही मिळतें. तूंही दोन धंदे केलेस तर तुलाही जेवण-खाण मिळेल." दुसरी म्हातारी म्हणाली

ताराचा चेहरा हें ऐकून लाल झाला पण परिस्थितीकडे लक्ष देऊन ती गप्प बसली, हें मुक्ताच्या लक्षांत आलें. ती म्हणाली, "बायजा, असं वेड्यासारखं बोलूं नये. ताराबाई का हुजऱ्याची बायको होईल ? पण ताराबाई ! तुह्मी म्हणाल तर आपण त्या मास्तरचा तपास करूं."

"मुक्ता, हें वायफळ बोलणें सोड, मला एखादें काम पाहून दे. कायग मुक्ता, आतां माझ्यावर वेळ आली म्हणून ? नाहीं तर आईच्या देखत तूं असें बोलली असतीस का ?" असें म्हणत असतां तिच्या डोळ्यांतून पाणी वाहूं लागलें.

"बरं तर सांगा तुम्हांला कसली नोकरी पाहूं ?"

"अग एकाद्या मास्तरणीचें किंवा शिवणबाईचें काम मला करतां येईल."

"बायजा, उद्यां आपण मुलींच्या शाळेंत ह्यांना घेऊन जाऊं व पाहूं."

—:+:—

## प्रकरण दुसरें.

साडेदहा वाजले. मोठ्या कडाक्यानें शाळेची घंटा पडून दरवाजे उघडले गेले ! त्याबरोबर लहानमोठ्या मुलींचा घोळका, पाटी. दफ्तर, पाकीट, छत्री, दौत वगैरे निरनिराळ्या तऱ्हेचीं निरनिराळीं आयुधें घेऊन शाळेंत शिरून, आपआपल्या जागेवर बसण्याच्या गर्दीनें एकमेकींना लोटूं लागला. आपापसांत बोलाचाली, भांडणें, बाईंना नाहींतर मास्तरना सांगायची धमकी सुरू झाली. इतक्यांत बाई आल्या ह्मणून तार चोहोंकडे फिरली. त्याबरोबर चोहोंकडे निःस्तब्धता पसरली. टोले पडले. मुली आपापल्या वर्गांतून एकत्र होऊन "रक्षी प्रभो" ह्मणून गाणें सुरू झालें आणि मुलींच्या त्या आवाजानें सगळी शाळा दणाणली. प्रार्थना आटपून मुली आपल्या कार्यक्रमाला लागल्या. थोड्या वेळांत मुक्ता, बायजा व ताराबाई आली. अर्थात् मुलींत 'ही मुलगी कोण ?' 'शाळेंत कां आली ?' 'अगबाई केवढी मोठी ?' 'कितवी शिकत असेल ?' अशी चर्चा सुरू झाली.

एक ह्मणे ' अग ती कुणब्याची का?'

दुसरी–' छे ग, ती ब्राह्मणासारखी दिसते. '

तिसरी–' मग ती ह्या बायांबरोबर कां आली ? '

चवथी–' अग कदाचित् ती वाड्यांतली असून त्या तिच्या दासी असतील. '

' हो ! शहाणीच मोठी ! वाड्यांतली असती तर ती पायीं कशाला येती ? ' पहिल्या मुलीनें ह्मटलें.

तिकडे त्या बायका मुख्य मास्तरणींकडे गेल्या. त्या कुणब्याच्या बायकांना त्यांच्या पेहरावाकडे पाहून बसायला बांकबिक द्यावें असें मास्तरणीला वाटेना; पण ह्या लहान मुलीच्या तोंडावर जें पाणी खेळत होतें तें पाहिलें तर खालीं बस असेंही ह्मणवेना. अर्थात् नुसतें बसा ह्मणून मास्तरीण ह्मणाली. तशी जवळच्या वर्गाच्या एका बांकावर एका मुलीशेजारीं तारा बसली व मुक्ता, बायजा खालीं बसल्या.

बायजा ह्मणाली, " मास्तरीणबाई, ही माझी बहीण आहे, हिला तुमच्याकडे घेऊन आलें आहे."

" बरं केलं काय काम आहे? मुलगी कां शाळेंत घालायची आहे?"

" नशीब माझं. पोरबी झालं नव्हतं तेव्हां धणी गमावला; तर मुलगी कुठली?" मुक्ता ह्मणाली.

" कवळी पोर होती, पण नाहीं तिनं पाट लावला. आखा जन्म बामणावाणी काढला."

"तें कां? माझा नवरा हलक्या कुळांतला होता म्हणून मी पाट लावूं? आमचे घरधनी म्हणत आमच्या कुळांत बाया नवऱ्या संग जळून मेल्या. मी जाधव घराण्याची आहें, जाधव घराण्याची." मुक्ता म्हणाली.

"मग ही मुलगी कोण?" मास्तरीणबाई म्हणाल्या.

"त्या आहेत ब्राह्मणाच्या; त्यांना हवी आहे नोकरी, म्हणून आम्हीं येथें आलों."

' कोणाची मुलगी? तेथेंच असते का?"

"येथल्या नाहींत त्या आहेत माथेरानच्या. त्यांची आजी मेली, आतां कोणी नाहीं ह्मणून त्या येथें आल्या आहेत नोकरी पहायला."

" मुली तुझें नांव काय?"

"तारा प्रताप फडके."

"तूं कुठली परीक्षा दिली आहेस?"

"मी कोणचीच परीक्षा दिली नाहीं; पण ३।४ यत्तेपर्यंत मुलींना शिकविण्याजोगं मी शिकलें आहें; मला शिवणकाम व विणकामही थोडेंसें येतें "

"पण सर्टिफिकीटाशिवाय आमचेकडे नोकरी मिळत नाहीं."

"पण मी एक लहान मुलगी आहें म्हणून जर आपण मला आश्रय द्याल तर अनाथ मुलीवर उपकार केल्यासारखं होईल "

"आश्रय द्यायला मी थोडीच श्रीमंत आहे?"

"म्हणजे फुकट ठेवून घ्या असें नव्हे. मला काम द्या व त्याचा मोबदला ह्मणून पोटाला द्या. मी आपलें काम बिनचूक व श्रम घेऊन करीन व आपण सांगाल तें शिकेन."

"छेः, आमच्या येथें यंदा मुळींच जागा नाहीं."

"मग दुसरीकडे कुठें शिवणकाम मिळण्यासारखें असेल तर सांगा!"

"शिवणकाम शिकवायला बाई ठेवण्याजोगीं घरं कोणचीं असणार?"

"मुक्ता, चल तर मग" असं ह्मणून त्या उठल्या व उलट फिरतात तों शाळेचे चेअरमन आंत आले. साहेब आले ह्मणून मुली उठून उभ्या राहिल्या ह्या तिघी जरा बाजूला सरल्या. मास्तरीण बाईही उठल्या व साहेब आंत आले ते सहज बायजाकडे पाहून ह्मणाले, "आँ! कोण बायजा आणि येथें कां? शिकायला आलीस?"

"काय भाऊसाहेब थट्टा करतोस? आतां काय लिवते? जर येतं तर मग तुमच्या घरीं कशाला येती? ही माझी बहिण आली आहे आणि ती मुलगी आहे, तिला घेऊन आलें."

" [illegible] बहीण? कधीं ऐकलं नव्हतं. बरं तुझ्या वहिनीनें तुला बोलावलें आहे घरीं जा बरं."

"आज तिसरे प्रहरीं जाईन; पण भाऊसाहेब, आमच्या ह्या ताराबाईला कुठे जागा असेल तर पहाना?"

"कसली जागा?"

"त्यांना नोकरी धरायची आहे."

"ह्या काय शिकल्या आहेत? कसली नोकरी पाहिजे?"

"ह्या माझ्या बहिणीची धनीन मेली तिची नात आहे. आतां हिला कोणी नाहीं. मुंबईकडे होती."

' अरेरे ! आतां ही काय उद्योग करूं शकेल ? '

ताराबाई ह्मणाली, ' मास्तरणीची जागा मिळाली तर पहात होतें.'

तेव्हां मास्तरीण पुढें होऊन ह्मणाली," त्यांनीं कोणचीच परीक्षा दिलेली नाहीं. '

तेव्हां चेअरमन ह्मणाले, ' पण निराश्रित बायको मनुष्य आहे; खालच्या वर्गावर ठेऊन बघावें. '

' पण नव्या नियमान्वयें ट्रेंड शिक्षकांशिवाय ठेऊं नये अशी ताकीद आहे. डेप्युटीसाहेबांच्या ह्या ह्मणण्याला परवा सर्वांचा दुजोरा होता. '

' मला शिवणकाम, लोंकरीचें विणकाम, झिगचें काम चांगलें येतें; पण माझें वय लहान असल्यामुळें एकटीनें अशा वस्तु करून विकायचें काम करीत बसण्यापेक्षां एखाद्या वयातीत बाईच्या सहवासांत रहावें अशी मला इच्छा असल्यामुळें मी येथें आलें. माझी आजी नेहमी ह्मणायची कीं, बाळ एकटी राहूं नकोस सत्वस्थ अशा बाईच्या आश्रयानें रहा ' असें ह्मणतांच तिच्या डोळ्यांत पाणी आलें.

चेअरमनसाहेब ह्मणाले-' बाळ, तुझी हकीकत सांग. '

' माझी हकीकत फारशी मोठी नाहीं मी आणि माझी आजी माथेरानला रहात असूं. माझी आई माझ्या जन्माबरोबरच मेली आणि तेव्हांपासून माझे वडील फिरकलेच नाहींत. ही मुक्ता पुष्कळ वर्षे आमच्या घरीं होती. शेवटीं अखेरच्या वेळेस मला ह्या मुक्ताच्या हातांत टाकून माझी आजी-मी तिला आई ह्मणे गेली. मी अनाथ झालें. मग तेथें कसें रहायचें ? मुक्ता ह्मणाली, आतां आपण माझ्या बहिणीच्या गांवाला जाऊं ह्मणून तेथला पसारा आंवरून परवां आह्मीं येथें आलों.

ह्या दोघी साध्या बायांनीं माझी व्यवस्था फारच उत्तम ठेविली आहे. पण परक्यावर ओझं कशाला ? जवळचं मोडून खाल्लं तरी जन्मभर पुरत नाहीं; शिवाय रिकामें बसायचें ह्मणून हा उद्योग बघत होते हीच माझी हकीकत.'

'बाई, तुह्मांला कित्येक दिवस शिवणकामाला बाई नव्हती तर ही आयती चालून आली आहे, ठेवाना ! ह्मणजे तुमची जी आपल्याला जास्त काम पडतें म्हणून तक्रार आहे ती जाईल.'

'पण बोर्डाच्या मंजुरीशिवाय तिला ठेवतां येणार नाहीं. तिनें अर्ज द्यावा, आपण बोर्डापुढें ठेवू.'

हें बोलणें ऐकतांच आपल्याला ठेवायची मास्तरीणबाईची खुषी नाहीं हें तारानें ओळखलें व ती लगेच मुक्ताकडे वळून चल म्हणाली. मग त्या घरीं गेल्या आणि बायजा तिसरेप्रहरीं चेअरमन साहेबांकडे गेली. तोंपर्यंत चेअरमन साहेबांकडून त्यांचे बायकोस ताराची हकीकत कळलीच होती. ह्मणून तिनें बायजाजवळ त्या मुलीला कां घेऊन आली नाहींस अशी चौकशी केली; तसें बायजानें सांगितलें कीं, ती मुलगी आपण होऊन कोठें जाण्याजोगी नाहीं; तिची सगळी ऐट एखाद्या राजाच्या मुलीसारखी आहे पण स्थिति भिकाऱ्याची हें बोलणें ऐकून चेअरमन साहेबांची बायको रमाबाई हिचें मन जास्तच आकर्षिलें. ती कांहीं बोलली नाहीं. थोड्या वेळानें आपलें काम करून बायजा गेली

## प्रकरण तिसरें.

'मुक्ता, नको नोकरी. आपण तशाच राहूं. पण एखाद्या चांगल्या जागेंत तुला व मला घर बघ. लहानसें पुरें.' तारा ह्मणाली.

'तेथें राहून खाणार काय?' बायजा ह्मणाली.

'बायजाबाई, ज्या परमेश्वरानें माणसाला जन्माला घातलें तो अन्नवस्त्र देतोच' तारा ह्मणाली.

'तेथं राहून मुक्तानें भीक मागावी होय?'

'कां बरं! जें मिळेल तें आह्मी मिळून खाऊं.'

'तुला काय काम करतां येतें? एक लिखणं तरी मास्तरीण ह्मणून कोणी ठेवीत नाहीं. लग्न करायचें नाहीं तर खाणार काय? मुक्ता येथें राहिली तर माझ्यासंग काम करून पोटाला खाईल. चार पैसे ह्मातारपणाला शिल्लक टाकील.'

'मुक्ता, तूं बोलत नाहींस. आधीं आपल्याला दुसरी जागा बघना?' तारा ह्मणाली.

'ताई, नव्या जागेला भाडें हवें; पोटाला हवें'

'मग आपण तें देऊं. आपण तेथलं घर आवरून आलों तेव्हां जे पैसे बरोबर आणले आहेत ते खर्च करूं.'

'पण ते असे किती दिवस पुरणार? त्यांनीं आपल्या हयातींत कमावलेलं कुठं ठेवलं तें त्यांना सांगतांच आलें नाहीं कां काहीं नव्हतंच कोण जाणे!'

'तो विचार जाऊंदे. आधीं जागा बघ. मी आतां येथें मुळींच राहायची नाहीं. कसेंही करून आपण दोघी पोट भरूं. माणसासारखीं माणसें आपण वेळ आली तर रडत कां बसायचं ?'

अशा प्रकारचें बोलणें दुसरे दिवशीं चाललें असतांना रमाबाई दारांत आल्या. रमाबाई ही वीस वर्षांचीच बायको होती; पण ती स्वभावानें मोठी प्रेमळ असून मनानें मोठी उदार व उत्साही होती. पतीप्रमाणेंच आपणही नेहमीं लोकांकरितां कांहीं तरी करावें असें तिला वाटे. आदले दिवशींची हकीकत ऐकून तिला वाईट वाटलें आज तिच्यावर प्रसंग आला ह्मणून तारेला एकदम गरिबासारखें कसें वागतां येईल ? तेव्हां आपणच जाऊन तिला बोलावूंया असें ठरवून ती बायजाच्या घरावरून मुद्दाम बाहेर पडली व आंत जाऊन उभी राहिली तिला पाहून बायजा उठली व 'या वहिनाबाई, तुह्मी कोणीकडे ? कांहीं काम होतं तर गड्याला कां नाहीं पाठवलं ?' असें ह्मणाली.

रमाबाई ह्मणाली, 'माझें काम गड्याजोगें नव्हतें मी तुझ्या ह्या ताराबाईची ओळख करून घ्यायला आलें आहे. या ताराबाई, आपण समोरच्या देवाला जाऊं"

ही चेअरमनची बायको हें तारानें ओळखलें व जी बाई आपल्याला भेटायला मुद्दाम मोलकरणीच्या घरीं आली, त्या बाईबरोबर ताराबाईला देवळांत जायला मुळींच हरकत वाटली नाहीं ती चट्दिशीं उठून दाराबाहेर आली व दोघी देवळाकडे निघाल्या

‘ खरोखरच कां आपण माझ्याकडे आलां आहांत ? ’ तारा ह्मणाली.

‘ होय. ’

‘ मग मला कां बरं नाहीं बोलावलेंत ? मी आलें असतें. आपण कशाला बरं तसदी घेतलीत ? ’

‘ त्यांत काय झालं ? ओळखीशिवाय संकोच वाटतो; पण तें पहा देऊळ आपण तिकडे एका बाजूला बसूं. तेथें तुह्मी आपली हकीकत सांगा. ’ मग दोघी आंत जाऊन बसल्या. नंतर तारा ह्मणाली, ‘ माझी हकीकत फारशी नाहीं. आई लहानपणीं मेली. परवां आजी मेली सामानसुमान विकून पसारा आवरायजोगं कुणी नव्हतं. माझ्या आजीचे एक वकील आहेत, ते आल्यावर सर्व व्यवस्था करतील तोंपर्यंत दाराला कुलूप लावून आह्मीं निघालों घरांत पैसा-अडका कांहीं नाहीं. भांडीं, फर्निचर, बिछाने असें आहे. माझा आजच निघायचा विचार नव्हता पण ही मुक्ता राहीना आणि माझ्याच्यानं एकटीनें तेथें गांवांबाहेर जंगलांत राहायचें धाडस करवना म्हणून मी निघाले. आमचे वकील आले असते तर त्यांनीं माझी सोय केली असती. पण त्यांना पत्र व तारही पाठविली तरी त्यांचें उत्तर नाहीं. आतां येथें कोणातरी चांगल्या माणसाच्या संगतींत राहायचा माझा विचार आहे. हे दोन दिवस मी कसे तरी येथें काढले पण उद्यां कांहीं येथें राहायचा माझा विचार नाहीं आपल्या माहितींत आहे का तशी एखादी जागा ? ’

'हो आहे. आमच्या घरांत मागल्या पडवींतच दोन खोल्या आहेत. त्या आह्मी वापरीत नाहीं. तूर्त तुह्मी तेथें चला. नाहीं पटली तर मग दुसरींकडे पहा.'

'खरोखर आपण माझ्यावर फारच उपकार केलेत. ह्या परदेशांत परमेश्वरानेंच आपल्याला माझ्याकडे पाठविलें.'

'आपला परमेश्वरावर इतका विश्वास आहे कां?'

'अलबत्'

'मग तुमचें व माझें खास पटेल. चला तर घरीं, तेथें जाऊन तुमचें सामान आणायला गडी पाठवूं.'

'माझें सामान फार नाहीं. दोन ट्रंका व एक वळकटी. रहाण्याचें ठरल्याशिवाय जास्त सामान जवळ बाळगून काय करूं? मी घर सोडलेंच नसतें पण एकटीला राहवेना. शिवाय घरांत आह्माला फारसा पैसा अडका मिळाला नाहीं. तर्‍हां जन्मभर कसें चालणार?'

'आधीं चला, मग आपण घरीं बोलूं.' ताराबाईचें बिर्‍हाड रमाबाईकडे आलें. मुक्ताला ती रहा ह्मणाली, पण बायजाच्या उपदेशानें मुक्ताचें मन पालटलें. तिला पैसा गोळा करण्याची हांव सुटली. पहिले दिवशीं तर ताराला रमानें करूं दिलें नाहीं पण दुसरें दिवशीं तारा ऐकेना. तिनें पांच रुपयांची नोट मोडून थोडें थोडें सर्व साहित्य आणविलें व शेगडीवर भात भाजी करून जेवली. दुपारच्या वेळीं तिनें रमाबाईला थोडें विणकाम शिकविलें तिच्या मुलांचीं झबलीं विणायला घातलीं. हळू हळू आठ दिवसांतच तिच्या कुशलतेची रमाबाईला खात्री पटली. संध्याकाळीं रमाबाई गांवांत गेली होती व ताराही कंटाळली.

तेव्हां थोडें बाहेर पडून नदीकांठानें फिरून यावें असें तिला वाटलें. तिला माथेरानला एकटं फिरायची संवय होती म्हणून ती निघाली. नदीच्या कांठानें हिंडता हिंडतां ती राजवाड्याच्या भागाकडे येऊं लागली. इतक्यांत एक कुत्रें तिच्या पाठीस लागलें. तिनें दगड मारले तरी तें जाईना, उलट जास्तच चवताळून अंगावर येई ती पुन्हां दगड मारून पळे. अशा वेळीं एक तरुण अवचित आला आणि त्यानें आपल्या हातांतील काठीचे दोन तडाखे असे त्या कुत्र्याच्या पाठींत घातले कीं तें केकाटतच बाहेर पळालें. कुत्र्याबरोबर पळण्यानें व घाबरल्यामुळें तारा घामाघुम झाली होती. जात्याच ती सुंदर, त्यांत बाल्य आणि तारुण्य यांच्या संधीवर असणारें कोंवळें वय, तेजस्वी चेहरा व साधी आणि विनयशील रहाणी, यामुळें ती कोणाचेंही लक्ष आकर्षून घेण्याजोगीच दिसत होती. अर्थात् त्या तरुणानें तिच्याकडे पहातांच त्याच्या डोळ्यांना पुन्हां पुन्हां पाहण्याचा लोभ सुटला ती म्हणाला, ' तुम्हीं घरीं जाल ना ? आतां भय नाहीं ना वाटत ? '

' नाहीं. पण आपण ह्या वेळेस आलांत म्हणूनच मी त्या दुष्ट कुत्र्याच्या हातून बचावले आपले फार उपकार झाले. '

' छेः ! ह्यांत उपकार कसले ? एकमेकांनीं एकमेकाला मदत करायची हें माणसांचें कर्तव्यच आहे. '

' आपण ह्याच गांवांत असतां का ?

' हो ' असें म्हणून तो तरुण निघून गेला. तारा घरीं आली. आतां ती येथें समाधानानें असे. तरी जवळची पुंजी लवकर संरेल अशी तिला भीति वाटे. तिनें आपल्या वकिलाला एकदोन पत्रें घातलीं

पण उत्तर आलें नाहीं. नाहीं ह्मणायला तिच्याजवळ दोन तीन जिन्नस होते पण ते मोडण्याची तिची इच्छा नव्हती. कारण कीं, एक तर ते आईची आठवण ह्मणून ठेवलेले होते. दुसरें असें कीं, आज ते मोडले तर पुढें काय? उलट जवळ थोडें द्रव्य असलें तर तें दुखण्याबाण्याला उपयोगी पडेल. ह्मणून ती आतां पुन्हां काय करावें हा मंत्र रमाबाईला विचारी. ती ह्मणे, ' तूं आमची ह्मणून आमच्याजवळ रहा. आह्मांला जड नाहींस. मग आह्मी बरेंसें स्थळ पाहून लग्न करून देऊं. ' पण तारा ह्मणे, ' हात पाय असतांना आयतें जेवण मला मुळींच आवडत नाहीं आणि लग्न तर शक्यच नाहीं; कारण कोणीही मोठ्या योग्यतेचा मनुष्य जिची फारशी माहिती नाहीं अशी मुलगी करणार नाहीं. जेवायला आयतें ह्मणजे श्रम करायला हवेच पण पैशाची विवंचना नको असें अन्न घालणारा हवा ह्मणून कोणातरी माणसाशीं लग्न करायचें ही कल्पना मला पसंत नाहीं. तेव्हां नोकरी अगर काम पहा. तुह्मी आणि भाऊसाहेब खटपट कराल तर मी लहान मुलांचे कपडे वगैरे शिवून देईन. ' मग रमाबाईनीं ही गोष्ट पतीजवळ सांगितली व त्यांनीं तशी खटपट उद्यां करूं ह्मणून आश्वासन दिलें

आज त्यांना वाड्यांत युवराजांकडे पार्टीला जावयाचें होतें. कारण वाड्यांत वहिनीसाहेबांचा चुलतभाऊ आला होता तो ह्यांचा संबंधी होता वाड्यांत आज चहाचा बेत साधा घरगुतीच होता. राजेसाहेब, त्यांचे भाचे आबासाहेब, पाहुणा आणि हे गांवांतील भाऊसाहेब एवढींच माणसें असल्यामुळें थोड्या वेळानें वहिनीसाहेबही तेथें आल्या इतक्यांत बंडखोर कुमार बहिणीची खोडी काढून आले.

मागें माणसें न्यायला आलीं पण ते कोणालाच दाद देईनात. हें पाहून धाकट्या माईसाहेबहीं आल्या. अर्थात् ताईसाहेबांनीं तरी कां बाहेर रहावें ? वहिनीबाई नोकरांवर रागावूं लागल्या. राजेसाहेब ह्मणाले, 'मुलांना धाक नाहीं.' वहिनीबाई ह्मणाल्या, 'ह्या आयांना वजन ठेवतां येत नाहीं.' युवराज ह्मणाले, 'प्रत्यक्ष आयांना जर ठेवतां येत नाहीं तर भाडोत्री आया काय ठेवणार ?' परक्याच्या देखत ह्मटलेला हा शब्द वहिनीसाहेबांना खपला नाहीं. त्या ह्मणाल्या, 'खरं आहे. आतां इतर आयांसारखें आह्मी मुलें संभाळायला उठलें पाहिजे.' त्यांचा राग ओळखून त्यांचा भाऊ ह्मणाला, 'छे ताईसाहेब, तसं नव्हे. तीं उगीच आपली थट्टा केली. पण येवढें खरें कीं एखादी उत्तम गव्हर्नेस पहा ह्मणजे मुलांना चांगलें शिक्षण मिळेल.'

'छे, छे! तें आमच्या इथें बोलूं नका.' राजे ह्मणाले.

'कां बरं ? ताईसाहेबांना आवडत नाहीं कां ?' भाऊ ह्मणाला.

'तें कोणाला ठाऊक; पण आमच्या मातोश्रींना तो विटाळ खपायचा नाहीं.'

'मग एखादी हिंदु बाई पहावी.' भाऊसाहेब ह्मणाले. 'चांगली सुशिक्षित हिंदु बाई कोठली मिळायला ? बरं अर्धवट ठेवून मुलांवर वाईट संस्कार होतात त्यापेक्षां हे खालच्या वर्गाचे नोकर मला आवडतात.' राजेसाहेब ह्मणाले.

"'असंच केवळ नाहीं. वरच्या वर्गांतील चांगल्या सुशिक्षित बाया हें काम करूं शकतील.'

' पण असें चांगलें मनुष्य मिळणें दुर्मिळ. मुलांबरोबर खेळायचं, खेळतां खेळतां चांगल्या रीतिभाति शिकवायच्या, थोडेंसें प्राथमिक शिक्षण द्यायचें असें मनुष्य पाहिजे. '

हें ऐकतांच भाऊसाहेबांच्या डोळ्यापुढें तारा उभी राहिली. ते ह्मणाले, ' बरें, मी तुह्माला अशी एखादी मुलगी दिल्यास आपण प्रयत्न करून पहाल काय ? मात्र अट एक, आपण तिला आपल्या बरोबरीची नाहीं, तरी पण अगदीं खालच्या नोकरासारखी वागवितां कामा नये. '

' छे, छे ! गव्हर्नेस ह्मणजे खालच्या दर्जाचा नोकर नव्हेच. कोण मुलगी आहे ? केवढी आहे ? किती शिक्षण घेतलें आहे सांगा पाहूं ? ' राजेसाहेबांनीं विचारलें.

' मुलगी पंधरासोळा वर्षांची आहे. घरींच शिक्षण झालें आहे. माझ्या एका दूरच्या आप्ताची आहे. ' असें भाऊसाहेब ह्मणाले व खरं सांगितल्यास ठेवायला हरकत करतील ह्मणून दूरच्या आप्ताची आहे असें त्यांनीं मुद्दाम सांगितलें; पण वहिनीसाहेबांचा स्वभाव फार उतावळा होता. त्या ह्मणाल्या, 'तर मग त्यांना आतांच आणा पाहूं?' आतां पुन्हां बायकोला नाखूष केल्यास ती रागवेल ह्मणून राजेसाहेब ह्मणाले, ' नोकरीवर एकदोन दिवसांनीं रुजू झाली तरी चालेल, पण आपण आतां पाहूंया कीं, मुलगी काम करण्याजोगी आहे का ?'

ताईसाहेबांचा भाऊ ह्मणाला, ' भाऊसाहेब शिफारस करीत आहेत त्याअर्थीं ती योग्य असेल व तसें असेल तर ताईसाहेब तुह्माला बरें होईल. पण इतकी लहान मुलगी हें सर्व काम करील कीं नाहीं याची शंकाच आहे. '

' भाऊसाहेब आपली मोटार नेऊन तिला जरा घेऊन या हो तुमची कांहीं हरकत नसेल तर. ' राजेसाहेब ह्मणाले.

लगेच मोटार आली. भाऊसाहेब घरीं गेले आणि ह्मणाले, ' ताराबाई, मी तुझ्याकरितां एक काम पाहिलें आहे. चांगल्या माणसांचा सहवास, काम हलकें, ह्मणण्याजोगं फारसें नाहीं आणि चार माणसांत वेळही जाईल. ' मग त्यांनीं तिला सर्व सांगितलें. तिनें कबूल केलें. मग ते ह्मणाले, ' श्रीमंतांचीं माणसें लहरी असतात? तुझा थांगपत्ता नाहीं ह्मटलें, तर ते विश्वास ठेवणार नाहींत. आमचा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे ह्मणून मी तुला दूरची आप्त ह्मटली आहे. तें तूं होय ह्मण. ' ती पुढें कांहीं बोलणार, तों भाऊसाहेब ह्मणाले, ' कांहीं शंका कुशंका काढूं नको. ती तुझी वहीग तसाच मी तुझा भाऊ आहे समज आणि तुला न पटल्यास निःशंक मनानें ह्या तुझ्या घरीं ये. तुझी कांहीं तरी काम करायची इच्छा होती आणि तेथें आज सहज बोलणें निघालें ह्मणून मी तुझें नांव सुचविलें. चल तर लवकर कपडे करून. '

' नाहीं, मला कपडे करायचे नाहींत. नोकर राहणाऱ्याला ही साधी राहणीच पाहिजे. ' मग तीं दोघें मोटारींतून वाड्यांत आलीं. तोंपर्यंत वाड्यांत मंडळी गप्पा मारीत बसलीच होती. तिला आंत आणून भाऊसाहेब ह्मणाले, ' ताराबाई नमस्कार करा. ह्या आमच्या वहिनीसाहेब.' तिनें त्यांना नमस्कार केला व उभी राहिली. मग राजेसाहेबांनीं तिला बसावयास सांगितलें. तिला पाहतांच आबासाहेबांनीं आपल्याला संध्याकाळीं भेटलेली मुलगी ह्मणून ओळखली. ती सुद्धां

त्या तरुणाला तेथें पाहून विस्मित झाली; पण तिनें आपली नजर लगेच तेथून फिरविली. राजेसाहेबांना हिच्याबद्दल काय वाटतें ह्मणून आबासाहेब जेव्हां त्यांच्याकडे निरखून बघायला लागले तेव्हां क्षण-मात्र त्यांना असा भास झाला कीं ह्या ताराबाईच्या तोंडवळ्यांत व राजेसाहेबांच्या तोंडवळ्यांत बरेंच साम्य आहे. तिचा तो सुंदर पाणी-दार व तेजस्वी चेहरा पाहून तिला कांहीं विचारावें असें कोणालाच वाटलें नाहीं. राजेसाहेब ह्मणाले, ' तुह्माला ह्या कबूल आहेत ना ? ठेवायच्या ना ? ' त्यांचा भाऊ ह्मणाला, ' ह्यांच्या चेहऱ्यावरून ह्या तुह्माला बऱ्याच उपयोगी पडतील. पहा प्रयत्न करून. कां भाऊ-साहेब, तुमची कांहीं हरकत नाहीं ना ? '

' सरकार, हरकत नाहीं. पण ताराबाई लहान मुलगी आहे हें समजून आपण वागवावी ह्मणजे झालें. '

' छे ! छे ! त्याबद्दल मुळींच काळजी करूं नका. त्या तिला आपली मुलगी समजतील. ' राजेसाहेब ह्मणाले. स्वाभाविकरित्याच हे शब्द निघालेले ऐकून ताराला एक प्रकारचें प्रेम वाटलें. मग सर्वच उठलीं. उद्यां पाठवितों असें ह्मणून तारा व भाऊसाहेब घरीं आलीं.

———:*:———

## प्रकरण चवथें.

' कुमार, आपण असें केलंत तर आम्ही तुमच्याशीं बोलणार नाहीं. '

बरं नाहीं करायचा. आतां बोलाल ना ? ' असें ह्मणून त्या बालकानें या तरुणीच्या गळ्याला मिठी मारली. इतक्यांत एक लहान

मुलगी आंग्लपद्धतीप्रमाणें पोशाख केलेली तेथें आली आणि ह्मणाली, ‘ बाई, तुह्मी आमच्याबरोबर फिरायला या ना ? आम्हाला नको गंगी.’

‘ नाहीं, तुमचें बोट तर मी धरणार. ’ कुमार म्हणाला.

‘ मी दुसरें बोट धरीन. ’ मुलगी म्हणाली

वाचकांनीं ह्यांना ओळखलंच असेल. ताराबाईच्या बरोबर हिंडायला जाण्यासाठींच मुलें भांडत होतीं. मुलांची हौस पाहून ताराबाई मोलकरणीला म्हणाली, ‘ गंगा, तूं खोली साफ करून मुलांचे कपडे वगैरे नीट करून ठेव. मीच जरा जवळच्या बागेंत त्यांच्याबरोबर फिरून येते ’ मग हीं सर्व वाड्याजवळच्या उद्यानांत गेलीं. तेथें आबासाहेब एक पुस्तक वाचीत हिंडत होते. आबासाहेब म्हणजे राजेसाहेबांच्या स्वर्गस्थ भगिनीचे चिरंजीव. जेव्हां सुटी असे तेव्हां ते आजोळी येत असत. त्यांचे वडील दुसऱ्या एका संस्थानचे चीफच होते. त्यांना पाहिल्याबरोबर कुमार ओरडून त्यांचे आंगावर धावायला निघाला इतक्यांत ताराबाई ह्मणाली, ‘ हां ! ’ त्याबरोबर कुमार मागें सरला व त्यांना नम्रतापूर्वक नमस्कार केला. तसे लगेच ताईसाहेबांनींही हात जोडले. त्यांनीं दोघांनाही जवळ घेतलें व ह्मणाल्या ‘ कुमार तुह्मी खूप शहाणे झालेले दिसतां. ’

‘ मी राजा व्हायचा आहे, ह्मणून आमच्या बाई मला शहाणा करीत आहेत मी आजोबांसारखा राजा होईन नाहो ? कांहो आबासाहेब, मग तुह्मी कोण व्हाल ?

‘ मला काय ठाऊक ? तुह्मी राजेसाहेबांना विचारा. ’

‘ बरं मग ताईसाहेब कोण होतील ? ’

‘ त्यांना एखाद्या राजाला देऊं ह्मणजे राणीसाहेब होतील ’

'त्या नाहीं का राजा होणार ?'

'अहो, त्या बायको मनुष्य ना ?'

'हो हो, खरंच मी विसरलों. मग ह्या आमच्या बाई राणी-साहेब होतील ना ?'

त्याबरोबर आबासाहेबांच्या डोक्यांत कल्पना आली कीं खरो-खरच ही राणी शोभण्याजोगी आहे.

'कुमार, आपण तुरा करूं या.' ताराबाई गोष्ट उडवावयाच्या हेतूनें ह्मणाली. मुलं लगेच फुलांकडे गेलीं ताराबाईनें थोडीं देंठासकट फुलें तोडून तेथें कापून तयार केलेल्या गवतावर ठेविलीं व केळीचे बारीक दोरे काढून त्याचे बारीकसे गुच्छ करून त्या दोन मुलांना दिले. पण आबासाहेब तिथें उभे होते ह्मणून तिनें आणखी एक गुच्छ करून ह्मटले, 'हा आपला कांहीं तरी गुच्छ आहे हा आपल्याला देऊं का ?' 'हो द्या.' असें ह्मणून त्यांनीं तो मोठ्या प्रमानें व सस्मित मुद्रेनें घेतला. थोड्या वेळांत इतक्या सुदर कल्पकतेनें केलेला गुच्छ पाहून त्यांना कौतुक वाटलें. ते ह्मणाले, 'ताराबाई, तुह्मी खरोखरच मोठ्या हुशार दिसतां.' तेव्हां तारा अगदीं निष्पाप तऱ्हेनें हंसून ह्मणाली, 'आपण माझी सर्व हुशारी पाहिली नाहींत गरिबाला करावें लागणारें कोणचेंच काम माझ्या हातून होत नाहीं. मग आपण हंसाल' कांहीं तरी बोलायचें ह्मणून आबासाहेब ह्मणाले, 'तुह्माला गरिबी दाखवायची नाहीं असाच कदाचित् ईश्वरी संकेत असेल !'

'मी ती अगिकारिली नाहीं, पण ती आली आहेना, आज मी निराश्रित निराधार नाहीं कां झालें ?' असें ह्मणतांच तिच्या डोळ्यांत पाणी आले. त्याबरोबर आबासाहेबांचें तोंड गोरेमोरें झालें.

‘ तुह्मांला वाईट वाटण्याजोगें मी बोललों याबद्दल मला फार वाईट वाटतें. तुह्माला कोणी नाहीं, हें मला ठाऊक नाहीं. ’ आबासाहेब ह्मणाले.

‘ मी माझी हकीकत एक दिवस सांगेन.’ तारा ह्मणाली, इतक्यांत मुलें आलीं व हीं सर्व वाड्यांत गेलीं.

‘ पुन्हां दोन चार दिवसांनीं आबासाहेबांची व ताराबाईची बागेंत गांठ पडली. कुमार व ताई वाळूचा किल्ला करीत होतीं. तेथेंच आसपास ताराबाई व आबासाहेब उभ्यानीं बोलत होते. आबासाहेब ह्मणाले, ‘ तर मग तुमच्या वडिलांजवळ तुमच्या आजीनें कांहीं ठेवले असेल पण तो लुच्चा मनुष्य असेल ह्मणून कोठेंतरी गप्प झाला असेल, पण तुमच्या वडिलांचा कांहींच कां पत्ता लागला नाहीं ? ते कोण होते ? ’

‘ ते एक इनामदार होते असें ते सांगत असत. पण ते व्यापार करीत असत, असं ते आईला ह्मणाले होते. त्यामुळें त्यांचा कधीं पत्ता नसे. पण दर पंधरावे दिवशीं ते नेमके येत, दोन दिवस रहात नी जात. पण माझ्या वेळेस आई गरभारशी असतांना ते जे गेले ते आलेच नाहींत व पुढें त्यांचा पत्ता नाहींसा झाला. माझ्या आईनें निजध्यास घेतला नी झुरणीला लागली. लोक ह्मणत तो कोणी लफंग्या असेल, त्यामुळें तर आईला धडकीच भरली. त्यांतच प्रसूत होऊन माझा जन्म झाला नी आई गेली. पण माझ्या आजीनें माझें पालनपोषण मोठ्या काळजीनें केलें. मुलीच्या बाबतींत प्रीतिविवाहाच्या वेडानें ती माझ्या आईच्या बाबतींत फसली असल्यामुळें तिनें मला पुरुषवर्गापासून फार दूर ठेवलेन् त्यामुळेच माझें सारें शिक्षण घरीं झालें.’

‘ म्हणजे तुमच्या आईचा प्रीतिविवाह झाला होता कीं काय? ’

‘ होय. माझी आजी म्हणे, माझी आई माझ्या वयाची असतांना फारच गोड आणि मोहक दिसे. तिला मुंबईच्या शाळांतून चांगल्या प्रकारचें शिक्षण मिळालेलें होतें. त्यांत अलीकडील पुस्तकें वाचण्याचें तिला फार वेड होतें. नेहमी तिच्या हातांत कसली तरी कादंबरी असे. शिवाय तिला इंग्लिश व मराठी वाचण्याचा पुष्कळ नाद असे. त्याचेंच आमचे आजोबा कौतुक करीत व तिची वाचनाची हौस पुरवीत. पुढें ती कादंबरींतल्या नायिकेसारखी दिसे. शेवटीं तिचें आयुष्य कादंबरीसारखें झालें. ’

‘ म्हणजे ? ’

‘ माझ्या आजीच्या आश्रमांत एक तरूण फर्स्टक्लास खोलींत रहावयाला वरचेवर येई. त्याचें व आईचें प्रेम जमलें व तिच्या आग्रहानें आजीनें त्याच्याशीं तिचें लग्न लावलें. लग्नाला त्यानें कोणीच माणसें आणलीं नव्हतीं. आजी म्हणे, तोंडावरून तो मनुष्य राजबिंडा दिसे त्यानें सांगितलें, मी मोठा इनामदार आहे; पण तूर्त इनाम उत्पन्नाचा लढा आहे म्हणून व्यापार करतो. लवकरच मला चुलता दत्तक घेईल मग आम्हीं थाटानें तेथें राहूं. मात्र तूर्त लग्न चोरूनें करावयाचें ’

‘ पण तो इनामदार होता कीं नाहीं त्याची आजीनें चौकशी केल्याशिवाय मुलगी कशी दिली ? ’

‘ केली तर ! त्यावेळेस त्यांनीं सांगितलेल्या नांवाची चौकशी केली व त्या नांवाचे ते इनामदार असून तंटा आहे ही गोष्ट खरी

आहे असें कळलें. आजीचा विश्वास बसला. आई तर त्यांच्यावर भाळलीच होती. तिला ते प्रत्यक्ष परमेश्वरच वाटत. मग लग्न झालें. पण पुढें ते घरीं येत नाहींसे झाले. तेव्हां त्या पत्त्यावर तपास करतां ते हे नव्हत असें कळलें. इतका सभावित दिसणारा मनुष्य इतका भामटा असेल अशी कल्पनाच झाली नाहीं.'

'साहजिक अहे. पण तुमच्या आजोबांनीं नाहीं कां शोध लावायची खटपट केली?'

'अहो, आजोबा तेव्हां वारले होते व त्यांनीं आपल्या हयातींत घरांतून निघून सुधारक राहणीचा अवलंब केला. त्यामुळें आप्तांत वांकडें आलें. प्राप्तीच्या मानानें ते खर्च बराच करीत. त्यांनीं आमच्या आजीला चांगलें मराठी व थोडें इंग्रजी शिकविलें होतें शिवाय ती मुंबईस पारशी वगैरे बायकांचें बघून विण भरायला शिकली होती. आईलाही हायस्कूलमध्यें घातलें होतें. पण ह्या नव्या राहणींत जुन्या तऱ्हेचें कष्टाचें काम करायची त्या दोघींना मुळींच संवय नव्हती. पुढें आजोबा वारल्यावर आप्त कोणीच आले नाहींत. त्यांचा आजीवर राग होता त्यांनीं वाट पाहिली कीं, हीं आपण होऊन येईलच. जाते कुठें? पण आजी फार मानी होती. तिनें विचार केला कीं, चांगल्या दिवसांत ह्यांनीं विचारलें नाहीं. आतां नवऱ्याच्या मागें काय विचारणार, मग अपमान करून घ्यायला जा कशाला? ह्मणून ती माथेरानला तिच्या मावशीकडे गेली तेथें तिच्या डोक्यांत आलें कीं, विलायतेकडे पुष्कळ बायका दोन चार विद्यार्थी घेऊन राहतात, तसें आपण करावें त्याप्रमाणें तिनें माथरानला चांगल्या जागेवर असणारा एक बंगला

भाड्यानें घेतला व एक ब्राह्मण व बाई बरोबर घेऊन आश्रम उघडला. फर्स्ट क्लास व सेकंड क्लास असे दोन वर्ग होते पहिल्याच्या दोन खोल्या व दुसऱ्याच्या दोन. सहा माणसांपेक्षां जास्त माणसें तेथें कधीं घेतलीं नव्हतीं. अर्थात् त्याला खाणावळीसारखें स्वरूप आलें नाहीं. चांगल्या हवेवर राहाण्यासाठीं येणारीं माणसें अगर पहावयाला येणारीं माणसें सहाच घ्यावयाचीं ठरल्यामुळें त्यांची व्यवस्था घरच्यासारखी उत्तम राही. त्यांतच माझे वडील फर्स्ट क्लास पाहुणे होते. त्यामुळें मला कधीं काम करायचें ठाऊक नव्हतें. आचारी स्वयंपाक करी, गडी मोलकरीण वरचें काम करीत. आपल्या खोलींत ताटें आलीं कीं जेवायचें; कारण आजी मला कधीं एकटी आमच्याकडे असणाऱ्या दोन तीन खोल्यांकडे फिरूं सुद्धां देत नसे. त्यामुळेंच मला हलकी कामें करतां येत नाहींत.'

'एकंदरींत तुमचा इतिहास ऐकण्याजोगा आहे.'

'हो आहे खरा, पण मला जगांतला व्यवहार फारसा माहीत नाहीं, त्यामुळें माझ्या हातून चुका होतात खऱ्या. काल माझ्या लक्षांत आलें कीं, माझा व आपला दर्जा पहातां मी आपल्याशीं असें फारसें बोलत उभें राहूं नये. ह्यामुळें आपण मला उद्धट ह्मटली असेल नाहीं बरें?'

'छे छे!'

'बरें तर मग मी आतां मुलें घेऊन जातें.' असें ह्मणून तारा मुलें घेऊन वाड्याकडे निघाली.

## प्रकरण पांचवें.

ताराबाई राहिल्यापासून वहिनीसाहेबांना बरीच मोकळीक मिळाली. कुमार फारच सुधारला. त्याला मराठी येऊं लागलें. ताईसाहेबही अक्षर ओळखीत. सारा दिवस देखरेख करणारे मनुष्य असल्यामुळें मुलें प्रकृतीनेंही चांगलीं सुधारलीं. ताराला विणण्या-भरण्याचा नाद असल्यामुळें तिनें मुलांकरितां लोंकरीचीं झबलीं विणावीं, वहिनीसाहेबांकडून सामान घेऊन तऱ्हतऱ्हेचे कपडे शिवावे. त्यांच्या नानातऱ्हेच्या वेण्या घालाव्या, कपडे घालावे व नटवावीं. मुलें लहान व हीसुद्धां वयानें लहान आणि हौसी असल्यामुळें त्या गोष्टी करण्यांत गुंग होई मुलें निजलीं ह्मणजे वाची. आबासाहेब तिला वाचायला निरनिराळीं पुस्तकें देत. मुलें घेऊन तारा राणीसाहेबांकडे गेली ह्मणजे तेथें त्या सुद्धां मुलें सुधारलीं असें ह्मणत. ही नम्र विनय-शील मुलगी त्यांना फार आवडे वहिनीबाई सुद्धां तिच्यावर प्रेम करीत. ती रिकामपणच्या वेळीं वहिनीसाहेबांच्या चोळीवर कशिदा काढ, एकादा रुमाल वीण, एखादी चांगली गोष्ट वाचून दाखव, असें करी. तिची आणि राजेसाहेबांची गांठ क्वचितच पडे. आज राजेसाहेब वाड्यांत येत असतांना त्यांना सहज आपण मुलांच्या खोलीवरून यावेसें वाटलें. ह्मणून ते खोलीच्या दाराशीं गेले तों आंत ताराबाई, कुमार आणि ताईसाहेब एकमेकाशीं गप्पागोष्टी करण्यांत पूर्ण रंगलीं होतीं. ताईसाहेब मांडीवर बसल्या असून कुमारानें पाठीमागून गळयाला मिठी घातली होती व आज आह्मीं तुह्मांला गांवांत जायला सोडणार नाहीं ह्मणून भांडत होते. तें पाहून राजेसाहेब

खूष झाले व ते आंत गेले. ती आज अप्रतिम सुंदर दिसूं लागली. कारण वाड्यांत आल्यापासून ह्या मुलांच्या संगतींत तिचा वेळ फार चांगला जाई. तीं मुलें तिच्यावर मनापासून प्रेम करीत. दुःखाचा विचार करायला वेळच नव्हता. अर्थात् तरुण वय, सारा वेळ बांधलेलें आवडीचें काम, चांगलें खाणें पिणें यामुळें ती येथें आली तेव्हां पेक्षां चांगली दिसूं लागली. आली तेव्हां ती दुःखी होती. तिची ती वागण्याची ढब पाहून ही कोणी राजकन्याच असावी असा राजेसाहेबाना भास झाला. त्यांनीं आत्यंतिक प्रेमानें तिची विचारपूस करून शाबासकी दिली व ते गेले. एका पोरीची खुद्द मालक म्हणून चाललेली प्रौढी त्या मोलकरणीला आवडली नाहीं. तिसरे प्रहरीं मुलें आजोबांचें बोलावणें आल्यामुळें तेथें गेलीं होतीं. ताराबाई आपल्या खोलींत कोचावर एकटीच पडली होती व आपल्या परिस्थितीचा विचार करीत होती. विचार करितां करितां चालू कालापर्यंत ती आली, तों एकदम तिच्या डोळ्यापुढें आबासाहेबांची मूर्ति उभी राहिली. त्याबरोबर ते किती सुंदर आहेत, कसे छान बोलतात, माझ्यावर किती प्रेम करतात असे विचार तिच्या मनांत आले, पण लगेच वाटलें कीं आपल्याला काय उपयोग ? छे, छे, मना, पुरुषांचा विचारसुद्धां आणूं नकोस. आईचें चित्र डोळ्यांपुढें ठेव. असें ती मनांत म्हणते आहे तों दारांत आबासाहेब उभे. ते कितीतरी वेळ तिच्याकडे पहात होते व आपल्या मनानें आपल्या ताब्यांत रहावें म्हणून त्याला विनवीत होते. विचाराच्या तंद्रींत त्यांच्या हातांतलें पुस्तक खालीं पडलें आणि त्या आवाजानें तारा दचकली व आबासाहेबांना पहून धडपडत उठून बसली. ‘ आपण केव्हां आलांत ? ’

'थोडा वेळ झाला.'

'अगबाई, मग हांक कां नाहीं मारली? आणि येथें येण्याची तसदी कशाला घेतली?'

'हा एका मासिकाचा खास अंक देण्यासाठीं.'

'आपल्यासारख्यांनीं माझ्या सारख्या गरिबाच्या खोलीकडे आलेलें कदाचित् कोणाला आवडणार नाहीं.'

'मला सुद्धां?'

'भलतंच कांहीं तरी. जर आवडलं नसतं तर आपण आलां असतां कां?' तारा हसून ह्मणाली.

'इतरांपेक्षां मला निराळा लेखतां कां?'

'आपण सामान्य माणसांपैकीं नाहींच मुळीं!'

'मग साधू कां देवावतार?' आबासाहेब हंसून ह्मणाले.

'हसायला नको. तें अगदीं खरें आहे.'

'मग माझी पूजा झाली पाहिजे. कारण साधूंना शिष्यशाखा असते, देवाला भक्त असतात.'

'आमच्यासारख्याला आपली पूजा करावयाचा अधिकार नाहीं. पण कोणीतरी भाग्यवती ती खास करील.'

'बरं, हें वाचून झालं ह्मणजे मग कसें आवडलें तें सांगा हं'

'पण मी एक विनंती करूं कां? आपण येथें येऊन पुस्तक देण्याची तसदी घेऊं नये.'

'बरं तर.' ह्मणून आबासाहेब हंसत निघून गेले.

——:——

## प्रकरण सहावें.

आबासाहेब आजोळीं आले ह्मणजे तिसरे प्रहरचा चहा वगैरे सर्व मामीकडेच असे. ते तेथें बसले ह्मणजे मामीशीं खूपसें बोलायचं, मुलांच्या खोड्या काढायच्या, धांदलधांदल करायची मामा असल्यास गप्पा मारायच्या, खायला मागायचें असा कार्यक्रम चाले आजही तिसरे प्रहरीं आबासाहेब तेथें बसले असतांना रोजच्या ठरल्याप्रमाणें तारा मुलांना घेऊन आली अगर मुलांनीं तिला आणली ह्मणा. मुलें खेळत होतीं, कुणबीण दारांत उभी होती व ही आंत अदबीनें उभी होतीं.

'मामी पेटी वाजवा.' आबासाहेब ह्मणाले.

'मला नाहीं चांगली वाजवितां येत.'

'मग आपल्या ताईसाहेबांना अवश्य शिकवा हं, नाहींतर नवरा मिळायचा नाहीं.'

'आधीं तुमची बायको पाहूंया, मग ताईसाहेब.'

'माझें लग्न इतक्यांत करायचेंच नाहीं.'

'पण तुमच्या आजाआजींचा तर आतांच लग्न करायचा विचार आहे.'

'मग मी पळून जाईन.'

पळून जाईन शब्दाचा अर्थ कुमाराला कळला. 'मी पळत पाठीमागें जाऊन पकडून आणीन हो वहिनीसाहेब!'

'बघूं या बरं कोण दमतो? चला.'

'मला नाहीं सांपडलांत तर आमच्या बाई पकडतील. होय ना हो बाई ? आबासाहेब पळाले तर तुह्मी त्यांना पकडून घ्याल ना हो ?'

हें ऐकून वहिनीसाहेब, आबासाहेब सर्व हंसलीं.

वहिनीसाहेब ह्मणाल्या, 'आबासाहेब, तुह्मी असं कांहीं तरी बोलतां ह्मणून मुलें बोलतात.'

'बरं आतां मुका बसतों तुह्मी पेटी वाजवा नाहीं तर पत्ते खेळा.' आबासाहेब ह्मणाले.

'वहिनीसाहेब, मला येतं खेळतां.' कुमार ह्मणाला.

'चालेल चालेल. मामी, तुह्मी, मी नी कुमार लाडीस खेळूं'

'चांगलींच माणसं शोधून काढलींत. कुमार काय खेळतो ?' वहिनीसाहेब ह्मणाल्या.

'त्यांना खरंच सुरेख खेळतां येतं.' ताराबाई ह्मणाली.

तिघांचा डाव सुरू झाला. कुमारानें ताराबाईला जवळ बसवून घेतलें. ती त्याच्यामागें मर्यादेनें दूरशी बसली व मधून मधून सांगूं लागली. कुमार वरचेवर जिंके तर आबासाहेब सारखे हरत होते. वहिनीसाहेबांनीं पाहिलें तर आबासाहेबांचें लक्ष वरचेवर ताराकडे होतें. त्यांना तें आवडलें नाहीं. त्यांनीं खेळ बंद करून मुलांना न्यायला सांगितलें रात्रीं ही गोष्ट राजेसाहेबांच्या कानावर गेली. ह्मणाले, 'खरोखरच मुलगी मन ओढण्यासारखी आहे.'

'इतकी का ती सुंदर आहे ?'

'सुंदर तर आहेच. आतां तुमच्यासारखी वैभवसंपन्न राहणी

तिच्याजवळ नाहीं. पण त्याच्याहींपेक्षां तिच्या चेहऱ्यांत विशेष प्रकारचें तेज आहे. चर्येवर एक प्रकारचें मार्दव असून वाणींत रुबाव आहे.'

'बरं, असलं तरी असल्या भिकार पोरीशीं कां लग्न करायचें आहे ?'

'त्यांच्या आजोबांनीं जी एक सरदाराची ह्मणून काळीदुस्स मुलगी ठरविली आहे तिच्यापेक्षां बरी. गरिबी ह्मणजे कांहीं गुन्हा नाहीं. गुण असल्यावर काय हरकत आहे ?'

'पुरे मेलं मला नको वाद. ह्याचा कांहीं तरी बंदोबस्त केला पाहिजे.'

'पहूं विचार करून'

पण वहिनीसाहेबांच्या डोक्यानें ही गोष्ट पक्की घेतली. इतक्यांत मुलांच्या कुणबिणीमार्फत राणीसाहेबांच्या कुणबिणीकडे आबासाहेब व ही बागेंत बोलतात वगैरे चहाडी गेली आणि ती तिनें राणीसाहेबांच्या कानांवर घातली. सासवासुनांची गांठ पडतांच हा प्रश्न निघाला व सुनेचा रुकार ऐकून सासूबाईसुद्धां घाबरल्या. ब्राह्मणाची मुलगी आपल्या घरीं जाऊं दे आणि आबासाहेबांनाही मोह पाडायला नको असा त्यांनीं विचार केला.

रोजच्यासारखें आबासाहेब आले असतां वहिनीसाहेब ह्मणतात-

'आबासाहेब, आपल्या घराण्यांतील प्रत्येक पुरुष सन्मार्गी व सदाचरणी निघालेला आहे.'

'बरं मग ?'

' नाहीं ह्मटलें आमच्या घराण्यांतील पुरुषांना कधीं वांकड्या डोळ्यानें दुसऱ्याकडे पहायचें ठाऊक नाहीं. '

' पण मला हें सांगण्याचा हेतू ? '

' तुमच्या लक्षांत आला असेलच. '

' नाहीं बोवा. '

' मग सांगू ? '

' सांगा. '

' रागावणार नाहीं ना ? '

' छे ! '

' मला वाटतें अलीकडे तुह्मीं मुलांच्या—'

' थांबता कां ? त्या बाईशीं—नव्हे मुलीशीं —मी बोलतों, पाहतों, पण ह्याचा अर्थ वाईट नजरेनं पाहतों, असा नव्हे ती मुलगी मला कितपत योग्य आहे, तिला मी पसंत पडेन कां ह्याचा फक्त मनाशीं विचार करतों. '

' ह्मणजे तुह्मी तिच्याशीं लग्नाचें बोललांसुद्धां वाटतें ? तिला काय झालें न पसंत व्हायला ? आळशावर गंगा चालून आली. '

' छे लग्नाच्या बाबतींत मुळींच नाहीं. तुमची कल्पना चुकीची आहे '

' कसली चूक ? पण कायहो, तुह्मी शहाणे ह्मणतां मग अगदींच कसे असें बोलूं लागलांत? आज बोललांत तें बोललांत. पुनः बोलूं नका हो. '

' कां वरं ? '

' आजींना कळलं तर तिला आतांच हांकलतील. '

' ह्यांत तिची काय चूक ? '

' तिनं भुलविलन् ह्मणून. '

' तिनें बिचारीनें असा कोणच्याही तऱ्हेचा प्रयत्न केलेला मला आठवत नाहीं. '

' मग आजपासून तिचें नांव घ्यावयाचें नाहीं ह्मणून शपथ घ्या'.

' नाहीं तरी तिचें नांव घेऊन मी हांक मारीत नाहीं, तिला उचलून पळवून नेऊन माणसांतून उठवणार नाहीं आणि ती यायची पण नाहीं. '

' मग काय दुसरी मुलगी नक्की करायची ना ? '

' नाहीं ! तूं मला लग्नच कर्तव्य नाहीं. '

ह्या त्यांच्या भाषणानें तिला काढण्याचा वहिनीसाहेबांचा निश्चय नक्की झाला. वास्तविक पाहिलें तर ती त्यांची मर्जी सांभाळायची फार खटपट करी; मुलांना उत्तम करी त्यामुळें त्यांना विसावा मिळे पण ती अप्रतिम सुंदर आहे, ती राजवाडा शोभवण्याजोगी आहे, तिला पुष्कळ कला येतात, ही तिची स्तुति त्यांना आवडत नसे कां बरें ? त्याचें उत्तर स्त्रीस्वभाव. ह्या शिवाय जास्त सांगतां येणार नाहीं त्यांनीं तिला एक दोन दिवसांत सोडतों असा निरोप भाऊसाहेबांना पाठवला होता व दुसरे दिवशीं सकाळीं उद्यां तुह्मीं काम सोडा, सध्या बाईची जरूर नाहीं, असें तिलाही कळविलें. आगाऊ कांहीं सूचना नसतांना व आपल्याकडून कुठलाही प्रमाद घडलेला नसतांना असा निरोप कां बरें आला, असें ताराला

वाटूं लागलें. सगळ्यांत मुलांचा सहवास सोडायचें तिला अवघड वाटलें. तिला अगदीं रडायला येऊं लागलें ती आपल्या खोलींत बसून पोटभर रडली व मनाशीं विचार करूं लागली. इतक्यांत कुमार आला आणि ह्मणाला, ' बाई, तुह्मी आतां राजेसाहेबांसारख्या दिसत होतां. ' मग तिनें आपली ट्रंक उघडली, त्यांतील एक चंदनी पेटी काढली व तींतून आज कित्येक वर्षांत न काढलेली आपल्या आईची तसबीर काढून पाहूं लागली. त्याबरोबर एक हिऱ्याची आंगठी खालीं पडली. ती चटदिशी कुमारानें उचलली व तो खेळत बाहेर आला. त्याच्या हातांत ती आंगठी पाहून मोलकरणीनें आईकडे चला ह्मटलें तेव्हां कुमार ह्मणाला, ' ही बाईची आंगठी आहे.' लगेच कुळंबिणीने वहिनीसाहेबांकडे वर्दी पोंचविली. त्यांनीं तिला आंगठी घेऊन बोलाविलें. लगबगीनें पेटी लावून ती त्यांचेकडे गेली, तेव्हां त्या ह्मणाल्या,

' अग ही आंगठी कोठली ? ' ' माझी आहे. '

' बाळ, देवानें तुला अशी बुद्धि कां दिली ? '

' सरकार, मी गरीब आहे, पण चोरटी नव्हे. ती आंगठी माझ्या आईची आठवण ह्मणून मी सांभाळून ठेविली आहे. ती कुमारांनीं खेळतां खेळतां उचलली '

' खुळे पोरी, एवढी चोरी असें सांगून पचेल का ? ही खुद्द स्वारीच्या हातांतील आंगठी. पण असें कशाला ? सरकार स्वारीला कांहीं न कळवितां ही पाहायलाच पाठवूं ' असें ह्मणून हुजऱ्याकडे आंगठी देऊन पाठविलें. तो निरोप घेऊन आला, हीच आपली आंगठी

ह्मणून. मग तिचें ह्मणणें कोण ऐकतो ? तूं इतकी शिकलेली मुलगी असून अशी चोरटी असशील असें आह्मांस वाटलें नव्हतें.' हे शब्द ताराला लागले. तिचा मानीपणा जागृत झाला. 'आज सहा महिने मी मुलांना संभाळलें, त्याच्याबद्दल जर हेंच बक्षिस असेल तर परमेश्वराच्या घरीं रुजू असो. मी आतांच जाते. आपल्याला आणखी कांहीं शंका असेल तर माझ्या ट्रंकांची झडती घ्या.'

हें बोलणें होत आहे तोंच राजेसाहेब आले 'बाळ, असें ह्मणूं नये. लहान आहेस. उचलावीशी वाटली असेल, नाहीं तर मुलांनींही उचलली असेल. संभव आहे'

'नाहीं सरकार, मुलें आपली वस्तू उचलून कोठें न्यावयाचीं नाहींत. ती आपली नाहींच माझ्या मृत मातेचें तें स्मृतिचिन्ह आहे; मी गरीब असले, तरी चोरटी खास नाहीं. पण आतां काय त्याच !! मी आतां जाते. चोरीचा आळ आल्यानंतर एक क्षणही येथें राहणें उचित नाहीं. आपल्याला झाडा घ्यायचा असल्यास घ्या ह्मणजे चाललें'

"छे, छे, अशी काय तूं चोरी करून कां निघाली आहेस ? आतां राहा. मग जायचें पाहूं.'

'नाहीं. आज मला कामावरून काढून टाकण्यांत आलें आहे व आतां राहायला मीही पण तयार नाहीं' असें ह्मणून ती बाहेर पडली दोन्ही ट्रंकांची एकच ट्रंक भरली एक वळकटी बांधली आणि ती बाहेर काढून ठेवून ती बाहेर पडली. ती शेजारींच असलेल्या एका देवळांत गेली. दहाची वेळ,

देऊळ शांत होतें तेथ जाऊन दाराबाहेर बसून तिला पुष्कळ रडूं आलें 'देवा नारायणा, तूं सर्वांचा वाली ह्मणवतोस; मग माझ्या पाठीस कां बरं लागलास ? मी ह्या जन्मीं काय बरें पाप केलें ? कशा-करितां मला घर ना दार केलेंस ? पोट भरायला निघाले तर नसतां चोरीचा आळ आणलास. आतां मी कोठें जाऊं व काय करूं ? देवा ! ! आतां तुझ्या दारांत डोकें ठेवून निजायचें उरलें आहे.

तोंच एक धीर व गंभीर आवाज ऐकूं आला. 'बेटा उठ' देव उभा आहे.' तिनें विस्मयानें पाहिलें, तर देवाच्यापुढें एक साधा वेषधारी पुरुष उभा.

बाळ, देवाला नांवें ठेवून कां रडतेस ?'

'महाराज, तुह्मी कसें ओळखलेंत ? मी आतां कोठें जाऊं ?'

'बेटा तूं राणी व्हायची आहेस. रोना मत. चलो.'

'महाराज , कोठें जाऊं ? मला कोठेंही घर नाहीं.'

'माझ्याबरोबर चल.'

'महाराज, मी कुलीन ब्राह्मणकन्या आहे जग भोंदूनें भरलें आहे मी एका परकी पुरुषाबरोबर कशी विश्वासानें जाऊं ? तेव्हां आपण आपली ओळख द्या खात्री पटवा.'

'ती पहा ती बाई येते आहे तिला विचार'

इतक्यांत एक पोक्त बाई आंत आली. 'बाई, हे सत्पुरुष कोण ?'

'अग मुली, हे शंकरजी महाराज. तूं ओळखीत नाहींस ?'

ह्यांचें नांव तिनें पुष्कळांच्या तोंडून ऐकिलें होतें. पण त्यांच्या उलट लबाड साधूंच्या पुढें खोटे शिष्य उभे करावयाच्या वगैरे गोष्टीही तिनें ऐकिल्या होत्या. तिचें मन कच खाऊं लागलें.

इतक्यांत आलेल्या एका गृहस्थास ते ह्मणाले ' दत्तू ' वाड्यांत जा, ताराबाईचें सामान घेऊन ये. टांगा करून आण. आज आपल्याला संध्याकाळचा मुक्काम श्रीनगरच्या देशमुखाकडे करावयाचा आहे. तेथें ताराबाई जायची आहे. ' हें ऐकतांच ताराला आश्चर्य वाटलें. पण मन घेईना, इतक्यांत महाराजांचा शोध काढीत दहावीस स्त्रीपुरुष तेथें येऊन त्यांच्या पाया पडले. तारानें मग मनाशीं विचार केला. ' जगांत ईश्वरी अंश सत्पुरुष आहेत हें तर नक्की कारण त्यांच्या पुण्याईशिवाय हा एवढा पसारा चालणें शक्य नाहीं. तेव्हां त्यांपैकीं हे नसतील कशावरून ? यदाकदाचित् त्यांच्या करण्याबोलण्याला मेळ नाहीं वाटला तर आपण वेळेला सुचेल तें वागावयाचें.' असें ह्मणून तिनें मौन स्वीकारलें.

इतक्यांत टांगा व सामान आलें तो मनुष्य खालीं उतरला तसें महाराज ह्मणतात, ' चल बेटा , बस. गाडीची वेळ झाली. ' ती टांग्यांत मागील बाजूला बसली. महाराज पुढें बसले. टांगा स्टेशनांत आला. एका हमालानें त्यांना पहिल्याबरोबर धांवत येऊन सामान स्टेशनांत नेलें. तोंच हीं दोघें स्टेशनांत गेलीं. इतक्यांत लोकांची वाट पहात रेंगाळत असणाऱ्या तिकिट कलेक्टरची नजर ह्यांच्यावर पडतांच तो पुढें आला आणि ह्मणाला, ' महाराज, आपण आंत चला मी सेकंड क्लासचें तिकिट घेऊन येतों. '

' छे, छे, माझ्या सारख्या गांवढळ माणसाला सेकंड क्लास काय उपयोगी ? जंटलमेनला त्रास व्हायचा. दोन थर्ड क्लास आण. चल बाळ. ' ह्मणून दोघें आंत गेलीं. तिला एका बांकावर बसविली तोंच तो हमाल आला.

' सामान येथें ठेवलें आहे, गाडींत ठेवीन. दुसरा बघूं नका–' असें ह्मणून तो बाहेर गेला. तिकिट कलेक्टर तिकिटें घेऊन आंत आला व दुसरी हमाली न मिळाल्यामुळें हमालही आला व ह्मणाला ' महाराज, आतां पुन्हां केव्हां दर्शन ? '

' लवकरच येणार आहे.'

' आज कुठें जायचें ? '

' ही माझ्या स्नेह्याची मुलगी आहे. हिला वहिणीच्या घरीं पोंचवितों. '

' मग आपणच कशाला निघालां ? दुसऱ्या कोणीही पोंचविलें असतें '

' वा !! तुझ्या स्नेह्यानें जर तुला एखादें काम सांगितलें तर तूं असेंच करशील का ? मग त्याला काय वाटेल ? ' गाडी आली. ताराला बायकांच्या डब्यांत बसविलें व तेथील दुकानदाराकडूनच पेढे, चिवडा वगैरे पदार्थ घेऊन तिच्या डब्यांत ठेऊन ' बेटा, स्वस्थ बैस हां. उतरायच्या वेळेस मी येईन. ' असें महाराजांनीं सांगितलें व आपण दुसऱ्या डब्यांत बसले.

## प्रकरण सातवें.

वहिनीसाहेबांच्या बरोबरच ताराबाई जाईल अशी कोणाची कल्पनाही नव्हती; पण ती गेली. मुलें तिच्या नांवानें हांका मारूं लागलीं, तीं रडूं लागलीं. लवकरच आबासाहेबांच्या कानांवर ही गोष्ट गेली ती ऐकून त्यांचें काळीज थरारलें. आपण संदिग्ध बोललों ह्मणूनच ताराला निघावें लागलें. बिचारीला आतां कोठें आधार मिळेल? कदाचित् ती पुनः भाऊसाहेबांकडेच गेली असेल, असें त्यांना वाटे. दुपारीं राजेसाहेब आंत असतांच आबासाहेब मामींच्या खोलींत आले; तीं मुलें कुरकुरत होतीं. कुणबिणी खेळायला नेण्याकरितां आर्जवा करीत होत्या. तसें राजे साहेब ह्मणाले, 'तुह्मी तिला फार घाईनें काढलीत ह्मणून आज हा मुलांचा असा त्रास होतो आहे. बरं पण तिला भाऊसाहेबांकडे पोंचविलीत तरी का ?'

'मला वाटतें आपल्या मनांत तिला काढावयाचें नव्हतें. कारण दुपारीं असेंच बोलायचें. आतां पुन्हां उलटच. मी कां तिला पोंचवीत बसूं ?'

'हें पहा, त्यांची आप्त त्यांनीं आपल्या सोईकरितां आणून दिली, तेव्हां आपल्याला नको का त्यांचें माणूस त्यांच्या घरीं पोंचवावयाला ?'

'पण ठीक होईपर्यंत ती राहिली कुठें ? नुसती आंगठी घेतलीस ह्मणण्याबरोबर मानें खवळल्याचा आव आणून तडक चालती झाली.'

‘ कुठें गेली ? ’

‘ नोकर माणसें ह्मणतात तिच्या पाठोपाठ एक मनुष्य येऊन तिची ट्रंक, वळकटी वगैरे घेऊन गेला. ’

‘ कसली आंगठी ? ’ आबासाहेब ह्मणाले.

‘ इकडच्या हातांतली परवांपासून हरवलेली आंगठी तिच्याजवळ निघाली. ’

‘ छे शक्यच नाहीं तारा कधींच चोरी करणार नाहीं. ’

‘ असें मला सुद्धां वाटतें. ’ राजे ह्मणाले.

‘ मग ती तिच्या पेटींत कशी गेली ? ’ वहिनीसाहेब ह्मणाल्या.

‘ कांहीं तरी घोटाळा असेल. ’ आबासाहेब ह्मणाले.

‘ पण ती ह्मणत होती कीं ती माझीच आहे. ’ राजेसाहेब ह्मणाले.

‘ एकदरींत तिला तूर्त ठेवून घेऊन आणखी चौकशी करावयाला पाहिजे होती. ’

‘ मामा, शिवाय चोरीच्या आळानें तिला बाहेर काढलीत तेव्हां आमांचीं माणसें काय ह्मणतील ? मग ती कोठें जाईल ? ’

‘ माझ्या बोलण्याची प्रचीति पाहिली कां? हें पहा आबासाहेबांचं प्रत्येक बोलणें कशा प्रकारचें येतें आहे ! ’ वहिनीसाहेब ह्मणाल्या.

‘ त्यांत काय, कोणाही विचारी माणसाला शील व सद्वर्तनी अनाथ माणसाला विनाकारण त्रास दिल्याबद्दल असेंच वाईट वाटेल. मनुष्याच्या चारित्र्यावर एवढासा कां डाग पडला ह्मणजे मनुष्य त्याच दृष्टीनें बघतें. ’

राजेसाहेब ह्मणाले, ' ती मुलगी इतक्या लवकर गेल्याबद्दल माझ्या मनाला सुद्धां रुखरुख लागली आहे. असें करा—, आपल्या जामदारखान्यावरच्या माणसाला बोलावून ही आंगठी दाखवा बरं ? ' लगेच तो मनुष्य आला. त्याला आंगठी दाखविली. तो ह्मणाला, ' ही तीचशी वाटते. निदान तसें दिसतें खरें—पण रोजच्या सारखी ही डोळ्याला दिसंत नाहीं. कारण बरेच दिवस ती माझ्या ताब्यांत होती. गतवर्षी ती एकदां वापरली होती; पण यंदा पाचूची घेतल्यापासून पुन्हां ती माझ्याकडेच होती. ती परवां पंधरा दिवसापूर्वीं दिली. '

' होय आणि ती माझ्या हातून कुठें तरी पडली पण कुठें ती मुळींच स्मृति नाहीं.

' आंगठ्या ह्या नेहमीं स्मृतिनाशकच असतात. ' आबासाहेब ह्मणाले.

' छे, तस नाहीं. त्या विशिष्ट स्मृति उत्पन्नही करतात ' वहिनीसाहेब ह्मणाल्या. त्याबरोबर राजेसाहेबांच्या चेहऱ्यांत एकदम फरक पडला. ते विचारक्रांत दिसूं लागले. विशिष्ट स्मृति तर त्यांच्या हृदयांत जागृत झाली नसेल ना? जामदाराला जाण्याचा हुकूम झाला; मग राजेसाहेब ह्मणाले, ' एकंदरींत त्या मुलीला सोडण्यांत घाई झाली खरी. तिचें ह्मणणें ऐकून घ्यावयाला हवें होतें. आतां मनुष्य पाठवून ती भाऊसाहेबांकडे असेल तेथून तिला आणवावी.

संध्याकाळीं फिरायच्या निमित्तानें आबासाहेब बाहेर पडले. ते सहज ह्मणून भाऊसाहेबांकडे गेले. तेथें ताराची चवकशी केली. पण

ती नव्हतीच. तेव्हां भाऊसाहेबांनाही नवल वाटलें. आबासाहेबांनीं ती वाड्यांतून गेल्याचें सांगितलें. आबासाहेबांची काळजी मात्र वाढली. ते पुन्हां मनाला ह्मणत—

' ताराबद्दल मला काळजी कां वाटावी ? ती माझी कोण ? '

—:।:—

## प्रकरण आठवें.

चीफसाहेब दुपारीं वामकुक्षीच्या तयारींत असतां हुजऱ्यानें येऊन निरोप सांगितला कीं, ' आपली जर कांहीं अडचण नसेल तर शंकर महाराज तिसरे प्रहरीं वाड्यांत भेटीला येणार आहेत. ' क्षणमात्र विचार करून येऊं द्या ह्मणून सांगितल्यावर निरोप घेऊन हुजऱ्या गेला. शंकरमहाराजांचें नांव पुष्कळदां चीफ साहेबांच्या कानांवरून गेलेलें होतें अर्थात् हिंदुसंस्कृति पाहिली ह्मणज श्रद्धा असो वा नसो सत्पुरुषाला कोणाही हिंदूच्या घरीं मज्जाव होणें शक्य नाहीं. त्याचा सत्कारच व्हावयाचा. त्याला अनुसरूनच चीफनीं सांगितलें. अर्थात् हा साधुपुरुष आपण होऊनच येत असतां त्यांच्यानें नाहीं ह्मणवलें नाहीं.

योग्य वेळीं महाराजांची स्वारी आली, ' जारे, सरकारला मी आलों आहे ह्मणून सांग. ' ' सरकार आज कोणालाच इतक्यांत भेटणार नाहींत. ' असें हुजऱ्या ह्मणतो आहे तोंच ' काय बावळट आहेस ' असें ह्मणून स्वारी आंत घुसली.

' अहो बुवा, विनाकारण का धक्का बुक्की करायला लावतां ? हा सरकार वाडा आहे—. ' असें ह्मणून शिपाई धाऊन त्यांना

धरूं लागले. " अरे पण माझ्यासारख्याला पकडायचें कां चोर दरोडे-खोर- ह्यांना पकडायचें ? बरं बाबा, हा पहा येथें बसतों. तुझ्या सर-कारला तावडतोब सांगून ये. नाहीं तर मी आंत घुसेन. " " ह्या वेळेस वर्दी कशी पोंचेल ? मग कचेरीला आल्यावर. " " अरे, तो कां अर्ज आहे ? नुसतें भेटायचें कीं चाललों गांवाला. " " तें सगळें खरें पण तसें करतां येत नाहीं. "

इतक्यांत आंतून एक हुजऱ्या आला आणि सरकारांनीं देवडी-वर निरोप पाठविला आहे कीं, कोणी साधुपुरुष सरकारकडे यायचे आहेत ते आले तर त्यांना एकदम सरकारच्या खासगत बैठकींत आणावयाचें व परिवार बाहेरील पडवींत बसवावयाचा." तेव्हां दारा-वरला मनुष्य म्हणाला "आंत जाशील तर हा विचित्र मनुष्य भेटायला आला आहे म्हणून सांग."

आंत मध्यभागी कृष्णाजिन घालून आसन केलें असून बाजूला खुर्च्यांवर चीफसाहेब व आईसाहेब बसलीं होतीं. आबासाहेबही होते. हुजऱ्याचा निरोप ऐकून आईसाहेब म्हणाल्या, " कदाचित् तेच तर ते नसतील ? साधूचा काय नेम सांगावा ? " तेव्हां त्यांनीं हुजऱ्याला ह्या माणसाला आंत आणायला सांगितलें. पण तो येऊन पहातो तों हे आपले डोळे मिटून गप्प. तोंडावर जाज्वल्य तेज. ताकद होईना हात लावायची. हांका मारल्या पण एक ना दोन. त्यानें जाऊन तसेंच सांगितलें. चीफ साहेबांना हांक ऐकूं आली. ते उठून बाहेर आले व बघतात तों देवडीवर शिपायांच्या पहाऱ्यांत जोड्यांच्या ढिगा-जवळ एक तेजस्वी पण साध्या कपड्यांतली मूर्ति बसली आहे.

कानांत फक्त कुंडलें आहेत. चीफ साहेब येतांच सर्वच पारडें बदललें. सर्व उठले. “ बोवाजी, बोवाजी, ” ह्मणून हांका मारल्या. पण चीफ साहेबांनीं सर्वांना खुणेनें गप्प केलें. चीफसाहेब स्वतः पुढें गेले व ह्मणाले, “ महाराज, आपण कोण आणि येथें कां बसलां ? ”

डोळे उघडून ते ह्मणाले, ‘ मी कोण तें तुला कळविलें होतें. तुझ्या नोकरांच्या हुकुमानें येथें बसलों आहे. चोर, दरवडेखोर कांहीं तुमच्या नोकरांना पकडतां येत नाहींत ह्मणून त्यांनीं मला पकडलें. मी त्यांना वर्दी पोहोंचवा ह्मटलें तर ह्मणे हुकूम नाहीं—”

“ महाराज, चुकीची क्षमा व्हावी आणि आंत चलावें.” स्वामी उठले आणि आंत गेले. तेथें तयार केलेल्या आसनावर बसून ते ह्मणाले, ‘बोलावल्याशिवाय माजघरांत जाऊं नये, त्याची प्रचिती आली. पण ह्या व्यवहारिक गोष्टी आह्मां लोकांना समजत नाहींत. ’

“ आमच्या मोठ्या प्रपंचांत ह्या आमच्या ध्यानांतही रहात नाहींत — ”

“ आपल्या कुटुंबांत किती माणसें आहेत ? ”

“ पुष्कळ. त्यांची व्यवस्था लावण्यांत ईश्वरीचिंतन सुचतच नाहीं. आज ईश्वरी हुकूम तुझ्याकडे येण्याचा झाला ह्मणून आलों—”

“ फार चांगलें झालें. दर्शनाचा अलभ्य लाभ झाला. ”

“ बरें युवराज व सुनबाई कोठें आहेत ? ” लगेच हुजऱ्या गेला व त्यांना घेऊन आला. त्यांनीं नमस्कार केला व खालीं बसलीं.

“ कां राजेसाहेब, मग आंगठीचा शोध लागला कां ? ”

“ हो—सांपडली. ”

चीफ सहेब ह्मणाले, " तुह्मांला कशी सांपडली ? ती माझे जवळ आहे. मी तुह्मांला कधीं आठवण होईल तें बघत होतों. "

राजेसाहेब ह्मणाले, " ह्मणजे ? "

" ठेवल्या ठिकाणीं ती आहे कां बघावी. ती तेथून गेली असेल. " वहिनीसाहेब ह्मणाल्या.

तसें चीफ ह्मणाले, " वा ! अशी कशी जाईल ? ही पहा ती. "

त्यांनीं जानव्यांतली आंगठी काढली; पण राजेसाहेबांच्या हातांत दुसरी आंगठी !!

एकदम आबासाहेब ह्मणाले–' पाहिलें, तारा चोर नव्हे.'

' अलबत ती चोर नाहींच. ' महाराज ह्मणाले.

' हा काय चमत्कार ?' राजे ह्मणाले.

' तुह्मीं त्या दिवशीं आमच्याकडे फराळ केलांत, तेव्हां हात धुतांना आंगठी साबूच्या डब्यांत राहिली. मी हात धुतांना ती उचलली व तुह्मांला केव्हां आठण होते ती पहावयाला माझ्याजवळ ठेविली.' चीफ ह्मणाले

' आतां मला आठवतें पण ती गोष्ट मी अजिबात विसरलों.' राजे ह्मणाले.

' मग ही दुसरी आंगठी कुठली ?' वहिनीसाहेब ह्मणाल्या.

महाराज ह्मणाले, ' कां चीफसाहेब आंगठ्या ह्या विशिष्ट स्मृति करतांही असतात नाहीं ? पण काय हो हे कोण ?'

' आमचे नातू आबासाहेब. आमची वडील मुलगी गेली ती आगरच्या चीफना दिली होती. तिचे हे चिरंजीव–' चीफ ह्मणाले.

इतक्यांत मुलें आलीं. ' महाराजांना नमस्कार करा.' ह्मणतांच तीं पुढें गेलीं, तशी कुमाराच्या अंगावर हात फिरवीत महाराज ह्मणाले, ' काय चोर ? तुह्मीं चोऱ्या करतां वाटतें ?''

' छे. छ. मी नाहीं चोरी केली.'

' मग आंगठी कोठून घेतलीत ?'

' आमची ताराबाई होती ना ? तिच्या ट्रंकेंत एका चंदनी पेटींत होती ती तिनें ट्रंक उघडली तेव्हां सांपडली. '

' तेव्हां ताराबाई काय करीत होती ? '

' रडत होती. मग एक फोटो काढून बघितलान् व खूप रडली ह्मणून मी बाहेर खेळायला गेलों. तों वहिनीसाहेबांनीं ती माझे-कडील आंगठी राजेसाहेबांची ह्मणून ठेऊन घेतली. '

' कांहो चीफ साहेब, आंगठी चोरणारा रडत बसेल कां ?' आबासाहेब ह्मणाले, ' मामी कुमारचें ह्मणणें ऐका. '

आईसाहेब ह्मणाल्या. ' आबासाहेब मघांपासून पहातें आहे. फार तिचा पक्षपात करतो आहेस. पण ती तुझ्या दर्जाची नाहीं.'

महाराज ह्मणाले, ' मग आपल्याला नातसून कोण पाहिजे ? एखादी राजकन्या-ना ? '

' आह्मांला तसं वाटतेंच व त्यांच्या वडिलांचीही तशीच इच्छा आहे. ' आईसाहेब ह्मणाल्या.

' बरें आहे. मी उठतों. मात्र तारा दोषमुक्त आहे अशी वहिनीसाहेबांची खात्री झाली ना ? येतों आतां--आबा-

साहेब, तुह्मांला राजकन्याच मिळेल असा माझा तुह्मांला पूर्ण आशीर्वाद आहे. "

राजेसाहेब पुढें होऊन ह्मणाले, ' महाराज, ताराचा कांहीं पत्ता आपल्याला ठाऊक आहे का ? '

' मी फक्कड मनुष्य ना घर ना दार. मला जगाची काय माहिती ? कोठें तरी बसून शंकर शंकर करावयाचें. ' इतकें ह्मणून सगळ्यांचे नमस्कार व्हायच्या आधींच महाराजांची स्वारी झपाट्यानें बाहेर गेली.

' नुसता आंगठीचा उलगडा करण्याकरतांच आज महाराज आले होते कां ? ' चीफ ह्मणाले. पण कोणी कांहीं बोललें नाहीं. ' आतां त्या मुलीचा पत्ता लावून तिला ती आंगठी द्या. '

' पण ती गांवांत नाहीं व कोठें गेली हेंही ठाऊक नाहीं. कारण नुकतेच माझ्याकडे भाऊसाहेब वकील आले होते. ते असेंच ह्मणाले, कीं ' माझी आणि माझ्या बायकोची खात्री आहे कीं, ती कधीं चोरी करणार नाहीं ह्मणून. या गोष्टीबद्दल ते हळहळत होते. '

' मामींच्या मुलांना तिनें इतक्या कळकळीनें संभाळलें असून मामींनीं तिला घरादाराशिवाय उघडी केली. ' आबासाहेब ह्मणाले.

' असें वडील माणसाला बोलूं नये. ' असें चीफ ह्मणाले.

' तसें नव्हे आजोबा. हें पहा, ह्यांनीं होऊन एका चांगल्या घराण्यांतली मुलगी आणली तिची आपल्याला जरूर नाहीं तर तिच्या आप्तांना बोलावून आणून तिला त्यांच्या स्वाधीन करावी कीं नाहीं ? तें न करतां तिच्यावर आळ घातली नी अर्थात् चोरीचा

आळ घेऊन आपण आपल्या दूरच्या आप्तांकडे गेल्यास अपमान होईल असें त्या मानी बालिकेला वाटल्यास त्यांत नवल काय? अर्थात् ती कुठें तरी निघून गेली.'

आतां हा वाद वाढविणें बरें नाहीं., हें समजून सर्वजण हळुहळू जाऊं लागलीं पण एका जुन्या अंधुक स्मृतीनें राजे-साहेबांचें मन व्यग्र झालें. 'होय! दोन सारख्या आंगठ्या खरेदी केल्या होत्या.' ही गोष्ट त्यांना आठवली व त्यांचें काळीज थरारलें. कां बरें?

---

## प्रकरण नववें.

आबासाहेबांचें मन व्यग्र झालें. त्यांना कोठें चैन पडेना कीं कुठें त्यांचें लक्ष लागेना. ते ह्मणत-' मला ताराचा चटका कां लागला? तिला हें ठाऊक असेल कां? पण छे, कसें असणार? आणि ती दुधानें पोळल्यामुळें ताक सुद्धां फुंकून पिणार. आज-पर्यंत मला इतकी कल्पना नाहीं. पण तारा गेल्यापासून तिच्यावर माझें किती प्रेम जडलें आहे, हें माझें मलाच ठाऊक! तिचा तो निष्पाप सुंदर चेहरा, आतां माझ्या डोळ्यांपुढें सारखा घोळतो आहे कष्टाळु तरी किती? तिनें थोड्या दिवसांत मुलांना कसें सुरेख वळण लावलें? मुलांकरितां नाना प्रकारचे पोषाख किती केले? मामींच्या येथें कलाकुसरीच्या सुंदर वस्तु किती केल्या आहेत? पण मामींनीं

तिचे उपकार असे फेडले !!' अशा विचारांत त्यांचे दिवस जात. शेवटीं कंटाळून ते आपल्या घरीं गेले.

इकडे राजेसाहेबांनीं आपल्या एका जुन्या दोस्ताला बोलावून आणलें आणि ह्मणाले, 'धनाजी, पंधरा वर्षांपूर्वी ज्या कामगिरीवर मी तुह्मांला पाठविलें होतें त्याची तुह्मांला आठवण आहे काय ?'

'होय सरकार ह्या नव्या आईसाहेबांमुळें आपलें आणि सरकारचें पटेना तेव्हां आपण राजधानी सोडून मुंबईस गेलांत व आपला पत्ता वडिलांना लागूं नये ह्मणून प्रतापराव असें नवीन नांव धारण करून माथेरानला राहिलां होतां. ही हकीकत फक्त मला ठाऊक होती. पुढें आपण तेथेंच लग्न केलेंत. पण सरकारला जीवावरचें दुखणें झालें तेव्हां आपला तपास जारीनें सुरू झाला ह्मणून मी आपल्याला तार करून मुंबईस आणलें. तेथून आपण सरकारकडे येथें आलांत. तेव्हां सरकारची शेवटली इच्छा ह्मणून रायपूरकरांच्या मुलीशीं आपलें लग्न करायचें ठरून झालेली बोलाचाली आपण कबूल करावी ह्मणून सरकारनीं आपल्यापुढें सर्व गोष्टी मांडल्या. त्या वेळेस माथेरानला केलेलें लग्न आपल्याच्यानें त्यांना सांगवेना, ह्मणून आपण पुनः लग्नाला उभे राहिलांत आपल्या इच्छेविरुद्ध पण विमनस्क स्थितींत आपलें लग्न झालें. त्या वेळीं आपल्याला कांहीं दिवस माथेरानला मुळींच जाता आलें नाहीं. मात्र तिकडून त्या वेळीं आपल्याला आपल्या पहिल्या पत्त्यावर दोन पत्र आलीं. त्यांत एका पत्रांत पहिलें कुटुंब फार आजारी असून आपण भेटायला यावें असा मजकूर होता व तें मी आपल्याला कळविलेंच होतें व दुसरें पत्र आपलें कुटुंब निवर्तल्याचें आलें. मग आपण मला तेथें जाऊन शोध करण्यास सांगितलें

मी तेथें गेलों तों मला रस्त्यांतच आश्रमांतून मुंबईस जाणारा ओळखीचा एक गृहस्थ भेटला. तो ह्मणाला--

' आश्रमाच्या मालकिणीची एकुलती एक मुलगी मेल्यामुळें आठ दिवस आश्रम बंद आहे ह्मणून मी मुंबईस चाललों. ' तें त्याचें भाषण ऐकून मीही तसाच परत फिरलों; कारण मला तरी त्या मंडळीला ओळख द्यायचीच नव्हती. दुरूनच शोध घ्यायचा हुकूम होता. '

' मग तर तुमची ना तिच्या आईची गांठ नाहींच पडली? '

' छे, नाहीं. '

' हें तुह्मीं मला तेव्हां नाहीं सांगितलेंत ? '

' नुसतें ती गेली ही बातमी खरी कां एवढाच शोध करायला आपण सांगितलें होतें. '

' बरें आतां असें करा. पुन्हा माथेरानला जा. त्या आश्रमाची काय वाट झाली आहे, त्या बाई आहेत किंवा कसें वगैरे वगैरे जी कांहीं माहिती मिळण्याजोगी असेल तेवढी माझें नांव न कळवितां काढून आणा. तुमचा ट्रॅव्हलींग खर्च खाजगींतून द्यायला सांगू. '

' जशी आज्ञा. ' ह्मणून धनाजीराव निघून गेला.

राजेसाहेब विचार करीत बसले. ' खरेंच, त्या वेळेस मी जी दोन लग्नांची चूक केली त्यांतून परमेश्वरानेंच सोडविलें असें मला वाटलें खरें. तेव्हां इंदिरेबरोबर घालविलेल्या त्या सुखकर स्मृतीचें कसें बरें विस्मरण पडलें ? छे पडलें नाहीं. तें मुद्दाम पाडून घ्यावें लागलें. एकीकडे राज्यलोभ आणि एकीकडे इंदिरा असें झालें. माझ्याकडून

संतोषानें गादीचा वारसा घ्यायचा असल्यास रायपूरकरांच्या मुलीशीं लग्न केलेंच पाहिजे ही वडिलांची अट न मानली तर राज्याबाहेर रहावयाचें. बरें कायमचें रहावयाचें ह्मणजे पुनः खर्च हवा. त्याकरितां पुन: पोलिटिकल एजंटकडे तंटा न्यायचा. हें सगळें नको म्हणून इंदिरेचें प्रेम मला लाथाडावें लागलें; पण तिच्याशीं प्रेम जडलें तेव्हां तिला फसवावें लागेल असें मला वाटलेंच नाहीं. त्या वेळीं विचार केला कीं थोड्या दिवसांनीं बाबांचें मन वळवून त्यांना खरें सांगून हिला नेईन. पण सर्वच संपलें. माझ्या विरहानें झुरून इंदिरेनें प्राण सोडला. अहाहा !!! आज माझ्यापुढें माथेरानचा पहिला दिवस उभा राहतो आहे "लांब सडक काळेभोर केस मोकळे सोडून गवतावर मुलांचा रुमाल करीत बसलेली एक मुलगी आली आणि मला आपल्या आईकडे घेऊन गेली व तेथें ब्राह्मण नसल्यामुळें मी मागितलेला चहा आईच्या सांगण्यावरून आपण माझ्यापुढें आणून ठेवला. त्या वेळेस गुलाबी पातळ नेसलेली इंदिरा जसें गुलाबाच्या फुलांत एखादें मोगऱ्याचें पुष्प टाकावें अशी दिसत होती. तो तिचा तेतकी वर्ण देह त्या गुलाबी वस्त्रांत किती ह्मणून खुलत होता ? त्यापेक्षां किती तरी पट असें हंसरें सुंदर मुखकमल त्यांत अप्रतीम खुलत होतें. मी तेथें असेपर्यंत मला वरच्या मजल्यावरून ह्या निष्पाप सुंदरीकडे बघायचें वेडच लागलें होतें. त्यामुळेंच मग मी निरनिराळीं निमित्तें काढून तिच्या आईकडे बोलायला जाई. अर्थात् आमचें संघट्टण वाढून आमच्यांत गप्पा गोष्टी सुरू झाल्या. त्यावेळीं तिला वाचण्याचा भयंकर नाद असून प्रीतिविवाहाची आवड आहे असें कळलें. तेव्हां अर्थात मी माझी मागणी पुढें टाकली. आपल्या

प्रमाणेंच सर्व जग सज्जनांनीं भरलें आहे असें समजणाऱ्या त्या बालिकेनें माझी मागणी ताबडतोब मान्य केली. पण आईची व्यवहार-दृष्टी चटदिशीं हो ह्मणेना. पण योगायोग निराळा. त्याच वेळीं एका इनामदाराचा वारस हक्काचा तंटा सुरू होता. तो इनामदार मी ह्मणतांच त्या संबंधानें थोडासा तपास होऊन खात्री पटली व इंदिरेचें नी माझें लग्न झालें. अगदीं चार माणसांत झालेलें तें सार्वे लग्न असलें तरी इंदिरा माझी धर्मपत्नी झाली होती. त्यामुळें तिला आत्यंतिक आनंद झाला व एकत्र सहवास असून आह्मांला जें दूरदूर रहावें लागे तो दूरपणा मोडला. इंदिरा जशी धर्मानें माझी झाली होती तशी अंतःकरणानेंही झाली. त्यावेळेस आह्मा दोघांस जो आनंद झाला व जें सौख्य वाटलें त्याच्यापुढें आह्मांला स्वर्ग सौख्य तुच्छ भासलें. मी ह्मटलें—" इंदिरे, आपल्याला एखादें राज्य मिळालें तर? " त्या " राजवाड्यांतल्या महालांत देण्यासाठीं आणखी थोडेसें प्रेम असेल तर हवें. आपण त्या राज्याच्या दगदगी शिवाय ह्या प्रेम साम्राज्याच्या मांडींत परस्परांच्या संतुष्टतेनें आनंदांत राहूं शकतो. " " पण तुला घालायला उंची वस्त्रें आणि अलंकार नकोत का? " " ते दोन्ही आपल्या नजरेला संतोष देण्याकरितां हवेतना? मग मी तर सध्यां आपल्याला आवडत नाहीं ह्मणायची? " असें ह्मणून ज्या प्रेमळतेनें तिनें माझ्याकडे पाहिलें त्यामुळें मी वेडावून गेलो व प्रेमाच्या उर्मींत मी माझी **मुद्रिका** प्रेमाची भेट ह्मणून तिच्या करांगुलींत घातली. ह्या दोन्ही सारख्या मुद्रिका मी लग्नाच्या वेळेस मुद्दाम तिला व मला ह्मणून केल्या होत्या. पुढें आमचें तें प्रेम कितीतरी वृद्धिंगत झालें. मी मुंबईस चार दोन दिवस

यायचा तर ती माझी सारखी वाट पहात राही. तो माथेरानचा बंगला, त्याच्या भोंवतालचा तो मनोहर प्रदेश आतां माझ्या डोळ्यापुढें सारखा नृत्य करतो आहे. तेथें निरनिराळ्या ठिकाणीं आह्मी मौजा करायच्या, आपलें इनाम आपणांस मिळालें ह्मणजे आपण यंव् करूं त्यंव करूं असें मनोरथ इंदिरा किती बांधायची. हाय ! हाय ! मी दुष्टानें इंदिरेला जगांतून घालविलें. माझा दोन तीन महिन्यांचा वियोग असह्य होऊन ती गतप्राण झाली. ज्या वेळेस मी वडिलांची तार येतांच घरीं निघालों त्यावेळेस ती एकसारखीं मला धरून ह्मणत होती कीं, ' आज सकाळीं मला वाईट स्वप्न पडलें, तुह्मी पुनः येणार नाहीं असें दिसलें. मला अपशकून होत आहेत. ह्मणून आज जाऊं नका. ' असें ह्मणतांना तिच्या डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा चालल्या होत्या. पण तार आल्यामुळें मी निष्ठुर होऊन तिची समजूत करून कसा तरी निघालों. तो देखावा सारखा माझ्या डोळ्यापुढ आतां खेळतो आहे. आज ह्या आंगठीनें तें सर्व दृश्य डोळ्यापुढें मूर्तिमंत आणलें. इंदिरेचें स्वप्न खरें झालें. पुन्हां गांठ पडली नाहीं. इंदिरा मेली हें ऐकतांच मीं विचार केला कीं, तिचा वियोग तर झालाच, आतां तेथील कर्तव्य संपलें. उगीच मुद्दाम झाकलेल्या गोष्टी उघड करून काय करायच्या ? तीच आंगठी पुनः आमच्या घरांत येईल व एवढा गोंधळ होईल अशी माझी कल्पना सुद्धां नव्हती पण ईशेच्छा बलीयसी " असे शद्ब राजसाहेबांच्या तोंडून मोठ्यांदा निघाले तेव्हां वहिनीबाई पाठीशींच उभ्या होत्या. त्या ह्मणाल्या, " आतां नाहीं कां गडे विसरायचें ? त्या आंगठीनें फारच गोंधळ घातला. मी तुमच्या सगळ्यांच्या हिता-

करतांच करायला गेलें. एका हलक्या कुळांतील मुलीवर आबासाहेबांचें प्रेम जडलेंसे वाटूं लागलें ह्मणून मी तिला दूर केली; त्यांत आंगठी सांपडली. ”

“ तुह्मांला कोण काय ह्मणतें ? पण खरें प्रेम कुठें गरिबी-श्रीमंतींत कां आहे ? जर खरें खरें परस्परांचें प्रेम असेल तर मी आबासाहेबांना अगत्यानें लग्न करायची परवानगी देईन. शुद्ध प्रेम ही और चीज आहे. ”

— ] —

## प्रकरण दहावें.

श्रीनगरचे देशमुख ह्मणजे एक मोठे इनामदार होते. तेथें त्यांचा एक जंगी वाडा असून तो गांवांतील पुष्कर ह्मणून जो मोठा तलाव होता, त्याच्या एका कांठावर होता. गांवांत जरी ब्रिटिश अधिकार होता तरी ह्यांचा वाडा आणि आसपास असणाऱ्या ह्यांच्या शेतीवाडी नी ह्यांचा गांवातील पसारा राजासारखाच होता. ह्यांना एक पंधरा वर्षांची उपवर कन्या असून एक लहान मुलगा होता. हे शंकर महाराजांचे शिष्य होते. महाराजांवर यांची आत्यंतिक भक्ति असून ते त्यांच्या अर्ध्या वचनांत असत शंकर महाराजांची स्वारी ताराबाईसह अवचित् वाड्यांत आली अर्थात् ते आल्याची बातमी वाडाभर झाली. खुद्द देशमुख उठून खालीं यायला निघतात, तों महाराज जिना चढून वर सुद्धां गेल व ताराला पुढ करून ह्मणाले, “ बाळ, अण्णासाहेबांना वंदन कर. ”

गुरुजींना वंदन करून देशमुख ह्मणाले, " महाराजांनीं आज अवचित दर्शन दिलें. आगाऊ पत्र वगैरे ? "

" अहो ! मला कसलें पत्र ? तें लीलाताईच्या यजमानांना. बरें लीलाताई कुठें आहे ? " असें ह्मणतात तों लीलाताई हजर. महाराज आल्याचें ऐकून ती निघालीच होती. तिला पाहून महाराज ह्मणाले, " वा ! शंभर वर्षें आयुष्य बरें कां ? हें पहा ताईसाहेब, ही एक मैत्रीण आपणाला आणली आहे. ही एक राजकन्या आहे बरें कां ? हिच्या मनाला कोणच्याही तऱ्हेचे क्लेश होणार नाहींत अशी सांभाळा हिला. आण्णासाहेब, ही एक राजकन्या आहे. हिला माझी मुलगी ह्मणून तुझ्या येथें ठेवणार आहे. हें अमोल रत्न बरोबर घेउन मी कफल्लक कुठें हिंडू ? तूं हिला नीट संभाळशील ना ? ज्या वेळेस हिला संभाळायचें तुला जड वाटेल किंवा हिच्याविषयीं कांहीं शंका येईल, त्यावेळेस हिला माझ्या स्वाधीन कर. तोंपर्यंत तूं हिला आपली मुलगी ह्मणून समजली पाहिजे. आणखी चार सहा महिन्यांत ती स्वगृहीं जाईल. मग कसें ? "

' महाराज आपण सांगितलेली कोणचीही गोष्ट माझ्या हातून अमान्य होईल कां ? सर्व आपलेंच आहे. '

' अण्णासाहेब ' माझा तसाच तुझ्यावर विश्वास आहे ह्मणूनच मी तिला तुमच्याकडे आणली. ती एक राजकन्या असून लवकरच एका राजाबरोबर तिचें लग्न होईल. पण सर्वांच्या कल्याणाकरितां हिच्यावर थोडे दिवस हा अज्ञातवास आला आहे. '

रात्रभर स्वामी तेथें राहिले व सकाळीं **तारायाईला** विचारून व तिला धीर देऊन निघाले. इकडे लीलानें तिला घरांत

नेऊन ऊंची वस्त्रें नेसायला दिलीं. रात्रीं खोलींत आपल्या शेजारीं आंथरून घातलें. सकाळीं स्वामी गेल्यावर ताराला फार वाईट वाटलें; तेव्हां अण्णासाहेबांनीं आणि लीलाताईनें तिचीं पुष्कळ समजूत केली. मग महाराजांच्या गोष्टी निघाल्या; तेव्हां ताराला फारशी माहिती नाहीं हें पाहून लीलानें तिला त्यांच्या पुष्कळ गोष्टी सांगितल्या व ज्याअर्थी महाराजांनींच तुह्मांला जवळ केलें आहे त्याअर्थी तुमचें खात्रीनें कल्याण होईल असें सांगितलें.

—:†:—

## प्रकरण अकरावें.

महाराजांच्या इच्छेप्रमाणें लीलाताईनें तिला स्वतंत्र अशी एक खोली, उंची कपडे लत्ते, नोकर चाकर वगैरे सर्व कांहीं दिलें. पण तिला तें मुळींच आवडलें नाहीं ती ह्मणे, ' मला इतकें नको. खोली तेवढी असूं दे. '' ती अण्णासाहेब, लीलाताई व तिची आई यांच्याशीं नम्रतेनें वागे पुष्कळ वेळांपैकीं लीलाताईबरोबर काम करेंण्यांत, कांहीं आईसाहेबांजवळ व बाकीचा आपल्या खोलींत असा ती आपला वेळ घालवी. येथें वाड्यांत तिला सर्वच लीलाताईसारखी समजत असल्यामुळें चोहोंकडे हिंडाफिरायची तिला मुभा होती. अर्थात् निरनिराळीं वर्तमानपत्रें व पुस्तकें तिला वाचायला मिळत.लीलाताईबरोबर गायनमास्तरजवळ, ड्रॉइंगमास्तरजवळ ती बसे. अर्थात् मूळच्या मोडक्यातोडक्या ज्ञानांत शास्त्रशुद्ध भर पडत चालली होती. फुलांचा तर तिला फारच नाद होता. एकदां ह्या दोघीजणी आलबम

पहात होत्या. त्यांत आबासाहेबांचा फोटो होता. प्रत्येकाची ओळख करून देतां देतां हा फोटो माझ्या मामेभावाचा आहे असें लीला म्हणाली. पण त्या वेळेस ताराच्या तोंडावर जे फेरबदल झाले ते पहायला लीलाचें लक्ष वर नव्हतें. लौकरच लीला कायशा कानाला घरांत गेली. तारा तेथेंच बसली होती. तिच्या मनांत सारखे विचार सुरू झाले. वहिनीसाहेबांनीं जरी मला झिडकारलें तरी राजेसाहेब गोड बोलले. मग त्यांची आंगठी खरेंच कां माझ्यासारखी असेल? जरी असली तरी एकदम असा आळ घ्यावा कां? तें ऐकून आबासाहेबांना काय बरें वाटलें असेल? ते मला चोर समजले असतील कां? खरेंच, किती उमदे तरुण आहेत ते! किती गोड स्वभाव! अंतःकरण किती प्रेमळ, ज्याच्या वांट्याला हें रत्न जाईल ती साध्वी खरोखरच धन्य होय पण मीं कां बरें त्यांचा विचार करतें? मी कोण? ते कोण? पण समजा कदाचित् माझें त्यांच्याशीं जमलें तर? तर काय? ते किती चांगल्या तऱ्हेनें माझ्याशीं वागतील? अरे मीं फारच वहावलें." असें म्हणून तिची विचारमालिका जाग्यावर आली. ती चट्दिशीं उठून आपल्या खोलींत गेली.

ताराला येऊन दोन महिने झाले आतां ती येथें घरचीच झाली होती. त्यांचा वेळही चांगला जाई. अण्णासाहेबांच्या जवळ तिला धार्मिक शिक्षणही चांगलें मिळे. असा काळ जात असतां एक दिवस अचानक एक मोटार दारांत उभी राहिली. दरबारी थाटाची ती मोटार, ते संस्थानी हुजरे पाहून हे कोण म्हणून तारा चमकली. तोंच एक विजार, कोट व डोक्याला संस्थानी तऱ्हेचा गुलाबी जरीचा फेटा

बांधलेला सुंदर तरुण बाहेर पडला त्याच्या हातांत रुप्याच्या मुठीची एक बारीक छडी होती. तो चौकांत येतांच लीला ओरडली, 'अगबाई! आबासाहेब.' ताराला एकदम चक्कर आल्यासारखें झालें पण ती सांवरली व आंतल्या खोलींत गेली आबासाहेब वर येऊन आईसाहेब, अण्णासाहेब यांना नमस्कार करून लीलाला शोधीत आले तों ती दारांतच. तिच्याकडे पहात ते विनोदानें ह्मणाले, "हं. मी यांना दोघांना नमस्कार केला. ताईसाहेब आतां मला करा."

'हें हो काय?'

'अण्णासाहेब, ही अजून आहे तशीच आहे कां?'

'होय, पण आमची **ताराबाई** मात्र गरीब आहे. ती तुला जास्त आवडेल. तारा, बाळ तारा-'

तारा आली पण आंत येतांच तिनें अगदीं घाबऱ्या मुद्रेनें आबासाहेबांकडे पाहिलें. ते एकदम आश्चर्यचकित झाले.

'बाळ, हे आमचे आबासाहेब. ह्यांना नमस्कार कर. हे लीलाचे मामेभाऊ.'

तारानें नमस्कार केला. तशी लीला ह्मणाली, "पहा आबासाहेब मला कशी मैत्रीण मिळाली आहे ती? आमचे महाराज आहेतच तसे. त्यांनीं ह्यांना येथें आणलें."

लीला बोलत होती तोंच तारा आंत जाऊन चहाची तजवीज करून आली बरोबरचा हुजऱ्या येऊन त्यानें आबासाहेबांच्या पायांतील बूटबीट काढून गेला. इतक्यांत शागीर्दानें चहा आणला. ताराची

सूचकता पाहून सर्वांना कौतुक वाटलें. लीलाताई ह्मणाली, " ताराबाई तुह्मांला हें सर्व कसें सुचतें ? मला आतां शिकलें पाहिजे."

" ताईसाहेब, देव तुह्मांला हें शिकण्याची जरूर पडण्याजोग्या परिस्थितींत कधीं न ठेवो "

" ह्मणजे काय ताराबाई, श्रीमंतांच्या घरीं झालं तरी आपल्या माणसांची काळजी आपण नको कां करायला ?" आईसाहेब ह्मणाल्या.

" ताईसाहेबांच्या वांटणीचें मी करीन." तारा ह्मणाली.

" बाळ, येथें तूं करशील. तिच्या घरीं गेल्यावर आणि तुझें लग्न झालें ह्मणजे ?"

" जाऊंद्या आत्याबाई मीं येथें आहे तोंपर्यंत तर ताराबाई सासरीं जात नाहींत ना ? मग तर ताईसाहेब तुह्मीं काळजी करूं नका." आबासाहेब ह्मणाले.

" तूं एक नाहीं तर अर्धा दिवस राहणार. तेवढ्यांत कसें लग्न होणार ? अर्थात् तूं आहेस तोंपर्यंत लीला मोकळी आहे खरी." आईसाहेब ह्मणाल्या.

" अण्णासाहेब, आत्याबाई नेहमीं रागावतात ह्मणून मीं ह्या खेपेला तुह्मीं जा ह्मणेपर्यंत रहाणार आहे."

" खरें कीं काय ? मग दोन चार पोतीं तांदूळ सांगूं काय ?" आण्णासाहेब ह्मणाले. अशा विनोदांत चहा आटोपला व खाशा पाहुण्याकरितां राखून ठेवलेल्या खोलींत आबासाहेब गेले.

---:*:---

## प्रकरण बारावें.

रात्रीं सपाटून पाऊस पडून जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें होतें. तरी पण पाऊस जोराचा असल्यामुळें रस्ते वाहून धुऊन स्वच्छ झाले होते. पोटभर पाणी पिऊन झाडेंझुडपें संतुष्ट होऊन ऐटींत माना वर करून उभीं होतीं. सृष्टीसुंदरीचे हे नयनमनोहर वस्त्रालंकार पाहून सगळें जग जसें हंसत होतें. नुकताच सूर्योदय झाला होता व दिवाकरही ढगांतून डोकें वर काढूं लागला होता त्याचे पुढं आलेले बालकिरण सांठलेल्या डबक्यांतील पाण्यावरून आपल्या तेजाची सृष्टीच्या शोभेंत भर घालीत होते. अशा ह्या सुंदर वेळीं लीलाताई व ताराबाई सुंदर वस्त्रालंकारांनीं नटून सखी पार्वतीसारख्या बागेंत हिंडत होत्या. आज श्रावणसोमवार असल्यामुळें त्या लौकर आंग वगैरे धुऊन देवाला जायला तयार झाल्या होत्या. पण आईसाहेबांचें आटपायला थोडा उशीर असल्यामुळें मौजेनें त्या बागेंत हिंडत होत्या. इतक्यात आबासाहेबांची स्वारी फिरत फिरत तेथें आली. ' काय हो ताईसाहेब, कोठें लग्नाला जायचें आहे वाटतें ? आज आह्माला कांहीं चहा वगैरे—''

" आपण उठला नव्हतां बरें कां. ह्मटलें, आह्मीं आपली सगळी तयारी करून ठेवली होती. '' लीला ह्मणाली.

" आज श्रावणसोमवार आहे ह्मणून आह्मीं देवाला जाणार आहों. '' तारा ह्मणाली.

" आमच्या आण्णासाहेबांच्या येथें देवाला कांहीं कमी नाहीं. त्यांचें एक गुरू आहेत ह्मणे; ते त्यांना सर्व पुरवतात. " आबासाहेब ह्मणाले.

" मला मात्र त्यांनीं सर्व पुरवल खरें. त्याच गुरूमाउलीच्या प्रसादानें मीं ह्या संतसंगतींत आलें. " तारा ह्मणाली.

" खरें कीं काय ? मग आमच्या ताईसाहेब संत ह्मणायच्या. मग ते गुरु बघितलेच पाहिजेत. "

" आबासाहेब, चेष्टा करा; पण खरोखर शंकरमहाराजांना बघाच. " लीलाताई ह्मणाली.

" काय ? शंकरमहाराज ?"

" हो."

त्याबरोबर त्यांच्या डोक्यांत कांहीं विचार आला. पण आंगठीचा प्रश्न लीलाच्या देखत निघाल्यास ताराला वाईट वाटेल ह्मणून ते गप्प बसले.

" काय हो आबासाहेब, तुह्मी खूप वाचीत असाल नाहीं ? मग आमच्या ताराबाईशीं तुह्मींच बोला. त्या मला बोलूंच देत नाहींत."

" कशावर ?" आबासाहेब ह्मणाले.

" छे हो, उगीच कांहीं तरी. "

" आतां कां ? बोला कीं बृहस्पती. अहो ताराबाई ह्मणतात, पैसेवाल्यांना कसली हौस नाहीं. मग आह्मीं काय विनहौशी ?" लीला ह्मणाली.

" असें नाहीं बरें कां ताईसाहेब. मीं ह्मटलें, ज्याच्या जवळ पैसा आहे त्याला कांहीं करूं अशी हौस नसते आणि हौस असेल त्याला सामर्थ्य नसतें. हेंच पहाना, ब्रिटिश राज्यांतील लोकांना कांहीं करावेंसें वाटतें पण सत्ता नाहीं. संस्थानिकांच्या हातांत पैसा व सत्ता असते पण त्यांना कशाची जरूर वाटत नाहीं."

" ताराबाई तूं राणी असतीस तर ?

" मीं कशी राणी होणार? उगीच बोलायचेंच शेख महंमदाचीं मनोराज्यें बांधायचींच तर बांधून दाखवूं कां ? मीं मुलांकरितां आणि बायकांकरितां माझा खाजगी पैसा खर्च केला असता, संस्थानची खाजगी शिल्लक शेतीच्या सुधारणेकडे लावली असती व आसपासच्या लोकांनीं बोट दाखवावें असें माझें संस्थान ठेवलें असतें. "

" खरेंच आबासाहेब, तुह्मीं तुमच्या राज्यांत काय काय करणार? आतां तुमचें शिक्षण संपलें ना ?"

" होय पोपटपंचीचें संपलें. बाकीचें असें हिंडून, चहा पिऊन मिळवणार आणि मग ठरवीन "

" पण राणीसाहेब तुमच्या विचाराच्या पाहिजेत. कधीं लग्न करायचें आहे ? " लीलाताई ह्मणाली.

" तुह्मीं सांगाल तेव्हां. "

" सदा कसली हो चेष्टा ? ताराबाई, आपण तुझें लग्न यंदा करूंया. "

" अहो ताईसाहेब लग्नें कुठें लोकांनीं करून कां होतात ? वेळ यावी लागते. " आबासाहेब ह्मणाले.

" काय हो ताराबाई, तुमच्या ह्या महत्वाकांक्षा राणी झाल्यावर टिकतील कां ? "

" संपतीचा मदच चढत असल्यास कोणी सांगावें ? बाकी अशक्य गोष्टीचा वाद कशाला ? चला ताईसाहेब, आपण जाऊंया. आईसाहेब वाट पहातील. " असें ह्मणून दोघी निघाल्या. त्यांच्याकडे पहात आबासाहेब विचार करूं लागले. " खरेंच. प्रत्येक राणीच्या डोक्यांत असे विचार येतील तर ? खरोखर तारा, तूं राणीच शोभशील. "

---

## प्रकरण तेरावें.

दुपारीं दीड दोन वाजायची वेळ. सर्वजण आपापल्या जागीं आराम घेत पडलीं होतीं. अशा वेळीं लोळण्याचा व वाचण्याचा कंटाळा आल्यामुळें आबासाहेबांची स्वारी आपल्या खोलींतून बाहेर पडली व पाय न वाजवितां सावकाश चालली. त्यावेळीं जिकडे तिकडे शुकशुकाट होता. तेव्हां तशीच फिरत स्वारी लीलाताईच्या खोलीवरून आली. तर तिचें दार बंद पुढें ताराबाईच्या खोलीशीं येतात तर दार उघडें असून ताराबाई पाठमोरी बसलेली होती. हे उंबऱ्याशीं उभे राहिले व आतां हांक मारणार तोंच त्यांचें लक्ष ताराबाईच्या हातांत क्रेऑननें एनलार्ज करण्याकरितां घेतलेल्या एका फोटोकडे गेलें. ते जरा घुटमळले. पण लगेच ह्मणाले, " काय चित्रकाम चाललें आहे ? आंत येऊं कां नको ? "

त्यांचा आवाज ऐकतांच ताराबाई चट्दिशीं उठली व 'या या' ह्मणाली आणि हातांतली फळी उलटी करून भिंतीजवळ उभी करून ठेविली.

'तुह्मांला चांगलेंच ड्रॉइंग येतें ह्मणायचें. येथें आल्यापासून खूप फ़ायदा झाला.'

'येथें आल्यानें फायदा झाला हें केव्हांही नाकबूल करतां यावयाचें नाहीं. मला चित्रकलेची आवड पहिल्यापासून होतीच. पण मी माझ्या डोक्यानें वाटेल तें खरडीं आतां मास्तरांच्यामुळें शास्त्रशुद्ध माहिती झाली'

'तेथून तुह्मीं निघालां हें एका अर्थी बरें झालें नाहीं का?'

'पण तीच आळ न येतां निघालें असतें तर आनंद होता. आपल्याला सुद्धां मला पाहिल्यापासून ही वाईट मुलगी येथें कशी आली असें वाटलें असेल नाहीं? पण एवढेच उपकार ह्मणायचे कीं, आपण येथें आल्यापासून देवमाणूस ह्मटलें होतें. पण खरेंच आपल्याला त्या आंगठीबद्दल काय वाटलें?'

'ती तुह्मीं घेतली असेल हें मला शक्यच वाटेना. बाकी तेथें आतां सर्वांची खात्री झाली आहे. कारण राजेसाहेबांची आंगठी सांपडली. त्यांना तर तुह्मांला घालवल्याबद्दल फार खेद होतो आहे. तुमचे शंकरमहाराज तेथें येऊन तुह्मांला निर्दोष करून गेले.'

'काय? गुरुदेव माझ्याकरतां तेथें गेले? अहाहा! खरा साधु हाच. गुरुदेव, हे आपले उपकार कसे फेडूं?' असें ह्मणतां ह्मणतां तिनें हात जोडले व तिच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले.

तें पाहून आपण पुढें होऊन हिचे अश्रू पुसावे असें आबासाहेबांच्या कितीदां तरी मनांत आलें; पण त्यांनीं आपली गंभीरता व सज्जनता सोडली नाहीं.

'तारावाई, मी तुह्मांला बरें वाटण्याकरितां ही बातमी सांगितली. पण तुह्मांला दुःख दिल्यासारखेंच झालें.'

'छे. छे. ह्या बातमीबद्दल मी आभारीच आहे.' ती लगेच डोळे पुसून पदर सांवरीत ह्मणाली.

'छे बुवा ! कोणाच्याही डोळ्यांतून पाणी आलें कीं, आपल्याला नाहीं आवडत. आह्मीं पुरुष असे कधीं रडत नाहीं.'

'ईश्वर तशी वेळ नच आणो. मी सुद्धां आतां रडणार नाहीं.'

'आतां तुमचीं चित्रें दाखवा पाहूं ?'

'दुसऱ्याला दाखवण्याजोगीं माझीं चित्रें सुंदर नाहींच आहेत.'

'मग काय नाहीं दाखवीत ? बरें राहिलें. मी आपला हेंच बघतों.' असें ह्मणून स्वारी भिंतीकडे गेली आणि तो फळा घेतला. तों त्यांत त्यांचेंच चित्र क्रेऑननें मोठें करायचें काम सुरू होतें. त्यांनीं हातांत चित्र घेऊन ताराकडे पाहिलें, तों ती खालीं मान घालून कांहीं तरी चाळा केल्यासारखें करीत होती. तोंडावर लाजेची लाली चढली होती.

फोटो पाहून झाल्यावर तो पुनः होता तसा ठेऊन आबासाहेब ह्मणाले, "तुह्मीं शिकायला हाच फोटो कोठें मिळवला ? कां मास्तरांनीं दिला ?"

ह्या प्रश्नानें ताराबाई जरा सावध झाली. " कोणाचा तरी फोटो घेऊन मोठा करायचा आणि यांच्या आलबम्‌मध्यें निघण्याजोगा असा हाच फोटो दिसला व तो करायला सोपा वाटला ह्मणून केला."

" लीलाताईनें हाच केला का ? "

" मास्तरांना दाखवायचा हा फोटो नव्हेच. हा मी खाजगी वेळांत चितारलेला आहे. आतां मीं तो काढूनच ठेवणार आहे."

' खरेंच, मला तुह्मीं येथें फार वेळ उभा राहूं नको ह्मणून नोटीस नाहीं दिली ?'

" कां ? त्या दिवशींच्या तेथल्या बोलण्याची आठवण झाली वाटतें ? पण मी तेथें नोकर होतें. नोकरांशीं फार वेळ बोललेलें आपल्या मामींना खपलें नसतें. येथें मी मुलगी अगर पाहुणी आहे."

" होय, हा फरक आहे खरा. मग येथें स्वस्थपणीं बसून बोलूं कां ? " असें ह्मणून एक खुर्ची ओढून ते बसले व ह्मणाले, ' हं, तुह्मीही बसा "

ताराबाई ह्मणाली, " तें मात्र योग्य नव्हे. केव्हांही आपण असें एका बाजूच्या खोलींत फार वेळ बोलत बसणें जगाच्या दृष्टीनें वाईट पण आपल्या हिताच्या दृष्टीनेंही वाईटच. ह्या माझ्या बोलण्यानें आपल्याला राग येईल ह्मणून मीं सुद्धां दोन मिनिटें बसतें पण परिणामीं खरें तेंच नेहमीं बोलावें नाहीं का ? "

" हिताच्या दृष्टीनें काय वाईट हो ? "

" आमची आजी ह्मणे, तरुण तरुणी फार फार एकत्र गप्पा

मारूं लागेल म्हणजे तीं वाहवण्याचा पुष्कळदां संभव असतो आणि परिणामीं तें अहितकारक ठरतें."

"पण केव्हांही वाईट परिणाम होऊं नये व जगाची भीति राहूं नये म्हणून जर माझ्यासारख्यानें तुम्हांला लग्नाची मागणी घातली तर ती तुम्ही पत्कराल कां? तुम्हाला योग्य पती मी आहे असें तुम्हांला वाटतें कां?"

हा अनपेक्षित प्रश्न ऐकून तारा घाबरली. पण लगेच ती सावध झाली आणि मोठा धीर करून म्हणाली, "मी आपल्याला माझ्या आईची हकीकत सांगितलीच. ह्या प्रीतिविवाहापायीं मीं अनाथ झालें. ती झुरून मेली तसेंच आपलें होईल. आपण राजे, मी गरीब मुलगी. आपल्या घरांत मला कोणी बरें पहाणार नाहीं." "आपल्या वडिलां-सारखा मीं चोरटा व्यवहार करूं इच्छित नाहीं आणि मी राजरोस लग्न केल्यावर माझ्याकरितां माझ्या आप्तांना आपला स्वीकार करावा लागेलच." आबासाहेब म्हणाले.

"खरोखर ह्या आपल्या धैर्याबद्दल मी आपले किती उपकार मानूं? पण माझें आपल्यावर खरं खरें अंतःकरणापासूनचें प्रेम आहे. त प्रेम आपल्याशीं लग्न करून आपल्याला दुःखांत ढकलावें असें म्हणत नाहीं. कारण आपल्या आजोळच्या माणसांचा मला परिचय आहे. माझ्याशीं लग्न केलेलें त्यांपैकीं एकालाही खपायचें नाहीं आणि माझ्या एकटीच्या सुखाकरितां आपल्या आप्तांच्या माणसांना दूर कर-ण्यापेक्षां असें लांब राहून आपल्यावर निरपेक्ष प्रेम करावें हेंच मला आवडतें."

" मग काय ? राणी होऊन माझ्याबरोबर संसारसुख भोगायची आपली इच्छा नाहीं ? मी आपल्या योग्यतेचा आहे असें आपल्याला वाटत नाहीं ? "

" खरोखर भाग्यवानालाच असा पति मिळेल. मग तें भाग्य माझ्या वांट्याला असतें तर मला कसें आवडलें नसतें ? पण माझ्या भाग्याचा विचार करतांना आपल्या सुखाचा नको कां विचार करायला ? थोड्याशा सुखाकरितां जर आपल्याला कायमचा त्रास होऊं लागला तर त्यांत काय फायदा ? ह्या माझ्या स्पष्ट उत्तरामुळें आपण माझ्याबद्दल गैरसमज मात्र करून घेऊं नका. "

" मग हेंच तुमचें उत्तर ना ? " तारानें मान खालीं घातली. निमिषमात्र तिच्याकडे पाहून आबासाहेब बाहेर गेले.

—[ ? ]—

## प्रकरण चौदावें.

आज आबासाहेब जाण्याच्या तयारीच्या गोष्टी बोलत होते. तारा नाहीं ह्मणाल्या पासून त्यांना मुळींच स्वस्थता वाटत नव्हती. तेव्हां आपण येथून दुसरीकडे गेल्यास आपल्याला बरें वाटेल अशी त्यांची कल्पना होती. अण्णासाहेब रहाण्याचा आग्रह करीत होते. आत्याबाई ह्मणाली, " झाले कां तुझे पुष्कळ दिवस ? रहा चार दिवस. पुनः केव्हां येणार ? आतांच किती तरी दिवसांनीं आलास? ,, " पण आतां आत्या, लीलाताईच्या लग्नाला लवकरच येईन. सांगा ताईसाहेब किती अगोदर येऊं ? "

" आधीं आह्मींच येऊं तुमच्या लग्नाला बरें ! "

" खरेंच आबासाहेब, आमची ताराबाई घ्या करून तुह्मांला. खाशी राणी शोभेल नाहीं ? " आईसाहेब ह्मणाल्या. त्याबरोबर ताराबाई तेथून जाऊं लागली आबासाहेब दुसरीकडेच बघूं लागले.

" ताराबाई, बैस. जाऊं नको. आतांच कांहीं आबाला लाजायला नको. पण सांग, आबा तुला आवडतो कां ? "

" खरेंच हा जोडा चांगला दिसेल नाहीं ? " आण्णासाहेब ह्मणाले.

" दादानें कबूल केलें तर खरोखरच शोभेल. ' आईसाहेब ह्मणाल्या.

" पण आई—मामी म्हणत होत्या कीं, राजकन्याच करायची असा त्यांच्या आजा आजींचा आग्रह आहे. " लीलाताई ह्मणाली.

" आपण राजकन्याच देऊं. " मागून ध्वनी आला. सर्व बघतात तों शंकर महाराज ! सर्वांनीं भराभर वंदन केलें. तारानें सर्वांमागून नमस्कार केलान् व गुरुदेवाकडे अशा कांहीं कृतज्ञ दृष्टीनें पाहिलें कीं, न बोलतांच सर्व भाव तिच्या मुद्रेवरून त्यांना कळून आला.

" कां ? आबासाहेब कसें काय ? ठीक आहे. तिथिनिश्चय कधीं ? "

" अजून जमलें नाहीं. " लीलाताई म्हणाली.

" मी म्हटलें आमची ताराबाई कर. " आण्णासाहेब ह्मणाले

" असें ! असें ! विनोद चालला होता. पण आबासाहेबांना

राजकन्याच हवी आहे आणि ताराबाईला लोक आपण होऊन नेणार आहेत. बरें अण्णासाहेब, माझी तारा तुह्मांला येथें पटतें कां ? कां तिला तिच्या घरीं नेऊन टाकूं ? तिची इस्टेट संपली, पोटापुरतें आहे.'

" छे. छे. गुरुदेव, हें काय बोलणें ? माझी लीला तशी ती."

" तारा, तुला त्रास वाटत नसल्यास रहा. चार दिवसांकरितां कशाला बदलाबदली ? चातुर्मास संपला कीं पहिल्या मुहूर्तावर तुझें लग्न करायचें. " सगळींजणें आश्चर्यचकित झालीं. आईसाहेब म्हणाल्या, " तिथीसुद्धां ठरली ? स्थळ कोणचें ? "

" अग,कर्ता करविता एका दिवसांत सर्व जुळवतो त्याचें अगोदरच ठरलेलें असतें. आपल्याला समजत नाहीं. "

" बरें आबासाहेब, आतां रहा नी मग त्यांकडे जा झालें. "

तो दिवस सर्वांचा गडबडींत गेला संध्याकाळीं गुरुदेव गेले. दुसरे दिवशीं सकाळीं कपाळ दुखतें ह्मणून तारा आपल्या खोलींत पडली होती. तिच्या समाचाराला एकदां आईसाहेब व लीला येऊन गेलीं. पण विशेष कांहीं नाहीं. उगीच पडसें असेल ह्मणून ती एकटी पडली होती. जवळ टेबलावर एक सोन्याचें घड्याळ होतें. इतक्यांत जायचें ह्मणून सांगायला आबासाहेब तेथें आले. तोंच आईसाहेबांनीं मुद्दाम चहा पाठविला आहे ह्मणून एक चांदीचा मोठा पेला घेऊन शागीर्द आला व टेबलावर ठेवून गेला.

" कां, अजून चहा व्हायचा आहे ? "

" नाहीं कपाळ दुखतें ह्मणून पडलें होतें. ह्मणून आईसाहेबांनीं पुनः पाठवला. किती प्रेमळ माणसें ? " तारा ह्मणाली.

" कशानें तुमचें कपाळ दुखतें आहे ? घ्या चहा. मी सुद्धां उठतोंच. तुह्मी आजारी आहां हें मला ठाऊक नाहीं. जायचें ह्मणून सांगायला आलों. "

"त्रास होण्याइतकें माझें कपाळ दुखत नाहीं. रोजचा उद्योग करूं नयेसें वाटतें आहे इतकेंच. त्याला असें चहासारखें गोड औषध मिळालें तर लवकर थांबेल. "

आबासाहेब हंसून ह्मणाले, " वा ! ! थोडक्यांत आहे. घ्या तर मग. "

" पण पेला फार मोठा आहे. अर्धा आपण घ्या. अर्धा मी घेतें. "

" छे, मला ह्या वेळेस नको आहे. "

" मला कीं नाहीं येथें आल्यापासून मी बरोबरीचीच आहे असें वाटतें. थोर लोकांना गरिबानें असें ह्मणूं नये हें लक्षांत रहातच नाहीं. "

" छे, छे, भलतेंच कांहीं तरी तसें ह्मणाल तर मग मी सर्वच पिऊन टाकीन. "

" पण मी आतां मुळींच देणार नाहीं. " असें ह्मणून ताराबाईनें चहा बशींत ओतून प्यायला सुरुवात केली व पुनः थोडा बशींत घेतला. इतक्यांत पेल्यांत उरलेला चहा आबासाहेबांनीं एकदम तोंडाला लावला. त्याबरोबर तारा रागाचा आव आणून ह्मणाली, " हें काय हो ! ! " पण पुढील शब्द तोंडांतून न येतां हसायला मात्र आलें.

" जाऊंद्या ! कशाला रागवायचा प्रयत्न करतां ! मनाजोगें झालें. मी चहा प्यावा अशीच तुमची ह्या वेळेस इच्छा होती. होय ना ?"

" पण सांगा, आपल्या जवळ दुसरें मनुष्य बसलें असतांना आपण एकट्यानें एखादी गोष्ट खायची प्यायची बरी दिसते कां ?"

" ह्मणून ही घ्या. मी सुद्धां तुह्मांला थोडी सुपारी देऊन बाकीची तोंडांत टाकतों. बरें, आतां मी जातों ह्मणून विचारायाला आलों आहे; पण आधीं सांगा, कपाळ कां दुखतें ?"

" सहज. "

" डोकें थोडें दुखतें ह्मगतां पग चेहरा तर फार उतरलेला दिसतो. "

" रात्रभर झोंप आली नाहीं ह्मणून-"

" खरें सांगूं कां ? कालच्या गुरुदेवांच्या भाषणानें मनाला तळमळ लागून राहिली आहे. "

" ते तुह्माला कांहीं बोलले कां ?

" आपल्या सर्वांच्या देखत ह्मगाले तेंच."

" तुह्मांला वाईट वाटण्याजोगें काय बरें ह्मगाले ? आठवत नाहीं. " तारानें खालीं मान घातली. " सांगा पाहूं काय तें ?" आबासाहेब ह्मणाले.

" लग्नाबद्दल-" अडखळत तारा ह्मणाली.

" झोंप न येण्याजोगें त्यांत काय होतें ? लग्न करूं ह्मणाले "

" पग मला तें करायचें नाहीं-"

" कां ? "

" उगीच. "

" हात्तेच्या. त्यामुळेंच त्रास झाला कां ? जाऊंद्या ते विचार. अशानें प्रकृती बिघडेल."

बोलतांना त्यांच्या हातांत घड्याळ होतें. ते त्याच्याशीं खेळत होते ते सहज लक्ष जाऊन ह्मणाले—" हें तुमचें घड्याळ वाटतें ? "

" हो, हें घड्याळ व ती आंगठी माझ्या वडिलांचीं स्मृतिचिन्हें ह्मणून माझ्या आईनें ठेविलीं होतीं व माझ्या आजीनें तीं कळकळीनें माझ्या लग्नांत आह्मा दोघांना द्यावयासाठीं जपून ठेवलीं होतीं. परवां आंगठीचा गोंधळ झाल्यामुळें हें मीं येथें आल्यापासून वापरतें. "

" खरेंच, घड्याळ किती उत्कृष्ट आहे ? " असें ह्मणून त्यांनीं उलथें पालथें करतां करतां त्याची मागची तबकडी घट्ट बसली होती ती चाकूनें उघडायला आरंभ केला.

" आपला कारभारी स्वभाव संस्थानिकाला योग्य आहे; पण माझें गरिबाचें घड्याळ फोडाल. " " फोडलें तर नवें देईन. "

" नको नको, ह्मणजे कोणीतरी चोरीचा आळ घ्यावा."

" अरेच्या !! हें पहा निघालें. " असें ह्मणत आंत पहातात तों आंत नांव. तें वाचून ते गप्प बसले. त्यांनीं तें पुन्हा लावलें व मुकाट्यानें ठेवलें.

" बरें जातों मी. "

" आतां केव्हां येणार ?"

" आपण बोलावलेंत तर. "

" मी कशी बोलावीन ? "

" बोलवाल, जरूर बोलवाल. "

——[ ? ]——

## प्रकरण पंधरावें.

आबासाहेब तथून थेट आजोळी आले. तोंपर्यंत तेथें किती तरी उलाढाली झाल्या होत्या. माथेरानला गेलेले धनाजीराव परत आले होते व त्यांनीं निरोप आणला कीं **इंदिरा** मेली, त्यावेळीं त्यांना एक मुलगी होती; पण थोडे दिवसांपूर्वीं तिची आजी मेली तेव्हां ती मुलगीही मोलकरणी बरोबर कुठेंशी निघून गेली. त्यावेळेस तिचे पैसे एका वकिलाच्या ताब्यांत होते; पण मोटारच्या अपघातानें तो वकील त्यावेळीं हॉस्पिटलमध्यें पडला होता. अर्थात त्या मुलीला तो पैसा वेळेवर उपयोगी पडला नाहीं. तिनें त्याला एक दोन पत्रें व तारा पाठविल्या पण उत्तर मिळालें नाहीं. आतां तो बरा होऊन आला आहे; पण त्या मुलीचा पत्ता लागत नाहीं, ह्मणून त्यानें तो बंगला रिकामा करून मालकाला द्यायचा व ंतलें सामान लिलांव करायचें ठरविलें आहे. ही बातमी ऐकतांच राजेसाहेबांना फार दुःख झालें व आपल्या स्वार्थीपणानें इतकें झालें तरी योगायोगानें मुलगी आपल्या घरीं आली असतां तिलाही आपण घालवून अन्नाकरितां देशोधडीस लावली. असें वाटून त्यांना फार वाईट वाटलें. बरें भाऊसाहेबांना बोलावून कांहीं विचारावें तर ते त्यांच्यावर

थोडेसे रागावले होते. मग राजेसाहेबांनीं धनाजीरावाला तो बंगला विकत घ्यायला व त्यांतील सामानसुमान मुळींच हलवायचें नाहीं असें वकिलाला सांगायला पुनः माथेसनला पाठवला आतां त्यांना सारखा **ताराचा** ध्यास लागला होता. कोठेंच चैन पडेना. अशा स्थितींत कांहीं दिवस गेले. तों आबासाहेब आले. ते राजेसाहेबांना एकांतांत गाठून ह्मणाले, " मामासाहेब, तुमचें नांव असलेलें एखादें सोन्याचें घड्याळ कधीं हरवलें होतें का ? " " माझें घड्याळ इंदिरेजवळ होतें तें तुला कसें पहायला मिळालें ? " मामासाहेब, इंदिरा कोण ? "

" आतां खरें कशाला लपवूं ? तुझी मामी."

" माझी मामी ? "

" हो. "

" ह्मणजे ? वहिनीसाहेब कोण ? "

" ह्या श्रीमंत मामी. त्यांच्या आधीं एका गरीब कुमारिकेशीं मी शास्त्रविधीनें लग्न केलें होतें पण ह्या दुसऱ्या लग्नाच्या व राज्याच्या खटपटींत थोडे दिवस तिच्याकडे दुर्लक्ष झालें आणि तिला आणून वैभवावर बसवायच्या पूर्वींच ती मेली. "

" मग तारा आपली कन्या तर ? "

" होय निःशंक होय. "

" तें घड्याळ व ही आंगठी तिच्या बापाचें स्मृतिचिन्ह म्हणून होत्या. "

" तूं कोठें पाहिलस ? "

" असेंच सांपडलें. "

" अरेरे, तर मग तुला तारा नाहींच भेटली. माझ्या दारांत आपण होऊन आलेल्या माझ्या बाळेला मी पुन्हां देशोधडीस लावली. तेव्हां तिनें पोटाकरितां विकलें असेल; पण हें तिच्याजवळ स्मृतिचिन्ह म्हणून होतें हें तुला कसें कळलें ? "

" मला तसें एकदां त्या ह्मणाल्या होत्या. परवां सहज एक घड्याळ दिसलें तर त्याच्या आंत तुमचें नांव. "

" तें मला दिसेल कां ? "

" हो. "

" कोठें ? "

" माझ्याबरोबर श्रीनगरला याल तर तेथें मी तें वाड्यांत दाखवीन. "

" येथें मागितलें तर ? "

" तीं माणसें कसें पाठवतील ? आणि आपण निमित्त तरी काय सांगणार ? माझं ऐका, आपण तेथेंच चला. "

" पण येथें काय निमित्य सांगणार ? "

" ताराबाईचा शोध म्हणून. "

" एका नर्सच्या शोधाकरितां मी जातों ह्मणणें बरें दिसेल कां? "

" पण स्वतःच्या मुलीच्या शोधाकरितां जाणें कसें दिसेल ? आज ताईसाहेब हरवल्या तर मामीसाहेब आपल्याला येथें बसूं देतील कां ? ती गरीब मामी असती तर तिनें तरी असें बसूं दिलें असतें कां ? आपण सर्व खरी हकीकत आजोबांनां सांगा व चला. "

आबासाहेबांची सूचना विचारांतीं राजांना पटली व तशी त्यांनीं व्यवस्था केली. झालेल्या चुकीबद्दल आतां रागावण्यांत कांहींच अर्थ नव्हता म्हणून चीफसाहेब गप्प बसले.

---

## प्रकरण सोळावें.

आबासाहेब गेले पण ताराचा उत्साहही गेला. ती हळु हळु त्यांच्या ध्यासानें खंगत चालली. तिनें मनाशीं पुष्कळ विचार केला; पण कित्येक दिवस खऱ्या आपलेपणाचें कोणी मनुष्य नसल्यामुळें आतां तिला जिव्हाळ्याचें कोणी मनुष्य असावेंसें वाटूं लागलें. आबासाहेबांची मागणी तिनें नाकारली पण महाराजांनीं लग्न करूं म्हणतांच ती भ्याली. तिला वाटलें, 'भलत्याच एखाद्या ठिकाणीं महाराजांनीं ठरवलें तर, मग त्यांच्या उपकाराच्या मोबदल्यांत नाहीं कसें म्हणूं ? इकडे ह्यांचें लग्न झाल्यावर मग काय उपाय ? ते राजे आहेत. त्यांना कोणीही मुलगी देईल. माझा मात्र मग इलाज चालायचा नाहीं. मी जरी मोठा स्वार्थत्याग करायला निघालें होतें तरी आतां वाटतें तितकी माझी ताकद नाहीं. आज ह्या पंधरा दिवसांच्या अनुभवानें असें वाटतें कीं, मला एकलकोंडें रहाणें झेपणार नाहीं. माझा स्वभावधर्म दुसऱ्याच्या आश्रयानेंच राहाण्याचा आहे. मग तें दुसरें कोण ? आतां तें कसें व्हावें ? किती खट्टू मनानें मी त्यांना घालवलें ? खरेंच. तेव्हां मला माझ्या मनाची परीक्षाच झाली नव्हती मला काय वाटतें

तें आतां मला समजलें. विरह ह्मणजे काय तें मी आतां ओळखलें. मग आतां ते कसे येतील ? कोण बोलावील ? माझा बदललेला विचार त्यांना कसा कळणार ? पत्र लिहूं कां ? होय. दुसरा इलाज नाहीं.' असा मनाशीं निश्चय करून एक दिवस सकाळीं उठून ती पत्र लिहिण्यास बसली हल्लीं विचार करून करून तिचें डोकें फार तापलें होतें. रोज तिला थोडा तापही येत असे. तरी ती तसें कोणा-जवळ न बोलतां हळु हळु घरांत जाऊन तेथें चहा घेऊन, 'मी जरा पडत.' असें सांगून आपल्या खोलींत आली व दार लोटून एक कागद घेऊन पत्र ल्याहायला बसली. किती विचार केला पण मनाजोगता मजकूर जुळेना. शेवटीं,

चरणसेवेशीं सा. न. वि. वि.—

"मी त्या दिवशीं आपली विनंती अमान्य केली; पण आतां मला पश्चात्ताप वाटत आहे त्याचीं कारणें पुष्कळ आहेत. तीं यावेळीं मला लिहितां येत नाहींत. तरी आपण तातडतोब यावें. वाट पहात आहे."

एवढेंच पत्र लिहिलें. पण नुकतेंच वाड्यांतून आल्याचे श्रम, त्यांत विचार, तेवढ्यानींच तिला त्रास झाला. तिचें डोकें गरगर फिरूं लागलें. कांही सुचेना. तोंच दार उघडून आबासाहेब आंत आले—

'कां, कसलें पत्र लेखन ?' असें ह्मणून ते तिच्याकडे बघ-तात तों ते आलेले पाहून उभी राहिलेली तारा धाडकन् खालीं पडली. तिचा तोल जातो ह्मणून पुढें झालेल्या आबासाहेबांच्या पायापर्यंत ती पडते, तोंच त्यांनीं तोल सांवरला. नाहीं तर ती जमिनीवरच पडायची.

त्यांनीं हळूच तिचा तोल धरून तिला जवळच्या पलंगावर बसवली; पण ती तितक्यांत थोडी सावध झाली आणि त्यांच्या हाताला धरून पलंगावर आडवी झाली. " घाबरूं नका. जरा भोंवळ आली. ओरड करूं नका. " एवढेच शद्ब पलंगावर पडतां पडतां ती बोलली व मग घट्ट डोळे मिटलेन्. आबासाहेबानांही दोन मिनिटें स्वस्थ बसणेच श्रेयस्कर वाटलें; तों त्यांची दृष्टी टेबलावरील पत्राकडे गेली. जवळच पत्ता लिहिलेला लिफाफाही होता. आतां शंकाच उरली नाहीं. त्यांनीं तें पत्र खिशांत घातलें. तारा सावध होऊन उठून बसायचा प्रयत्न करूं लागली.

" नको नको. जरा पडा. पुनः घेरी येईल."

" पण माझें येथलें पत्र ?

" तें कोणाला पाठवायचें होतें ? "

तारेच्या चेहऱ्यावर लज्जा पसरली. " कुठें आहे ? "

" मालकाला मिळालें. "

" पण आतां आपण कसे आलांत ? "

" बोलावलें ह्मणून. "

" खरोखरच मला माझें मन ओळखतां आलें नाहीं."

" पण मी गरिबाच्या मुलीशीं लग्न करणार नाहीं. " आबासाहेब हंसत हंसत ह्मणाले.

" आतां तें कितीदां काढायचें ? माझें मन सर्वस्वी आपल्या आधीन झालें आहे. ह्याची मला कल्पना नव्हती. वस्तु जवळ असली ह्मणजे तिची किंमत नसते "

" ह्मणूनच मी आतां लांब जातों, मात्र मला जरा घड्याळ

पाहिजे आहे. कोठें आहे ? " तिनें उशीखालचें घड्याळ दिलें.

तारा खोलींत आली इतक्यांत ह्यांची मोटार दत्त झाली. तारा आपल्या विचारांत असल्यामुळें तिला कळलें नव्हतें. युवराजांना एकदम आलेले पाहून सगळीं स्वागतार्थ धांवलीं. ते माडीवर येऊन अण्णासाहेबांशीं बोलेचालेपर्यंत आबासाहेब आंत आत्याकडे गेले. तेव्हां त्या ह्मणाल्या, " लीला सकाळींच फिरायला गेली आहे. तारा आजारी असल्यामुळें खोलींत आहे. " असें ऐकतांच आबासाहेब खोलींत आले

---

## प्रकरण सतरावें.

घड्याळ पाहून राजेसाहेबांची शंका दूर झाली. मग अण्णासाहेब पूजेला निघाले तेव्हां आबासाहेब ह्मणाले, " मी व राजेसाहेब ताराबाईंना भेटायला त्यांच्या खोलींत जातों आपली कांहीं हरकत नाहीं ना ? " " छे. हरकत कसली ? मलासुद्धां तिचा समाचार घ्यायला जायचें आहे ! आज तिची तब्येत जरा बरोबर नाहीं, असें मला कळलें आहे. " असें म्हणून सगळीं निघालीं. लीला तेथें होती. अण्णासाहेब ह्मणाले, " मामा, ही आमची लीलाताई. "

अण्णासाहेब ह्मणाले, " बाळ तारा, आतां कसें वाटतें ? हे पाहिलेस कां आबासाहेबांचे मामा आपल्या येथें आले आहेत. असें गोरेंमोरें तोंड कां केलेंस ? "

आबासाहेब चटदिशीं सहज गेल्यासारखे तिच्याजवळ जाऊन

ह्मणाले, "भिऊं नको." "ही कीं नाहीं फार भिडस्त आहे." अण्णासाहेब म्हणाले, " मी आतां देवखोलींत जातों;कारण आज पाहुण्यांना लवकर जेवायला मिळालें पाहिजे. " असें ह्मणून ते गेले.

" ताईसाहेब, मामांना पुन्हां चहा लागतो तेवढा आणवा बरं-" लीला गेली. तशी आबासाहेब ह्मणाले, " हें घ्या घड्याळ. तुह्मीं भिऊं नका. "

" खरोखर मी आंगठी घेतली नाहीं. ह्यापेक्षां मी जास्त काय सांगणार ? "

" ताराबाई, तूं अगदीं वेडी आहेस. मी तुला आंगठीबद्दल विचारायला आलें नाहीं. तर बाळ, तुला एक आनंदाची बातमी सांगायला येथें आलों आहे—तारा, माझ्या तारे, तूं माझी कन्या आहेस. मीच तुझा बाप **प्रताप.** तुझ्या आईच्या प्रेमामुळें भुलून मी तिच्याशीं लग्न लावलें; पण योग्यवेळीं स्पष्ट बोलण्याचा धीर न झाल्यामुळें दुसरें लग्न करावें लागलें. मग संधी पाहून वडिलांना खरी हकीकत सांगून तिला येथें आणणार होतों, पण त्याच्या पूर्वींच ती गेली. भेटायला येण्याचें पत्र व गेल्याचें पत्र दोन्ही एकदमच मला मुंबईस मिळालीं. पण त्यांत मूल झालें आहे हा उल्लेख नव्हता व ती गरोदर असल्याचेंही माझ्या कानावर आलें नव्हतें. त्यामुळें मी पुढील चौकशी केली नाहीं. सगळाच प्रकार चमत्कारिक झाला. भवितव्य चुकविण्यास कोण समर्थ आहे ? बाळ, तुला दिलेल्या त्रासाबद्दल मी आतां तुझी माफी मागतों. " हें ऐकतांच तारेचे डोळे फिरूं लागले. तिनें उशीवर डोकें टेंकलें. इतक्यांत शागिर्द चहा घेऊन आला. राजेसाहेबांनीं प्रथम एक पेला हातांत घेऊन ताराला आग्रहानें

पाजला. मग आबासाहेबांनीं व त्यांनीं घेतला. आतां तिला जरा हुशारी वाटली; तिनें ईश्वराचे अत्यंत आभार मानले. पुनः राजेसाहेब तिच्या औषधपाण्याची चौकशी करूं लागले. तेव्हां ती ह्मणाली, "आजी मेल्यापासून आज प्रथमच मला प्रेमाचा चहा मिळाला आहे. त्यानें मी आतां बरी होईन. हे सर्व माझ्या गुरुदेवाचे उपकार." मग आपण येथें कशी आलें हें तिनें सांगितलेंन्. दुपारीं भोजनोत्तर युवराजांनीं आण्णासाहेबांजवळ येण्याचें खरें कारण सांगितलें.

"ह्मणूनच गुरुदेव ह्मणत, राजकन्या संभाळा." "उद्यां आह्मी निघतों." असें ह्म तांच ह्यांना अवघड वाटूं लागलें.

दुपारीं जेवण झाल्यावर आबासाहेब आणि लीला ताराबाईच्या खोलींत बसलीं होतीं. तेव्हां तारा ह्मणने, "मला नाहीं तिकडे यावेंसें वाटत."

"पण मी आहे ना बरोबर?" आबासाहेब ह्मणाले.

"पण तुह्मी किती दिवस रहाल?"

"तिला सावत्र आईची भीति वाटते—"

"पण खरेंच, आतां मी तुह्मांला काय बरं ह्मणूं?" लीला ह्मणाली.

"असें काय बरें ताईसाहेब? तुह्मीं मला ताराबाईच ह्मणा. मला तें फार आवडतें."

"आबसाहेब, आपण काय ह्मणणार? आतां आपलें नातें ठरलें."

"पूर्वीं नव्हतें कां?"

"तें आपलें आह्मी ह्मटल्यामुळें; पण आतां त्या खऱ्या

राजकन्या ठरल्या." लीला ह्मणाली.

" आधींचें बदलून राजकन्या झाल्या, पुनः कोठें तरी राणी होतील. ह्मणजे एकसारखीं नांवें बदलत बसायला हवें, त्यापेक्षां एकदम राणीसाहेबच ह्मणाना."

" सदा कसली हो थट्टा ?" लीला ह्मणाली. तारानें मान खालीं घातली.

युवराज सर्व हकीगत कळवायला पुढें गेले व ताराला घेऊन यायचें काम आबासाहेबांवर आलें. आबासाहेब लटकेच ह्मणत होते कीं, ' मीच पुढें जातों, आपण मागून या ' पण मनापासून मागून जाण्यांतच त्यांना आनंद वाटला. दुसरे दिवशीं तारा येतांच हीं दोघें निघालीं. आण्णासाहेब गुरुदेवाच्या आज्ञेशिवाय पाठवायला तयार नव्हते; पण त्रिकालज्ञ मूर्ति ! त्यांचें सकाळींच पत्र आलें. घरच्या स्पेशल मोटारींतून जायचें ठरलें. तारा सर्वांना नमस्कार करायला आली, तेव्हां सर्वांना अतिशय दुःख झालें. आपल्या गुणांनीं सर्वांचीच ती आवडती झाली होती. असो.

दोघे मोटारींत बसलीं. एकांत मिळतांच आबासाहेब ह्मणाले, बोलावल्यामुळें आलों ह्याचा पुरावा आहे बरें." तारा ह्मणाली, " आतां किती चिडवायचं " " मोटार दाराशीं आली. दोघें आंत येतांच ' बाई आल्या, बाई आल्या ' ह्मणून कुमार, ताईसाहेब बिलगलीं.

आबासाहेब बाजूला झाले. ताराबाई आंत यायला संकोच पावूं लागली. युवराज पुढें होऊन हात धरून ह्मणाले, 'ये बाळ ये. हें तुझें सत्तेचें माहेर आहे. पुढें होऊन आईला नमस्कार कर.' दारांत येऊन ताराचा हात धरून खुद्द राजेसाहेब तिला आंत नेतात हें पाहून नोकर माणसें चकीत झालीं. इतक्यांत गुरुदेव दत्त ह्मणून उभे! ते आल्याची वर्दी ऐकून चीफ साहेब व आईसाहेब आलीं. तशी ताराबाईचा हातांत धरून गुरुदेव ह्मणाले, 'आईसाहेब, वहिनीसाहेब, माझी ही राजकन्या आतां तरी आबासाहेबांना चालेल का? आबासाहेब, या आणि ह्या राजकन्येचा हात माझ्या समक्ष आपल्या हातांत घेऊन तिच्या संरक्षणाची जबाबदारी घेतल्याचें वचन द्या. बाळ, राणी झाल्यानंतर राण्यांनीं जें करावें असें तुला वाटत होतें तें कर हां! युवराज ह्या वाग्निश्चयाला तुमची कबुली आहेना? कसं चीफ साहेब?' सर्व ह्मणालीं, "आपली असली ह्मणजे आमची आहेच. आह्मी कोण देणार?" 'तारा भिऊं नको आतां. तूं श्रीमंताची मुलगी आहेस. आतां तुझा कोणी अव्हेर करणार नाहीं. कोठें आहेत कुमार? ही नवी अक्क मिळवून दिल्याबद्दल पेढे द्या' असें ह्मणून महाराज बोलतां बोलतां उठून सुद्धां गेले. हा चमत्कारिक योगायोग घडला तरी कसा असा प्रत्येकजण विचार करूं लागला. ईश्वरी कर्तृत्वाची सर्वांस धन्यता वाटली परमात्म्याची अघटित लीला काय बरें करणार नाहीं? असो.

आपल्या मुक्ताला व रमाबाईंना राजपत्नी ताराबाई विसरली नाहीं हें सांगणें नकोच. तिचें विलक्षण परिवर्तन पाहून त्या दीन स्थितींतल्या सोबतीणींना काय बरें वाटलें असेल ?

आतां लवकरच चीफसाहेबांच्या येथें वडील नात आक्कासाहेब यांचें लग्न खुद्द रायपुरालाच मोठ्या थाटामाटानें होणार आहे तरी आपण सर्वांनीं अगत्य यावें. इतकें सांगून आपणा सर्व बंधूभगिनींची रजा घ्यावी हें बरें.

समाप्त

म. ग्रं. सं. ठाणे. ग्रंथालय शाखा.
वा. क्र. २६५२ ग्रं. क्र. ........
दि. ३४१ .. न. ........



२००

**प्रकाशक:**—सौ. गिरिजाबाई केळकर,
न्यू प्रताप मिल, धुळें.

**मुद्रक:**—रावजी बाळकृष्ण उपासनी बहाळकर,
खानदेशवैभव प्रेस, धुळें ग. नं. ६ घर नं. २१०

## इतर संग्राह्य पुस्तकें :—


१ **तुमच्यातले कांहीं** [ **भा. १** ] [ चार सामाजिक गोष्टी ]

कि० २ आणे

२ **तरुण स्त्री आणि पुरुष** [ संगीत सामाजिक छोटें नाटक ]

कि० १० आणे

३ **भावयोग** [ संगीत सामाजिक नाटक ]

जूनमध्यें प्रसिद्ध होईल.

## पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें.

**द. ह. दीक्षित—**

**नवगृही–पाताळे यांचा वाडा.**

धुळें, प. खानदेश.

**समर्थ–छापखाना**

**आग्रारोड–धुळें,**

प. खानदेश.